२१-६-७६
क्र०/८३
सी
४०२

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला
क्रमांक ६

★

मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य
(सन १९३४ ते १९५४)

★

प्रकाशक
दे. गो. लांडगे
कार्यवाह, मध्यप्रदेश संशोधन मंडळ,
नागपूर

किंमत सव्वा रुपया
१९५६

मध्य प्रदेश संशोधन मंडळ
नागपूर. कडून सप्रेम भेट

मध्यप्रदेश संशोधन मंडळ ग्रंथमाला
क्रमांक ६

*

मध्यप्रदेशांतील संशोधनकार्य
(सन १९३४ ते १९५४)

*

प्रकाशक
दे. गो. लांडगे
कार्यवाह, मध्यप्रदेश संशोधन मंडळ,
नागपूर

किंमत सव्वा रुपया
१९५६

या पुस्तकाचे सर्व हक्क मध्यप्रदेश
संशोधन मंडळाकडे आहेत.

मुद्रक
जा. मा. वाचासुंदर,
नरकेसरी प्रेस, रामदास पेठ, नागपूर नं. १.

प्रस्तावना

सन १९३३ च्या डिसेंबर महिन्यांत नागपूर येथे महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें वार्षिक अधिवेशन झालें. त्या निमित्ताने महाराष्ट्रीय विद्वानांचा मोठा मेळावा नागपुरला जमला होता. या प्रसंगी म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या प्रोत्साहनाने कांही संशोधनप्रेमी गृहस्थांनी नागपुरांत संशोधन मंडळ स्थापन करण्याचा प्रयत्न केला. ता. २ जानेवारी १९३४ रोजीं सिटी कॉलेज मध्ये कै. नी. व. भवाळकर यांच्या अध्यक्षतेखालीं नागपुरांत जमलेल्या विद्वान स्त्रीपुरुषांची सभा होऊन 'वाङ्मयेतिहास संशोधन मंडळ' स्थापन करण्याचें ठरलें. पुढें या मंडळांत केवळ वाङ्मय व इतिहास यांचेंच संशोधन न होतां त्यामध्यें विविध शास्त्रे, कला व इतर विषय यांचेंहि संशोधन केलें जावें असें ठरून त्याला 'मध्यप्रांत संशोधन मंडळ' असें व्यापक नांव देण्यांत आलें. या मंडळाची पहिली सभा ता. १४ जानेवारी १९३४ रोजीं मकरसंक्रांतीच्या सुमुहूर्तावर भरली होती. तींत प्रस्तुत लेखकाने खामखेडच्या ताम्रपटावरील आपला लेख वाचून मंडळाच्या संशोधनकार्यास प्रारंभ केला. तेव्हापासून आतापर्यंत या मंडळाचें कार्य अविरतपणें चालू आहे. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या प्रांताला मध्यप्रदेश असें नांव देण्यांत आलें. त्याला अनुसरून संशोधन मंडळाच्या नांवांतहि बदल करणें जरूर झालें. सन १९५४ च्या जानेवारी महिन्यांत सभासदांच्या वार्षिक सभेंतील ठरावानुसार मंडळाचें नांव 'मध्यप्रदेश संशोधन मंडळ' असें ठेवण्यांत आलें.

सन १९५४ मध्यें मंडळाच्या स्थापनेला वीस वर्षे होणार म्हणून त्या प्रसंगाने या प्रदेशांतील प्राचीन–इतिहास-संशोधनाचा आढावा घ्यावा या उद्देशाने प्रस्तुत लेखकाने त्यावर एक लेख लिहून तो मंडळाच्या सभेंत ता. ५ एप्रील १९५३ रोजीं वाचला. त्या लेखाच्या प्रकाशनासाठीं नागपूरच्या 'तरुण भारत' या सुप्रसिद्ध दैनिक वृत्तपत्राचे संपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांच्याशी बोलत असतां तशाच प्रकारचे गेल्या वीस वर्षांतील विविध विषयांच्या संशोधन कार्याचा आढावा घेणारे लेख अधिकारी विद्वानांकडून लिहवून घेऊन १९५४ सालीं मंडळाच्या विंशतिवार्षिक संमेलनाच्या प्रसंगी त्यांचें पुस्तक प्रसिद्ध करावें अशी कल्पना सुचली. तिला मूर्त स्वरूप देण्याकरितां आवश्यक तो द्रव्यनिधि मंडळाजवळ नव्हता. हीं अडचण जाणून श्री. भाऊसाहेब माडखोलकरांनी 'तरुण भारतां'त हे सर्व लेख छापून केवळ नाममात्र मूल्याने त्यांच्या प्रती मंडळास देण्याचें अभिवचन दिलें. मंडळाच्या स्थापनेला ज्या सद्गृहस्थांचें प्रोत्साहन करणीभूत झालें त्यामध्यें श्री. भाऊसाहेबांची गणना प्रामुख्याने

केली पाहिजे. तेव्हापासून सतत आजतागायत त्यांनी मंडळावरचें प्रेम कायम ठेऊन त्याला विविध प्रकारें साहाय्य केलें आहे. प्रस्तुत पुस्तकाच्या प्रकाशनाचें श्रेय त्यांना आहे.

या पुस्तकांत प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन भारतीय इतिहास, वैदिक, संस्कृत, पाली, आणि प्राकृत, महानुभावीय व इतर मराठी वाङ्मय, स्थापत्यकला व शिल्पकला या विविध विषयांत मध्यप्रदेशांत झालेल्या अद्ययावत संशोधनाचा आढावा घेतला आहे. प्रत्येक लेखांत सन १९३४ पर्यंत त्या त्या विषयांत झालेल्या संशोधनाचा वृत्तांत संक्षिप्त रीतीने देऊन तदनंतर गेल्या वीस वर्षांत मंडळाच्या सभासदांनी तसेंच मध्यप्रदेशस्थ इतर विद्वानांनीहि केलेल्या संशोधनकार्याचें वर्णन विस्ताराने केलें आहे. संस्कृत व मराठी या जिवंत भाषा असल्याने त्यांतील संशोधनाबरोबर नवीन साहित्यनिर्मितीचाहि आढावा घेतला आहे. सारांश, या पुस्तकांतील लेखांवरून संशोधनाने आपल्या प्राचीनकालविषयक ज्ञानांत कशी भर पडते, आतापर्यंत उपरिनिर्दिष्ट विषयांत किती कार्य झालें आणि भविष्यकाळांतील कार्याला किती क्षेत्र आहे याची स्पष्ट कल्पना वाचकांना येईल अशी आशा आहे.

प्रस्तुत पुस्तकांतील लेख त्या त्या विषयांतील अधिकारी विद्वानांकडून लिहवून घेतले आहेत. यांपैकी दोन लेख हिंदी भाषेंत होते; त्यांचा मराठी अनुवाद करून ते येथे दिले आहेत. सर्व लेखांचे लेखक केवळ संकलनकार नसून त्यांनी आपापल्या विषयांत संशोधनकार्य केलें आहे. असे गृहस्थ सदैव कार्यव्यापृत असतात. त्यामुळे त्यांच्याकडून लेख मिळण्यास फार काळ लागला. म्हणून मंडळाच्या विंशतिवार्षिक संमेलनाच्या प्रसंगीं हें पुस्तक प्रकाशित करण्याचा संकल्प सिद्धीस गेला नाही. तथापि थोड्या विलंबाने कां होईना, आरंभीच्या योजनेप्रमाणें हें कार्य आज पूर्ण होत आहे याबद्दल मंडळास समाधान वाटत आहे.

या प्रसंगीं मंडळाचे एक प्रमुख कार्यकर्ते व महानुभावीय वाङ्मयाचे नामवंत संशोधक कै. हरि नारायण नेने यांची दुःखद स्मृति होणें अपरिहार्य आहे. त्यांनी महानुभावीय संशोधनावर लेख लिहिण्याचें कबूल केलें होतें, पण प्रथम विदर्भ साहित्य संघाचे चिटणीस व नंतर अध्यक्ष या नात्याने त्यांच्यावर विविध कार्यांचा भार पडल्यामुळें त्यांना आपला संकल्प लौकर पुरा करतां आला नाही. तथापि त्या गोष्टीची आठवण त्यांनी शेवटपर्यंत ठेवली होती. त्यांच्या आकस्मिक निधनापूर्वी थोडेच दिवस प्रस्तुत लेखक त्यांस भेटण्याकरिता गेला असतां "या दुखण्यांतून बरे झाल्याबरोबर आपण हें कार्य प्रथम हातीं घेऊं" असें त्यांनी सांगितलें होतें. पण ईश्वरी संकेत निराळा होता. श्री. हरिभाऊंच्या निधनामुळें महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधनावरील लेखाचा खंड पडतो कीं काय असें वाटूं लागलें; पण आमच्या विनंतीस मान देऊन महानुभावीय वाङ्मयाचे ख्यातनाम संशोधक डॉ. वि. भि. कोलते यांनी त्या विषयावर लेख लिहिण्याचें आनंदाने कबूल केलें आणि अल्पावधींत तो पुराहि करून दिला, याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

प्रस्तुत पुस्तकांतील लेखांना जागेची मर्यादा घालावी लागली. आमचा उद्देशहि संशोधन कार्याचा स्थूलरूपाने आढावा घेणें एवढाच होता. त्यामुळे यांतील लेखांत सर्व मध्यप्रदेशीय संशोधकांच्या कार्याचा उल्लेख येणें अशक्य होतें. म्हणून कोणाच्या कार्याचा निर्देश या पुस्तकांत आला नसल्यास त्यांनी आम्हांस क्षमा करावी.

विदर्भांत संशोधन मंडळ स्थापावें यासाठीं कै. यादव माधव काळे यांनी अनेकदा प्रयत्न केला. शेवटीं सन १९३४ मध्यें तें अस्तित्वांत आलेलें पाहून त्यांना फार आनंद झाला. त्यांनी त्याच्या कार्यांत सक्रिय प्रोत्साहन दिलें. ते १९३६ सालीं मंडळाच्या द्वितीय वार्षिक संमेलनाचे अध्यक्ष होते व मंडळाकरितां भोसलेकालीन इतिहासावर त्यांनी एक व्याख्यानमालाहि गुंफली होती. 'वऱ्हाडचा इतिहास' व 'नागपूर प्रांताचा इतिहास' या ग्रंथांचे लेखक आणि 'नागपूरकर भोसल्यांची बखर' व 'ऐतिहासिक पत्र-व्यवहार' यांचे संपादक म्हणून त्यांनी केलेलें कार्य चिरस्मरणीय झालें आहे. विदर्भाच्या या नामवंत इतिहासकाराबद्दल मंडळास वाटत असलेला आदर त्यांच्या पूज्य स्मृतीस हें पुस्तक अर्पण करून आम्ही व्यक्त करीत आहों.

मंडळाच्या प्रस्तुत कार्यास ज्यांनी आपला बहुमोल वेळ खर्च करून लेखनद्वारें सक्रिय साहाय्य केलें त्या सर्व विद्वान लेखकांचे मनःपूर्वक आभार मानतों. श्री. भाऊसाहेब माडखोलकर व त्यांचे श्री. वाचासुंदर व इतर सहकारी यांनी दोन अडीच वर्षें मधून मधून चाललेल्या या पुस्तकाच्या छपाईने त्रासून न जातां अत्यंत आपुलकीने सर्व प्रकारांनी मदत केली म्हणून, दीर्घकालानंतर कां होईना, या पुस्तकाचें प्रकाशन शक्य झालें. याबद्दल आम्ही त्यांचे ऋणी आहों. मंडळाचे कार्यवाह श्री. दे. गो. लांडगे यांनी या कार्यांत फार परिश्रम घेतले हें येथे नमूद केलें पाहिजे.

नागपूर
ता. २३-८-५५

वा. वि. मिराशी,
अध्यक्ष,
कार्यकारी मंडळ,
मध्यप्रदेश संशोधन मंडळ, नागपूर.

अनुक्रमणिका

			पृष्ठ
१	प्राचीन–इतिहास–संशोधनाचें कार्य		
	म. म. वा. वि. मिराशी	...	१
२	मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास–संशोधन		
	श्री. दे. गो. लांडगे	...	१७
३	वैदिक संशोधन		
	डॉ. वि. वा. करंबेलकर	...	२९
४	संस्कृत साहित्याची निर्मिति व संशोधन		
	प्रा. सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी	...	४३
५	पाली आणि प्राकृत वाङ्मयाचें संशोधन		
	डॉ. हीरालाल जैन	...	५१
६	महानुभाव वाङ्मयाचें संशोधन		
	डॉ. वि. भि. कोलते	...	५७
७	मराठी वाङ्मय		
	प्रा. पां. कृ. सावळापूरकर	...	५७
८	प्राचीन स्थापत्यकला व शिल्पकला		
	डॉ. मो. गं. दीक्षित	...	९१
९	मंडळाच्या विशंति वार्षिक कार्याचें समालोचन		
	श्री. दे. गो. लांडगे	...	१०५
१०	**परिशिष्टें**		
	अ वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष	...	११३
	आ मंडळाच्या सभांत वाचलेले लेख	...	११४
	इ व्याख्यानें	...	१२४
	ई सभासदांची संख्या व वर्गणी	...	१२६
	उ उत्पन्न व खर्च	...	१२७
	ऊ सभासदांची यादी	...	१२९

विदर्भाचे नामवंत इतिहासकार



कै. यादव माधव काळे,
बी. ए., एल्‌एल्. बी.,

यांच्या पूज्य स्मृतीस
सादर समर्पण

मध्यप्रदेशांतील प्राचीन–इतिहाससंशोधनाचें कार्य*

(म. म. प्रा. **वा. वि. मिराशी**, नागपूर)

मध्यप्रदेशांतील इतिहाससंशोधनाच्या कार्यास जवळ जवळ दीडशे वर्षांपूर्वी सुरवात झाली. सन १८०७ मध्यें रिचर्ड जेन्किन्स् याला नागपूरकर भोसल्यांचे दरबारीं रेसिडेंट म्हणून नेमण्यांत आलें. तो सुमारें वीस वर्षे नागपुरास होता. तो मोठा चौकस असल्यानें त्यानें आपला आश्रित विनायकराव औरंगाबादकर यास चांदा, सिरपुर, रायपुर, रतनपुर इत्यादि ठिकाणीं पाठवून तेथील शिलालेखांची माहिती गोळा केली, व ती बंगालच्या एशियाटिक सोसायटीस पुरविली. ही माहिती त्या संस्थेच्या ' एशियाटिक रीसर्चेस ' नामक संशोधनपर नियतकालिकाच्या पंधराव्या व्हॉल्यूममध्यें छापली आहे.

मध्यप्रदेशांतील पहिला इतिहाससंशोधक

औरंगाबादकरानें बरेच कोरीव लेख वाचून त्यांवर टिपणें मोडी लिपींत लिहिलीं होतीं. तीं सध्या लंडन येथील इंडिया ऑफिसच्या पुस्तकालयांत पहावयास मिळतात. कांही वर्षांपूर्वी डॉ. य. खु. देशपांडे हे लंडनला गेले होते, त्या वेळी त्यांनी या टिपणांचे उतारे घेतले होते. या टिपणांतील कांही माहिती ऐतिहासिक दृष्टया अत्यंत महत्त्वाची आहे. पुढे कित्येक वर्षांनी नागपूर म्यूझियमची स्थापना झाल्यावर मध्यप्रांत–वऱ्हाडांतील निरनिराळया ठिकाणांहून मूर्ति व शिलालेख तेथें आणण्यांत आले. पण त्या वेळी त्यांची स्थानिक नोंद बरोबर रीतीनें करून ठेवण्यांत न आल्यामुळें कित्येक संशोधकांची दिशाभूल झाली आहे. डॉ. देशपांडे यांनीं घेतलेलीं कांहीं टिपणें मला दाखविलीं, त्यावरून ही गोष्ट ध्यानांत आली. त्याचीं एक दोन उदाहरणें येथें देतों.

कोरीव लेखांचा अभ्यास करतांना ते प्रथम कोठे सांपडले या गोष्टीला महत्त्व असतें. कारण त्यायोगें अनेक गोष्टींवर प्रकाश पडतो. त्यांतही ताम्रपट-नाण्यांपेक्षां शिलालेखांच्या प्राप्तिस्थानांचें महत्त्व विशेष असतें. ताम्रपट वा नाणीं हीं सहज हलवितां येत असल्यानें तीं मूळच्या ठिकाणांहून शेंकडो मैल दूर सांपडतात. पण शिलालेखांचें तसें नाहीं. शिलालेख बहुधा पूर्वीच्या ठिकाणींच सांपडतात. नागपूर म्यूझियममध्यें सोमवंशी भवदेव–रणकेसरी याचा बराच मोठा शिलालेख आहे. तो डॉ. कीलहॉर्ननें प्रसिद्ध केला असून त्याला मिळालेल्या माहितीवरून त्यानें त्याला रतनपूरचा शिलालेख असें नांव दिलें आहे. पण तें बरोबर नाहीं. कनिंगहॅमनें आपल्या रिपोर्टांत

* हा लेख मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या ता. ५ एप्रिल १९५३ च्या सभेंत वाचला होता.

भांदकचा एक शिलालेख नागपूर येथें नेला आहे, अशी माहिती दिली आहे. तो शिलालेख भवदेव रणकेसरीचा असावा असें वाटून कै. डॉ. हिरालाल यांनी त्याला भांदकचा शिलालेख ह्मटलें आहे व त्यावरून भांदक ही दक्षिण कोसलची (मध्यांच्या महाकोसलची) राजधानी असावी, असें अनुमान केलें आहे, तेंही चूक आहे. कारण डॉ. देशपांडे यांनी औरंगाबादकराच्या रिपोर्टांतील एक उतारा कांहीं वर्षांपूर्वी मला दाखविला, त्यावरून प्रस्तुत शिलालेख रायपूर जिल्ह्यांतील आरंग येथील होता, असें स्पष्ट दिसतें. सोमवंशी राजांचें राज्य रायपूर जिल्ह्यावर होतें. त्या जिल्ह्यांत त्यांचे कित्येक शिलालेख व ताम्रपट राजीम, आरंग, श्रीपुर इत्यादि ठिकाणीं सांपडले आहेत. तेव्हा प्रस्तुत लेख आरंगचा असल्यास आश्चर्य नाहीं. याच्या उलट भांदक किंवा विदर्भाचा कोणताही भाग सोमवंशी राजांच्या अमलाखाली कधीही नव्हता. त्यामुळें तो लेख भांदक येथें सापडणें सुतराम् असंभवनीय आहे. औरंगाबादकराच्या टिपणावरून या बाबतींत आतां अनुमान करण्याचीही जरूरी नाहीं.

दुसरें उदाहरण चालुक्यवंशी सहाव्या विक्रमादित्याच्या काळच्या शिलालेखाचें. नागपूर म्यूझियमच्या पुराणवस्तुविभागामध्यें ज्याच्यावर अनेक गाई कोरल्या आहेत असा एक स्तंभ आहे; व त्यावर सहाव्या विक्रमादित्याचा मांडलिक महाराष्ट्रकूटवंशी धाडीभंडक याच्या वासुदेव नामक दंडनायकानें गाईंच्या चाऱ्याकरितां कांहीं निवर्तनें दान दिल्याचा लेख कोरला आहे. हा शिलालेख सीताबर्डी येथे सांपडला असें कनिंगहॅमनें आपल्या रिपोर्टांत म्हटलें असल्यामुळें हा लेख ' सीताबर्डीचा लेख ' म्हणून प्रसिद्ध आहे. कनिंगहॅमचें विधान बरोबर असल्यास सहाव्या विक्रमादित्याच्या काळीं म्हणजे इ. स. च्या अकराव्या शतकांत सीताबर्डीस वस्ती होती, असें अनुमान करतां येईल. कांही दिवसांपूर्वी डॉ. देशपांडे यांनी औरंगाबादकराच्या रिपोर्टांतील एका लेखाचा उतारा मला दाखविला, व हा लेख कोठें प्रसिद्ध झाला आहे काय, असें विचारलें. तो उतारा वाचतांच तो लेख डॉ. कीलहॉर्ननें अगोदरच प्रकाशित केला असल्याचें मी त्यांना सांगितलें. औरंगाबादकरानें दिलेल्या माहितीवरून तो लेख असलेला शिलास्तंभ भांदक येथें भीमगड किंवा विंध्यासन टेकडीजवळ पूर्वी होता व तो तेथून नागपूरला आणला गेला असें स्पष्ट झालें. त्या लेखाचा सीताबर्डीशीं अर्थाअर्थी कांहींच संबंध नसल्यानें त्यावरून सीताबर्डीच्या प्राचीनत्वाबद्दल अनुमान करणें सयुक्तिक होणार नाही. असो.

विनायकराव औरंगाबादकर हा आपल्या मध्यप्रदेशांतील पहिला इतिहाससंशोधक. त्याच्या नंतर मात्र कित्येक वर्षें या प्रदेशांतील कोणीही इतिहाससंशोधनाकडे विशेष लक्ष दिलें नाहीं. गेल्या एकोणिसाव्या शतकांत या प्रांतांत सांपडलेले कोरीव लेख व नाणीं बहुधा कलकत्त्याच्या बंगाल एशियाटिक सोसायटीकडे व क्वचित्

मुंबई इलाख्यांतील विद्वानांकडे वाचन व प्रकाशन याकरितां पाठविलीं जात. सातवाहन, वाकाटक, राष्ट्रकूट, परमार, कलचुरि इत्यादि राजवंशांचे या प्रांतांत सांपडलेले शिलालेख, ताम्रपट व नाणीं होर्नल्, बुल्हर, कीलहॉर्न, हॉल, फ्लीट इत्यादि युरोपीय विद्वानांनीं व कांहीं रामकृष्णपंत भांडारकर, भगवानलाल इंद्रजी या सारख्या भारतीय विद्वानांनीं प्रकाशित केलीं आहेत.

रा. ब. डॉ. हीरालाल यांची कामगिरी

चालू विसाव्या शतकाच्या आरंभीं ही परिस्थिति पालटली. सन १९०१ च्या खानेसुमारीकरितां व पुढें जिल्हा गॅझेटियरांच्या प्रकाशनाकरितां रसेल साहेबांचे मदतनीस म्हणून कै. राय बहादूर हीरालाल यांची नेमणूक झाली. या कार्याच्या निमित्तानें त्यांना या प्रांतांतील भिन्न भिन्न भागांची पूर्ण माहिती झाली. व त्यांचे त्यांतील पुरातन अवशेषांकडे लक्ष गेलें. इ. ए. सी. व डेप्युटी कमिशनर या नात्यानें त्यांना अनेक जिल्ह्यांत फिरतीवर जावें लागे. त्या प्रसंगानेंही त्यांचा अनेक लोकांशीं परिचय वाढून प्राचीन इतिहासाच्या साधनांविषयीं चौकशी करणें व तीं मिळविणें सुलभ जात असे.

सन् १९३४ मध्यें हीरालाल कालवश झाले. तोंपर्यंत या प्रांतांत सांपडलेले बहुतेक कोरीव लेख वाचनाकरितां त्यांच्याकडे येत. कलचुरि, चंदेल्ल, राष्ट्रकूट, नाग इत्यादि राजवंशांचे कित्येक कोरीव लेख त्यांनी एपिग्राफिया इंडिका, इंडियन् अँटिक्वरी, इंडियन् हिस्टॉरिकल क्वार्टर्ली इत्यादि संशोधनपर नियतकालिकांत प्रसिद्ध केले आहेत. याशिवाय 'मध्यप्रांत व वऱ्हाड यामधील कोरीव लेखांची यादी' या अभ्यासकांस अत्यंत उपयुक्त अशा पुस्तकाच्या दोन आवृत्याही त्यांनी प्रसिद्ध केल्या. याखेरीज या प्रांतांतील संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांविषयीं अनेक ठिकाणांहून माहिती मिळवून त्यांचा मोठा कॅटलॉगही त्यांनी प्रकाशित केला. डॉ. हीरालाल प्राचीन इतिहासाच्या संशोधनाकडे लक्ष देऊं लागले, त्या काळी या प्रांतांतील भिन्न भिन्न राजवंशांविषयीं फारच थोडी माहिती उपलब्ध होती. त्यांच्या अंतकाळीं या प्रांताच्या प्राचीन इतिहासाची रूपरेषा बरीचशी स्पष्ट होऊन त्याच्या भिन्न भिन्न कालखंडांविषयीं आपल्या ज्ञानांत पुष्कळच भर पडली होती. तिचें बहुतेक श्रेय डॉ. हीरालाल यांसच दिलें पाहिजे.

डॉ. हीरालाल हे सेवानिवृत्तीनंतर संस्कृत व प्राकृत हस्तलिखितांच्या कॅटलॉगच्या कामाकरितां कांहीं काळ नागपुरास येऊन राहिले होते, त्या वेळीं माझा त्यांच्याशीं प्रथम परिचय झाला. पुढें ते नागपूर विश्वविद्यालयाच्या संस्कृत मंडळाचे सभासद निवडले गेल्यावर त्यांच्याशीं जास्त संबंध येऊन त्यांच्या विविध कार्याची अधिकाधिक माहिती होत गेली. त्यापूर्वीच मॉरिस कॉलेजमधील अध्यापनाच्या कार्यांत प्राचीन इतिहासाविषयीं माझ्या मनांत

आवड उत्पन्न झाली होती व मी या प्रांताच्या प्राचीन लेखांचें वाचन सुरू केलें होतें. या वाचनामुळेंच सन १९२८ मध्यें हिस्लॉप कॉलेजमध्यें कै. डॉ. केतकर यांनीं 'कालिदास आणि विदर्भ' या विषयावर आपला लेख वाचला. त्या वेळीं अध्यक्ष या नात्यानें केलेल्या माझ्या भाषणांत कालिदासा-विषयींच्या त्यांच्या खोडसाळ आरोपांना मी साधार उत्तर देऊं शकलों. त्यामुळें त्या लेखांतील कांहीं विधानें त्यांना पुढें बदलावीं लागलीं. असो. माझ्या वाचनांत कांही नवीन कल्पना सुचल्यास किंवा पूर्वगामी संशोधकांच्या चुका दिसल्यास त्यांवर लेख लिहून ते संशोधनपर त्रैमासिकांत मी प्रसिद्ध करूं लागलों. ऐतिहासिक संशोधनपर असा माझा पहिला लेख कलचुरिनृपति पहिला युवराजदेव या विषयावर होता. तो १९२९ सालीं मॉरिस कॉलेजच्या इतिहास-समितीपुढें रा. ब. हिरालाल यांच्या अध्यक्षतेखालीं वाचला होता. पुढे तो भांडारकर संशोधन मंडळाच्या ॲनाल्स्‌मध्ये छापला गेला. रा. ब. हिरालाल यांनीं त्या लेखांतील नवीन संशोधनाबद्दल प्रशंसोद्‌गार काढले. ते मला म्हणाले, "मी इंटरमीजिएटपर्यंतच संस्कृत शिकलों. तथापि मी परिश्रमानें या प्रांताच्या प्राचीन इतिहासाकरितां इतकें कार्य करूं शकलो. तुम्ही तर संस्कृतचे प्राध्यापक आहां. तुम्ही मनावर घ्याल तर तुम्हास या विषयांत पुष्कळच कार्य करतां येईल." पंचवीस वर्षांनंतर आजही त्यांचे उद्‌गार मला आठवतात.

रा. ब. दीक्षित यांचें साहाय्य

रा. ब. हिरालालनीं उत्तेजन दिलें, तथापि कधीं काळीं आपल्या हातून प्राचीन कोरीव लेख प्रकाशित केले जातील अशी कल्पनाही मला आली नव्हती. 'एपिग्राफिया इंडिका' हें हिंदुस्थान सरकारचें कोरीव लेखांच्या प्रकाशनास वाहिलेलें सुप्रतिष्ठित त्रैमासिक. त्यांत डॉ. बुल्हर, कीलहॉर्न, भांडारकर या सारख्या नाणावलेल्या संशोधकांचे लेख प्रसिद्ध होत. त्यांत आपला लेख प्रसिद्ध होईल असें स्वप्नही मला पडलें नव्हतें. पण तोही योग लौकरच घडून आला. सन. १९३१ मध्यें पुराण वस्तुसंशोधन खात्याचे डेप्युटी डायरेक्टर रा. ब. काशिनाथपंत दीक्षित हे या प्रांतांतील उत्खनन-योग्य अशा स्थळांची पाहणी करण्याकरिता आले होते. त्यांनीही भारतीय प्राचीन इतिहासाविषयीं माझी आवड पाहून मला कोरीव लेख प्रकाशित करण्या-विषयीं आग्रह केला. इतकेंच नव्हे तर, परत गेल्यावर त्यांनीं वऱ्हाडांतील अमडापूर व बार्शी टाकळी येथील शिलालेखांचे छाप मजकडे पाठविण्याविषयीं गव्हर्नमेंट एपिग्राफिस्ट डॉ. हीरानंद शास्त्री यांस लिहिलें. त्याप्रमाणें ते छाप मजकडे आले. हे लेख अत्यंत खराब स्थितींत असल्यामुळें ते वाचणें कठीण काम होतें. शिवाय 'एपिग्राफिया इंडिका' मध्यें लेख छापला जाण्याकरितां तो अत्यंत निर्दोष व उच्च

दर्जाचा असला पाहिजे, याची जाणीव मला असल्यानें मी त्या लेखांच्या संपादना-करिता अत्यंत परिश्रम घेतले. कांही मित्रांबरोबर अमडापूर व बार्शी–टाकळी येथे जाऊन ते लेख समक्ष पाहिले. व त्यासंबंधीं सर्व माहिती जमवून त्या वरचे लेख 'एपिग्राफिया इंडिकामध्यें' प्रकाशनार्थ पाठविले. ते त्या त्रैमासि-काच्या २१ व्या व्हॉल्यू'मध्यें प्रसिद्ध झाले आहेत. त्यानंतर गेल्या वीस बावीस वर्षांत 'एपिग्राफिया इंडिकां'त अनेक लेख मला प्रकाशित करतां आले आरंभीं आरभीं या लेखांकरितां कै. रा. ब. दीक्षित यांचें अनेक प्रकारें साहाय्य झालें. त्यांचें उत्तेजन व साहाय्य नसतें तर माझ्या हातून कांहींच कार्य झालें नसतें.

मध्यप्रदेश संशोधन मंडळाची स्थापना

सन १९३३ मध्यें नागपुरास महाराष्ट्र साहित्य संमेलनाचें अधिवेशन झालें. त्या प्रसंगी जनतेंत उत्पन्न झालेल्या जागृतीचा फायदा घेण्याचें ठरवून श्री. माडखोलकर प्रभृतींनीं सर भवानीशकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखालीं वाङ्मये-तिहास–संशोधन–मंडळाची स्थापना केली. त्यालाच पुढें 'मध्यप्रदेश संशोधन मंडळ' असें नांव प्राप्त झालें. आरंभीं या मंडळाच्या कार्याविषयीं कार्यकर्त्यांत, सभासदांत व जनतेंतही खूप उत्साह होता. सिटी कॉलेजमध्यें भरत असलेल्या मंडळाच्या सभांना चांगलीच उपस्थिति असे, व अनेकदां विवाद्य विधानांवर चर्चा होत असे. प्राचीन अवशेषांच्या पाहणीकरितां मंडळाचे सभसद दौरा काढीत, व ते अवशेष सुस्थितींत ठेवले नसल्यास पुराणवस्तुसंशोधन खात्याकडे पत्रव्यवहार करून त्याचें लक्ष त्यांकडे वेधीत. मंडळाचे एक उत्साही सभासद श्री. आ. रा. ऊर्फ आप्पासाहेब देशपांडे हे उमरेडास सबजज्ज् असतांना सन १९३५ सालीं त्यांना देवटेक येथे प्राचीन शिलालेख असल्याची माहिती लागली. त्यांनीं ती मला कळवून ते लेख पाहण्याविषयीं आग्रह केला. त्या वेळीं हिंदुस्थान सरकारनें माझ्या-करितां कलचुरि लेखांचे छाप घेण्यासाठीं पाठविलेला मनुष्य येथें होता. त्याला बरोबर घेऊन आह्मी चारपांच जण उमरेडास गेलों. तेथील लोकांनीं अत्यंत उत्साहानें आमचें स्वागत केलें. कित्येक उत्साही तरुण जिज्ञासेने आमच्या बरोबर आले. सायंकाळी आमचा पौनीस मुक्काम होता. त्या वेळीं तेथें एक जुना शिला-लेख असल्याची माहिती लागली. दुसऱ्या दिवशीं त्याचा छाप घेऊन आह्मी देव-टेकास गेलों. तेथील शिलेवर दोन कोरीव लेख आढळले. एक अशोककालीन व दुसरा वाकाटकनृपति पहिला रुद्रसेन याचा. त्यानंतर दोन महिन्यांनीं ह्मैसूर येथील ओरिएंटल कॉन्फरन्सच्या अधिवेशनांत मी त्यांवर लेख वाचला. अशोककालीन लेखाचा छाप पाहतांच कै. डॉ. जयस्वाल यांस आनंदाचें भरतें आलें व त्यांनीं अत्यंत प्रेमानें माझें अभिनन्दन केलें. पौनीचा लेखही अत्यंत प्राचीन असून त्यांत भारनृपति भगदत्त यानें स्थापिलेल्या पादुकापट्टाचा उल्लेख आहे. तो पुढें एपि-ग्राफिया इंडिकामध्यें प्रसिद्ध झाला आहे. या नंतर रामटेक जवळचें नांदपुर व चांदा

जिल्ह्यांतील मार्कंडी येथेही मंडळाच्या सभासदांचे दौरे झाले. या सर्व ठिकाणीं श्री. आप्पासाहेब देशपांडे यांचें अत्यंत साहाय्य झालें. या दौऱ्यांचा किंबहुना मंडळाच्या आरंभीच्या सर्व सभांचा वृत्तांत सविस्तर छापून येथील 'महाराष्ट्र' पत्रानें संशोधनकार्याला पुष्कळच मदत केली. तिचा साभार उल्लेख करणें जरूर आहे. याचप्रमाणें श्री. माडखोलकरांनी अगदी मंडळाच्या स्थापनेपासून सतत उत्तेजन व विविध प्रकारचें साहाय्य दिलें नसतें, तर तत्पूर्वीच्या एक दोन प्रयत्नांप्रमाणे संशोधन मंडळ स्थापण्याचा हाहि प्रयत्न निष्फळ झाला असता.

गल्या वीस वर्षांतील कार्याचा आढावा

डॉ. हिरालाल दिवंगत झाल्यास जवळ जवळ वीस वर्षे झालीं आहेत. या अवधींत या प्रांतांत झालेल्या प्राचीन इतिहासविषयक संशोधनाचा आढावा घेणें उपयुक्त होईल. कारण त्यायोगें झालेली प्रगति ध्यानांत येऊन या प्रदेशाच्या प्राचीन इतिहासाचे कोणते कोनेकोपरे अद्यापि अंधारांत आहेत, हें समजेल. पुढील आढाव्यांत अन्य संशोधकांनीं केलेल्या कार्याचा त्या त्या ठिकाणीं निर्देश केला आहे. इतर ठिकाणचें संशोधन प्रस्तुत लेखकानें केलें आहे, असें समजावें.

भारताच्या विश्वसनीय इतिहासास मौर्यकाळापासून सुरवात होते. कारण त्या काळापासून शिलालेख, ताम्रपट, नाणीं, वास्तु, प्रतिमा इत्यादि साधनें थोडचा बहुत प्रमाणांत उपलब्ध होऊं लागतात. या काळाच्या मागे हजारों वर्षांपूर्वी भारतांत अस्तित्वांत असलेल्या सिंधु संस्कृतीचे अवशेष सांपडले आहेत; पण तेथे मिळालेल्या मुद्रांवरची लिपी अद्यापि अज्ञात असल्यामुळे त्या संस्कृतीचें आपलें ज्ञान मर्यादित आहे. सिंधुसंस्कृतीनंतर मौर्यकालापर्यंत जो हजारों वर्षांचा काल लोटला, त्यावर उत्खननानें प्रकाश पाडण्याचा प्रयत्न चालू आहे; पण त्याला अद्यापि फारसें यश आलें नाहीं. तसेंच आपल्या वैदिक व रामायणमहाभारतकालीन संस्कृतीचें व इतिहासाचें ज्ञान आपणांस केवळ वाङ्मयावरून मिळवावें लागतें. त्याला उपोद्बलक असा इतर प्रकारचा पुरावा अद्यापि प्राप्त झाला नाही.

मौर्य—मौर्यकाळीं आपला प्रांत मौर्यांच्या साम्राज्यांत अन्तर्भूत होता. तथापि सम्राट् अशोकाचा एकच लघु लेख जबलपूर जिल्ह्यांत रूपनाथ येथें कोरलेला माहीत होता. त्यानंतर मागें उल्लेखिलेला व देवटेक येथें सांपडलेला दुसरा लेख आता नागपूर म्यूझियममध्यें आणून ठेवला आहे. तो त्रुटित आहे. तथापि अवशिष्ट भागावरून त्यामध्ये अशोकाच्या विदर्भामधील धर्ममहामात्रानें प्राण्यांना पकडूं नये व मारूं नये, अशी आपल्या स्वामीची आज्ञा उद्घोषित केलेली दिसते.

सातवाहन—मौर्यांनंतर सातवाहनांचें या प्रांतावर राज्य पसरलें. सातवाहनांचे कोरीव लेख आपल्या प्रांतांत सांपडले नाहींत. पण त्यांचीं अनेक नाणीं गेल्या वीस वर्षांत कित्येक ठिकाणीं सांपडलीं आहेत. या वंशाचा मूळ

संस्थापक सातवाहन याचीं तीन नाणीं हैद्राबाद संस्थानांत औरंगाबाद, कोंडापूर व वारंगळ या ठिकाणीं मिळालीं आहेत. त्यावरून या वंशाला 'सातवाहन' हें नांव कसें मिळालें याची समाधानकारक उपपत्ति आतां लावतां येते. या वंशांतील प्राचीन राजा सातकर्णि याचींही कांहीं नाणीं हैद्राबाद संस्थानांत सांपडलेलीं प्रकाशित झालीं आहेत. त्यानंतरचा पुराणांत उल्लेखिलेला आठवा राजा आपीलक याचें नाणें रायगडजवळ बालपूर येथें महानदीच्या वाळवंटांत पं. लोचनप्रसाद पांडेय यांस प्रथमच सांपडलें. तें रा. बा. दीक्षित यांनीं प्रसिद्ध केलें आहे. याशिवाय सन १९३९ मध्यें अकोला जिल्ह्यांत तऱ्हाळा गांवीं सातवाहनांच्या दीड हजार नाण्यांचा संचय सांपडला. आतापर्यंत सांपडलेल्या सर्व संचयांत हा मोठा तसाच अत्यंत महत्वाचा आहे. यांत सातकर्णि, पुळुमावि, शिवश्री पुळुमावि, स्कन्द सातकर्णि, यज्ञ सातकर्णि, विजय सातकर्णि, कुम्भ सातकर्णि, कर्ण सातकर्णि, शक सातकर्णि इत्यादि अकरा राजांची नाणीं होती. यांपैकीं कांही राजांचीं नांवें पुराणांतील वंशावलींत दिलीं आहेत, पण कांही नवीन आहेत. याशिवाय यज्ञश्री सातकर्णीचें, दोन शिडांच्या जहाजाची आकृति ज्यावर उमटविलेली आहे असें, शिशाचें नाणें आन्ध्र प्रदेशात गुंटूर येथें सांपडलेलें प्रस्तुत लेखकानें व त्याच राजाचा मुखवटा असलेले चांदीचें नाणें जबलपूर जवळ सांपडलेलें डॉ. कटारे यांनी प्रकाशित केलें आहे.

सातवाहनांच्या बरोबर उदयास आलेल्या व पुढें त्यांचे मांडलिक बनलेल्या 'सेबक' किंवा 'सेवक' राजांचीं कांही नाणीं हैद्राबाद संस्थानांत सांपडलीं आहेत. पुराणांत उल्लेखिलेले आन्ध्रभृत्य राजे हेच असावेत.

सातवाहनांच्या काळी छतीसगडमध्ये राज्य करणाऱ्या कुमारवरदत्त नामक राजाचा प्रस्तरलेख पूर्वीच्या सक्ति संस्थानांतील गुंजी या गांवी एका जलाशयाजवळ सांपडला आहे. त्यामुळें महाभारतांत उल्लेखिलेल्या कोसल देशांतील ऋषभतीर्थाचें स्थान निश्चित झालें आहे.

सातवाहनांचा अस्त सन २५० च्या सुमारास झाला. त्यानंतर त्यांच्या विशाल साम्राज्याचे अनेक तुकडे पडून त्यांत निरनिराळीं राज्यें अस्तित्वांत आलीं. उत्तर महाराष्ट्र, गुजरात व कोंकण या प्रदेशांत आभीरांचें राज्ये झालें. विदर्भांत वाकाटक उदयास आले. दक्षिण महाराष्ट्रांत राष्ट्रकूटांनी आपला अंमल बसविला; व दक्षिण हैद्राबाद, कर्णाटक या प्रदेशांत शकनृपति मान यानें आपलें राज्य स्थापिलें. या चारी वंशांचे अनेक कोरीव लेख किंवा नाणीं गेल्या वीस वर्षांत मिळालीं आहेत. त्यांचा क्रमानें विचार करूं—

आभीर—या कालखंडांत खुद्द आभीर राजांचे नवीन लेख सांपडले नाहींत. त्या वंशाचा संस्थापक ईश्वरसेन याचा लेख नाशिक येथील एका लेण्यांत सांपडलेला पूर्वीच माहीत होता. पण त्याचे मांडलिक खानदेशातील वलख येथील महाराज, माहिष्मतीचा सुबन्धु आणि विदिशेचा शकनृपति श्रीधरवर्मा यांचे लेख या कालखंडांत दृष्टोत्पत्तीस आले. श्रीधरवर्म्याच्या एरण येथील लेखांत महाराष्ट्राचा पहिला उल्लेख आहे.

वाकाटक–या कालखंडांत वाकाटक वंशाविषयीं पुष्कळच माहिती उजेडांत आली. सन १९५३ पर्यंत वाकाटकांचे व त्यांच्या मांडलिकांचे मिळून एकूण आठ–दहाच लेख माहीत होते. गेल्या वीस वर्षांत ही संख्या दुपटीवर गेली आहे. सर्वांत महत्त्वाची गोष्ट ही कीं, वाकाटक वंशाच्या निदान दोन शाखा झाल्या होत्या; एकीची राजधानी प्रथम रामटेक जवळचें नंदिवर्धन व नंतर वर्ध्याजवळचें प्रवरपुर ही होती व दुसरीची राजधानी अकोला जिल्ह्यांतील वत्सगुल्म ही झाली, ही नवीन माहिती वाशीम येथील द्वितीय विन्ध्यशक्ति याच्या ताम्रपट वरून प्रथमच मिळाली. या ताम्रपटाचा अभ्यास करीत असतां अजंटा येथील व घटोत्कच लेण्यांतील कोरीव लेखांकडे माझें लक्ष गेलें. या तिन्ही लेखांच्या वाचनामध्ये अनेक चुका झाल्यामुळें वाकाटक वंशाविषयीं विपर्यस्त माहिती प्रसृत झाली होती. त्याकरितां त्या लेखांचे पुनः संपादन करणें अवश्य झालें. आतां ते लेख हैदराबाद आर्किऑलाजिकल सारिजमध्यें प्रसिद्ध झाले आहेत.

वाकाटकांच्या इतिहासावरच नव्हे, तर तत्कालीन संस्कृतीवरही या कालखंडांत बराच प्रकाश पडला आहे. वाकाटक राजे केवळ विद्वानांचे आश्रयदातेच नसून स्वतःही उत्कृष्ट काव्यरचना करित असत; त्यांनीं प्राकृतांतील सेतुबंध व हरिविजय हीं सुंदर काव्यें व सत्तसई नामक प्राकृत सुभाषितसंग्रहांतील कांहीं सुभाषितें रचलीं होतीं; त्यांच्या काळीं संस्कृतांतहा उत्कृष्ट काव्यरचना झाल्यामुळें वैदर्भी रीतीला अग्रस्थान मिळालें; कालिदासानें आपलें सुधामधुर मेघदूत काव्य वाकाटकांच्या राजवटींत रामगिरि (रामटेक) येथे रचलें, इत्यादि माहिती संशोधनानें मिळाली. त्या काळीं शिल्पकलाही परिणतावस्थेत पोंचली होती. वाकाटककालीन देवालये सध्या विदर्भांत विद्यमान नाहींत. तथापि पवनार येथें आचार्य विनोबाजी भावे यांच्या आश्रमाजवळ सांपडलेल्या मूर्तींवरून तत्कालीन शिल्पकलेची कल्पना करतां येते.

इ. स. च्या सातव्या आठव्या शतकांत भवभूतीचें जन्मस्थान म्हणून प्रसिद्ध झालेलें विदर्भातील पद्मपुर वाकाटक कालींही विख्यात होतें, हें एका ताम्रपटावरून ज्ञात झालें. हें पद्मपुर म्हणजे भंडारा जिल्ह्यांतील आमगांवाजवळचें पदमपुर होय ही गोष्ट आता निश्चित झाली असून तिला पुराणवस्तुसंशोधन खात्यानें मान्यता दिली आहे.

कुन्तलेश राष्ट्रकूट–वाकाटक–काळीं कृष्णा नदीच्या खोऱ्यांत एका नवीन राजवंशाचा उदय झाला. या वंशाचा संस्थापक मान राजा असून त्यानें आपल्या नांवें मानपुर नामक नगर वसवून तेथें आपली राजधानी केली. याच्या वंशजांचे कांही लेख पूर्वी प्रसिद्ध झाले होते. पण त्यांचा काळ व देश निश्चित नव्हते. त्या विषयीं भलभलत्या कल्पना कांहीं संशोधकांनीं केल्या होत्या. या सर्व लेखांचा साकल्यानें विचार करून ते राजे वाकाटकांचे समकालीन होते, त्यांचें राज्य कृष्णा नदीच्या उत्तर खोऱ्यांत होतें, वाकाटकांच्या लेखांत ज्या कुन्तलेशाशीं त्यांचीं युद्धें व विवाहसंबंध झाल्याचा उल्लेख आहे, ते हेच राष्ट्रकूट इत्यादि माहिती प्रस्तुत लेखकानें आपल्या 'मानपुरचे राष्ट्रकूट' या लेखांत प्रथम प्रसिद्ध केली. ती आतां बहुतेकांनी मान्य केली आहे.

शक राजे–सुमारें आठ वर्षांपूर्वी हैदराबादाचे नाणकसंग्राहक श्री. हुरमुझ कौस यांनीं दोन तांब्याच्या नाण्यांचे छाप मजकडे पाठविले. त्यावरून शकवंशी मान नामक राजा दक्षिण हिंदुस्थानांत, सातवाहनानंतर उदयास आला, हें प्रथमच माहीत झालें. त्यानंतर या राजाची व त्याच्या कांहीं वंशजांचीं नाणीं हैदराबाद संस्थानांत कोंडापूर, मस्की इत्यादि ठिकाणच्या उत्खननांत मिळालेलीं मला प्रसिद्ध करतां आलीं. या राजाचें नांव पुराणांतील राजवंशांच्या वर्णनांत आलें आहे. पण त्या ठिकाणचा पाठ अपभ्रष्ट झाल्यानें त्याचें नांव यापूर्वी संशोधकांच्या ध्यानांत आलें नव्हतें. या नाण्यांवरच्या चिन्हांवरून हे शक राजे उत्तर महाराष्ट्रांत राज्य करणाऱ्या पूर्वीच्या नहपानादि शक राजांचे वंशज होते; त्यांनी आपल्या राज्यांत चालू केलेला संवत् पुढें बदामीच्या चालुक्यांनीं स्वीकारला व त्यांच्या राज्यविस्ताराबरोबर दक्षिणेंत त्याचा हळू हळू प्रसार झाला, यामुळेंच त्या संवताला शकसंवत् किंवा शकनृपतिसंवत् हे नांव मिळालें इत्यादि अनुमानें करतां येतात. शकसंवत् दक्षिणेंत कसा पसरला याची उपपत्ति आतां लावतां येते.

नळ राजे–वाकाटकांचे समकालीन नळ राजे बस्तर संस्थानांत व त्यालगतच्या मद्रास इलाख्याच्या भागांत राज्य करीत होते, ही माहितीही याच कालखंडांत मिळाली. यांचा एक शिलालेख विजगापटम जिल्ह्यांतील पोडागढ येथें मिळालेला कै. रा. ब. कृष्णमाचालू यांनीं प्रसिद्ध केला आहे. नळवंशी भवदत्तवर्मा याने वाकाटकांच्या राज्यावर आक्रमण करून नन्दिवर्धनाजवळचा भाग आपल्या अंमलाखालीं आणला होता हें श्री. य. रा. गुप्ते यांनीं संपादिलेल्या ऋद्धपूरच्या ताम्रपटावरून प्रथम ज्ञात झालें. या वंशाचीं कांही सोन्यांची नाणीं सन १९३९ मध्यें बस्तर संस्थानांत एडेंगा येथें सांपडलीं होतीं तीं मी प्रसिद्ध केलीं आहेत. त्यांवरून वराह, भवदत्तवर्मन् व अर्थपति या तीन राजांचीं नांवें ज्ञात झालीं. या राजांना विदर्भांतून लौकरच पाय काढावा लागला असें दिसतें. कारण यानंतरचे यांचे लेख विदर्भांत सांपडले नाहींत. याच वंशांतील नंतरच्या राजांचा एक शिलालेख राजीम येथील राजीवलोचनाच्या देवळांत आहे. पण तो अत्यंत शीर्णावस्थेंत असल्यानें त्याकडे कोणी विशेष लक्ष दिलें नव्हतें. तोही लेख आतां एपिग्राफिया इंडिकामध्यें प्रसिद्ध झाला आहे. त्यांत पृथ्वीराज, विरूपराज व विलासतुङ्ग या तीन राजांचीं नांवें आलीं आहेत.

शरभपुरनृपति––हे राजे छत्तीसगडांत राज्य करीत होते. यांचे ताम्रपट रायपूर, बिलासपुर व सारंगड या भागांत सांपडले आहेत. हे राजे आठव्या शतकांत राज्य करीत होते, असें डॉ. फ्लीटनें प्रतिपादिलें होतें. सन १९३१ मध्यें सारंगड संस्थानांत ठाकुरदिया येथें या वंशाचा एक राजा महाप्रवरराज याचा ताम्रपट सांपडला. संस्थानाधिपतींच्या कृपेनें तो प्रकाशनाकरितां मजकडे आला.

त्या प्रसंगीं या वंशाच्या व तत्संबद्ध इतर सर्व लेखांचा साकल्यानें विचार करून हे राजे पांचव्या शतकांत होऊन गेले व ते वाकाटकांचे समकालीन होते, हें मी सप्रमाण सिद्ध केलें. हें मत आतां सर्वमान्य झालें आहे. या वंशाचे आणखी बरेच ताम्रपट पं. लोचनप्रसाद पांडेय यांनीं प्रकाशांत आणले आहेत. या वंशाचा मूळ पुरुष प्रसन्नमात्र याची दोन सोन्याचीं नाणींही पं. पांडेय यांनीं प्रसिद्ध केलीं आहेत.

पांडववंशी किंवा सोमवंशी नृपति–हे राजेही वाकाटकांचे समकालीन असून मेकलदेशावर (नर्मदा नदीच्या उगमाजवळच्या प्रदेशावर) राज्य करीत होते. वाकाटकनृपति नरेन्द्रवर्मन् याचा मांडलिक भरतबल याचा रीवा संस्थानांत सांपडलेला ताम्रपट डॉ. छाबरा यांनीं अलीकडे प्रसिद्ध केला आहे. याचे वंशज पुढें छत्तीसगडांत येऊन त्यांनीं शरभपुराच्या राजांचें तेथून उच्चाटन केलें. या राजांचा काळही डॉ. फ्लीट, डॉ. कीलहॉर्न इत्यादिकांच्या मतें आठवें शतक हा होता. हे राजे शरभपुरीय राजांच्या पूर्वी राज्य करीत होते असें मत रा. ब. हिरालाल यांनी प्रतिपादिलें होतें. पण वस्तुस्थिति याच्या उलट होती. हे राजे शरभपुरीय राजांनंतर इ. स. च्या सहाव्या सातव्या शतकांत होऊन गेले, हे प्रस्तुत लेखकानें प्रथम साधार दाखविलें. तें मत आता सर्वमान्य झालें आहे.

या वंशांतील महाशिवगुप्त ऊर्फ बालार्जुन याचे कांही ताम्रपट छत्तीसगडांत गेल्या दहा पंधरा वर्षांत सांपडले आहेत. त्यांतील पहिला–मल्लार येथें सांपडलेला–ताम्रपट त्या वेळचे बिलासपुरचे जिल्हाधिकारी श्री. नगरकट्टी यांच्या कृपेने मजकडे आला. त्याचें संपादन करतांना अनेक प्रश्नांचा उहापोह मला करतां आला. या राजाच्या काळीं ह्यूएनत्संग हा चिनी यात्रेकरू दक्षिण कोसलांत आला होता. त्यानें त्या देशाच्या राजधानीचें जें वर्णन करून ठेवलें आहे. त्यावरून ती राजधानी रायपुर जिल्ह्यांतील श्रीपुर येथें होती हें त्या ताम्रपटावरील लेखांत दाखविलें आहे.

कलचुरि–वाकाटकांनंतर लौकरच कलचुरींचें राज्य महाराष्ट्रांत पसरलें. यांनी आपल्या लेखांत ज्या संवताचा उपयोग केला आहे, त्याला कलचुरिसंवत् किंवा चेदिसंवत् असें म्हणतात. पण ती संवत् मूळचा आभीर राजांचा हें मी सविस्तर दाखवून दिलें आहे. या संवताचा आरंभकाळ पुष्कळ वर्षें अनिश्चित होता. अनेकांनीं त्याविषयीं अनेक तर्क केले होते. या संवताचे जितके लेख सन १८९३ पर्यंत प्रसिद्ध झाले, त्या सर्वांचा साकल्यानें विचार करून डॉ. कीलहॉर्न यानें हा संवत् सन २४९ मध्ये स्थापला होता व त्याचें वर्ष भाद्रपद शुद्ध प्रतिपदेस सुरू होत असे असें प्रथम प्रतिपादिलें. पण, पुढे यामुळें कांही अडचणी उपस्थित होतात हें ध्यानांत आल्यावर या संवताचा वर्षारंभ पूर्णिमान्त आश्विन शुक्ल प्रतिपदेस होत असावा, असें त्याचें

मत घनलें. डॉ. कील्हॉर्न याच्या काळीं या संवताचे पंधरा सोळा लेखच प्रकाशित झाले होते. त्यानंतर गेल्या साठ वर्षांत आणखी पंचवीस तीस लेख–ज्यामध्यें गणित करून पडताळा पाहाण्यास आवश्यक असे वार, तिथि, नक्षत्रें, ग्रहणें इत्यादिकांचे उल्लेख आहेत असे–उपलब्ध झाले आहेत. त्या सर्वांचा विचार करून कलचुरि वर्षाचा आरंभदिन प्रथम अमान्त व नंतर पूर्णिमान्त, कार्तिक शुक्ल–प्रतिपदा हा होता हें मी साधार दाखवून दिलें आहे.

वाकाटकांप्रमाणें कलचुरि राजवंश हा आपल्या प्रांताचें गौरवस्थान आहे. वाकाटकांचें राज्य विदर्भावर तर कलचुरींचें डाहल (जबलपूर जवळचा प्रदेश), चेदि (बघेलखंड) व दक्षिणकोसल (छत्तीसगड) या प्रदेशांवर पसरले होतें. कलचुरि राजे सहाव्या शतकाच्या मध्याच्या सुमारास प्रथम उदयास आले. त्या वेळीं त्यांची र.जधानी माहिष्मती ही होती. यांचें साम्राज्य उत्तरेस माळवा व गुजरात, पश्चिमेस कोंकण व दक्षिणेस महाराष्ट्र व विदर्भ या प्रदेशांवर होतें. विदर्भांत वाकाटकानंतर एक राष्ट्रकूट घराणें राज्य करूं लागलें, तें कलचुरींचें मांडलिक होतें. त्याचा एक ताम्रपट पांच सहा वर्षांपूर्वी रामटेकजवळ नन्दिवर्धन किंवा नगरधन येथें सांपडला होता. तो आतां एपिग्राफिया इंडिकामध्यें प्रकाशित झाला आहे.

इ. स. च्या सातव्या शतकांत बदामीचे चालुक्य प्रबळ झाले. त्यांनी कलचुरींचा पाडाव करून त्यांना मांडलिक बनविलें. नंतर कलचुरींनी नर्मदा-कांठीं त्रिपुरी (सध्याचें जबलपुरजवळचें तेवर) ही आपली राजधानी करून आपलें राज्य उत्तरेस काशी–प्रयाग पर्यंत पसरविलें. इ. स. च्या नवव्या शतकांत त्यांची एक शाखा छत्तीसगडांत स्थापन झाली. तिची राजधानी प्रथम तुम्माण व नंतर रत्नपुर ही होती. पुढें तिचीही एक:शाखा रायपुरास स्थापन झाली.

त्रिपुरी व रत्नपुर या दोन्ही ठिकाणच्या कलचुरींचे अनेक शिलालेख व ताम्रपट गेल्या वीस वर्षांत सांपडले आहेत. त्यायोगें त्यांच्या इतिहासावर पुष्कळ नवीन प्रकाश पडला आहे. त्रिपुरीची मुख्य शाखा कोणी स्थापली, याविषयीं पूर्वीं कांहींच माहिती नव्हती. त्रिपुरीच्या अनेक कलचुरि नृपतींच्या लेखांत 'वामदेवपादानुध्यात' असें विशेषण त्यांना लावलेलें आढळत असे. पण त्याचा अर्थ लागला नव्हता. सन १९३५ मध्यें सागर येथील एका प्राचीन पण सध्या अस्पष्ट झालेल्या लेखाचा छाप घेऊन त्याचा मी बारकाईनें अभ्यास केला, तेव्हां 'वामराजदेव' नामक राजानें त्रिपुरीची गादी स्थापली व त्या घटनेच्या स्मरणार्थ त्याच्या सर्व वंशजांनीं आपणांस 'वामदेवपादानुध्यात' (वामदेवाच्या पायांचें चिंतन करणारे) असें विशेषण लावण्यास सुरवात केली, असें ध्यानांत आलें. रतनपुरच्या शाखेचे अनेक लेख या कालखंडांत उजेडांत आले. याचें श्रेय छत्तीसगडांतील निरलस संशोधक पं. लोचनप्रसाद पांडेय यांस दिलें पाहिजे. यांनी स्वत: शरभपुरीय, सोमवंशी

व कलचुरि राजांचे अनेक ताम्रपट प्रकाशांत आणले; व कांही स्वतः प्रकाशित केले. यांनी प्राचीन नाण्यांचाही मोठा संग्रह केला आहे. यांच्या कृपेने कांही ताम्रपट व नाणीं मलाही प्रकाशित करतां आलीं, याबद्दल त्यांचे आभार मानले पाहिजेत.

कलचुरि–चेदि संवतांचे जवळ जवळ सवाशें लेख आतांपर्यंत सांपडले आहेत. ते सर्व 'भारतीय उत्कीर्ण लेखसंग्रह' या ग्रंथमालेच्या चौथ्या भागांत प्रसिद्ध करावे असें हिंदुस्थान सरकारनें १९३५ सालीं ठरविलें. हें अत्यंत महत्वाचें पण तितकेंच जोखमीचें काम कै. डॉ. हिरालाल यांना देण्याचें ठरलें होतें. पण त्यांच्या अकालीं निधनामुळें तें मजकडे आलें. सन १९३५ ते १९४५ या दहा वर्षांतील माझ्या फुरसतीचा बराचसा भाग या कामाकरितां खर्च झाला होता. हा ग्रंथ तयार झाल्यावर महायुद्धामुळें व इतर अनेक अडचणींमुळें बराच काळ पडून होता. तो आतां छापला जात आहे. या ग्रंथांत कलचुरि संवताच्या सर्व लेखांचें वाचन व चिकित्सक दृष्टचा परीक्षण, त्यांचें इंग्रजी भाषांतर, त्या संवताचा उपयोग ज्यांनीं आपल्या कोरीव लेखांत कालनिर्देशार्थ केला, त्या आभीर, शक, गुर्जर, सेन्द्रक, चालुक्य, कलचुरि इत्यादि राजवंशांचा इतिहास, तत्कालीन धार्मिक, सामाजिक, व आर्थिक परिस्थिति इत्यादि विषय येतील.

राष्ट्रकूट–कलचुरींच्या काळीं आपला विदर्भ देश राष्ट्रकूटांच्या साम्राज्यांत मोडत होता. या वंशाच्या अनेक शाखा महाराष्ट्रांत पसरल्या होत्या. विदर्भांतील एका मांडलिक शाखेचा उल्लेख मागें आला आहे. दुसरी शाखा मूळची हैदराबाद संस्थानच्या औरंगाबाद जिल्ह्यांतील. पुढें ती प्रबळ होऊन तिचें साम्राज्य दक्षिणच्या बऱ्याच भागावर पसरलें, या शाखेचा त्रिपुरीच्या कलचुरि राजवंशाशीं अनेकदां विवाहसंबंध झाला होता. या शाखेच्या तृतीय गोविंदाचे कांहीं ताम्रपट प्रस्तुत कालखंडांत वऱ्हाडांत सांपडले होते. त्यांचा अभ्यास करतांना या गोविंदाच्या उत्तर हिंदुस्थानांतील स्वाऱ्यांचा जो कालक्रम डॉ. आळतेकर यांनीं ठरविला होता, त्यांत बराच फरक करावा लागेल हें माझ्या ध्यानांत आलें. त्याचा मुलगा प्रथम अमोघवर्ष याचा जन्म यापैकीं एका स्वारींत झाला होता. त्याच. कालही या ताम्रपटांच्या पुराव्यावरून निश्चित करतां आला.

उत्तरचालुक्य–राष्ट्रकूटानंतर चालुक्यांचा अंमल महाराष्ट्रांत पुनःप्रस्थापित झाला.त्यांच्या धाडीभंडक नामक एका मांडिलिकाचा स्तंभलेख भांदक येथें सांपडला होता. त्याचा उल्लेख मागें आला आहे. दुसरा मांडलिक परमारवंशी जगद्देव याचा शिलालेख पुसदजवळ डोंगरगांव येथें आहे. तो माझे मित्र डॉ. मा गो. देशमुख यांनी माझ्या नजरेस आणला. त्यामुळें धारच्या परमारवंशी सुविख्यात भोजराजाच्या निधनानंतर माळव्यांत उत्पन्न झालेल्या परिस्थितीवर नवीन प्रकाश पडला आहे.

यादव–परमारांनंतर हा प्रदेश देवगिरीच्या यादवांच्या सम्राज्यांत अंन्तर्भूत झाला. यादवनृपति सिंघण याचा एकच लेख या प्रदेशांत अमडापुर येथें सांपडला आहे. त्याचा उल्लेख मागें आला आहे. त्यानंतर सिंघणाचा नातू कृष्ण याचा एक लेख वाइनगंगेच्या तीरीं मार्कंडी येथें दृष्टीस पडला. तो डॉ. य. खु. देशपांडे यांनीं भारत इतिहास संशोधक मंडळाच्या त्रैमासिकांत प्रसिद्ध केला आहे. दुसरा लेख अमरावतीजवळ नांदगांव येथील देवळांत आहे, तो मी 'एपिग्राफिया इंडिकां'त प्रकाशित केला आहे.

कृष्णाचा पुतण्या रामचंद्रदेव किंवा रामदेवराव याचा लेख रामटेकास लक्ष्मणाच्या देवळांत आहे. तो अत्यंत भग्न स्थितींत आहे. अवशिष्ट भागावरही अनेक वर्षे सफेतीचीं पुटें चढल्यामुळें त्याचा छाप घेतां येतां येत नाही. शिवाय या देवळांत हिंदूंशिवाय इतरांस जाण्याची मनाई असल्यानें हा लेख आरंभींच्या कनिंग्हचाम्, बेग्लर इत्यादि युरोपीय संशोधकांस समक्ष पाहतां आला नव्हता व त्यामुळें या लेखाविषयीं चुकीची माहिती प्रचलित झाली होती. या लेखाचा पेन्सिलनें घेतलेला छाप डॉ. कील्हॉर्न यास पाठविला होता. त्यांतील सिंघण व रामचंद्र हीं नांवें पाहून तीं नांवें रायपुरच्या हैहय किंवा कलचुरि वंशावळींत दिसत असल्यामुळें तो लेख कलचुरींचा असावा व त्यावरून कलचुरींचे राज्य इ. स. च्या पंधराव्या शतकांत नागपूरपर्यंत होतें असें त्यानें अनुमान केलें. रा. ब. हीरालाल-नींही त्याचा अनुवाद केला होता. या लेखाचा छाप घेतां येत नसल्यामळें तो वाचण्याकरितां माझे मित्र प्रा. ल. रा. कुळकर्णी यांच्या बरोबर मला अनेकदां रामटेकला जावें लागलें. नंतर तो प्रथम 'सरदेसाई स्मारकग्रंथां'त व नंतर 'एपिग्राफिया इंडिकां'त आम्ही प्रसिद्ध केला. हा लेख कलचुरींचा नसून देवगिरीच्या यादवांचा आहे व त्यांत रामटेकवरील देवळांचा व त्याच्या पंचक्रोशींतीतील तीर्थांचा उल्लेख आहे हें दाखविलें आहे. यानंतर हैद्राबाद संस्थानांतील रामदेवरावाचा पुरुषोत्तमपुरीचा अत्यंत मोठा ताम्रपट प्रा. भुसारी यांनी दिलेल्या माहितीवरून मिळवितां आला. त्यांत सिंघण, कृष्ण, रामचंद्र इत्यादि यादव राजांच्या विजयांविषयीं पुष्कळ महत्त्वाची माहिती आली आहे.

येथवर गेल्या वीस वर्षांत मध्यप्रदेशाच्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानांत किती प्रगति झाली याची त्रोटक माहिती दिली. याशिवाय दक्षिणच्या इतर प्रदेशांत राज्य करणाऱ्या विष्णुकुंडी, गंग, शिलाहार, सिंद इत्यादि राजवंशाचे नवीन लेख प्रसिद्ध करून किंवा प्रकाशित झालेल्या लेखांचा पुनः अभ्यास करून मला त्या त्या प्रदेशाच्या प्राचीन इतिहासाच्या ज्ञानांत थोडीबहुत भर घालतां आली; पण तिचा उल्लेख येथें करणें अप्रस्तुत होईल.

आता विदर्भाच्या प्राचीन इतिहासाची रूपरेषा स्पष्ट झाली आहे. पण महाकोशलच्या प्राचीन इतिहासांत अद्यापि अनेक त्रुटि आहेत. त्याकरितां त्या प्रदेशाची व्यवस्थित पाहणी करून कोरीव लेखांचा शोध केला पाहिजे. या कार्याकरितां अनेक उत्साही तरुणांनीं पुढें यावयास पाहिजे. गेल्या वीस वर्षांत मला एकटयाला सुमारे पन्नास नवीन उत्कीर्ण लेख व अनेक प्राचीन नाणीं प्रकाशित करतां आलीं. त्यावरच्या व इतर संशोधनविषयक माझ्या लेखांची संख्या दोनशेवर जाईल. यावरून या विषयांत उत्साही व मेहनती तरुणांना काम करण्यास केवढें क्षेत्र आहे हें स्पष्ट होईल. पण दुर्दैवाची गोष्ट ही कीं, या कार्यास स्वतःस वाहून घेणारे तरुण अभ्यासक अद्यापि पुढें येत नहींत. सुमारें वीस वर्षांपूर्वी या प्रदेशांत संशोधनकार्याला चालना मिळावी व संघटित रीतीनें कार्य व्हावें या उद्देशानें मध्यप्रांत संशोधन मंडळाची स्थापना करण्यांत आली. आरंभी आरंभीं मंडळाच्या कार्यांत बराच उत्साह दिसत होता. वैदिक, संस्कृत व मराठी वाङ्मय, प्राचीन, मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहास, पुरातन अवशेष, कला, चालीरीति इत्यादि विषयांवर निबंध वाचले जात व चर्चा होत असे. पुढें हळू हळू कांहीं विद्वान् मित्रांनीं ह्यांतून अंग काढून घेतले. दामुअण्णा ओक, बापूसाहेब भवाळकर, म. म. कृष्णशास्त्री घुले यां सारखे परिणतप्रज्ञेचे संशोधक एकामागून एक दिवंगत झाले. नवीन अभ्यासक संस्थेला मिळून कार्य करण्यास पुढें येत नाहींत; त्यामुळें पुढील दहा पंधरा वर्षांत ही संस्था नामशेष होईल काय, अशी भीति वाटू लागली आहे. तसें पाहिलें तर गेल्या वीस पंचवीस वर्षांत प्राचीन इतिहासांतील संशोधनाला अनुकूल अशी परिस्थिति निर्माण झाली आहे. पंचवीस–तीस वर्षांपूर्वीं नागपूरला संशोधनाला अवश्य असें संदर्भग्रंथ व संशोधनपर नियतकालिकांचे पूर्वीचे अंक मिळण्यासारखे नव्हते. ते कलकत्याच्या इंपीरियल लायब्ररींतून मागवावे लागत व त्याला खर्च फार येई. आतां नागपूर विश्वविद्यालयाचें सुसमृद्ध असें पुस्तकालय सर्व पदवीधरांना खुलें आहे. त्यामध्यें जरूर ते सर्व सन्दर्भग्रंथ व नियतकालिकें उपलब्ध आहेत. नवीन संशोधन करण्यापूर्वीं आपल्या विशिष्ट विषयांत अद्या यावत् किती प्रगति झाली आहे याची माहिती असणें अवश्य असतें. ती या पुस्तकालयांत मिळविणें कठीण जाणार नाहीं.

नवीन अभ्यासक पुढें कां येत नाहींत यांचें एक कारण संभवतें. आपल्या नागपूर व सागर विश्वविद्यालयांत प्राचीन भारतीय इतिहास व संस्कृति हा विषय अद्यापि शिकविला जात नाहीं व त्या विषयाचे अध्यापकही नियुक्त केले नाहींत. त्यामुळें या विषयाचें ज्ञान व त्यांतील संशोधनाच्या क्षेत्राची माहिती या विश्वविद्यालयाच्या पदवीधरांना नसते. याच्या उलट उत्तर भारतांतील कलकत्ता-पाटणा, बनारस, अलाहाबाद, लखनौ वगैरे सर्व विश्वविद्यालयांत प्राचीन

भारतीय इतिहास व संस्कृति हा विषय शिकविण्याची उत्तम सोय आहे. त्यामुळें त्या विश्वविद्यालयांत अनेक पदवीधर प्राचीन इतिहासाचें संशोधन करतांना दिसतात. भारतीय इतिहास परिषदेंत महाराष्ट्रीय संशोधकांच्या मानानें त्यांची संख्या किती तरी अधिक असते. आपल्या प्रदेशांत प्राचीन इतिहासाचें संशोधन व्हावयाचें असल्यास हा विषय आपल्या कॉलेजांतून शिकविला गेला पाहिजे. तसें झाल्यास या विषयांत संशोधन करण्यास कांही विद्यार्थी पुढे येण्याचा संभव आहे.

वास्तविक पाहतां इतर विषयांप्रमाणें याहि विषयांत संशोधन करण्यास त्याचें विश्वविद्यालयीन शिक्षण अवश्यच आहे असें नाहीं. डॉ. भाऊदाजी, डॉ. भगवानलाल इंद्रजी, डॉ भांडारकर, रा. ब. दीक्षित, डॉ. हीरालाल, या पूर्वीच्या पिढ्यांतील व श्री. ग. ह. खरे, डॉ. मो गं. दीक्षित यांसारख्या चालू पिढींतील संशोधकांना या विषयाचें शिक्षण कॉलेजांत मिळालें होतें असें नाहीं. संशोधनाची आवड, संस्कृत व प्राकृत भाषांचें पुरेसें ज्ञान आणि विस्तृत वाचन व परिश्रम करण्याची तयारी असल्यास कोणत्याही उत्साही विद्यार्थ्याला या विषयांत नवीन कार्य करतां येईल. संशोधन मंडळासारख्या संस्थांमधून अभ्यासकांना मार्गदर्शन करण्याची व्यवस्था करतां येईल. मध्यप्रदेश संशोधन मंडळाला इच्छा असूनहि हें कार्य अद्यापि हातीं घेतां आलें नाहीं याचें मुख्य कारण, त्याकरितां योग्य अशा मध्यवर्ती जागेचा अभाव हें होय. विदर्भ साहित्यसंघाच्या संकल्पित इमारतींत संशोधनकार्याकरिता स्वतंत्र दालन बांधण्याची योजना आहे व तेथें संघ व मंडळ या दोहोंच्या संग्रहीं असलेली संशोधनसामग्री ठेवून संशोधनकार्याला चालना देण्याचा चालकांचा विचार आहे. या योजनेनें सर्व प्रकारच्या संशोधनकार्याला उत्तेजन मिळून नजीकच्या भावी कालांत इतिहास, भाषा, वाङ्मय, संस्कृति इत्यादि विविध विषयांत तेथें अविच्छिन्नपणें संशोधन होत राहील अशी आशा आहे.

या बाबतींत आपल्या मध्यप्रदेश सरकारचेंहि कर्तव्य आहे; त्यासंबंधी चार शब्द लिहिणें जरुर आहे. आपल्या देशांत प्राचीन विद्या, कला व इतिहास यांच्या संशोधनास कसा आरंभ झाला हें सर्वांस माहीत आहे. या लेखाच्या आरंभींहि त्यासंबंधी थोडासा उल्लेख आला आहे. हजारों मैलांवरून येऊन येथे राज्य स्थापणाऱ्या इंग्रजांनी आपल्या प्रजेच्या रीतिरिवाजांची आपणांस माहिती व्हावी, या हेतूने व कांही अंशी नैसर्गिक चौकसबुद्धीने येथील संस्कृत व प्राकृत वाङ्मय, प्राचीन इतिहास, स्थापत्यशिल्पादि कला

इत्यादिकांच्या अभ्यासांत स्वतः भाग घेतला किंवा इतरांना तो करण्यांत मदत केली. पाश्चात्य जर्मन पंडितांस तर या अभ्यासाच्या व्यावहारिक उपयुक्ततेचेंहि आमिष नव्हतें. त्यांपैकीं कित्येकांनी केवळ मानवी इतिहासाच्या जिज्ञासेनें या कार्यांत आपलें आयुष्य वेंचलें. त्यांच्या कार्याचें महत्त्व जाणून तत्कालीन इंग्रज राज्यकर्त्यांनी त्यांस प्रोत्साहन दिलें व हरतऱ्हेनें मदत केली. हिंदुस्थानचा गव्हर्नर लॉर्ड कर्झन याने पुराणवस्तुसंशोधन खातें स्थापून या कार्यास कशी चालना दिली तें सर्वविश्रुत आहे. गेल्या पन्नास वर्षांत आपल्या प्राचीन–इतिहासविषयक ज्ञानांत जी भर पडली आहे तिचें बहुतांशीं श्रेय परकी सरकारास आहे. आतां आपल्या देशास स्वातंत्र्य प्राप्त झालें आंहे. जनतेंत आपल्या देशाची प्राचीन संस्कृति, इतिहास वगैरेविषयीं जिज्ञासा उत्पन्न होऊं लागली आहे. या विषयांत संशोधन करण्यास भारतीय विद्वान् अधिकाधिक संख्येने पुढे येऊं लागले आहेत. अशा वेळीं त्यांना प्रोत्साहन देणें व त्यांच्या कार्यास आर्थिक साहाय्य करणें हें आपल्या देशी सरकारचें पवित्र कर्तव्य आहे- आपल्या देशाच्या पंचवार्षिक योजनांत देशाची सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व वैज्ञानिक उन्नति करण्याकडे लक्ष दिलें जात आहे तें योग्यच आहे. पण त्याबरोबरच आपल्या देशाच्या प्राचीन संस्कृतीच्या व इतिहासाच्या अभ्यासासहि सढळ हाताने मदत करणें अत्यावश्यक आहे. कांहीं प्रादेशिक सरकारांना याची जाणीव झाली असून त्यांनी आपल्या प्रदेशांतील संशोधनसंस्थास उत्तेजन व आर्थिक साहाय्य देण्यास आरंभ केला आहे. आपल्या मध्यप्रदेशांत संशोधन कार्य करणाऱ्या तीन संस्था महाकोशल, नागपूर व विदर्भ भागांत आहेत; पण आर्थिक अडचणीमुळे त्यांच्याकडून आतापर्यंत भरींव कार्य होऊं शकलें नाही. यापुढें तरी आपल्या सरकारास त्यांच्या कार्याचें महत्त्व पटून त्यांस सक्रिय उत्तेजन मिळेल अशी आशा आपण करूं या.

----०----

मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहाससंशोधन

(ले. श्री. दे. गो. लांडगे, बी. ए., एल्एल. बी., नागपूर)

मध्यप्रदेशांतील प्राचीनतिहासविषयक संशोधनाचा आढावा मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे कार्याध्यक्ष व या प्रान्तांतील अग्रगण्य विद्वान् म. म. वा. वि. मिराशी यांनी यापूर्वी घेतला आहे यानंतर प्रस्तुत लेखांत असेंच मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहासाच्या संशोधन कार्याचें सिंहावलोकन करण्याचें काम मला करावयाचें आहे

कालखंडाची व्याप्ति

युरोपांत ४१० इ. त रोमन साम्राज्याचा अंत झाल्यावर प्राचीन इतिहासाचा काळ संपला व मध्ययुगाला सुरुवात झाली. तो काळ १५ व्या शतकाच्या अखेरीस कोलंबसाच्या अमेरिकेच्या शोधाने संपला व अर्वाचीन इतिहासाला सुरुवात झाली. भारतेतिहासाचें मध्ययुग कोणतें समजावें व अर्वाचीन इतिहासाला केव्हां सुरुवात करावी या संबंधी इतिहास-लेखकांत मतभेद दिसून येतो. तरी सामान्यत: ११ व्या शतकाच्या प्रारंभापासून या देशावर मुसलमानांचें जोराचें आक्रमण सुरू झालें. तेव्हांपासून तों मोंगली साम्राज्याचा संस्थापक बाबर या देशांत यईपावेतोंचा जो काल तो मध्यकाल धरावयास हरकत नाही व त्यानंतरचा काल अर्वाचीन इतिहासाच्या क्षेत्रांतील मानूं. लेनपूल सारखा इतिहासकार मध्य-युगाचा प्रारंभ जरी मुसलमानांच्या ११ व्या शतकांतील आक्रमणापासून करतो तरी त्याचा अंत मोंगली सत्ता संपून १७६४ च्या बक्सरच्या लढाईने जो इंग्रजांच्या सत्तेचा उदय झाला, तों पावेतों करतो.

मध्ययुगीन राजवटी

इ. स. ७१२ ला अरब खिलाफतीच्या वतीने महंमद बिन कासिम याने सिंधमध्यें आपलें प्रस्थान टाकलें. त्याच वेळीं अरबांनी पश्चिमेकडील देश म्हणजे त्या वेळचें अर्धें ज्ञात जग केवळ ५० वर्षांत पादाक्रांत केले. त्या मानाने, त्यानतर आपण आपलें स्वातन्त्र्य सुमारें ५०० वर्षे कायम ठेऊं शकलों, हें भूषण होय. या काळांत या देशांत अनक राज्ये होतीं; व त्यांपैकीं कांहींची सत्ता या प्रान्तावर किंवा त्याच्या सीमेपर्यंत आली होती. ११ व्या शतकाच्या अखेरपर्यंत राष्ट्रकूट, उत्तर चालुक्य व परमार यांची सत्ता वऱ्हाडातून नाहीशी होऊन देवगिरीच्या यादवांची अधिसत्ता निकटच्या दक्षिणेंत प्रस्था-पित झाली व तिचा अंमल मराठी मध्यप्रदेशःवरहि बसला. त्यांच्या ऱ्हासकालीं चंद्रपूरचे गोंड राजे उदयास आले. तिकडे जबलपूरकडे कलचुरि वंश आपल्या वैभवांत होता व तो क्षीण झाल्यावर देवगडच्या गोंड जमीदारानें डोकें वर काढलें. खेरल्याचें गोंड राज्य बाहमनींनी बुडविलें. रतनपूरचे हैहय,

खलारी व रायपूर येथील त्यांच्या दोन शाखा, वारंगलच्या काकतीयांतून निघालेले बस्तरचे व कवर्धाचे नागवंशी राजे, कांकेरचे सोमवंशी, लांजी, भंडारा व वैरागड येथील छोटे मोठे जमीदार या प्रान्तात मुसलमान काळांत सत्ता गाजवीत होते.

मुसलमानकाळांतील उपलब्ध साधनें

महंमद गझनवी, महमद घोरी बखत्यार खिलजी (नालंदा वगैरेंचा विध्वंसक) व कुतुबुद्दिन ऐबक या सुलतानांनी किंवा त्यांच्या हस्तकांनी हिंदूच्या मन्दिरांचा विद्यापीठांचा व उत्तमोत्तम नगरांचा विध्वस केला व सहस्त्रावधि हिंदूंची मुंडकीं कापलीं. मात्र या प्रांतापुरतें बोलावयाचें तर, बुंदेलखंडचे चंदेल्ल व माळव्याचे परमार यांनी त्यांची धाड थोपवून धरली. तरी घोरीचा हस्तक कुतुबुद्दिन ऐबक चंदेल्लांवर चालून आलाच होता. अर्थात् या कंदनामुळें त्या काळचा यथार्थ इतिहास सांपडणें दुरापास्तच होय तरी या सुलतानांच्या पदरच्या मुसलमान लेखकांनी, तसेच युरोपिअन प्रवासी किंवा वकील यांनी लिहून ठेवलेल्या हकीकती उपलब्ध आहेत. मोंगल काळांत तर इतिहासाला बारेमाप पीक आलेलें दिसतें. हिंदुस्थान सरकारच्या पुराण-वस्तुखात्याने १९३२ सालीं एक इतिहासग्रंथांची यादी प्रसिद्ध केली आहे तींत ३०७ फारशी हस्तलिखितें असल्याचें नमूद आहे. मात्र तींत मराठा इतिहासावर फक्त तीनच ग्रंथ आहेत. अलबेरुनी, फरबी, उत्बी बैहकी व फिरदौसी हे महंमद गझनवीच्या वेळचे ग्रंथकार होत. महंमद घोरी व पृथ्वीराज चव्हाण यांचा संघर्ष चंद वरदाईने पृथ्वीराज रासो या बृहद्ग्रंथात वर्णिला आहे व अशीं रजपुतांच्या आख्यायिका व वंशावळी देणारीं तत्सम इतरहि साधनें उपलब्ध आहेत. बाबरचें आत्मचरित्र प्रसिद्ध आहे. हुमायूनच्या कारकीर्दीचे लेखक त्याचा सेवक जवाहर व बहिण गुल्बदान हे मुख्यतः होत. ऐने अकबरी, अकबरनामा व तारीक–इ–फिरिश्ता हे ग्रन्थ तर सर्वश्रुतच आहेत. पुढील बादशहांनाहि तसेंच भाग्य लाभलें आहे परंतु ही साधनें एकांगी होत. ज्यावेळीं मुसलमानांचे घोर आक्रमण हिंदुस्थानांत चालू होते, त्याच काळीं या भूमींत मोठमोठे साहित्यिक भाष्यकार, संत-महंत व निबंधकार यांचीहि ग्रंथनिर्मिति चालू होती व त्यामुळें इतिहासाचें यथार्थ दर्शन होण्यास मदत होते.

आरंभीचे प्रयत्न

मुसलमान इतिहासकारांनी आपल्या प्रान्ताला जें गोंडवन म्हणून म्हटलें आहे, तें अज्ञानमूलक होय. वर ज्या भिन्न भिन्न एतद्देशीय बलिष्ठ सत्तांचा उल्लेख आहे, त्यांची आतां इतकी विपुल सामग्री एकत्रित झाली आहे कीं, त्यामुळें मुसलमानी इतिहासलेखकांस गौणत्व प्राप्त झालें आहे. इ. स. ६५० ते १२५० या कालावधींत या प्रान्तांत १३ राजवंश सत्ताधीश होते. त्यांचे शिलालेख व ताम्रपट १९ व्या शतकाच्या मध्यापासून सामान्यतः उपलब्ध होणें सुरु झालें व त्यांतहि गेल्या अर्ध शतकांत तर खूबच भर पडली. कलकत्यास १७८४ ला रॉयल एशिआटिक सोसायटी

स्थापन झाली; परंतु युरोपिअन अभ्यासकांचें लक्ष प्रथम संस्कृत साहित्याकडे गेलें. बंगालप्रमाणें मुंबईतहि १८०३ मध्यें अशीच संस्था अस्तित्वात आली व १८२९ मध्यें ती ग्रट ब्रिटनच्या मूळ संस्थेची शाखा बनली. परंतु, १८४१ पासून तिला स्वतंत्र हुरूप चढला. त्या वर्षाच्या तिच्या जुलैमध्यें प्रसिद्ध झालेल्या पहिल्या खंडात नागपूर पदार्थसंग्रहालयातील परमार नृपतींच्या शिलालेखावर बाळशास्त्री जांभेकर यांचा लेख आला. यानंतर महाराष्ट्रांतील इतर विद्वान् पुढे सरसावले व या प्रांतातील युरोपिअन विशेषज्ञांचेहि लेख आले.

त्यानंतरचे प्रयत्न

पुराणवस्तुखात्यातर्फे या प्रांताची पहिली पाहणी १८७४ सालीं झाली. आरंभी जे डा बेगलर व कनिंगहॅम यांनी (प्रतिवृत्तें, भाग ७, १७ व १९ यांत) व नंतर हेन्री कुझिन्स यांनी पाहणी केली. यानंतर जिल्हावार गॅझेटिअर्सकरितां माहिती संग्रहित होत असतां, श्री. आर. व्ही. रसेल व त्यांचे दुय्यम डॉ. रा. ब. हिरालाल यांना संशोधनाची संधि प्राप्त झाली गॅझेटिअर्स तर बाहेर पडलेंच पण त्याचबरोबर रसेलसाहेबांचे 'या प्रांतातील जाती व वंश' याजवरील ४ खंडहि प्रकाशित झाले. तसेंच डॉ. हिरालाल यांची तीन सहस्र हस्तलिखित ग्रंथांची यादी व कोरीव लेखांची यादी हे दोन संदर्भग्रंथहि प्रसिद्ध झाले. दुसऱ्या ग्रंथामुळें ह्यूनत्संग या प्रांतात आल्यापासून तों गोंडांचा उदय होईपर्यंतचा जो कालखंड–इ. ६५० ते १२५०–अंधारात होता, तो प्रकाशांत आला. १९३९ मध्यें म्हणजे त्रिपुरी कॉंग्रेसच्या वेळीं ब्यौहार राजेन्द्रसिंह यांचे त्रिपुरीचा म्हणजेच प्रसिद्ध कलचुरि घराण्याचा इतिहास हें सुंदर पुस्तक जें बाहेर पडलें, तें उपरोक्त संशोधनाचें फल होय.

गोंडांच्या इतिहासाचीं साधनें

गोंडराजे म्हणत कीं, 'आमचा शब्द हाच आमचा ताम्रपट.' यामुळें त्यांचे प्रस्तरलेख अथवा ताम्रपट तर नाहींतच, पण विश्वसनीय असे इतिहासग्रंथहि नाहीत. तसे त्यांचे प्रशस्तिकार किंवा भाट झाले, पण त्यांच्या कवनांत अतिशयोक्ति अधिक. डॉ. हिरालाल यांच्या यादीप्रमाणें एक गोंडराजा प्रेमनारायण याच्या वेळची जबलपूर जिल्ह्यातील सिम्रा येथील सतीशिला व रामनगर येथील शिलालेख एवढीच सामग्री असल्याचें दिसतें सी यू. विल्स् यांचे 'सातपुड्यातील राजगोंड महाराज' हें पुस्तक (१९२३) मुख्यतः मुसलमानी इतिहासग्रंथांवर आधारलें आहे. १८३७ मध्यें 'हिस्ट्री ऑफ गढामंडला राजाज्' म्हणून स्लीमनने एक पुस्तक लिहिलें. त्यांत दोन बखरी व १६६७ चा उपरोक्त रामनगरचा कोरीव लेख आधाराला घेतले होते. लेख तर आतां अविश्वसनीय ठरला आहेच, पण बखरीवरहि १८६० मध्यें डॉ हालने टीका केली आहे. गणेशदत्त पाठक (गढाराजांच्या पुरोहित कुटुंबाचे वंशज) यांनी 'हिस्ट्री ऑफ मंडला' नांव चें पुस्तक लिहिलें आहे. वरील यादीनंतर डॉ. हिरालाल यांना आणखी एक सतीशिळा व सोन्याचें नाणें सांपडलें. नाण्यांवर १५१३ इ. मध्यें प्रसिद्ध संग्रामशहाचा उल्लेख आहे. चांदीच्या नाण्यांवर तेलगु अक्षरें असल्यामुळें गोंड दक्षिणेतून आले असावेत असे वाटतें.

विलसनें चांद्याच्या गोंड राजांना तर सोडूनच दिलें आहे. नागपूरच्या गोंड राज्याविषयी तो पृ. १२७ वर एका टीपेंत गोविंदराव ब्राम्हणानें १८७६ इ. त एक बखर लिहिल्याचा उल्लेख करतो. माझ्या वहींतहि त्या बखरीचा कागद १८७६ च्या छापाचा असल्याचें नमूद केलेलें सापडलें. ही बखर मी ६ वर्षांपूर्वी नागपुरांत विलस म्हणतो त्याप्रमाणें किल्यांत राजाच्या नातेवाईकाकडे पाहिली होती. विलसचा ह्या बखरीवर विश्वास बसत नसला, तरी त्यांत इतर उपयुक्त माहिती आहे. मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या दप्तरांत मुख्यतः देवनागरींत व थोडीशी मोडींत लिहिलेली अशी बखर आहे. ती १४-४-१८८८ ला लिहून झाल्याचे लेखक म्हणतो. अर्थात् राजा सुलेमान शाहच्या वेळीं ती लिहिली आहे. चांद्याच्या वंशाबद्दल अजून एकहि विश्वसनीय कागद मिळाला नाहीं.

गोंडापूर्वी गौळी राज्यें

अलीकडील मुद्रित पुस्तकांत (१९१४) शिवणीचे सील वकील यांचे पुस्तक चांगलें आहे. गोंड हा शब्द बंगालच्या 'गौड' या शब्दापासून निघाल्याचें कनिंगहॅमचे मत त्यांना मान्य नाहीं. माझेंहि मत सील सारखेंच आहे. दुसरें एक नटेसन अय्यर यांचें पुस्तक आहे, परंतु त्यांत विशिष्ट विवेचन नाहीं. गोंडांपूर्वी गवळ्यांची राज्यें असल्याचा लोकांचा समज आहे एवढेंच नव्हे, तर रणशूर व धनशूर या गवळ्यांपासून देवगडच्या जाटबाशहानें आपलें राज्य परत हिसकून घेतल्याचें सांगण्यांत येतें. विलस् यास गवळी राज्य असल्याचें संमत नाही. उलट १८६७ च्या पहिल्या गॅझटिअरच्या उपोद्घातांत ग्रँटला ही कथा टाकून द्यावीशी वाटत नाही. श्री. दिलीपसिंग यादव यांनी 'अहीर इतिहासकी झलक' म्हणून जें पुस्तक लिहिलें आहे, (१९१४) त्यांतहि या प्रांतात गौळी राज्यें असल्याचें प्रतिपादिलें आहे. या विषयावर अजून संशोधन व्हावयास हवें.

मराठ्यांचा काळ

येथवर मराठ्यांच्या पूर्वीचे स्वकीय अथवा परकीयकृत संकलनांचें किंवा संशोधनाचें निरीक्षण करण्यांत आलें. नागपूरकर भोसल्यांच्या उत्कर्षकाळीं त्यांचा इतिहास लिहिल्याची माहिती अजून उपलब्ध झाली नाही. द्वितीय रघूजीचा अडगांव येथें पराभव झाल्यावर, १८०४ च्या प्रारंभी २५ वर्षांचा तरुण एलिफन्स्टन रेसिडेन्ट म्हणून नागपुरास आला. त्यानें आपल्या बरोबर ३ शिक्षित कुटुंबें नागपुरास आणिलीं. त्यांपैकीं दंडिग्यांचें कुटुंब हें एक होय. यांचेकडे थोडसें कुटुंबवृत्त व प्रवासवर्णन एवढेंच पहावयास मिळालें. एलिफन्स्टन नंतर जेन्किन्स आला व तो तब्बल २० वर्षे राज्यांत राहिला. त्यानें केंद्रसरकारकडे १८२७ सालीं एक सविस्तर वृत्त लिहून पाठविलें. तें मुद्रित झालें आहे तें लिहिण्यापूर्वी त्यानें ६० प्रश्नांची एक प्रश्नमालिका प्रमुख लोकांकडे पाठविली होती. ती लेखकानें पाहिली आहे. दुसरें, 'शिष्टाधिपति' जेन्किन्सकडे 'किंकर' विनायकराव औरंगाबादकर हा वाकबगार गृहस्थ होता. याला म. म. मिराशी आद्य संशोधक म्हणून

संबोधितात, तें कांहीं अंशीं खरें आहे. त्याच्याहि पूर्वी म्हणजे नागपुरास रेसिडेंट स्थायिक होण्यापूर्वी क्लाईव्ह, हेस्टिंग्स् व कॉर्नवॉलिस यांचेकडून नागपूरदरबारकडे जे वकील आले होते, त्यांनीहि सूक्ष्म निरीक्षण करून येथील राज्याच्या हकीकती दिल्या आहेत. जमीनमोजणीचा रेनेलचा नकाशा तर भौगोलिक माहितीच्या दृष्टीनें फार उपयुक्त आहे.

औरंगाबादकर

औरंगाबादकरांनी एकत्रित केलेल्या माहितीचे कित्येक रुमाल असून ते लंडन येथे इंडिया ऑफिसच्या ग्रंथालयांत आहेत. त्यानें ७ फारशी किताबी, दरबार, गुजाबादादा, सखाराम महिपत व बगाजी रघुनाथ (हा भोसल्यांचा इंग्रज दरबारीं वकील होता) यांच्या बखरी, १८१३ ची जेन्किन्सबरोबरच्या पुणें प्रवासाची हकीकत, मुत्सद्यांचे अहवाल, माहूर, छत्तिसगड व छिंदवाडा जिल्ह्यांची माहिती, सोभामलची बंगल्याची हकीकत, राजा गोविंद बक्षचा 'राहात आफजा', शिवाजीच्या व पेशव्यांच्या बखरी व पुण्याची कैफियत, धर्मादायांचे उतारे, परराष्ट्रीय पत्रव्यवहाराचे दोन खंड व वृद्धांच्या तोंडी हकीकती अशा माहितीच्या आधारावर १५ खंड लिहिले आहेत. तो सन १८०९ पासून रात्रंदिवस खपत होता. "एक मराठी नवीस, एक फारशी नवीस, एक शास्त्री व एक लेखक"असे मिळून हें लेखनकार्य केलें. "प्रथम गणेश सरस्वती व मुसदी यांस नमन करून प्रभुसाहेब अलीशान रजारद जेकीन्ससाहेब बहादुर पदकमलीं दृढभाव धरून सके १७३८ धातानाम संवच्छर स. १२२६ फ. त लेखनाडंबर आरंभून ×××× हे बखर तेरा वर्षांत तयार जाहली' ! हींत १८१८ पर्यंतची हकीकत आली आहे. त्यानें चिटणीस दप्तरांतून हुकूमनामे व तहांच्या नकला घेतल्या. अदालतीच्या कारवाईचीं टिपणें घेतलीं. ज्या ज्या स्थानास पुण्याच्या वाटेवर 'स्वामींनी' (जेन्किन्सनें) पवित्र केलें. त्याचा तपशील लिहिला व पोवाडे टिपले'. त्याने द्वि. रघुजीस आलेल्या ११३ पत्रांची विल्हेवारी केली, चंद्रपूर, छत्तीसगड इ. ठिकाणचे शिलालेख पाहिले व नकला घेतल्या. तात्पर्य, असा हा उद्योगी पुरुष होता. त्याला इंग्रजी किंवा संस्कृत येत नव्हतें. पण चौकस मात्र खरा. या व्यक्तीचे येथें वंशज आहेत किंवा नाहीत, हे लेखक निश्चित करीत आहे. ज्याचेवर विश्वासून १६-१२-१८१७ रोजी आप्पासाहेब रेसिडेन्टचे स्वाधीन झाला तो हा होय. 'ब्राम्हणाने क्रिया करून दगा केला' असें जें मनभटाविषयीं म्हटलें आहे, तें खरे नाहीं.

सरकारी दप्तर

जेन्किन्सनें आपल्या रिपोर्टांत औरंगाबादकरांच्या माहितीचा कितपत उपयोग केला, हें समजण्यास मार्ग नाही, पण त्याच्या विषयीं कृतज्ञता कोठेच उघडपणें दर्शविली नाही. या वृत्तांत पुष्कळ भाग अभ्यसनीय आहे. यानंतर प्रान्तीय सरकारने रेसिडेन्सीतील कागदपत्रांतून कांही विशिष्ट प्रकरणें निवडून तीं छापलीं आहेत. अलीकडे डॉ. सिन्हा यांच्या संपादकत्वाखालीं ३ भाग बाहेर पडले आहेत. असे ७ खंड काढण्याची योजना आहे. यांत १८०० ते १८६० पावेतोंचा कालखंड येईल. १८६७ चे संबंध प्रान्ताचें एकच

गझेटिअर आहे. त्यांत थोडी ऐतिहासिक दृष्टी दिसते. त्या मानानें १९०७ च्या जिल्हावार गॅझेटिअर्समध्यें अधिक माहिती आहे. तरी ती स्वातंत्र्योद्भव परिस्थितीमुळें जुनाट भासते. इकडे संशोधन मंडळानें सरकारचें लक्ष वेधलें आहे. केन्द्र सरकारनें प्रसिद्ध केलेल्या पर्शिअन कॅलेन्डर्समुळें भोसले राज्यातील शासकांच्या नीतीवर व त्यांचे सल्लागार, सरदार व वकील यांच्या मनोभूमिकेवर विदारक प्रकाश पडतो.

स्थानिक प्रयत्नांच्या मागसलेपणाची मीमांसा

महाराष्ट्रांतील इतिहासविषयक आरंभीच्या प्रयत्नांचा 'भारतवर्ष' नांवाच्या अल्पजीवी मासिकात (१८९७) आढावा घेण्यात आला आहे. या प्रयत्नांत नागपुरांतील अभ्यासूंन हि थोडी मदत केली आहे. स्प्रेंगेल, (१७९१) स्कॉटवेरिंग, (१८१०) ग्रँट डफ (१८२६) मॉरिस ब्रिग्ज, टॉड व माल्कम वगैरे इतिहासकार सरकारी अधिकारी होते व त्यांच्यांत परस्पर सहकार्यहि होतें. मुंबईच्या एशिआटिक सोसायटीचेंहि त्याना प्रोत्साहन होतें. आमचेकडे भोसल्यांचें राज्य १८५३ पर्यंत असल्यामुळें आम्हाला नवीन दृष्टि उशीरां आली. १९०३ पर्यंत वऱ्हाड मध्यप्रदेशाशी संलग्न नव्हता. मुंबईला १८५७ मध्यें विश्वविद्यालय स्थापन झालें, तर या प्रांतांत १८६१ मध्यें पहिल्यांदा नवीन अंमल सुरू झाला व विश्वविद्यालय तर १९२३ त स्थापन झालें. ज्या वेळीं येथें सिट स्कूल सारखी शालेय शिक्षणसंस्था स्थापण्याचा प्रयत्न चालला होता, त्यावेळी (१८६८) विविधज्ञानविस्तार' तिकडे निघाला; व ग्रँट डफच्या इतिहासावर टीका करण्यापर्यंत कीर्तन्यांनी मजल गाठली होती. जांभेकरशास्त्री १८४१ मध्यें संशोधनात्मक लेख लिहू लागले, त्यापूर्वी ३८ वर्षे रॉयल एशियाटिक सोसायटी मुंबईत स्थानापन्न झाली होती. १८६४ मध्यें रानडे एम्. ए. झाले, तर आमची बी. ए. ची तुकडी पहिल्यांदाच १८८८ मध्यें परीक्षेकरितां गेली जगन्नाथ शंकरशेट, डॉ. भाऊ दाजी लाड, डॉ. भगवानलाल इंद्रजी, रा. सा मंडलीक, न्या. मू. तेलंग शंकर पांडुरंग पंडित, सर भांडारकर हे निबंधमाला (१८७४) व काव्येतिहास संग्रह (१८७८) यांच्या पूर्वीच संशोधनकार्यात गुंतले होते. १८७३ ते १८८२ या काळांत कै. हरि महादेव पंडित हे नागपुरांत प्रथम पुढे आले. ते 'विविधज्ञानविस्तारा' चे एक संपादक झाले व काव्येतिहाससंग्रहात अप्रकटपणे टीकाटिप्पणी लिहू लागले. त्यांनी १८७६ पासून इंग्रजी ग्रन्थांच्या आधारें क्रमशः 'विस्तारा'त नागपूरचा छोटासा इतिहास लिहिला व पुढे त्याला ऐतिहासिक घराण्यांची पुस्ती जोडून ता प्रसिद्ध करण्यांत आला. या पुस्तीमुळें विस्मृतींत गेलेलीं कुटुंबें थोडीशीं उजेडांत आलीं; पण हा सर्व केवळ तोंड ओळखच. यानंतर कै. वामन दाजी ओक यांनी १८८८ त गुप्तेकृत नागपूरची बखर प्रसिद्ध केली व काव्येतिहाससंग्रहातून भोसले–पेशवे–व्यवहाराची ७९ पत्रें सटीप प्रसिद्ध केली. ओकांच्या तळटीपा अत्यंत समर्पक व माहितीपूर्ण आहेत व त्या त्यांनी विद्यमान राजेबहादरांचे वडील जानोजी महाराज जिवंत असतांच लिहिल्यामुळें विश्वसनीयहि आहेत. १८९२ मध्यें नागपुरांत प्रका-

शित होणाऱ्या 'नीरजोल्लास' नांवाच्या अल्पजीवी मासिकानेहि कांही जुजबी ऐतिहासिक स्फुट माहिती दिली आहे. मात्र न्या. रानडे यांच्या 'मराठ्यांच्या सत्तेचा उदय' या बहुमोल ग्रंथानंतर सर्वांचीच दृष्टि फाकली. रा. ब. पारसनीस, मोडक, वासुदेवशास्त्री खरे यांच्या प्रकाशनांमुळेहि स्थानिक इतिहासावर प्रकाश पडत गेला.

राजवाडेयुग

यानंतर खरा विराट् प्रयत्न म्हणजे इतिहासाचार्य वि. का. राजवाडे (१८९८ ते १९२६) यांचा होय. म म. प्रो. पोतदार याला राजवाडेयुग म्हणतात. त्यानी मराठ्यांच्या इतिहासाच्या साधनांचे २२ खंड काढले. त्यांत विशेषतः खंड ३ मधील पत्रें नागपूरच्या इतिहासलेखनाला मदत करतात. ऐतिहासिक पत्रव्यवहार म्हणून जो एक ग्रंथ कै. या. मा काळे यांनी सहसंपादित केला, त्यांत उपरोक्त ७९ पत्रें पुनर्मुद्रित तर केलींच, पण स्वतःच्या संग्रहातील कांही नवीन पत्राचांहि भर घातली. १९२१ पासून नियमितपणें निघणाऱ्या भारत इतिहास संशोधन मंडळाच्या त्रैमासिकांतून म. म. मिराशी, डॉ. य. खु. देशपांडे व प्रि ह. ना. नने यांनी विविध कालखडान्तर्गत एतिहासिक व साहित्यिक विषयांवर लिहिलें आहे. पेशवे दप्तराच्या निवडक पत्रांच्या ४५ खंडांपैकीं २०व्या खंडांत १७१७ ते १७७४ पर्यंतचा भोसल्यांच्या कामगिरीचा पत्ररूप इतिहास पहावयास मिळतो. तसेंच १७८१ ते १८२० या काळांतील पुणे रेसिडेन्सीतील इंग्रजी पत्रें कै. या. मा. काळे यांनी संपादिलीं आहेत. पेशवे दप्तरांतील खंड १, ६, १७, २८ व ३९ यांतहि भोसल्यासंबंधी बरीच पत्रें आहेत. त्याचप्रमाणें वाड-पारसनीसांचे सनदातहनामेहि उपयुक्त आहेत. सर जदुनाथ सरकार, आर. डी. बॅनर्जी व हरेकृष्ण मेहताब यांच्या ग्रंथांमुळे भोसल्यांच्या ओरिसांतील कारकीर्दीवर कांही प्रकाश पडतो. या विषयानें कसून संशोधन होण्याची आवश्यकता भासते.

मध्यप्रदेश संशोधन मंडळ

मध्यप्रदेश संशोधन मंडळासमोर आतांपावेतो २०० च्या वर निबंध वाचण्यांत आले. त्यांत मध्ययुगीन व प्राचीनेतिहासविषयक व साहित्यिक निबंधांचीं संख्या अधिक आहे. मंडळाच्या स्थापनेच्या सुमारास (१९३४) कै. नी. ब. भवाळकर व श्री. शं. गो. चट्टे यांनी अनुक्रमें 'वाङ्मयीन संशोधनाची दिशा' व 'नागपुरातील सरदार घराणीं' हे लेख 'वागीश्वरी' मासिकांत लिहिले. पुढे श्री. चट्टे यांनी आपासाहेब भोसले यांचा अप्रकाशित पण त्रुटित अहवाल उजेडांत आणला. पण त्यापासून फारसा फायदा झाला नाही. अलीकडे 'युगवाणी'च्या ऑगस्ट १९५० च्या अंकांत भवाळकरांचा एक २८ वर्षांपूर्वी लिहिलेला लेख प्रसिद्ध झाला आहे. त्यांत वाङ्मयाबरोबरच ऐतिहासिक कार्याचेंहि समालोचन आलें आहे. कै. भवाळकर, कै. म. म. कृष्णशास्त्री घुले प्रा. नेने, प्रा. वि. भि. कोलते, कै. प्रि. दा. के. ओक, व श्री आ. रा. देशपांडे या मंडळाच्या सद-

त्यांच्या संशोधनानें सांस्कृतिक इतिहासाच्या अभ्यासाला मदत होते. वणी येथील कै. नीळकंठराव सरमोकद्दम यांनी १८६७ मध्ये 'बखरी, सनदा, पोवाडे व ऐतिहासिक कागदपत्रें' याचे आधारें वणीचा इतिहास लिहिला होता. (शारदाश्रम, वार्षिक शके १८३५.) अलीकडे ५-७ वर्षांत प्रस्तुत लेखक नागपूर शहराची व भोसले राजवटीची माहिती शोधून ती मंडळांपुढे ठवीत असतो व ती सारांशरूपाने नियतकालिकांत व दैनिकांतहि मधूनमधून येते. मंडळानें प्रसिद्ध केलेल्या 'निवडक निबंधात' लेखकाचा पंडितपरंपरेवर लेख आला आहे. तसेच टोपोग्राफी ऑफ नागपूर' हा त्याचा लेख नागपूरच्या हिस्टॉरिकल कांग्रेसने प्रसिद्ध केला (१९५०). लेखकानें मिळविलेली माहिती कांही सार्थकीं लागावी म्हणून त्याचें 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' हें छोटेंसें पुस्तक मुद्रित हात आहे. नागपुराकडील शाहीरांचे पोवाडे आंक्वर्थ-शालीग्राम व केळकर यांच्या पुस्तकांत प्रसिद्ध झाले आहेत. त्याचप्रमाणें २ पोवाडे 'विस्तारा'च्या जुन्या अंकात आले आहेत धर्माजी भोसले व परसोजी भोसले यांच्यावर दोन पोवाडे लेखकाला मिळाले. त्यापैकीं एक चांद्याच्या मधुवनांत' प्रसिद्ध झाला आहे.

इतर संस्था व कार्यकर्ते

नागपूर विश्वविद्यालयाच्या वतीनें एक 'हिस्टॉरिकल सोसायटी' १९४५ मध्यें स्थापन झाली. तिच्या इंग्रजी वार्षिकांतील लेख वाचनीय असतात नागपुरातील एक संकलनकार व इतिहासलेखक पं. प्रयागदत्त शुक्ल यांनी भोसल्यांच्या इतिहासावर १९३३ मध्यें हिन्दीत पुस्तक लिहिलें आहे या शिवाय गॅझेटिअसंच्या धर्तीवर त्यांची कांही प्रकाशनें आहेत. त्यानी नुकतेच एक सातपुडा सभ्यतेवर पुस्तक लिहिलें आहे. कै. रा. ब. डॉ. हिरालाल यांचा मध्यप्रदेश का इतिहास' त्यांच्या अभ्यासाचा परिपाक दर्शवितो (१९४१) गोंदियाचे कै. बा. ना. सहस्र बुद्धे यांनी मुख्यतः शेरे मुताखिरीनच्या आधारें 'भोसल्यांच्या बंगालवरील स्वाऱ्या' हें पुस्तक १९४४ मध्यें लिहिलें. या पुस्तकानें मराठ्यासंबंधीचे बंगाली लोकांचे कांही दूषित ग्रह नाहीसे होतात. त्याचप्रमाणें ,यांचे पठाण व मोगली अमलांत ओढीसाची दुर्दशा', व 'भोसल्याकडून इंग्रजांनी ओढीसा कसा जिंकला हे लेख प्रसिद्ध झाले आहेत. ते मागील वर्षी निधन पावल्यामुळें संशोधनकार्याचें नुकसान झालें आहे. सर जदुनाथ सरकार यांनी आपल्या 'फॉल ऑफ दी मोघल एम्पायर' या पुस्तकाची १९३५ ची आवृत्ति सुधारून १९४९ मध्यें दुसरी आवृत्ति काढली परंतु बंगाल्यातील स्त्रियांवर मराठ्यांनी अत्याचार केल्याची गंगाराम व मुसलमान इतिहासकारांची हकीकत फिरून उद्धृत केली आहे. उलट आर. डी. बॅनर्जी या गोष्टीला आपल्या बृहद् ग्रंथात स्थान देत नाहीत. कै. काळे यानीहि गंगारामचें महाराष्ट्रपुराण कांही टीका न करतां आपल्या पुस्तकांत दिलें आहे. आश्चर्य हें कीं, मराठ्यांनी एवढी देशभर मुलुखगिरी केली, पण हे चाळे त्यांनी कोठेंच केले नाहीत. कै. सखाराम गणेश देऊस्कर यांनीहि खरी वस्तुस्थिति बंगाली जनतेपुढें ठेविली होती. सर्वांत

महत्वाचे ताजे कार्य म्हणजे पुण्यांतील प्रसिद्ध वैद्य घराण्यातील कागदपत्रांचे जे कै. शं. ल. वैद्य यानी खंडशः प्रकाशन केले तें होय. वैद्यांचे पूर्वज नागपूरच्या भोसले दरबारांत पेशव्यांतर्फे वकील असत. या पत्रांपैकीं कित्येक नागपूरकरांसंबंधीं आहेत व या विपुल संग्रहातील बरीच पत्रें जबलपूरचे कै काकासाहेब साने यानी वैद्यांकडे रवाना केली होतीं. वाशीम येथील काळू घराण्यांतील कागदपत्रांची डॉ. य. खु. देशपांडे व श्री. शं. गो. चट्टे यांनी पाहणी केलेली दिसते. मीहि प्रयत्न केला होता, पण साधला नाहीं. त्यामुळें तेंथें कोणती माहिती आहे, हें मला सांगतां येत नाहीं. अकोला येथें राहात असलेले प्रसिद्ध विठ्ठल बल्लाळ सुभेदाराचे वंशज डॉ. रा. ग. परांजपे यांचें मूळ वास्तव्य पातूर-नंदापूर येथें असे. तें स्थान मी पाहिले आहे. कागदपत्र मिळाले नाहींत पण गढी वगैरे पाहण्यांत आली. माझ्या इतर प्रयत्नांचा मी येथें विस्तार करूं इच्छीत नाही. सागरचे प्रसिद्ध श्री. वासुदेवराव सुभेदार यांचे सागर जबलपूरकडील मराठ्यांच्या कारकीर्दीवर लिखाण चालू आहे. त्यांचेजवळ बरेच अस्सल कागदपत्र आहेत.

इतर माहिती

एके काळीं नागपूरच्या आप्पासाहेब भोसल्यांविषयीं लोकांत फार अभिमान वास करीत असे. तेव्हां आपण त्याच्या अन्याय्य पदच्युतीचा विशेष अभ्यास करावा म्हणून सरकारी नोकर असतांहि कै. रामभाऊ पंधे यांना कांही अस्सल कागदपत्रें पाहून टिप्पण करून ठेविले आहे चिटणवीस घराण्याचा इतिहास टाईप होऊन तयार आहे. त्यांत उपयुक्त माहिती आहे. बुटी घराण्यांत कांहींच कागद मिळाले नाहीत. भोसलेकालीन इतर कुटुंबांतहि तोच अनुभव आला. राजघराण्यांतील कोठींत कांही कागद सांपडण्याचा संभव आहे, परंतु त्या बाबतींतले प्रयत्न यशस्वी झाले नाहीत.

महाकोसलमधील मंडळ

महाकोशलमध्यें एक ऐतिहासिक मंडळ आहे व त्याचे अध्वर्यु श्री. लोचनप्रसाद पांडे हे वयोवृद्ध गृहस्थ आहेत. त्यांचा गौरवपूर्ण उल्लेख म. म. मिराशी यांनी केला आहे. त्यांच्याकडून दोन वर्षांपूर्वी आप्पासाहेब भोसल्यांची सहा पत्रें डॉ. य. खु. देशपांडे यांना मिळालीं. बिंबाजी भोंसले यांनी सुमारें ३० वर्षें रतनपूर येथे कारभार केला, परंतु त्यांची कारकीर्द अजून अज्ञात आहे. कांही मालकाळीचे कागद सचिवालयांत आहेत. त्यांचें परीक्षण अजून झालें नाहीं.

वऱ्हाडांतील कार्यकर्ते

वऱ्हाडांतील संशोधकांत कै या. मा. काळे व डॉ य खु. देशपांडे हे अग्रगण्य होत. कै. काळे यांनी नागपूर प्रांताचा इतिहास व वऱ्हाड प्रांताचा इतिहास हे दोन महत्वाचे ग्रंथ लिहिले आहेत. त्यांच्या 'आप्पासाहेब व मनभट' हा शारदाश्रमाच्या वार्षिकांतील लेखामुळें मनभटानें गाईचे शेपूट हातांत धरून भोसल्यांचें राज्य बुडविलें, हा गैरसमज नाहीसा होतो. त्याचप्रमाणें गोंडांचा इतिहास, वाशीमचे राजे उदाराम, कळंब येथील बुऱ्हानशाह व निझाम-

शाह, मालोजीचा मृत्युशक असे संकीर्ण लेखहि त्यांनी लिहिले आहेत. दुसरे प्रथितयश व मुरब्बी संशोधक म्हणजे डॉ. देशपांडे हे होत. १९२६ मध्यें त्यांचें 'महानुभावीय मराठी वाङ्मय' हें पुस्तक प्रसिद्ध झालें व त्याच वर्षी त्यांनी आपला शारदाश्रम स्थापन केला. त्यांनी "Revenue administration under the rule of Aurangzeb", "Historical families in Berar under Mogul rule" व Dual administration of Berar" या विषयावर हिस्टॉरिकल कॉंग्रेस व रेकॉर्ड्स कमिशन पुढे निबंध वाचले आहेत. याशिवाय जैन व बौद्धांचे अवशेष, बिहारांतील ऐतिहासिक स्थलवर्णनें, वऱ्हाडांत सापडलेल्या पर्शियन सनदा व नाणीं, भांदक व मार्कंडोवरील संशोधानात्मक लेख, असे किती तरी लिखाण त्यांच्या लेखणींतून उतरलें आहे. त्यांची ताजी कामगिरी म्हणजे त्यांची 'वत्सगुल्म माहात्म्य' या ग्रंथाची विस्तृत प्रस्तावना होय. ते युरोपांत गेले (१९३९) तेव्हां त्यांनी इंडिआ ऑफिसांत जाऊन तेथून औरंगाबादकरांच्या ऐतिहासिक सामग्री संबंधी विस्तृत टिपणें करून आणिलीं. यांनी ३० घराण्यांतून हस्तलिखितें मिळवून कांही पोथ्या शारदाश्रमांत ठेऊन, २ हजार पोथ्या १९४५ सालीं नागपूर विश्वविद्यालयाला दिल्या. मध्यप्रदेश संशोधन मंडळाचे ते सन्मान्य सभासद असून प्रादेशिक व अनेक भारतीय ऐतिहासिक मंडळाचे सदस्य किंवा पदाधिकारी असतात. एकदरीत त्यांचें कार्य विशाल असून व्यक्तिशः लेखकही त्यांचा ऋणी आहे. यवतमाळच्या विद्यमान कार्यकर्त्यांत श्री. द. वा. महाजन व दे गो. महाजन हे प्रमुख होत. पूर्वोक्त महाजनांनी जाधव घराण्याची बखर व पत्रव्यवहार मिळविला असून, दुसरे जैन संशोधन मंडळाचे अध्यक्ष आहेत. प्रांतिक ऐतिहासिक निरीक्षक समितींतहि ते आहेत. कै पृथ्वीगीर यांनी 'गोसावी व त्यांचे संप्रदाय' हें पुस्तक चिकित्सापूर्वक लिहिलें आहे.

इतर सहाय्यक

नागपुरांतील कै. गोपाळराव दळवी यांनी 'मराठा कुळांचा इतिहास' हें उपयुक्त पुस्तक लिहिलें आहे. श्री. शं. गो. चट्टे यांचा जुन्या कागदपत्रांवर भर असतो. एके काळी श्री आनंदराव जोशी हेहि इतिहासांत लक्ष घालीत असत. डॉ. हिरालाल जैन यांनी अपभ्रंश भाषेंतील जैन वाङ्मय पुढे आणण्यांत जरी भरीव कामगिरी केली असली तरी 'Historical Research in Berar' हा त्यांचा 'शारदाश्रमाच्या' ग्रंथांतील लेखहि वाचनीय आहे.

हल्लीं या राज्याची स्वतन्त्र ऐतिहासिक कागदपत्रांची निरीक्षक समिति डॉ. सिन्हा यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झाली आहे. आज पावेतों तिचे आमन्त्रक डॉ. देशपांडे असत. त्यांचे कार्य हि. रे. कमिशनच्या कार्यवाहींत नमूद आहे. हल्लीहि ते, श्री. चट्टे. श्री महाजन, पं. लोचनप्रसाद पांडे व प्रस्तुत लेखक सदस्य आहेत. पण अद्यापि त्या समितीकडून फारसें कार्य झालें नाहीं.

धुळे येथील राजवाडे संशोधन मंदिरातर्फे 'संशोधक' नावाचें त्रैमासिक निघत असतें. कै. बा. ना. सहस्रबुद्धे यांचे बरेचसें लिखाण या मंदिरातर्फे प्रसिद्ध झालें. या मंडळाला स्वतःचें मन्दिर असून १५०० रु. वार्षिक सरकारी सहाय्य मिळतें. आतां पावेतों राजवाडे कोऑ. बँकने १६ हजार रुपये मंडळाच्या प्रकाशनकार्याकरितां दिलें, हें जातां जातां सांगावेसें वाटतें.

भविष्यकाळ

म. म. दत्तो वामन पोतदार यांच्याच प्रेरणेनें मध्यप्रदेश संशोधन मंडळ अस्तित्वात आलें. पुण्याच्या मंडळाला सरकारी सहाय्य, स्वतःची इमारत वगैरे सर्व कांही आहे. त्यांचे त्रैमासिकहि गेलीं ३३ वर्षे नियमानें चालू आहे. तरी त्या त्रैमासिकाच्या आश्विन-पौष शके १८७२ च्या अंकातील निवेदनात, "कोणी तरुण मनुष्य ह्या कामांत लक्ष्य घालीत नाही," असें म्हटलें आहे. या बाबतींत लेखक नम्रपणें सांगू इच्छितो कीं, त्यानें याच हेतूनें १६-३-१९५३ च्या 'राष्ट्रशक्तींत' 'इतिहाससंशोधनाचें रचनात्मक कार्य' हा दीर्घ लेख लिहिला. आमच्या मंडळानें आपल्या निःसहाय स्थितींतहि १९३७ सालीं नागपूरकर भोसल्यांची बखर पुनर्मुद्रित केली. १९५१ मध्यें 'निवडक निबंधांचें' एक पुस्तक काढलें व आणखीहि प्रकाशनें लवकरच बाहेर येत आहेत.

तात्पर्य कार्याच्या मानानें मनुष्यबळ व द्रव्यबळ दोन्हीहि कमी पडत आहेत. तथापि संशोधन मंडळानें कांही हस्तलिखितें व दुर्मिळ जुने मुद्रित ग्रंथ एकत्र करून कपाटें सजवून ठेविलीं आहेत. सुदैवानें नागपूर विश्वविद्यालयाच्या हस्तलिखित शाखेंत (सुरुवात १९४६) विविध विषयांवर ३६६३ संस्कृत पोथ्या आहेत. मंडळांतहि तसलेच ५० रुमाल आहेत. कै. गंगाधर शास्त्री मंग्रूळकर यांच्या संग्रहातील २०० पोथ्या लेखकानें तपासल्या व त्यांतून शास्त्रीबुवांची स्वरचित १५ पुस्तकें विद्यापीठाच्या संग्रहालयात रवाना करण्याचें सद्‌भाग्य लेखकास लाभलें. म. म. मिराशी यांनी, संशोधन-मंडळाला विदर्भ साहित्यसंघाच्या कै. लोकमान्य टिळक सभागृहांत अपेक्षेप्रमाणें जागा मिळाल्यावर इच्छित कार्य प्रगत होईल, अशी आशा व्यक्त केली आहे. ती सफल होवो. तूर्त सिटी कॉलेजच्या कृपेनें त्यांच्याच एका खोलींत संशोधन मंडळाचें साहित्य ठवलें आहे.

भग्नावशेषांचें संरक्षण

येथपावेतों मुद्रित लेख, ग्रंथ, कागदपत्रें, शिलालेख व नाणीं यांच्यासंबंधी लिहिलें. याशिवाय या प्रांतांत कित्येक गढ्या, किल्ले, मन्दिरें, जुन्या वाड्यांचे जीर्णावशेष, सतीशिळा व समाधी आहेत कीं, ज्यांची पुनश्च पाहणी झाली पाहिजे. नाहीं तर भद्रनाथाचा नागनाथ, वराहाचा विष्णु, एखाद्या फाटक्या कबरीचा जागता पीर किंवा एखाद्या इंग्रज बाईच्या कबरेचा देव झाल्याची जशी आजहि उदाहरणें आहेत, तसें भविष्यकालांतहि होईल. खरोखरीच

भंडाऱ्यापासून १२ मैलांवर मेजर वले वॉटसनची बायको पुरली गेली आहे. पण तिला जवळचे तेली देव म्हणून पूजतात. एवढी नन्दिवर्धनची सुंदर वेस व किल्ल्याची किती तरी मोकळी जागा, पण तेथें घुबडें व गिधाडें वास करतात. पातूर-नंदापूरच्या सुभेदारांची भव्य वेस, शेजारची विशाल गढी, रामटेकची राजमाता चिमाबाईची समाधि अशी किती तरी स्मारकें दुर्लक्षित आहेत. त्यांचीहि सुव्यवस्था झाली पाहिजे.

मध्यप्रदेशांतील वैदिक संशोधन

(डॉ. विनायक वामन करंबेळकर, नागपूर)

मध्यप्रदेशांत गेल्या अर्धशतकांत बरेच वैदिक संशोधन झालें ही एक समाधानाची गोष्ट आहे संस्कृत भाषेच्या विशाल कोशागारांत अन्वेषणाला योग्य अशी किती तरी दालनें आहेत व त्यांत शोध करणाऱ्यांना अनेक मूल्यवान वस्तु सांपडतात. त्या मानाने वैदिक संशोधनाचें दालन शोध करण्यास अधिक अवघड आणि त्यांत पदरीं पडणारा लाभ तितकासा डोळ्यांत भरणारा नसतो अशी वस्तुस्थिति असतां या क्लिष्ट वैदिक संशोधनाच्या मार्गाचे पथिक आपल्या मध्यप्रदेशांत कोण कोण होऊन गेले व आहेत व त्यांनीं काय संशोधन जनतेपुढे मांडलें हें पहावयाचें आहे.

कै. महामहोपाध्याय पं. कृष्णशास्त्री घुले

घुले घराणें नागपूर मध्यप्रदेशाच्या सांस्कृतिक इतिहासांत अनन्यसामान्य महत्वाचें आहे. याच घराण्यांतील पुरुषांनीं नागपुरांतील पांडित्य प्रकर्षावस्थेस नेलें आणि या घराण्याच्या "अखेरचा दीपस्तंभ" ठरलेल्या पं. कृष्णशास्त्रींनी मध्यप्रदेशांतील वैदिक संशोधनाची मुहूर्तमेढ रोवली.

घुले घराण्यांतील पंडितांनी विविध ग्रंथरचना केली. अनन्तभट्टांची महाभारतावरील 'दुर्बोधचन्द्रिका' टीका (सं. १७५७), आत्मारामभट्टांचा 'भागवतविरोधपरिहार,' सदाशिवभट्टांची 'शंकरविवृति' प्रसिद्ध आहेत. पण त्यांचा वैदिक विद्वत्तशी संबंध नव्हता. या दिग्गज पंडितांच्या परंपरेंत निर्माण झालेल्या शास्त्रीबावांच्या ठिकाणीं आपल्या पूर्वजांप्रमाणें व्याकरणनिपुणता तर होतीच, पण त्याहून विशेष म्हणजे पाश्चात्य पंडितांचें अंधानुकरण नसलेली स्वोपज्ञ अन्वेषणकुशलता होती. शास्त्रीबुवांनीं आपल्या सारख्याच विद्वान्, रसिक व जिज्ञासु लोकांची एक लहानशी संस्था काढली होती. तिचें नांव "मणिमञ्जूषा," या संस्थेंत ज्या अनेक साहित्यिक चर्चा होत, त्यांतूनच शास्त्रीबुवांची अन्वेषणकुशलता प्रथम प्रकट झाली. आपल्या अभ्यासाचा विषय सांगोपांग चर्चिला जावा म्हणून शास्त्रीबुवांनी हिंदी, बंगाली, गुजराथी वगैरे देशभाषांचा व जर्मन, फ्रेंच, उर्दू वगैरे परभाषांचा व्यासंग ठेवला होता.

ऋग्वेदाचा मराठी अनुवाद

पं. कृष्णशास्त्रींच्या वैदिक संशोधनाचा प्रारंभ इ. स. १९०४ पूर्वीच झाला. या सालच्या डिसेंबर महिन्यांत त्यांनी केलेलें ऋग्वेदाचें मराठी भाषांतर नागपूरच्या 'तत्त्वविवेचक' छापखान्यांतून क्रमशः छापून येण्यास आरंभ झाला. केसरीकारांनीं या अनुवादाची त्यावेळीं प्रशंसा केली. कै. शं. पां.

पंडितांच्या "वेदार्थयत्ना"हून भिन्न तत्त्वावर हें ऋगनुवादाचें कार्य शास्त्रीबुवांनीं चालविलें होतें. "वैदिक ऋषि उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत राहणारे होते; तिकडे सहा महिन्यांचा दिवस व तितक्याच महिन्यांची रात्र असते; त्या अंदाजानें उत्तर ध्रुवावर २४ तासांचा उषःकाल असतो; ऋग्वेदांत वारंवार उल्लेखिलेलीं जलें म्हणजे दिव्यजलें होत; इंद्र वृत्रवध करून कोंडलेल्या दिव्य जलांचे प्रवाह मोकळे करतो" इत्यादि कै. लोकमान्य टिळकांच्या मूलभूत संशोधनाला आधारभूत मानून शास्त्रीबुवांनीं ऋग्वेदाचें प्रथम मंडल अनुवादित केलें. या त्यांच्या अनुवादाच्या कार्यांत त्यांना अनेकांचें साह्य होतें. पण ऋङ्मंत्रांचा अर्थ लावण्याचें धोरण मात्र शास्त्रीबुवांचेंच होतें. या कार्याला हात घालतांना त्यांनीं अगोदर लोकमान्यांशीं पत्रव्यवहार केला होता; त्यांच्यापासून फ्रेंच जर्मन भाषांतील आधारभूत ग्रंथांची यादी घेतली होती; ते ग्रंथ उपयुक्त ठरण्यासाठी त्या भाषांचें अध्ययन केलें होतें; व 'ऋग्वेदाचें संशोधन म्हणजे एक बिकट जबाबदारी आहे" ही लोकमान्यांनीं दिलेली सूचना त्यांनीं मनांत सतत बाळगिली होती. शास्त्रीबुवांनीं केलेला हा ऋग्वेदाचा अनुवाद अपूर्ण स्थितींत आहे हें खरें पण त्यावरील त्यांच्या टिपणामुळें त्यास अद्यापि महत्त्व आहे. "श्रुतिबोध" किंवा चित्रावशास्त्र्यांच्या 'मराठी अनुवादा' हून याचें जें वैशिष्ट्य आहे तें त्यांतच.

"ऋग्वेदेन होता करोति"

आपल्या "हौत्रध्वान्तदिवाकर" नामक निबंधांत शास्त्रीबुवांनीं याजुषपद्धतीनें हौत्रकर्म करावें कीं आपस्तम्ब व हिरण्यकेशी श्रौतसूत्रांतील वर उद्धृत केलेल्या वचनाप्रमाणें ऋग्वेद पद्धतीनें करावें या वादाबद्दल शास्त्रीबुवांनीं जो अधिकारवाणीनें निर्णय दिला आहे त्यामुळें होत्राबद्दलचा वाद कायमचा निकालांत निघाला आहे.

शास्त्रीबुवांचे वैदिक निबंध बहुमूल्य असून त्या योगानें वेदविषयक ज्ञानांत मौलिक भर पडली आहे.

दिति आणि अदिति

कस्य नूनं कतमस्यामृतानां
मनामहे चारु देवस्य नाम ।
को नो मह्या अदितये पुनर्दा-
त्पितरं च दृशेयं मातरं च ॥ ऋ. वे. १-२४-१

या शुनःशेपानें म्हटलेल्या मंत्रावरून शास्त्रीबुवांनीं दिति व अदिति म्हणजे कोण हें ठरविलें आहे. यासाठी प्रथम मॅक्समूलर, रॉथ म्यूर, लुडविग प्रभृति पाश्चात्य पंडितांच्या मतांचा परामर्श घेऊन शास्त्रीबुवांनीं असें मत मांडलें कीं 'अदिति' हा स्वतंत्र शब्द नाहीं; तो दिति शब्दाचा प्रतियोगी आहे; शुनःशेप म्हणजे सूर्य; ज्या आईवडिलांपासून तो दूर गेला होता व ज्यांना भेटण्यास तो उत्सुक झाला होता ते म्हणजे पृथ्वी व आकाश; अदिति म्हणजे आकाशाची पोंकळी-वरचा खगोल व दिति म्हणजे त्या उलट खालचा

गोलार्ध. शुनःशेप दितीच्या ताब्यांत सांपडला होता, त्याला परत अदितीला भेटावयाचे होतें. उत्तर ध्रुवावर आर्यांचें मूलगृह होतें यांचा पुरावा म्हणून हें दीर्घरात्रिसूचक रूपक आहे.

वसिष्ठ आणि विश्वामित्र

पौराणिक वाङ्मयांत वसिष्ठ व विश्वामित्र यांचीं भांडणें प्रसिद्ध आहेत. ऋग्वेदातही या ऋषीबद्दल बरीच माहिती येते. पण त्यांत विरोधाचा भाव आढळत नाही. तथापि असें म्हणतात की भरतांचा मूळ पुरोहित विश्वामित्र होता, पण सुदास राजानें त्याला काढून त्याच्या जागीं वसिष्ठाची नेमणूक केली. या बद्दल सूड घेण्यासाठी विश्वामित्राने दहा राजे एकत्र केले व त्यांच्याकडून सुदासावर आक्रमण करविलें. पण शेवटी सुदासाचा जय झाला. हेंच "दाशराज्ञ युद्ध" (ऋ. वे. ७,१८, ३३ ८३).

शास्त्रीबुवांच्या मतें 'दाशराज्ञ युद्ध' ऐतिहासिक नाहीच मुळी. तें एक केवळ रूपक आहे ऋग्वेदातील देवयोनिविशेष असलेल्या ऋषींनां माणसें कल्पून पौरस्त्य व पाश्चात्य संशोधकांनी त्यांची आपसांत युद्धे लावलीं ! वसिष्ठ व विश्वामित्र दोघेही दिव्य लोक; त्यांत सुदासाचा प्रथम कोण पुरोहित होता आणि नंतर कोण झाला या चर्चेला कांहींच अर्थ उरत नाही. वास्तविक वसिष्ठ म्हणजे सूर्य व विश्वामित्र म्हणजे चंद्र; सुदास म्हणजे द्युलोक. उत्तर ध्रुवाच्या प्रदेशांत दीर्घ रात्रीच्या वेळीं सूर्य क्षितिजाखाली असतांना चंद्राचें द्युलोकांत अधिराज्य असतें. तें सूर्य वर येतांच नाहीसें होतें. हें निसर्गाच्या नित्य चमत्काराचें रूपक वसिष्ठ विश्वामित्रांच्या द्वारें वेदांत वर्णिलें आहे.

भ्रातृव्य आणि सपत्न

'सपत्न' शब्दाची व्युत्पत्ति यास्क, पाणिनि, दुर्ग, सायण वगैरे पूर्वसूरींनीं कसकशी केली हें दाखवून, त्यास कोणी 'अव्युत्पन्न' प्रातिपादिक ठरवितात, तर कोणी 'निपातांत' त्याची रवानगी करतात हें दाखवून दिलें. 'भ्रातृव्य' शब्द ऋग्वेदात नाहींच; आहे फक्त 'भ्रातृपुत्राः' असा.

वेद आणि वैदिक ग्रंथांत "वरुण इंद्राचा भ्राता होय" असे उल्लेख आढळतात; रात्रीला 'वारुणी' म्हणतात; वरुणाला 'असुर' असें नांव असल्यामुळें असुराचे पुत्र "असुरस्य वीराः" म्हणजे ते अंधकारमय असणार. तेंच वर्चिन्, पिप्रु, स्वर्भानु वगैरे. यांना अवेस्तांत 'वरेन्य देव' म्हटलें आहे.

वरेन्य देव = वरुण पुत्र = 'They are associated with darkness' (Macdonell); म्हणून आदित्यांचे शत्रु ते वरुणपुत्र वरुण आदित्यांचा भ्राता म्हणून वरुणपुत्र भ्रातृव्य ठरतात. तेव्हांपासून 'भ्रातृव्य' शब्द शत्रु या अर्थी रूढ झाला.

जे भ्रातृव्य तेच 'सपत्न' "सपत्ना वै द्विषन्तो भ्रातृव्याः ।" (ऐ. ब्रा). सपत्नीचे पुत्र म्हणून सपत्न उषा आणि रात्रि या दोन सूर्याच्या भार्या. रात्रीपासून असुर झाले, तेच आदित्यांचे सपत्न.

सरस्वती नदी

वेदांत अनेक नद्यांचीं नांवें आहेत. त्यांत सरस्वती श्रेष्ठ. या नदीबद्दल जो वाद उत्पन्न झाला, त्याला कारण म्हणजे ऋग्वेद पंजाबांत तयार झाला ही कल्पना. ऋग्वेदांतील वर्णनावरून सरस्वती नदी प्रकाशयुक्त, बुद्धिदात्री, द्युलोकांतून निघणारी, अधोगोलार्धांतील लोकांचा नाश करणारी, देदीप्यमान अशी आहे.

या नदीचा शोध करण्यांत पूर्वीचे संशोधक गढून गेले. त्यांना कांहीं काळ अवेस्त्यांतील 'हरव्हैति', 'हरक्वैति', 'रंहा' व 'हरोयु' या नद्या म्हणजे सरस्वती वाटली, पण मग पुढें त्यांनीं आपलें मत बदललें. अशा प्रकारचें संशोधन होऊन सुद्धां अद्यापि सरस्वती अज्ञातच राहिली आहे. असाच प्रकार ऋग्वेदोक्त 'समुद्रा'बद्दल आहे. प्रा. क्षेत्रेशचन्द्र चट्टोपाध्याय 'सरस्वती म्हणजे सिन्धू' असें म्हणतात. डॉ दासांच्या मतें हल्लीची सरस्वती ती तीच. हीं मतें ऋग्वेद पंजाबांत तयार झाला या कल्पनेच्या पोटीं जन्मास आलीं आहेत. म्हणून प्रथम ही कल्पना दूर केली पाहिजे.

ऋग्वेदांत समुद्र म्हणजे 'अन्तरिक्ष' असें मानण्यांत येतें. तदनुसार सिन्धुमाता, मरुत्सखा, पवीरवीकन्या (विद्युत्कन्या) इत्यादि विशेषणांवरून सरस्वती म्हणजे द्युलोकांतील दिव्य नदी असें म्हणावें लागतें.

दाशराज्ञ युद्ध

ऋग्वेदांत (३-५३ व ७-१८, ३३ व ८३) दाशराज्ञ युद्धाची हकीकत आली आहे. या युद्धाबद्दल आजपर्यंत बरीच भवति न भवति होऊन गेली आहे. हें युद्ध मानवी नसून अन्तरिक्षांतील आहे असें शास्त्रीबुवांचें मत. असेंच मत इटालियन पंडित सिग्निरदो ग्युबर नाटिस यांचें व कै. लोकमान्य टिळकांचें होतें. सुदास विरुद्ध दहा राजे यांचें हें युद्ध कोणत्या प्रदेशांत झालें ? पिजवन दिवोदासाचा पुत्र सुदास भरत-तृत्सूंचा पुढारी होता. याहून अधिक माहिती वेदानें या राजाबद्दल दिलेली नाहीं. म्हणजे १+१० = ११ राजांचें हें युद्ध मग त्यास 'दाशराज्ञ' कां म्हणावें ? कांहीं उल्लेखावरून सुदास राजा तरी होता कीं नाहीं याबद्दल संशय वाटतो. सर्वत्र वसिष्ठ, इन्द्रवरुण यांनीच सुदासाचे शत्रू मारले व सुदासाचें रक्षण केलें असें वर्णन येतें. म्हणजे प्रत्यक्ष सुदासानें युद्ध केलेंच नाहीं. आणि दहा राजांशी युद्ध झालें म्हणावें तर

दश राजानः समिता अयज्यवः
सुदासमिन्द्रावरुणा न युयुधुः ॥

या मंत्रांत दहा राजे जमून सुद्धां युद्धच झालें नाहीं असें म्हटलें आहे. म्हणजे "अगा जें झालेंच नाहीं। तयाची वार्ता पुससी काई ॥ अशी या दाशराज्ञ युद्धाबद्दल स्थिति आहे !

असाच संशय युद्धस्थलाबद्दल आहे. युद्ध परुष्णी नदीवर झालें म्हणावें तर ती नदी कोणती ? शिवाय युद्धाचें कारण काय झालें ? "गो अजनासः प्राचा गव्यन्तः ययुः।" या संदर्भावरून गाईचा अपहार हें एक शक्य कारण

असावें त्याचप्रमाणें युद्धाला डावपेंच नाहींत; जयपराजयाचा उल्लेख नाहीं; अशा तुटपुंज्या युद्धाला 'दाशराज्ञ युद्ध' असें घवघवीत नांव देऊन अन्वेषकांनीं त्याचें रसभरीत वर्णन केलें आहे. रेगॉझिन्, चिंतामणराव वैद्य, डॉ. केतकर, डॉ कीथ प्रा. चट्टोपाध्याय, डॉ. केदार, करंदीकर यांनी या युद्धाबद्दल लिहिलें आहे.

वास्तविक, दाशराज्ञ युद्ध मानवी युद्ध नव्हते; ती अन्तरिक्षांतील ग्रहनक्षत्रांची हालचाल होती. दिवोदासाकरितां इंद्रानें शंबराचे ९९ किल्ले फोडले; सुदासाकरितां सात किल्ले फोडले. हें सर्व किल्ले अंधकाराचे होते. हें युद्ध म्हणजे "अन्तरिक्षरूपी सुदासाला वेढणारे, शरद् ऋतूमध्यें दीर्घ रात्रीच्या वेळीं दृग्गोचर होणारे जे दहा तारे तेच दहा राजे" अशी कल्पना केली म्हणजे बाकीच्या युद्धविषयक वर्णनाची उपपत्ति लावण्याची अडचण येत नाहीं.

महादेवाचें मूळ स्वरूप

हा लेख म्हणजे शास्त्रीबुवांच्या मूलग्राही संशोधनाचें फल आहे. कै. राजाराम शास्त्री भागवत यांनीं शिव म्हणजे सूर्य अशी कल्पना मांडली; कै. टिळकांनी 'ओरायन' मध्यें "आकाशगंगखाली व्याध नांवाचा जो तारा तोच रुद्र" असें मत दिले; सरदार किब्यानीं शंकर म्हणजे हिमालय पर्वत असें म्हटलें; ॲनी बिझांट बाईनीं 'महादेव म्हणज आकाश' नंदी म्हणजे जगत् इत्यादि विचार प्रकट केलें. पं. केदारनाथ विद्याविनोद यांना महादेव म्हणजे सूर्य व अग्नि आणि दुर्गा म्हणजे यज्ञवेदी असें वाटलें; सिस्टर निवेदिताबाईला 'बौद्धस्तूपावरून महादेवाची कल्पना हिंदूंत आली' असें भासलें; आणि पं. सातवेळकरांनी महादेव म्हणजे उत्तर ध्रुवावरील 'बर्फमय पर्वत असें ठरविलें.

या सर्व मतांत महादेव म्हणजे अग्नि व हिमालय या दोनच कल्पना ग्राह्य वाटतात. वैदिक वर्णनावरून रुद्र म्हणजे अग्नि होय असें निश्चित वाटूं लागतें वेदात रुद्र हें अग्नीचें नांव आहे. शास्त्रीबुवांनीं अनेक ग्रंथ व ग्रंथकारांचे दाखले देऊन रुद्र म्हणजे अग्नि व मेरुपर्वत हें मत मांडलें आहे.

याप्रमाणे कै. कृष्णशास्त्रींचे इतर ही 'वेदांतील रोगजंतुशास्त्र' वगैरे वैदिक संशोधनपर लेख आहेत. 'यज्ञसंस्था व पशुबलि" या विषयावरील त्यांची प्रवचनें वैदिक अभ्यासाचा कक्षेंत येतात. शास्त्रीबुवांचें हें सर्व लिखाण 'वागीश्वरी', 'विहंगम', विविधज्ञानविस्तार वगैरे मासिकांतून प्रसिद्ध झालें. यांतील कांहीं लेख त्यांनीं मध्यप्रांत संशोधक मंडळापुढे वाचले होते. आतां श्री. बाळशास्त्री हरदास यांच्या परिश्रमानें शास्त्रीबुवांच्या वैदिक निबंधाचा संग्रह छापून प्रसिद्ध झाला आहे.

डॉ. के. ल. दप्तरी

वायुपुराणावरून वेदांचा समय

डॉ. दप्तरीचें नाव ऐकलें नाही असा सुशिक्षित मनुष्य महाराष्ट्रांत आढळणार नाही. शास्त्रीय संशोधनाने त्यांचें नांव सर्वत्र गाजलें आहे. त्यांनी आपल्या 'The Astronomical Method and its Application to the Chronology of Ancient India" या विषयावर नागपूर विद्यापीठांत दिलेल्या चार व्याख्यानांत (नोव्हेंबर १९४०) वैदिक संशोधनाच्या विस्तीर्ण क्षेत्रांतील नेमक्या मुद्देमालाला हात घातला आहे. 'The Chronology of the Pre-Mauryan Period' या चौथ्या व्याख्यानांत त्यांनीं वेदांचा समय ठरविला आहे, 'वायुपुराण' हा याबाबत डॉ. साहेबांचा मोठा आधार आहे. त्यांच्या मतें वायुपुराणाने "वाराह-कल्पाचा" इतिहास दिला आहे त्यावरून वैदिक आर्य इ. स, पू. १०१०२ च्या सुमारास मेरुपर्वतावर (पामीरचें पठार) रहात असत. त्या नंतर त्यांनीं रशियन तुर्कस्थान, अफगाणिस्थान व पजाब प्रांतांत वसाहतो केल्या. (इ. स. पू. १०१०२–इ. स. पू. ३१०२). सरस्वती व दृषद्वती नद्यांच्या प्रदेशास तेव्हा 'ब्रह्मावर्त' म्हणत असत. तेथे "आनंद" नामक ब्रह्मा प्रशासक होता. यज्ञ, विवाह, वर्णभेद यांच्या व्यवस्था या ब्रह्माच्या समयीं अस्तित्वांत आल्या. त्या साधारण १३२ वर्षें टिकल्या. पण मग मागे पडल्या. त्यांचा पुनरुद्धार स्वायंभुव मनूनें केला. इत्यादि.

श्री. अप्रबुद्ध

वैदिक संस्कृतीची पुनर्घटना

श्री. अप्रबुद्धांचा ऋग्वेदावरील अधिकार सर्वांना मान्य आहे. "वैदिक संस्कृतीची पुनर्घटना" (शके १८५३) या ग्रंथांत साक्षात् वेदाविषयीं विशेष चर्चा नाही. तथापि पृ. १८२–१८५ मध्यें 'असुर' 'अदिति' वगैरे शब्दांच्या व्युत्पत्ति विचारांत घेतल्या आहेत. श्री. अप्रबुद्धांच्या मतें 'सुर' शब्द सुर् = नियंत्रण करणें यापासून निघाला आहे. 'दिति' म्हणजे प्रकाश; स्वयप्रकाश अन्तःस्फूर्ति म्हणजे 'अदिति'. याच ग्रथांत ऋग्वेदापासून 'वर्ण' शब्दाची अर्थोत्क्रान्ति नंतरच्या साहित्यांत कसकशी होत गेली हेंही दाखविलें आहे. एकंदरीत या ग्रंथाचे धोरण अगदीच वेगळे आहे

ऋग्वेदाचा संदेश

हा ग्रंथ श्री. अप्रबुद्धांच्या वेदाध्ययनाचें महाफल आहे. यांत त्यांनीं 'संशोधनशास्त्र' याच विषयाची चर्चा प्रथम केली आहे. नंतर ऋग्वेदावरून आर्य, चातुर्वर्ण्य, धारणा, संस्कृति यांचें वर्णन आलें. त्यावरून असा निष्कर्ष निघाला:—

'ऋग्वेदांत दिसणारी भारतीय संस्कृति निर्गत संस्कृति म्हणविण्याइतकी पूर्णावस्थेस गेली होती " (पृ २०६). वैदिक संस्कृतीचें दिग्दर्शन या ग्रंथांत यथास्थित आहे.

मूळ ग्रंथाप्रमाणें, त्याला जोडलेलीं परिशिष्टेंही महत्वाचीं आहेत. त्यांपैकीं परिशिष्ट २ मध्ये टिळकांच्या 'ओरायन' मध्यें मांडलेले मुद्दे नाकबूल केले आहेत.; परिशिष्ट ३ मध्यें वेदकालाचा निर्णय सांगितला आहे; ऋग्वेद इ. स पू. ४०००, त्यानंतर १००० वर्षांनी वाजसनेयि संहिता तयार झाली; परिशिष्ट ४ मध्ये 'आधी ऋग्वेद कीं अवेस्ता'? या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. ऋग्वेदाची रचना झाल्या नंतर पारशी फुटून वेगळे झालें.' या मताला 'डॉ. हौ' याच्या लिखाणाचा पाठिंबा दिला आहे. परिशिष्ट ५ मध्ये ऋग्वेदाच्या भाषेचा विचार केला आहे.

डॉ. रघुवीर

पैप्पलाद आणि जैमिनीय

आज आपल्या प्रांतांत स्थायिक झालेले डॉ. रघुवीर कोणास परिचित नाहीत? ते मूळचे पंजाबांतील आणि त्यांचे वेदविषयक संशोधन-कार्यही तेथेच संपन्न झालें, पण ते आज यथे असल्यामुळे त्यांच्या कार्याचा गौरवान्वित उल्लेख करणें उचित ठरेल. डॉ. रघुवीरांनी आपल्या "सरस्वती-विहार ग्रंथमालेंतून" व " Journal of Vedic studies" मधून अनेक अप्रसिद्ध वैदिक ग्रंथ छापून प्रसिद्ध केले. अथर्ववेदाची "पैप्पलाद संहिता" त्यांनीच प्रथम देवनागरींत आणली, तशी यजुर्वेदाचा "कपिष्ठल संहिता" व सामवेदाचे 'जैमिनीय ब्राह्मण" (प्रथमकाण्ड) त्यांनीं संशोधन करून प्रसिद्ध केलीं. त्यांचा लक्षात ठेवण्यासारखा ग्रंथ म्हणजे 'Vedic Mysticism (१९३२) हा होय. हा ग्रंथ डॉ. रवीन्द्रनाथ ठाकुरांना स्फूर्तिप्रद ठरला असें म्हणतात. या ग्रंथांत ऋग्वेद (८.५८.२), यजुर्वेद (वा. सं. ७.४८; कपिष्ठल ८.१२; ४८ ५), अथर्ववेद (१०.८; ११.८; १३.४; १५ ३; १६ ३, १९४१; वगैरे) यांतील एकंदर १५ सूक्तांचा इंग्रजी अनुवाद आहे या अनुवादाचें ध्येय डॉ. साहेबांच्या शद्वांत:-

The philologist had missed the eye, the Vision that alone could unite him, his reader and the Vedic Rishis in the ecstasy of the soul. भाषाशास्त्रज्ञाने हरविलेली दिव्यदृष्टि पुन: वाचकास परत मिळवून देणें हें आहे.

जैमिनीय ब्राह्मण

डॉ. लोकेशचंद्र हे डॉ. रघुवीरांचे सुपुत्र आहेत. त्यांनी तयार केलेलें "जैमिनीय ब्राह्मणाचें" (काण्ड २, खण्ड १-८०) परिष्करण मध्यप्रदेशांत तयार झालें आहे, ही अभिमानास्पद गोष्ट झाली. हे "गवामयन" विषयक सामवेदाच्या ब्राह्मणाचे खण्ड डॉ. लोकेशचंद्रांनी आपल्या पित्याच्या देखरेखीखाली तयार केले. याच ग्रंथावर त्यांना एका पाश्चात्य विद्यापीठाने

डॉक्टरेट दिली आहे. पांच सहा हस्तलिखितांच्या साह्याने त्यांनी ही संशोधित प्रति तयार केली आहे. या ब्राह्मणाचे पहिले काण्ड डॉ रघुवीरांनीं प्रसिद्ध केलें (एकदर खण्ड ३६३), डॉ लोकेश यांनीं दुसऱ्या खंडानें ४४२ पैकी ८० खंड प्रसिद्ध केले व आता उरलेला सर्व भाग ते छापून प्रसिद्ध करीत आहेत, असे ऐकिवांत आहे याच ब्राह्मण ग्रंथावर डॉ. ओटल डॉ कॅलण्ड, डॉ. हॉपकिन्स यांनी पूर्वी परिश्रम घेतले होते हें ध्यानांत ठेवण्यासारखे आहे,

डॉ. केदार

वेदस्थान

कै. डॉ तु. ज. केदार यांनीं वेदस्थानाविषयीं संशोधन केलें आणि असा निष्कर्ष काढला की, वेदस्थानांत अर्मेनिया, अझरवैजान, कॉकेशस, रशियन तुर्कस्थान, मेसोपोटॅमिया, पॅलेस्टाईन व पर्शिया हे प्रदेश येतात. या प्रदेशांतील नद्या, पर्वतांचे उल्लेख वेदात आढळतात. ऋग्वेदाचा बव्हंश भाग यथेंच तयार झाला. वैदिक काळांत आशिया मायनरचे तीन विभाग होते. त्यापैकी पश्चिमेस द्रुह्यू, पूर्वेस पुरु व मध्यभागांत तुर्वसूंची वसाहत होती. या सर्वांत पुरु पराक्रमी व श्रेष्ठ होते यदूंनी सीरिया व अनूंनी कुरुधन हा कास्पीयन पलाकडील प्रदेश व्यापला होता. हे सर्व ययातीचे वंश होते; त्यांनी इ. स. पू. ७१०२ मध्यें अशा प्रकारें वसाहती केलेल्या होत्या. तेव्हांपासून इ. स. पू. ४५०० पर्यंत आर्यांचा वेदस्थानावर अधिकार होता. त्या नंतर त्यांना बलाढ्य आसिरियन साम्राज्याने स्थानभ्रष्ट केले. पुरूंच्या प्रदेशात 'सरस्वती' नदी वहात होती. पुरूंच्या कुळांत होऊन गेलेल्या 'पुरुकुत्स' आणि 'कुरुश्रवण' राजांच्या नावावरून प्रसिद्ध असलेले प्रदेश अद्यापि वेदस्थानांत आहेत. १० व्या मंडलांतील 'कवषां'चा संबंध अर्मेनियाशी होता; येथें त्रसदस्यूंचें राज्य होतें. वेदस्थानांत एकंदर २१ नद्यांचा उल्लेख आहे. त्यापैकीं सरस्वती, सिन्धु व शरयु प्रमुख होत्या. सरस्वती म्हणजे अरस, अरक्षेस–अर्मेनियांत; सिन्धु म्हणजे युफ्रटिस–मेसोपोटॅमियांत. याच धोरणानें डॉक्टर. साहेबांनीं भलन, अलिन, शिव, तुग्र, शिग्रु, एतष, पणि वगैरे अनार्य कुळांचाहि विचार केला आहे अगस्त्य, वसिष्ट, विश्वामित्र या ऋषींचही एतिहासिक चर्चा केली आहे. डॉ. केदारांचें पूण लिखाण अद्यापि प्रसिद्ध झालेलें नाहीं. तें जेव्हां प्रसिद्ध होईल तेव्हां त्याच्या साकल्याने विचार होऊन त्याचें महत्व प्रत्ययास येईल.

श्री. करुणाशंकर दवे

श्री. दवे यांनी वेदांवर अतोनात परिश्रम केले आहेत. एवढ्या मोठ्या अभ्यासास त्यांच्या शास्त्रीय दृष्टीची जोड मिळालेली असल्यामुळे त्यांच्या हातून अगदी मूलग्राहि व रूढ मनाला धक्का देणारें संशोधन निघल अशी अपेक्षा असली तर नवल नाही. वृक्ष, वनस्पति, पशु, पक्षी, वगैरे बाबतींत श्री दवे यांची माहिती अद्ययावत् आहे. तिच्याशी वैदिक ज्ञान ताडून पाहिल्यावर श्री. दवे यांचें लक्ष अधिकाधिक वैदिक संशोधनांत गुंतून पडलें.

" वेदांत सुपर्ण "

वेदांत सूर्याला ' दिव्य सुपर्ण गुरुत्मान् ' म्हटलें आहे. त्याचे लांब पंख, सरदार पिसे व पिंगट रंग यामुळे गरुडाला हिरण्यपक्ष सुपर्ण म्हणतात. 'हेमाङ्ग' आणि ' सुवर्णकाय ' हीं त्याचीच नामान्तरें. सायणाचार्यांनीं सुपर्ण म्हणजे " श्येन " असें मानलें. कोशांत सुपर्णाला पर्याय जवळ जवळ नाहीतच व जेथें आहेत तेथे कोंबड्याला सुद्धा सुपण म्हटले आहे. (उ. विश्वप्रकाशांत)

वैदिक ऋषीना सुपर्णाचे सर्व भेद माहिती होते. त्याच प्रमाणे त्याचा स्वभाव व वैशिष्ट्यें ते ओळखून होते. सुप्रसिद्ध 'द्वा सुपर्णा" (४५. १. १६४ २२) मंत्रांत दोन स्वतंत्र सुपर्ण गरूडाचे प्रकार उल्लेखिलेले आहेत. (Eagle and oriole). तत्वज्ञानांत हे दोन सुपर्ण म्हणजे आत्मा व परमात्मा समजले जातात. सुपर्ण हा शद्ब सर्व प्रकारच्या गरुडांना लावला जात असे वैदिक काळांत सुपर्णांचा स्वभाव ओळखून त्यांना घरीं पाळत असत व त्यांच्याकडून शिकार करवीत असत अशा प्रकारें एक अज्ञात दालन उघडून श्री. दवे यांनीं वैदिक संशोधनांत वैचित्र्य निर्माण केलें आहे प्रस्तुत लेख श्री. दवे यांनी नागपूर येथील प्राच्य विद्यापरिषदत वाचून दाखविला

लाक्षा व लाक्षाकीट

या आपल्या स्वतंत्रपणें छापलेल्या लेखांत श्री. दवे यांनीं अथर्ववेद ५।५ या सूक्ताचा विशिष्ट पद्धतीने व ध्येयाने अर्थ लावला आहे यांत लाक्षा, लाक्षाकीट, लाक्षेचा औषधि म्हणून उपयोग वर्णिलीं आहेत. लाक्षेला, वेदाने, ती सुंदर तरुणी कल्पिली आहे.

अथर्व. ५ ५ सूक्तावर सायणाचें भाष्य नाही; परदेशी व एतद्देशीय अनुवादकांनीं ' लाक्षा ' म्हणजे एक वेल असें गृहीत धरलें आहे. या पूर्वग्रहामुळें सूक्ताचा महत्वाचा अर्थ गूढ राहिला. परंतु वैदिक ऋषीचें " दर्शन " सूक्ष्म होतें. याचें प्रत्यंतर या सूक्तावरून मिळतें. "यस्त्वा पिबती 'जीवति" या वैदिक परंपरेला धरूनच चरक-सुश्रुतांनीं रक्तवृध्दिसाठी लाक्षापान सांगितलें आहे. लाक्षाकीट धव, प्लक्ष, खदिर वगैरे वृक्षावर वाढतो, या कीटाची प्रभावशीलता तिचा स्त्री-पुंभाव. तिचा स्वभाव, तिला मानवणारी समशीतोष्णता, वगैरे गोष्टी या सूक्तांत वर्णिल्या आहेत. श्रीं. दवेंनीं त्या प्रथम आमच्या नजरेस आणल्या.

श्री दवे यांचा ऋग्वेद, वाजसनेयि संहिता व तैत्तिरीय संहिता यांतील पशु-पक्ष्यांबद्दल माहितीने पूर्ण ग्रंथ तयार आहे हल्ली ते ज्या मोठ्या कार्यांत गुंतले आहेत तें कार्य म्हणजे "अश्विन् देवतांचें नैसर्गिक स्वरूप आणि त्यांचा ऋभु आणि त्वष्ट्र यांशीं संबंध" हें होय, याच कार्याच्या अनुषंगानें बृहस्पति, गधर्व आणि अप्सरा यांचे निसर्गांत कोणते स्वरूप आहे हेंहि ते स्पष्ट करणार आहेत. श्री. दवे यांची आश्विन देवताबद्दल जी कल्पना आहे व त्या कल्पनेच्या सिद्धि साठी त्यांनी जो पुरावा गोळा केला आहे त्यावरून जर त्यांची कल्पना सिद्ध होऊं शकली तर आम्हाला ऋग्वेदाकडे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलावा लागेल.

डॉ. हरिश्चन्द्र सेठ

'झरथुष्ट्राचा समय आणि ऋग्वेद'

हा एक डॉक्टर साहेबांचा मोठा मनोरंजक लेख आहे (नागपूर यूनिव्हर्सिटी जर्नल, नं. ७.) यांत जी गोष्ट सिद्धकरण्यासाठी डॉ. साहेबांनी एवढा पुरावा गोळा केला आहे तो सिद्ध आणि ग्राह्य होईल किंवा नाही हा प्रश्न वेगळा आहे. एवढे मात्र खरे की अवेस्ता आणि ऋग्वेद यांचे संबंध काय होते ही एक वैदिक संशोधनाची जिव्हाळ्याची गोष्ट बनली आहे.

पारशी धर्माचा संस्थापक झरथुष्ट्र खराखरच झाला किंवा नाही (डारमेस्टेटर) या संशयापसून प्रारंभ करून डॉ. साहेबानी अवेस्ताच्या परंपरें प्रमाणें झरथूष्ट्राचा समय (इ. स. ५-६०००) त्याच प्रमाणे पारशी पंडितांच्या मताने (इ स ५४०००) युरोपीय संशोधकांच्या विचाराने (इ. स. पू. १०००–६०० च्या दरम्यान) बुन्दहिश्नांत ग्रथित केलेल्या पर्शियन परंपरेच्या अनुरोधाने (अलेक्झांडर पूर्वी २५८ वर्षे) मुसलमान इतिहासकारांच्या मताने व शेवटी ग्रीक ग्रंथकारांच्या उल्लेखावरून (इ स. पूर्व ६वें शतक) पारशी धर्म-संस्थापकांचा समय विचारांत घेतला व झरथुष्ट्र इ. स. पूर्व ६०० च्या सुमारास झाला असा निष्कर्ष काढला.

विश्ताश्प कोण ?

नंतर झरथुष्ट्राचा पुरस्कर्ता विश्ताश्प कोण हा प्रश्न पुढे आला. बेहिस्तून शिलालेखांत दरायसचा पुत्र विश्ताश्प उल्लेखिलेला आहे. याचा ग्रीक इतिहासकारांनीं हेस्ताश्प असा उल्लेख केला आहे. जर अवेस्तांतील विश्ताश्प आणि शिलालेखांतील विश्ताश्प एकच आहेत असें ठरलें तर अकेमेनियन आणि कैयानियन एकच असें ठरेल. पण या दोन विश्ताश्पांना एक मानण्यासाठी पुरावा आहेः–तो म्हणजे (१) हुतोसा राणीची कथा (२) मार्सेलियसचा पुरावा (३) बेहिस्तून शिलालेखाचा आधार आणि (४) पर्शियन परंपरा,

मार्टिन हौ, जाईल्स प्रभृतींनीं वैदिक छन्दभाषा आणि झेन्दभाषा यांत अगदी निकटचे साम्य असल्याचा निर्वाळा दिला आहे. असेंच आवेस्ताची साम्य उभय धर्मांच्या देवता, वीरगाथा, विधिविधान व पुराणकथांत आढळतें. या सर्व गोष्टींवरून पारशी व आर्य एकाच वंशाचे लोक होत असें ठरतें. झरथुष्ट्राचा एकेश्वरवाद हा वैदिक आर्यांपासून पारशी फुटून निघाले या दुहीचें प्रथम चिन्ह आहे.

याप्रमाणें झरथुष्ट्राच्या काळापर्यंत वैदिक आर्य आणि पारशी एकत्र रहात होते असें ठरल्यावर त्यांच्यांतील कांहीं व्यक्तींचीं नांवें वेद व अवेस्ता या दोन्ही ग्रंथांत आढळणार हें ओघीलाच आले. अशी नांवें हुडकून काढण्याचा प्रयत्न भरूचा, होडीवाला यांनीं केला ऋ. वे १–२२ मध्यें 'इष्टाश्व' व 'इष्टरश्मि' हीं नांवें येतात. सायणाच्या मतानें हे राजे होते. विशेष म्हणजे हें सूक्त औशिज कक्षीवतानें पाहिलेलें आहे. हीं सर्वच नांवें अवेस्त्यांत

येतात. फक्त 'इष्टरशिम' अवेस्तांत ठीक जुळत नाहीं; तेव्हां तो अकेमेनियन लेखांतील 'अर्शम' आहे असें ठरविण्यांत आलें. अशाच प्रकारें दिवोदास, प्रतर्दन, सुश्रवस, एतश, कुत्स या नांवासारखीं नांवें अवेस्तांत असल्याचें दाखविण्यात येऊन शेवटीं असा निष्कर्ष काढण्यांत आला कीं, "अवेस्ता आणि ऋग्वेदाचा कांहीं भाग इ. स. पूर्व ६ व्या शतकांत तयार झाले."

वैदिक साहित्यांतील कालखण्ड

झरथुष्ट्र व त्याच्या गाथा इ स पूर्व ६०० च्या सुमारास झालीं असें मत मांडल्यावर त्या गाथाशी भाषा व विषयाच्या दृष्टीनें जुळणारा ऋग्वेदाचा भागही त्या समयास झाला असें मत मग ओळीलाच आले. जे मंत्र जुने ते पूर्वीचें असें तत्व गृहीत धरून मॅक्सम्यूलर आणि त्याच्या अनुयायांनीं—

सूत्रकाल—इ. स. पू.		६००—२००
ब्राह्मण-आरण्यकें—	,,	८००—६००
छन्दःकाल—	,,	१२००—८००

असे वैदिक साहित्याचे काळ खण्ड पाडले होते. अर्थात डॉ. सेठ साहेबांनां या वैदिक वाङमयाच्या काल खण्डांत बदल हवा आहे. त्यांच्या मताने ऋग्वेद कालच इ स. पू ६०० येतो त्यानंतर ब्राह्मण व आरण्यकें आणि उपनिषदें; नंतर सूत्र ग्रन्थ !

पं. सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी

आवेस्तिक धर्माशी तुलना

'वैदिक धर्माची आवेस्तिक धर्माशी तुलना' हा आपला पहिला वैदिक संशोधनपर लेख पंडितजींनीं फारच पूर्वी म्हणजे १९२९ सालीं लिहिला. त्यावेळी ते विद्यार्थिदशेंत होते. साहजीकच हा लेख लिहिण्यासाठी त्यांनीं होडीवाला, मॅक्डोनेल, मोदी वगैरेंचे ग्रंथ आधारभूत घेतले. सर्व लेख अगदी मनोरजक माहितीने परिपूर्ण आहे.

दोन धर्मांच्या ग्रंथांतील भाषा-साम्यापासून आरंभ करून त्यांनी क्रमशः देवता, पुराणकथा, विश्वकोश, मरणोत्तर कल्पना, विधिविधान, तत्त्वज्ञान आणि नीति या सर्व बाबतींत वैदिक व आवेस्तिक धर्मांतील साम्यस्थानें पुढे मांडलीं आहेत. त्यांच्या नेहमीच्या पद्धतीने त्यांनीं हा विषय अगदी सुगम व रोचक करून सोडला आहे.

परंतु 'अहुर मझ्द' आणि 'वरुण' यांचें समीकरण मान्य होण्यासारखें नाही. मझ्द हा शब्द एस्. के. होडीवाला म्हणतो त्या प्रमाणे "महस् दा" किंवा इतर अन्वेषक म्हणतात त्या प्रमाणें "असुर मेधा" यापासून निघाला असें म्हणावें तर प्रत्यक्ष वेदांतच "असुरो महो दिवः" असें रुद्राला उद्देशून आलें आहे ? तदनुसार मझ्द म्हणजे रुद्र कीं काय ?

इंद्र-वृत्र कथा जशी वेदांत आहे तशी ती ती अवेस्तांत आढळत नाही. त्याचप्रमाणे वैदिक 'देव' अवेस्तांत Daeva याच नांवाने दैत्य बनले आहेत ! तसाच 'इन्द्र' 'इन्दर' या नांवानें पिशाच बनला आहे.

मरणोत्तर बाबींत अथर्वांतील सन्दर्भांत प्रेत उघड्यावर टाकण्याच्या प्रथेचा उल्लेख येतो. तर तीच तेवढी प्रथा पारशांत कां प्रचलित असावी ?

जर 'अथ्रवन्' या नांवाने अथर्व ऋषि अवेस्तांत येतात असें म्हणावें तर आंगिरस ऋषि पारशांच्या धर्मग्रंथांत " आंग्रमैन्यू " बनले काय ?

पंडितजींनीं वेद व अवेस्ता यांच्या साम्य स्थळांबरोबर वैषम्यस्थळें ही दाखविलीं असती तर तें अधिक जिज्ञासु छात्रांनां उपकारक वाटलें असतें.

पाणिनि आणि ऋक्प्रातिशाख्य

पं चतुर्वेदींचा हा लेख साक्षात् वैदिक संशोधनपर आहे किंवा काय हा एक प्रश्नच आहे. तथापि ऋक्प्रातिशाख्य वेदविषयक व्याकरणाचा विचार करतें आणि प्रस्तुत लेखांत पाणिनि आणि ऋक्प्रातिशाख्य यांचे संबंध विचारांत घेतले आहेत म्हणून वैदिक संशोधनांत त्याचा अन्तर्भाव करण्यास प्रत्यवाय नसावा.

पाणिनि आणि ऋक्प्रातिशाख्य यांचे संबंध हा एक वादग्रस्त प्रश्न आहे. डॉ. वटकृष्ण घोष यांनीं पाणिनीवर 'ऋक्प्रातिशाख्याचें अंधानुकरण केलें" हा जो आरोप केला त्याचें निराकरण करण्यासाठी पंडितजींनीं प्रस्तुत लेख लिहिला आहे.

डॉ. घोषांच्या मतानें--

i) पाणिनीला ऋग्वेदाच्या पदपाठाचें प्रत्यक्ष ज्ञान नव्हतें;

ii) पाणिनीने ऋक्प्रातिशाख्याचें अंधानुकरण केलें आहे;

iii) प्रगृह्य सूत्राबद्दलचें परंपरागत विवरण चुकीचें आहे.

डॉ घोषांनीं 'नोदात्तस्वरितोदयम्' हें पाणिनिसूत्र उदाहरणादाखल घेऊन त्यांतील अनुष्टुभ् छंदाचा जो अंश लक्षांत येतो तोच पाणिनीने ऋक्प्रातिशाख्याचें अनुकरण केलें हें दर्शविणारा आहे. असें म्हटलें. यावर पंडितजींनीं असें सप्रमाण दाखवून दिलें की वर दिलेलें सूत्र ऋक्प्राति-शाख्यांतीलच आहे असें नाही तर तें वाजसनेयि प्रातिशाख्यांत देखील येतें. आणि या सूत्रांतील जा छन्दोमयता अनुकरणाचा पुरावा मानला जातो ती इतर अनेक सूत्रांत आढळते उ 'कृत्तद्धितसमासाश्च' 'तङानावात्मनेपदम्' इत्यादि पाणिनीला शाकल्याच्या पदपाठाचें प्रत्यक्ष ज्ञान होते हें १।१।१६ या सूत्रावरून स्पष्ट होतेंच त्यानंतर डॉ. घोषांचें प्रगृह्य सूत्राचें नवें विवरण कसें अमान्य आहे हें पंडितजींनी पटवून दिलें आहे.

डॉ थीमी आणि डॉ घोष यांच्यामध्यें हा वाद उद्भवला पण पंडितजींनीं उभयतांच्या मतांचा सांगोपांग विचार केला. डॉ. थीमींनीं पंडितजींचीं मतें मान्य केलीं.

ऋग्वेदाची सामान्य माहिती —

आपल्या "वैदिक सूक्तावलीची संस्कृत भूमिका", 'प्रतिभा' 'रेडियो-संग्रह' यांतील लेखांत पंडितजींनीं छात्रोपयोगी ऋग्वेदाची माहिती दिली आहे. ऋग्वेद हाच जगतांतील प्राचीनतम ग्रंथ आहे; मनुष्यजातीच्या आद्यसंस्कृतीचें प्रतिबिंब त्यांत पडलें आहे; ऋग्वेदाच्या

संहितेला ' दाशतयी ' म्हणतात; त्यांत एकंदर १०२८ सूक्तें आहेत; सर्वानुक्रमणी वरून वैदिक मंत्रांचे छंद, देवता, संख्या व प्रकरण समजतात; ऋग्वेदाची भाषा उदात्तादि स्वरांनी निबद्ध आहे; त्याची २-८ मंडलें गृत्समदादि ऋषींनीं पाहिलेलीं आहेत; चार वेदांत ऋग्वेद हाच मूलवेद आहे; मॅक्सम्यूलर प्रभृति पाश्चात्य पंडितांनीं ऋग्वेदावर प्रगाढ श्रम घेतले आहेत. शेवटीं असा निष्कर्ष काढला की–

यावत्तिष्ठन्ति गिरयः सरितश्च महीतले ।
तावदृग्वेदमहिमा भूतले प्रचरिष्यति ।।

भार्गव आणि आथर्वण

प्रस्तुत लेखकाने (वि.वा. करंबेळकर) **अथर्ववेदाचें** थोडेबहुत संशोधन केलें आहे. आपल्या 'अथर्वसंस्कृति' वरील प्रबंधांत त्याने अथर्वमंत्रांच्या द्रष्टृभूत ऋषिकुलांची माहिती एकत्र संकलित केली आहे. त्यावरून अथर्ववेदाचे दिव्य मंत्र ज्या ऋषिकुलांत चालत आले त्यांत अथर्वन्, अंगिरस् व भृगु याचीं कुलें प्रमुख होत. त्यांच्या नांवावरूनच अथर्ववेदास ' अथर्ववेद ', 'भृग्वंगिरसां ब्रह्म' 'अथर्वांगिरसां ब्रह्म ' इत्यादि नांवें आहेत. या सर्व नांवांच्या तुलनात्मक साहचर्यभावावरून व त्याचप्रमाण अथर्ववेदांतील आणि इतर वेद, ब्राह्मण उपनिषदें व महाभारत यांतील पुराव्यावरून प्रस्तुत लेखकाने असें मत मांडलें आहे की वैदिक काळांत जें ऋषिकुल ' अथर्वन् ' या नांवाने प्रसिद्ध होतें त्याचीच एक शाखा "भृगु" इतकी कीर्तीस चढली कीं ' अथर्वन् ' कुळ त्यांतच विराम पावलें. म्हणजे अथर्ववेदांतील ' अथर्वन् ' ऋषि आजहि गोत्र, प्रवर व सप्तर्षि संघांत ' भृगु ' नांवाने आढळतात.

ब्रह्मन् आणि पुरोहित

ऋग्वेद, यजुर्वेद आणि सामवेद या तीन वेदांच्या अनुयायांना त्रैविद्य म्हणत असत. या उलट अथर्ववेदाला प्रथम वेद म्हणून मान्यता नव्हती व अथर्ववेदाच्या प्रतिनिधीला मोठमोठ्या यज्ञांत स्थानही नव्हतें. अगदी वैदिक काळापासून त्रेताग्नींची उपासना करणारे त्रैविद्य व एकाग्नि क्रिया करणारे अथर्वन् पुरोहित यांच्यांत फार मोठा झगडा होता असें अथर्वपरिशिष्टाच्या पुराव्यावरून ठरविता येतें. याच झगड्यांतून मोठ्या यज्ञांत होता, अध्वर्यु व उद्गाता यांच्या बरोबरीनें अथर्व प्रतिनिधीस 'ब्रह्मा' पद प्राप्त झालें. अथर्व वेदाचें गोपथ ब्राह्मण, वैतान (श्रौत) सूत्र, कौशिक (गृह्य) सूत्र व अथर्व परिशिष्टें या सर्वांनींच या वादांत भाग घेतला होता असें उपलब्ध होतें

परंतु त्रैविद्य आणि अथर्वविद् यांचा संघर्ष नुसत्या 'ब्रह्मा' पदासाठीं होता असें नाहीं. राजाचा पुरोहित कोण असावा हृहि वादग्रस्त प्रश्न होताच. अथर्व परिशिष्टांनी व कौशिक सूत्राने राजाचा पुरोहित भृग्वंगिरोविद् असावा असा निकाल दिला आहे. अथर्व परिशिष्टांतून राजपुरोहितांची कर्मे दिलेलीं आहेत.

या त्रैविद्याशीं झालेल्या वादाचा अथर्व-परंपरेवर मोठा विलक्षण परिणाम घडला यद्यपि 'ब्रह्मा व 'पुरोहित' हीं मानाची स्थानें अथर्व-

विदांनीं हस्तगत केलीं तथापि तेवढयानें वैमनस्य मिटलें नाहीं. अथर्वपुरोहिताची सोपी व सर्वोपयोगिनी एकाग्निक्रिया हीच सर्व वादांत हुकमी निकाल देणारी ठरावी, हें पाहून त्रैविद्यांनीं तशाच प्रकारच्या काम्येष्टि निर्माण करण्यास प्रारंभ केला. संस्कार, रोगनिवारण, इच्छापूर्ति जयप्राप्ति, शकुनविज्ञान या सर्व बाबी ज्या एकाग्निक्रियेनें अथर्वविद पार पाडून लोकप्रियता मिळवीत होते, त्याच त्रेताग्नींच्या साह्याने काम्येष्टि क्रियांत अन्तर्भूत करून त्रैविद्यांनीं अथर्वाच्या पायाखालची जणूं जमीनच काढून घेतली. 'अथर्व संस्कृति' या आपल्या प्रबंधांत प्रस्तुत लेखकाने अशा प्रकारचे धार्मिक व सामाजिक स्वरूपाचें संशोधन केलें आहे.

अथर्ववेद आणि आयुर्वेद

या आपल्या दुसऱ्या अथर्ववेदविषयक प्रबंधांत प्रस्तुत लेखकाने दोन भागांत अथर्ववेदांतील भैषज्याचा साकल्याने विचार करण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम आयुर्वेद परंपरा कशी वेदकालाच्या अगोदरपासून चालत आलेली आहे, हें दाखवून नंतर ऋग्वेदादि वेदसंहितांत व ब्राह्मणादि ग्रंथांत तिच्याविषयीं काय माहिती मिळते हें दाखविलें. नंतर आयुर्वेद परंपरा प्रामुख्याने अथर्वमंत्रांतून कशी स्पष्ट होते हें दाखविण्यांत आलें. रोगोत्पत्ति, शारीर, गर्भविज्ञान, रोगचिकित्सा व उपाययोजना या बाबतींत अथर्ववेदोक्त भैषज्यज्ञान मंत्र, कौशिकसूत्र व गर्भोपनिषद् यांच्या मदतीने स्पष्ट करण्यांत आलें.

दुसऱ्या भागांत अपचित्, किलास, बलास, जायान्य, ग्राहि, क्षेत्रिय, आस्राव, हरिमा, विष्कन्ध आणि तक्मन् या रोगांची चर्चा सविस्तर करण्यांत आली आहे. या दहा स्वतंत्र निबंधांत अथर्वोक्त रोगांचें अध्ययन चरक, सुश्रुत व काश्यप या तीन आयुर्वेद संहितांच्या साह्याने करण्यांत आलें आहे.

श्री. य. रा. दाते.

ज्ञानकोशांतील वेदविद्या

ज्ञानकोशाच्या रचनाकार्यांत श्री. य. रा. दाते यांचें साह्य होतें ही गोष्ट सर्वविश्रुत आहे. त्यातल्या त्यांत 'वेदविद्या' व 'बुद्धपूर्व जग' या दोन भागांच्या विरचनेंत श्री. दात्यांचा हात होता. या दोन भागांत वैदिक वाङ्मयाची व यज्ञ संस्थेची सांगोपांग माहिती आली आहे. दाशराज्ञ युद्धानंतर ऋग्वेद संहिता तयार झाली असें अनुमान बसवून तदनुसार त्यांत कोष्टकें तयार करून देण्यांत आलीं आहेत. पुण्याच्या वसंत व्याख्यान मालेंत याच विषयावर श्री. दाते यांनी एक व्याख्यान दिलें होतें. त्याच प्रमाणें 'वेदकालीन युद्धकला', 'ऋग्वेदांती धर्म' 'वैदिक काळांत लोकांचें ध्येय' इत्यादि लेख त्यांनीं प्रसिद्ध केले आहेत.

या प्रमाणें मध्यप्रदेशांत ज्या ज्या संशोधकांनीं वेदांवर परिश्रम घेतले त्या लोकांची व त्यांच्या परिश्रमांची नोंद येथे केली आहे. या शिवाय किती तरी अज्ञात अवस्थेंत अन्वेषण करीत असतील. त्यांच्या त्या अज्ञात सेवेची दखल येथे घेतां आली नाही, याबद्दल त्यांची क्षमा मागून हा लेख संपवितों.

मध्यप्रदेशांतील संस्कृत साहित्याची निर्मिति व संशोधन

(ले. प्रा. **सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी**, एम्. ए., नागपूर)

प्रस्तुत लेखाचा विषय मध्यप्रदेशांत गेल्या वीस वर्षांत झालेल्या संस्कृत साहित्याच्या निर्मितीचा व संशोधनाचा संक्षिप्त परिचय हा आहे. या लेखांत संस्कृत साहित्य या शब्दांत वैदिक, ऐतिहासिक व पारिभाषिक खेरीज करून, इतर सर्व प्रकारच्या संस्कृत साहित्याचा अन्तर्भाव केला आहे. म्हणून वेद, ब्राह्मणें व उपनिषदें, त्याचप्रमाणें नाणीं, ताम्रपट, शिलालेख, आयुर्वेद, ज्योतिषशास्त्र इत्यादि विषयांव्यतिरिक्त सर्व संस्कृत ग्रंथांचें संशोधन व नवीन वाङ्मयनिर्मिति यांचें सिंहावलोकन करणें प्रस्तुत लेखांत योग्य होईल. आतां हें सांगण्याची आवश्यकता नाहीं कीं, संस्कृत वाङ्मयामध्यें या विषयांवर असंख्य ग्रंथ लिहिले गेले आहेत. आपल्या मध्यप्रदेशांतही संशोधनसामग्रीच्या दृष्टीनें या विषयांवर भरपूर ग्रंथसंपत्ति उपलब्ध आहे.

मध्यप्रदेशांतील प्राचीन संस्कृत साहित्य

आपला मध्यप्रदेश हा भारतवर्षाच्या मध्यभागीं असल्यामुळें, प्राचीन काळापासून वाङ्मयनिर्मितीच्या दृष्टीनें त्याचें महत्त्व सर्वमान्य झालें आहे. मध्यप्रदेशाचा एक भाग जो विदर्भ, त्याचा महाकवि कालिदासानें ' समृद्ध राज्य ' म्हणून गौरवपूर्ण उल्लेख केला आहे. विदर्भ शब्दावरूनच बनलेलें वैदर्भी रीतीचें नांव काव्यरचनेची सर्वोत्कृष्ट शैली म्हणून सुप्रसिद्ध झालें आहे. राजशेखरानें उल्लेखिलेल्या वच्छोमी नामक काव्यरीतीचें नांव विदर्भाच्या वत्सगुल्म (सध्यांचें वाशीम) या नगरावरूनच पडलें होतें. केवळ काव्यरीतींच्या नांवांतच नव्हे, तर अनेक काव्य–नाटकांच्या नायक-नायिकांच्या योगेंही विदर्भाची साहित्यांतील प्रसिद्धि दृष्टीस पडते. कालिदासाच्या मालविकाग्निमित्रांतील मालविका, रघुवंशांतील इन्दुमती, नैषधचरित आणि नलचम्पू यांतील दमयन्ती या नायिका व भवभूतीच्या मालतीमाधवांतील नायक माधव हे सर्व विदर्भाच्या रम्य भूमीमध्येंच जन्म पावले व वाढले. संस्कृत साहित्यांतील अमर गेय काव्य मेघदूत यांतील रामगिरि मध्यप्रदेशांतच विद्यमान आहे. राजशेखराची विद्धशालभंजिका ही नाटिका त्रिपुरी (सध्याचें जबलपुरजवळचें तेवर) येथील कलचुरिवंशी केयूरवर्ष उर्फ युवराजदेव याच्या दरबारीं प्रयोग करण्याकरितां लिहिली गेली होती. तेव्हां प्राचीन कालापासून मध्यप्रदेशांत कवि व विद्वान् यांची दीर्घ परंपरा चालू असली, तर त्यांत आश्चर्य नाही. सेतुबन्धाचा कर्ता राजा प्रवरसेन,

नायकुमारचरिताचा कर्ता पुष्पदन्त, नलचम्पूचा कर्ता त्रिविक्रमभट्ट, तसेंच भवभूति, भारवि, दण्डी, राजशेखर, कविवर्य सदानंद, तत्त्वज्ञ सोमशम्भु इत्यादि अनेक ग्रंथकार मध्यप्रदेशाचे निवासी होते. सारांश, पश्चिमवाहिनी नर्मदा, तापी व पूर्णा, त्याचप्रमाणें पूर्ववाहिनी महानदी आणि गोदावरी यांच्या परिसरांत पसरलेला मध्यप्रदेश प्राचीन कालापासून साहित्यिकांचें क्रीडास्थान झाला आहे.

मध्यप्रदेशाच्या अनेक भागात आजही विशाल संशोधनसामग्री विखुरलेली आहे. छत्तीसगढाच्या संस्थानांतील विस्तीर्ण वाङ्मयनिधि एखाद्या उत्साही तरुण संशोधकाची वाट पाहत आहे असें सांगतात कीं वस्तर संस्थानच्या राज्यपुस्तकालयांत उत्कृष्ट संशोधनसामग्री विद्यमान आहे. नागपूर येथें भोसले राज्यांच्या दोन्ही पातींच्या ग्रंथसंग्रहाचें पूर्ण परीक्षण अद्यापि व्हावयाचें आहे. महाकोसल व विदर्भ यांतील समृद्ध घराण्यांच्या, त्याप्रमाणेंच वैदिक व शास्त्री वर्गांच्या ग्रंथसंग्रहांत जी वाङ्मयीन सामग्री विखुरलेली आहे तिचा शोध, परीक्षण व संरक्षण शक्य तितकें लौकर होणें जरूर आहे. कालचक्राच्या फेऱ्यांत तिचें अस्तित्व अधिक काल टिकणें असंभवनीय आहे. मंडला येथील पंडित घराण्यांत प्राप्त झालेल्या वाङ्मयसामग्रीवरून रूपनाथकृत गढेशनृपवर्णनम्, आणि लक्ष्मीप्रसादकृत गजेन्द्रमोक्षकाव्यम् यांचा परिचय श्री. गो. वि. भावे व श्री ल. रा. कुलकर्णी यांनीं आपल्या इंग्रजी लेखांत करून देऊन यासारख्या सामग्रीचें महत्त्व दाखवून दिलें आहे. नागपुरांतील असली सामग्री प्रा. करंबेळकर, श्री. लांडगे, श्री. चट्टे इत्यादि विद्वान् प्रकाशांत आणीत आहेत. नागपूर विश्वविद्यालयाच्या हस्तलिखि ग्रंथसंग्रहालयांत, तसेंच मध्यप्रदेश संशोधन मंडळाच्या संग्रहालयांत या विद्वानांच्या प्रयत्नांचें मूर्त स्वरूप दृष्टीस पडतें. त्याप्रमाणेंच रायगडच्या महाकोसल हिस्टॉरिकल सोसायटीचे पं लोचनप्रसाद पांडेय व यवतमाळच्या शारदाश्रमाचे डॉ य. खु देशपांडे यांनी हस्तलिखितांचा संग्रह करण्याचें स्तुत्य कार्य केलें आहे.

संस्कृतसाहित्यविषयक संशोधनाच्या क्षेत्रांत मध्यप्रदेशांत जें कार्य झालें आहे त्याच्या पुढील संक्षिप्त परिचयांत प्रथमच ही गोष्ट सांगितली पाहिजे कीं त्यामध्यें कोणताहि विशिष्ट क्रम अनुसरला नाहीं. लेखकांचा काल, वय, ग्रंथांची किंवा लेखांची संख्या, संशोधनाची मौलिकता, व्यापकता इत्यादि गुणविशेष, यांकडे कांटेकोरपणाने लक्ष न देतां संशोधनकार्याचा केवळ धांवता परिचय दिला आहे. तेव्हां त्यामध्यें तुलनात्मक तारतम्य पाहणें हें केवळ अव्यावहारिकच नव्हे तर त्यांत उल्लेख असलेल्या विद्वानांना अन्यायकारकहि होईल. तसेंच लेखकांच्या सर्व कृतींचा एकत्र निर्देश केला असल्यामुळें खालील परिचय विषयानुसार नसून लेखकानुसार आहे.

दिवंगत संशोधकांचें कार्य

कै. महामहोपाध्याय कृष्णशास्त्री घुले यांच्या वैदिकवाङ्मयविषयक संशोधनाचा परिचय मागील ' वैदिकसंशोधन ' भागांत येऊन गेला आहे. त्याशिवाय त्यांनीं धर्मशास्त्र, व्याकरण व साहित्य यांमध्येही पुष्कळ कार्य केलें आहे. त्यांचे पूर्वज पं. सदाशिवशास्त्री घुले यांची नागेशकृत लघुशब्देन्दुशेखरावरील सदाशिवभट्टी नामक टीका काशीमध्यें प्रकाशित झाली आहे. तिचें नव्यवैयाकरणसम्प्रदायामध्यें विशिष्ट स्थान आहे. स्वतः प. कृष्णशास्त्रींनी मध्यप्रदेश संशोधन मंडळांत वाचलेल्या एका लेखांत पाणिनीय व्याकरणांतील कांही दोषांचें विवेचन केलें आहे. त्यांच्या सापिण्ड्यभास्कर नामक संस्कृत ग्रंथांत दाक्षिणात्यांमध्ये प्रचलित असलेल्या मातुलकन्यापरिणयाचें शास्त्रीय दृष्टीनें समर्थन केलें आहे. ' गणपतिपूजा व गाथासप्तशतीचा काळ ' या निबंधांत ख्रिस्तोत्तर पांचव्या शतकानंतर गणपतिपूजा प्रचारांत आली व गाथासप्तशती लिहिली गेली असावी असें अनुमान केलें आहे. त्यांची ' पतितोद्धारमीमांसा ' या ग्रंथाला वर्तमान कालांत प्रासंगिक महत्त्व आहे, तसेंच शास्त्रीबुवांनीं कालिदासाच्या ग्रंथांवरही समीक्षणात्मक विचार प्रकाशित केले आहेत. उदाहरणार्थ, मेघदूतांतील पाठभेद, रघुवंश व कुमारसंभव यांच्या रचनेंतील पौर्वापर्य, इत्यादि. त्यांचें ' हरिहरीयम् ' हें द्व्यर्थी संस्कृत स्तोत्र प्रसिद्ध झालें आहे. त्यांत त्यांचें काव्यनिर्माणकौशल्य स्पष्टपणें दिसून येतें. म म. केशव गोपाल ताम्हन यांच्या प्रसादगुणयुक्त कवित्वाची अद्भुत प्रतिभा त्यांचे सच्छिष्य श्री. ल. रा. कुळकर्णी यांनी प्रकाशित केलेल्या ' ताम्हनकाव्यसंग्रहां ' त स्पष्टपणें दिसते. मध्ययुगीन काव्यरचनापद्धतीला अनुसरून श्लेषयमकादि अलंकारांनी विभूषित अशी श्री. मा. ना. डाऊ यांनी रचलेली ' विनोदलहरी ' ही आपल्या काव्यगुणांनी श्लाघनीय झालेली अशी मौलिक रचना आहे. तिजवर श्री. वे. गो. डाऊ यांनी सुबोधिनी नामक टीका लिहिली आहे. या टीकेच्या योगें ' विनोदलहरीं 'तील सुन्दर श्लोकांचा केवळ अर्थच नव्हे तर कवित्वचमत्कारही सुस्पष्ट होतो.

भहजीशास्त्री घाटे यांच्या उत्तररामचरितावरील ' भावभूतार्थबोधिनी ' नामक टीकेने टीकावाङ्मयांत उत्तम भर पडली आहे. डॉ. तु. ज. केदार यांनी कालिदासावर उत्कृष्ट लेखन केलें आहे. 'कालिदासाचा काळ व जन्मभूमि' नामक इंग्रजी लेखांत त्यांनीं कालिदास ख्रिस्तपूर्व पहिल्या शतकांत होऊन गेला व त्याची जन्मभूमि विदिशा होती हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. ' मेघदूतांतील मेघमार्ग ' या लेखांत रामगिरि (रामटेक) पासून मेघाचा मार्ग दाखविला आहे, याशिवाय ऋग्वेदांतील प्राचीन व्यक्ति व स्थल यांच्या नांवांचा संबंध पश्चिम आशियाशी जोडण्याचा प्रयत्न त्यांनीं आपल्या ' वेदस्थान ' शीर्षक इंग्रजी लेखांत केला होता. कै. शिवदासपन्त बार्लिगे यांनी महाभारतकाल, मेघदूतांतील रामगिरि, कालिदासकाल या वि यांवर लेख लिहिले होते. त्यांच्या मतें कालिदासाचा काल विक्रम संवताची प्रथम

शताब्दी हा होता आणि मेघदूतांतील रामगिरि म्हणजे बस्तर संस्थानांतील रामगढ हा होय. निधनापूर्वी थोडे दिवस त्यांनी 'शंकराचार्यजन्मकालकाव्यम्' संस्कृतांत प्रसिद्ध केलें होतें. त्यांत त्यांच्या कवित्वाचा उत्कृष्ट प्रत्यय होतो. रायगढ संस्थानाधिपति कै. चक्रधरसिंह ललितकलांचे मोठे पुरस्कर्ते होते. त्यांनी विद्वानांना आश्रय घेऊन त्यांच्याकडून नृत्य, वाद्य व गीत या संगीत शास्त्राच्या तीन्ही शाखांवर सचित्र ग्रंथ लिहविले होते. त्यांचीं नांवें अनुक्रमें नर्तनसर्वस्व, तालतोयनिधि आणि रागरत्नाकर अशीं आहेत. हे ग्रंथ प्रकाशित झाले तर त्यांच्या योगें ललितकलावाङ्मयांत चांगली भर पडेल यांत संशय नाही. जबलपुरचे व्योहार रघुवीरसिंह यांनीं अपल्या 'विद्वन्मोदतरंगिणी' (संस्कृत) मध्ये विविध शास्त्रांच्या सिद्धांतांवर कवित्वपूर्ण लिहिलें आहे. जबलपूरचे पंडित सरयूप्रसाद मिश्र यांनीं कालिदासाच्या रघुवंशाचा हिंदींत सटिप्पण पद्यमय अनुवाद प्रसिद्ध केला आहे. बिलासपूरचे म. म. जगन्नाथप्रसाद भानु यांनी संस्कृत छन्दोवाङ्मयाचें आलोडन करून लिहिलेला छन्दःप्रभाकर हा हिन्दी ग्रंथ उत्कृष्ट आहे. कै. रा. ब. ना. दा. वाडेगांवकर यांनी पारिभाषेन्दुशेखराचें उत्कृष्ट मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें आहे. तें स्पष्ट प्रतिपादनशैली व ऊहापोहात्मक विवेचन या बाबतींत अन्य भाषान्तरकर्त्यांना आदर्श होईल. त्यांच्या शब्दरत्नमनोरमा यांच्या त्याच तऱ्हेच्या भाषान्तराचाही एक भाग प्रसिद्ध झाला आहे. अवशिष्ट भागही प्रसिद्ध झाल्यास मराठींत व्याकरणशास्त्रावरील आणखी एका उत्कृष्ट ग्रंथाची भर पडेल.

विद्यमान संशोधकांची कामगिरी

येथवर मध्यप्रदेशांतील आधुनिक दिवंगत विद्वानांच्या साहित्यसेवेचा सामान्य परिचय करून दिला. आतां विद्यमान विद्वानांच्या वाङ्मयीन कृतींचा निर्देश करावयाचा. म. मा. वा. वि. मिराशी यांच्या बहुविध व मूलगामी संशोधन कार्यामध्यें प्राचीन-इतिहास विषयक कार्याचा शिलालेख व ताम्रपट यांचें वाचन, प्राचीन नण्यांचें प्रकाशन इत्यादींचा-परिचय प्राचीन-इतिहाससंशोधनविषयक लेखांच्या आढाव्यांत या पूर्वीच येऊन गेला आहे. म्हणून इथे त्यांच्या इतर संशोधन कार्यांचा संक्षिप्त निर्देश केला आहे. पद्मगुप्ताचें 'नवसाहसांकचरित' नामक महाकाव्य, दण्डीचें 'दशकुमारचरित' नामक गद्यकाव्य, राजशेखराची 'विद्धशालभञ्जिका' नाटिका या संस्कृत ग्रंथांतील उल्लेखांचा प्राचीन इतिहासाच्या ज्ञानाकरितां उपयोग करून निव्वळ साहित्यिक ग्रंथांतून ऐतिहासिक सामग्री कशी काढतां येते हें त्यांनीं सोदाहरण दाखविलें आहे. याशिवाय राजशेखराच्या ग्रंथांचा कालक्रम, गाथासप्तशतीचा काल व मूलनाम, वाकाटक कालांतील राजकवि, इत्यादि लेखांत त्या त्या विषयांवर नवीन प्रकाश पाडला आहे. भवभूतीचें जन्मस्थान पद्मपुर (जि. भंडारा), त्याच्या नाटकांतील कालप्रियनाथ (काल्पी येथील सूर्याचें देवालय), मेघदूतांतील रामगिरि (नागपूर जवळचें रामटेक)

इत्यादिकांचा स्थलनिश्चय करण्यामध्यें त्यांच्या इंग्रजी व मराठी लेखांतील प्रमाणें व विचारसरणी प्राय: सर्व विद्वानांनी मान्य केलीं आहेत. कालिदासाचा काल, ग्रंथ, कवित्व, तत्त्वज्ञान, समाजस्थिति इत्यादि कालिदासविषयक विविध प्रश्नांचें चिकित्सक पद्धतीने विवेचन करणारा त्यांचा (मराठी व हिंदी भाषेंतील) ग्रंथ त्या विषयावर प्रमाणभूत झाला आहे. समुद्रगुप्ताचें कृष्णचरित काव्य व भासाचें यज्ञफल यावरील लेखांत त्यांनीं सयुक्तिक प्रमाणांच्या योगानें हे ग्रंथ बनावट आहेत हें सिद्ध केलें आहे. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या 'संशोधनमुक्तावलि, सर पहिला' या ग्रंथांत कालिदासविषयक अन्य मतांचें परीक्षण करणारे कांही लेख समाविष्ट केले आहेत त्यांमध्यें प्रतिपक्षांच्या मतांचें आमूलाग्र खंडन करणारी त्यांची तीक्ष्ण बुद्धि व स्वमतप्रतिपादनांतील सयुक्तिकता यांचा उत्तम परिचय होतो. श्री. नारायण पैंकाजी पंडित यांनीं आपल्या विविध लेखांत संत ज्ञानेश्वरांच्या तत्वज्ञानाची शंकराचार्यांच्या सिद्धांताशी अभिन्नता दाखवून जें समन्वयात्मक विवेचन केलें आहे तें दार्शनिक व्याख्यांच्या भारतीय परम्परेला धरून आहे. याशिवाय 'आर्यधर्मोपपत्ति' नामक ग्रंथ व नारद भक्तिसूत्रांवरील मराठी टीकाही त्यांनी प्रसिद्ध केली आहे. त्यांचे सुपुत्र डॉ. वा. ना. पंडित यांचा 'शाङ्करतत्त्वज्ञानांत भक्तीचें स्थान' या विषयावरील डॉक्टर पदवीकरितां लिहिलेला प्रबंध अद्यापि अप्रकाशित आहे, तरी 'जगन्मिथ्यात्व' 'औपनिषदिक तत्त्वज्ञान' 'ज्ञानेश्वरींत षड्दर्शनांचा परिचय' इत्यादि त्यांचे लेख त्यांच्या सयुक्तिक चिकित्सक पद्धतीचा चांगला परिचय करून देतात. डॉ. के. ल. दप्तरी यांचे ज्योतिष व आयुर्वेदविषयक ग्रंथ प्रसिद्ध आहेत, पण त्यांचा उपनिषदांवरील विवेचनात्मक व्याख्याग्रंथ अद्यापि अप्रकाशित आहे. त्यांच्या 'मीमांसासूत्रविमर्श' 'धर्मविवादस्वरूप' आणि 'महाभारतकालनिर्णय' या मराठी ग्रंथांत त्यांची स्वतंत्रविचारपद्धति व तर्कपुरस्सरता उत्तम दिसून येते. त्यांचे 'राजतरंगिणीनिरीक्षण' 'रामचंद्रांची डायरी' 'व्यासांची शंकराचार्यांवर फिर्याद', 'प्राचीन भारतांतील सप्तर्षिसंस्था' इत्यादि मराठी लेख त्यांच्या मौलिक विचारसरणीचे निदर्शक आहेत. त्यांचा 'प्राचीन भारतीय कालगणतेंत ज्योति:शास्त्रीय पद्धतीचा उपयोग' या नांवाचा ग्रंथ नागपूर विश्वविद्यालयानें प्रकाशित केला आहे. प्राध्यापक सरस्वतीप्रसाद चतुर्वेदी यांनीं पाणिनीय व्याकरणाच्या विविध समस्यांवर (उदाहरणार्थ, विशिष्ट सूत्रांचा अर्थ, पाठभेद, पारिभाषिकशब्दावलि, भाष्यार्थ इत्यादिकांवर) अनेक लेख इंग्रजींत लिहिले आहेत. याशिवाय पाणिनीय शब्दभांडारावरून पाणिनीयकालनिर्णय (इंग्रजी), 'पाणिनीय व्याकरण-संप्रदायांत खण्डनमण्डनपर परंपरागत शास्त्रीय चर्चा' (इंग्रजी), 'गतद्विसहस्राब्दीमध्ये पाणिनीय व्याकरणाचा विकास' (हिन्दी) इत्यादि सामान्य विषयांवरही त्यांचे लेख आहेत. त्यांच्या वैदिकवाङ्मयासंबंधी लेखांचा परिचय वैदिक संशोधनाच्या आढाव्यांत या पूर्वीच येऊन गेला आहे. 'अनुष्टुभ् छन्दाची उत्पत्ति, विकास व प्रकार' या इंग्रजी

लेखांत त्यांनी त्या छन्दाच्या सर्व संभाव्य प्रकारांची निश्चित संख्या व सोदाहरण लक्षणें स्वरचित संस्कृत कारिकांत दिलीं आहेत. त्यांनी एकाच उपलब्ध हस्तलिखितावरून संपादिलेलें 'भृङ्गदूत' संस्कृत दूतकाव्याचें एक उत्कृष्ट उदाहरण आहे. तसेंच त्यांचे 'कालिदासीय ग्रंथांत मध्यप्रांत–विदर्भाचें प्रतिबिंब' 'विक्रमादित्याची ऐतिहासिकता', 'पाणिनिकालीन भारत', 'संकल्पविधींचें महत्त्व', 'वाल्मीकीचें रामराज्य' इत्यादि लेख जिज्ञासु वाचकांस उपयुक्त वाटतील. डॉ. वि. वा. करंबेळकर यांच्या अद्यापि अप्रकाशित असलेल्या 'अथर्ववेदांतील संस्कृति व त्या वेदाचें भारतीय धर्मांतील स्थान' या ग्रंथाचा उल्लेख मागें वैदिक वाङ्मयावरील संशोधनाच्या आढाव्यांत आला आहे. त्याशिवाय त्यांनी विविध विषयांवर लिहिलेल्या लेखांत त्यांच्या संशोधनकुशल प्रतिभेचा उत्तम परिचय होतो. नागपूर विश्वविद्यालयाच्या हस्तलिखित ग्रंथभाण्डाराचे मुख्याधिकारी या नात्यानें त्यानीं अनेक संस्कृत ग्रंथ प्रकाशांत आणले आहेत. त्यांमध्यें रुद्रकविविरचित 'नबाबखानखानानचरितम्' गणेशकविकृत शौरिसुरततरङ्गिणी, गंगाधर कवीचे अठरा ग्रंथ, गीतगोविन्दाच्या अनुकरणात्मक तीन ग्रंथ–संगीतराघव, संगीतचिन्तामणि, संगीतदामोदर–हे विशेष उल्लेखनीय आहेत. त्यांचे 'नागानन्द नाटकांतील रूपक', 'नागार्जुनाचें कोडें' 'संस्कृतसाहित्यांतील यातुविद्याविधान', 'गोंडांच्या राजवटींतील साहित्यवृद्धि' इत्यादि इंग्रजींतील संशोधनलेख मननीय आहेत. त्याप्रमाणेंच त्यांनी 'माधुर्यभक्तीचें प्रतीक राधा हिचा विकासक्रम', 'आजकाल महाकाव्यें कां निर्माण होत नाहींत ?' इत्यादि प्रासङ्गिक विवाद्य विषयांवरही मराठींत आपली लेखणी चालविली आहे. 'भारतीय संस्कृतीचा उत्कर्ष' 'संस्कृत साहित्याचा सोपपत्तिक इतिहास' या ग्रंथांनीं त्यांनी मराठी वाङ्मयांत चांगली भर टाकली आहे. डॉ. जी. के. पोटे यांनी अद्यापि अप्रकाशित असलेल्या आपल्या 'मध्ययुगीन भारतांतील सामाजिक जीवन' या डॉक्टर पदवीकरितां लिहिलेल्या प्रबंधांत ख्रिस्तोत्तर प्रथम शताब्दीपासूनच्या संस्कृत वाङ्मयाचें आलोडन करून मध्ययुगीन सामाजिक जीवनाचें व्यापक चित्र रेखाटलें आहे. डॉ. ज्वालाप्रसादांनीं 'भारतीय न्यायशास्त्रांत प्रत्यक्षलक्षणाची मीमांसा' व 'निर्विकल्पक प्रत्यक्ष' यांवर विचारपूर्ण लेख इंग्रजींत लिहिले आहेत. सूत्रशैलीमध्यें लिहिलेल्या त्यांच्या 'भारतीयदर्शनम्' या संस्कृत ग्रंथांत पौरस्त्य व पाश्चात्य दार्शनिक मतांचें समन्वयात्मक प्रतिपादन आहे. डॉ. डी. जी. लोंढे यांनी मराठी ज्ञानकोशांत सांख्यमतावर व इंग्रजींत 'शङ्कराचार्यांना सम्मत असलेलें ब्रह्म', 'अद्वैत वेदान्तांत प्रत्यक्षाची समस्या', 'शङ्करोत्तर अद्वैतवेदान्त' इत्यादि विषयांवर लेख लिहिले आहेत. डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. ग. त्र्यं. देशपांडे यांनीं संस्कृत साहित्य शास्त्राचें अध्ययन करून मराठींतील तद्विषयक वाङ्मयांत चांगली भर टाकली आहे. डॉ. देशमुख यांचा 'मराठीचें साहित्यशास्त्र' हा प्रबन्ध व 'रेखा

शब्दार्थाबद्दल विवेचनात्मक लेख व श्री. देशपांडे यांचीं साहित्यशास्त्रासंबंधी व्याख्यानें यांत त्यांच्या सूक्ष्म अध्ययनाची प्रतीति होते. प्रा. देशपांडे यांचे 'वैदर्भी रीति', 'भवभूतीचा करुण रस', 'कालिदासाचें निसर्गवर्णन', 'साहित्यांतील औचित्यविचार' इत्यादि लेखहि मननीय आहेत. यांचा अलंकारप्रदीप हा ग्रंथ अलंकारांच्या अभ्यासकांस उपयुक्त आहे. डॉ. वि. भि. कोलते यांच्या विविध प्रकारच्या लिखाणांत 'कालिदासाच्या यशाचें रहस्य', 'महात्मा रावण', 'वैदर्भी महाकवि भारवि', 'शाकुन्तलांतील सर्वोत्कृष्ट अंक कोणता?' इत्यादि संस्कृत साहित्यविषयक विचारप्रवर्तक लेखांचाहि अन्तर्भाव होतो. लोकनायक बापूजी अणे यांचा 'महाभारत बुद्धपूर्व कीं बुद्धोत्तरकालीन?' व कै. विष्णु मोरेश्वर महाजनींचा 'रामायणकालीन समाजस्थिति' हे लेख त्यांच्या महाभारत व रामायण यांच्या खोल अध्ययनाचे निदर्शक आहेत. डॉ. शं. दा. पेंडसे यांनी आपल्या 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास' या ग्रंथांतील उत्कृष्ट विवेचनास संस्कृत साहित्याचा आधार घेतला आहे. त्यांच्या महाभारतकालीन समाजस्थितीच्या अध्ययनाचें फल त्यांच्या 'भारतीय स्त्रियांचें तेजस्वी रूप द्रौपदी' या लेखांत दृग्गोचर होतें. प्रा. म. र. आष्टीकर यांनी ध्वन्यालोक व तद्विषयक अन्य ग्रंथांचें अध्ययन करून ध्वनिसम्प्रदायाच्या विवाद्य तत्त्वांवर मननीय लेख लिहिले आहेत. त्याचप्रमाणें अमरावतीचे श्री. श्री. पु. हिर्लेकर यांचे रसस्वरूपविषयक लेखहि अत्यंत उद्बोधक असतात. श्री. ल. स. पांढरीपांडे यांनी मराठी विज्ञानशतकाच्या आवृत्तीस जोडलेल्या प्रस्तावनेंत तो ग्रंथ शतकत्रयाचा कर्ता भर्तृहरि याचा किंवा दुसऱ्या कोणाचा या विषयाचा चांगला खल केला आहे. विद्वद्वर्य अप्रबुद्ध व साहित्याचार्य बाळशास्त्री यांनी आपल्या ग्रंथांच्या व व्याख्यानांच्या द्वारें भारतीय संस्कृतीच्या विविध अंगांवर उत्तम प्रकाश पाडला आहे.

रायगढचे पं. लोचनप्रसाद पांडेय यांनी आपल्या अनेक हिंदी लेखांत छत्तीसगढांतील अनेक विस्मृत ग्रंथरत्नें प्रकाशांत आणलीं आहेत. त्यांमध्यें पटनाराज्यनिवासी वैजलदेवाचा संस्कृत व्याकरणात्मक वैजलकारिकाग्रंथ संबलपुरनिवासी गंगाधर मिश्र यांचें पटनाराज्यनरेशांचें विविध छंदामध्यें वर्णन करणारें कोसलानंद काव्य, रतनपुरनिवासी पं. तेजनाथ शास्त्री यांचा पद्यात्मक रामायणसारसंग्रह, तसेंच तेथील कायस्थकुलभूषण पं. रेवाराम बाबूंचे गंगालहरी, नर्मदालहरी, गीतमाधव इत्यादि ग्रंथ यांचा निर्देश केला पाहिजे.

कांही अनुवादग्रंथ

देशाच्या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर संस्कृतभाषा व तिच्यांतील साहित्य यांच्याविषयीं विद्वानांत अनुरागवृद्धि व्हावी हें स्वाभाविक आहे. प्रा. सावळापूरकर यांचें काव्यप्रकाशाचें मराठी भाषांतर, पं. सुन्दरलाल शुक्लांचा नैषधचरिताच्या पांच सर्गांचा हिन्दी अनुवाद, प्रा. विनयमोहन शर्मा (शुकदेवप्रसाद तिवारी) यांचें गीतगोविंद व ऋतुसंहार या ग्रंथाचें पद्यमय हिंदी रूपान्तर, प्रा. प्रभुदयाळ अग्निहोत्री यांचें मृच्छकटिकाचें हिंदी भाषान्तर व व्योहार राजेन्द्रसिंहांनी मेघदूताला हिन्दींत दिलेलें नाटकरूप हीं या अनुरागवृद्धीचीं सुन्दर उदाहरणें आहेत.

वरील सर्व कृतींचा साकल्यानें विचार करतां संस्कृतसाहित्यविषयक संशोधनांत मध्यप्रदेशीय विद्वानांनीं चांगलीच कामगिरी केली आहे, असें म्हणण्यास हरकत नाहीं.

मध्यप्रदेशातील पाली आणि प्राकृत वाङ्मयांचें संशोधन

(ले. डॉ. हीरालाल जैन, एम्. ए., डी. लिट्., नागपूर)

भारतीय संस्कृतींचें पोषण आणि विकास वैदिक, बौद्ध व जैन या तीन
विचारप्रवाहांनी झाला आहे. वैदिक साहित्याची भाषा संस्कृत
आहे. वेद संस्कृत भाषेच्या अत्यंत प्राचीन रूपामध्यें लिहिले आहेत आणि
त्या भाषेचा क्रमानें झालेला विकास ब्राह्मणें व उपनिषदें, महाभारत
आणि रामायण, तसेंच कालिदासादि महाकवींच्या कृतींमध्यें दिसून येतो.
हे सर्व ग्रंथ सामान्यत: संस्कृत साहित्यात समाविष्ट केले जातात.

बौद्ध वाङ्मय

भगवान् बुद्धानें आपला उपदेश तत्कालीन जनभाषेमध्यें केला त्याच्या
अनुयायांनीं त्या उपदेशाच्या आधारावर त्रिपिटक नामक साहित्याची रचना
केली. या साहित्याचा प्रचार बुद्धधर्माबरोबर प्राय: सर्व आशिया खंडात
झाला. परंतु कालांतरानें या धर्माचा भारतवर्षामध्यें प्राय: लोप झाला आणि
त्याबरोबर त्रिपिटक साहित्याचाही या देशामध्ये मागमूस राहिला नाही.

ही स्थिति कित्येक शतकें टिकली. पण पाश्चात्य देशांत भारतीय
साहित्य आणि इतिहास यांची आवड उत्पन्न झाल्यावर बौद्ध साहित्याच्याहि
संशोधनाला आरंभ झाला. त्यामुळें इंग्लंडमध्यें पाली टेक्स्ट सोसायटीची
स्थापना झाली आणि तिच्या योगें लंकेमध्यें सुरक्षित असलेल्या संपूर्ण पाली
त्रिपिटकाचें प्रकाशन झालें. या प्रकाशनांत रोमन लिपीचा उपयोग केला
आहे. पाली साहित्य नागरी लिपीमध्यें मिळणें अद्यापि दुष्कर आहे. ही
अडचण दूर करण्याचा प्रयत्न मुंबई विश्वविद्यालय आणि काशीचें भार-
तीय ज्ञानपीठ यांनी चालविला आहे तो स्तुत्य आहे.

जातककथांचा अनुवाद

आपल्या मध्यप्रदेशांत नागपूर विश्वविद्यालयांत इंटरमीजिएटपासून
एम्. ए. परीक्षेपर्यंत पालीच्या अध्ययन-अध्यापनाची व्यवस्था कित्येक
वर्षांपासून केली आहे आणि त्यायोगें पाली भाषेमध्यें तीन चार विद्वान्
एम्. ए. परीक्षा पास झाले आहेत. परंतु मध्यप्रदेशांत पाली साहि-
त्याची जी थोडीबहुत सेवा आतापर्यंत झाली आहे तिचें श्रेय वर्धा
येथील राष्ट्रभाषाप्रचारसमितीचे मंत्री श्री. भदन्त आनंद कौसल्यायन

यांना आहे. भदंतजींनी या क्षेत्रांत केलेलें अत्यंत महत्त्वपूर्ण कार्य म्हणजे बौद्ध जातकांचा हिंदीमध्ये अनुवाद हें होय. एका दृष्टने पाहतां जातक-ग्रथ हा पाली साहित्याचा प्राण आहे. जातककथा केवळ रम्यता, नैतिक उपदेश आणि प्राचीन सामाजिक परिस्थितीच्या ज्ञानाचें साधन या कारणांनींच नव्हे, तर सर्व जगांतील कथासाहित्यावर पडलेल्या त्यांच्या प्रभावामुळें अत्यत महत्त्वाच्या मानल्या जातात. जातकांची एकूण संख्या ५४७ आहे. त्यांपैकीं पहिल्या ५०० कथा भदन्तजींनी अनुवादित केल्या असून त्या हिंदी साहित्य सम्मेलन, प्रयाग, या संस्थेमार्फत चार खंडात प्रकाशित झाल्या आहेत. या योजनेनुसार बाकी राहिलेल्या ४७ कथा आणखी एक दोन खंडांत प्रसिद्ध करतां यतील. आम्हाला आशा आहे कीं भदन्तजी आणि हिंदी साहित्य संमेलन राहिलेले खड लवकर प्रकाशित करून या महत्त्वपूर्ण पाली साहित्याच्या संपूर्ण प्रकाशनानें जिज्ञासूंची तृप्ति केल्याचें श्रेय प्राप्त करून घेतील.

महावंश व इतर ग्रंथांचें भाषांतर

भदन्तजीचें दुसरें उल्लेखनीय कार्य म्हणजे पाली 'महावंशा'चें हिंदी भाषांतर. हा ग्रथ बौद्ध धर्म आणि लंकेचा इतिहास यांच्या ज्ञानाकरितां अत्यंत उपयोगी आहे; कारण त्यांत विक्रमपूर्व पांचव्या शतकापासून विक्रमोत्तर चौथ्या शतकापर्यंत म्हणजे सुमारे आठ–नऊशें वर्षांचा बौद्ध धर्माचा व लंकेचा इतिहास सांपडतो. हा अनुवाद प्रयागच्या हिन्दी साहित्य संमेलनानें सन १९४२ मध्यें प्रकाशित केला.

भदन्तजींचें पाली वाङ्मयाचें तिसरें कार्य म्हणजे 'सच्चसगहो' हा ग्रंथ. बौद्ध धर्माच्या मौलिक तत्त्वांचा संक्षिप्त परिचय करून देणाऱ्या ग्रंथाची उणीव पुष्कळ काळ भासत होती. ती 'सच्चसंगहो' द्वारा उत्तम रीतीने भरून निघाली आहे पाली त्रिपिटकांतील वेच्यांचा हा सुंदर संग्रह लंकेंतील सुप्रसिद्ध धार्मिक विद्वान महास्थविर ज्ञानातिलोक यांनी प्रथम केला होता व लौकरच त्यांची इंग्रजी व जर्मन भाषांमध्यें भाषांतरेंही झालीं होतीं. भदन्तजींनी या संग्रहाचा अनुवाद 'बुद्धवचन' या नावानें केला व तो सारनाथ (काशी) येथील महाबोधि पुस्तक भाण्डारद्वारा प्रकाशितहि झाला. परंतु जेव्हां लोकांची प्रवृत्ति बौद्धज्ञानाबरोबरच पाली भाषेच्या अध्यापनाकडेहि झाली, तेव्हां या मूलग्रंथाचें नागरी लिपींत संपादन करणें अवश्य झालें. हें कार्य भदन्तजींच्या सच्चसंगहो ग्रंथांत (हिंदी साहित्य संमेलन) उत्कृष्टपणें झालें आहे. या छोटचाशा ग्रंथांत बौद्ध धर्माची चार आर्यसत्यें व अष्टांगिक मार्ग यांचें स्वरूप प्रकट कर-

णाऱ्या त्रिपिटकांतील उताऱ्यांचें संकलन केलें आहे. त्याला जोडलेल्या हिंदी भूमिकेंत भदन्तजींनी त्रिपिटक साहित्य आणि बौद्धदर्शन यांचा सरळ व वाचनीय परिचय दिला आहे.

जैन वाङ्मय

भगवान् बुद्धांनी आपला उपदेश संस्कृत भाषेंत न करतां तत्कालीन जनभाषा मागधीमध्ये केला. त्याप्रमाणेंच त्याचे ज्येष्ठ समकालीन जैन तीर्थंकर भगवान् महावीर यांनीहि देशकालानुसार जनभाषा अर्धमागधी हिच्यामध्ये आपलीं प्रवचनें केलीं. त्यांच्या शिष्यांनी त्यांच्या प्रवचनांचें बारा अंगांत संकलन केलें. त्यांना 'द्वादशांगश्रुत' अथवा 'जैनागम' असें नांव आहे. परंतु हे जैनागम पुष्कळ काळपर्यंत लिपिनिविष्ट न होतां केवळ मुनींच्या स्मृतींत किंवा श्रुतपरंपरेंत राहिल्यामुळे त्याचे मूळ स्वरूप सुरक्षित राहिलें नाहीं. जैनागमाचें बारावें अंग 'दृष्टिवाद' याचा तर पूर्ण लोप झाला. पण बाकीच्या अकरा अंगांचें संकलन महावीरनिर्वाणानंतर साडेनऊशें वर्षांनी वलभी नगरांत एका मुनिसंमेलनानें तयार केलें ते सध्यां प्रचलित असून अनेक प्राकृत व संस्कृत टीकाटिप्पणींनी सुसमृद्ध झालें आहे, पण या प्राकृत साहित्याला श्वेतांबर जैन सम्प्रदायच मान्यता देतो. दिगम्बर जन संप्रदायाच्या मतानुसार ह सर्वही अंगें लुप्त झालीं होतीं. त्यांतील कांही भागांचें ज्ञान गिरिनगर यथील चन्द्रगुंफेंत वास्तव्य करणारे मुनि धरसेनाचार्य यांना होतें. त्यांनी तें ज्ञान पुष्पदन्त आणि भूतबलि या थोर शिष्यांना दिलें. या शिष्यांनी 'षट्खंडागम सूत्रां'ची रचना केली. त्यामध्यें बाराव्या श्रुताङ्ग दृष्टिवादांतील कर्मसिद्धांत चें जें ज्ञान त्यांना धरसेनाचार्यद्वारा प्राप्त झालें होतें त्याचा समावेश केला होता. या ग्रंथाच्या रचनेचा उत्सव ज्येष्ठ शुक्ल पंचमीला झाला होता, या घटनेला जवळ जवळ दोन हजार वर्षें झालीं, पण तेव्हापासून आजपर्यंत हा दिवस श्रुतपंचमी या नावानें पाळला जातो.

षट्खंडागमसूत्रांचें प्रकाशन

षट्खंडागम सूत्रांवर अनेक टीका व भाष्यें लिहिलीं होतीं असें परंपरागत आख्यायिकांवरून समजतें. पण आतां याची 'धवला' नामक एकच टीका उपलब्ध आहे. ही टीका विक्रम संवताच्या नवव्या शतकांत राष्ट्रकूट नृपतीच्या आश्रयास असलेल्या आचार्य वीरसेनानें व जिनसेन नामक त्याच्या शिष्यानें लिहिली होती. हा ग्रंथ जैन सिद्धान्ताचा अत्यंत प्रमाणभूत असून इतका गहन व कठीण आहे कीं, गेल्या चार पांच शतकांत याचें पठन-पाठनच लुप्त झालें होतें. याची एकच ताडपत्रावर हळेकानडी लिपींत

लिहिलेली प्रत म्हैसूर राज्यांतील मूडबिद्री नामक गांवांत सिद्धान्तवस्ती नांवाच्या जैन मंदिरांत सुरक्षित ठेवली होती. तिच्या वंदन करण्याकरितां हजारों यात्रेकरू दर वर्षी त्या मन्दिराची यात्रा करीत असतात. पुष्कळ प्रयत्न केल्यावर या ग्रंथाची प्रत मिळाली आणि तिचें सम्पादन, अनुवाद व प्रकाशन करण्याचें कार्य मध्यप्रदेशांतच प्रस्तुत लेखकाच्या द्वारा चालू झालें. षट्खंडागमसूत्र आणि धवला टीका यांचा प्रथम भाग सन १९३९ मध्यें अमरावतीच्या सरस्वती मुद्रणालयांत प्रकाशित झाला. त्यानंतर या महाग्रंथाचे आतांपर्यंत नऊ भाग प्रसिद्ध झाले आहेत. रहा ते बारा हे भाग मुद्रणावस्थेंत आहेत. याप्रमाणें बहात्तर हजार श्लोकात्मक या ग्रंथाचें प्रकाशन सोळा भागांत पूर्ण होईल अशी आशा आहे. हें कार्य अमरावती येथील जैन साहित्योद्धारक कार्यालयामार्फत भेलसा येथील श्रीमान् सेठ शिताबराय लक्ष्मीचन्द्रजी यांच्या औदार्यानें होत आहे. हा ग्रंथ प्राकृत गद्याच्या दार्शनिक शैलीचें एक अनुपम उदाहरण आहे. यामध्ये कोठें कोठें संस्कृत भाषेंतील रचनेचेंहि संमिश्रण झालें आहे म्हणून हा ग्रंथ मणिप्रवालन्यायानें रचला आहे असें म्हणतात.

अपभ्रंश वाङ्मयाचें संशोधन

याशिवाय प्रस्तुत लेखकाकडून अपभ्रंश साहित्याचीहि थोडीबहुत सेवा झाली आहे. सन १९२४ मध्यें मध्यप्रदेश सरकारनें या प्रांतांतील संस्कृत व प्राकृत हस्तलिखित ग्रंथांची सूचि करविली होती. हें कार्य कै. रायबहादूर हीरालालांकडे सोंपविलें होतें. त्यांनी जैन ग्रंथांची सूचि करण्याचें कार्य माझ्याकडे दिलें. तदनुसार या प्रदेशाच्या अकोला जिल्ह्यांतील कारंजा (लाड) गांवच्या तीन प्राचीन जैन शास्त्रभांडारांची तपासणी व त्यांतील सुमारें तीन हजार हस्तलिखितांची सूची मी तयार केली. ती मध्यप्रदेश सरकारनें 'मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील संस्कृत व प्राकृत ग्रंथांची सूचि' (इंग्रजी) यांत सन १९२५ मध्यें प्रसिद्ध झाली. तिच्या प्रस्तावनेमध्यें जैन साहित्याच्या परिचयाखेरीज कारंजा येथील भांडारांतील दहा-बारा अपभ्रंश काव्यांचा विषय परिचय करून दिला होता; परिशिष्टामध्ये त्यांतील उतारेहि दिले होते. या सूचीमुळें विद्वानांचें लक्ष त्या अपभ्रंश काव्यांकडे विशेषेंकरून आकर्षित झालें. सन १९२५ मध्यें प्रस्तुत लेखकाची नेमणूक किंग एडवर्ड कॉलेजच्या संस्कृतच्या प्राध्यापकाच्या जागेवर झाली. त्यानंतर त्यानें या अपभ्रंश ग्रंथांच्या सम्पादन-प्रकाशनाच्या कार्यास प्रारंभ केला. नंतर कारंजा जैन ग्रंथमालेची सुरुवात झाली व तिच्यामध्यें डॉ. प. ल. वैद्य यांनी संपादिलेलें 'जसहरचरिउ' १९३१ मध्यें प्रसिद्ध झालें. त्यानंतर प्रस्तुत लेखकानें

'णायकुमारचरिउ' व 'सावयधम्मदोहा' (१९३२), 'पाहुडदोहा' (१९३३), 'करकंडचरिउ' (१९३४)' असे ग्रंथ प्रकाशित केले. हे ग्रंथ विस्तृत भूमिका, इंग्रजी किंवा हिंदी अनुवाद, शब्द-सूचि व टिप्पणी यांनी युक्त असून, त्यामध्यें त्या भाषेचें स्वरूप, तींतील साहित्य व तिचा इतिहास, तसेंच तिचा विद्यमान भाषांच्या विकासावर प्रभाव इत्यादि विषयांचें विस्तृत विवेचन केलें आहे.

इतर संशोधन

प्रस्तुत लेखकानें कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजांतील प्राकृताचे प्राध्यापक डॉ. ए. एन्. उपाध्ये यांच्या साहाय्यानें जैन भूगोलविषयक तिलोयपण्णत्ति नावाच्या प्राकृत ग्रंथाचेंहि संपादन केलें आहे. याचा पहिला भाग १९४३ मध्यें आणि दुसरा भाग १९५१ मध्यें अमरावतीच्या सरस्वती मुद्रणालयांत छापला जाऊन जैन संस्कृति संघ सोलापूर या संस्थेमार्फत प्रकाशित झाला. ग्रंथाचें हिंदी भाषांतर पं. बालचन्द्रजी शास्त्री यांनी केलें आहे.

प्रस्तुत लेखकाला कॉलेजांत पाली व प्राकृत भाषा व साहित्य यांच्या अध्यापनांत असा अनुभव आला कीं प्राकृत साहित्याचा बहुतेक भाग जैन धर्माशीं संबद्ध आहे आणि जैन धर्माचे आचार व सिद्धान्त यांचें यथायोग्य ज्ञान असल्याशिवाय तें साहित्य उत्तम रीतीनें समजत नाहीं, कारण पदोपदीं तें जैन पारिभाषिक शब्दांनी भरलेलें आहे. प्रसंगोपात्त स्थूल रूपानें त्यांचें ज्ञान करून दिलें तरी तें विद्यार्थ्यांच्या मनावर ठसत नाहीं. कारण कोणतेंहि दार्शनिक मत त्यांच्या अंगोपांगांसहित सांगितलें जात नाहीं तोंपर्यंत त्यांचें यथार्थ ज्ञान होत नाही व स्मरणही राहत नाहीं. तेव्हां ज्यायोगें प्राकृतचें अध्ययन होईल आणि त्याबरोबर जैन धर्माचेंही आवश्यक ज्ञान व्यवस्थित रूपानें प्राप्त होईल अशा प्राकृत उताऱ्यांच्या पुस्तकाची जरूर भासू लागली. शिवाय ज्याच्या योगें विद्यार्थी सैद्धांतिक उल्लेख करू शकतील अशा तऱ्हेचें पुस्तक त्यांना उपलब्ध करून देणें आवश्यक होतें. या अनुभवामुळें प्रस्तुत लेखकानें तत्त्वसमुच्चय नांवाचें संकलनपुस्तक तयार केलें तें सन १९५२ मध्ये वर्ध्याच्या भारत जैन महामण्डळानें प्रकाशित केलें असून तें बी. ए. व एम्. ए. च्या पाली-प्राकृतच्या अभ्यासक्रमांना लावलें आहे.

वर्ध्याच्या राष्ट्रभाषाप्रचारसमितीने नुकताच जो वाङ्मयपरिचय ग्रंथ प्रकाशित केला आहे त्यांतील प्राकृत व अपभ्रंश यांचा परिचय प्रस्तुत लेखकानें लिहिला आहे. भारतीय विद्याभवन तर्फे जो भारतीय इतिहास

प्रकाशित होत आहे त्यांतील अपभ्रंश साहित्य व जैन साहित्य यावरची प्रकरणें प्रस्तुत लेखकाचीं आहेत. तसेंच कलकत्याच्या रामकृष्ण मिशनद्वारा जो भारतीय संस्कृति परिचय ग्रंथ अनेक भागांत प्रसिद्ध होणार आहे त्यांतील जैन धर्म व साहित्यसंबंधीं प्रकरणेंही प्रस्तुत लेखकानेंच लिहिलीं आहेत.

मध्यप्रदेशांतील प्राकृत भाषा व साहित्य यांच्या संशोधनाचा भविष्यकाळ मला अत्यंत उज्ज्वल दिसत आहे येथील अनेक शास्त्रभांडारांत विशेषतः कारंजा येथील भांडारांत पुष्कळ ग्रथ अप्रकाशित आहेत. नागपूर विश्वविद्यालयाशी संलग्न असलेल्या नागपूर महाविद्यालयांत एम्. ए. परीक्षेपर्यंतच्या पाली व प्राकृत यांच्या अध्ययनाची सोय केली आहे. आणि मागे उल्लेखिलेली सम्पादन–प्रकाशनाची परंपराही चालू आहे. नवीन पिढीने या विषयाचा प्रयत्नपूवक निश्चयाने अभ्यास करणें मात्र आवश्यक आहे.

मध्यप्रदेशातील महानुभाव-वाङ्मयाचे संशोधन

(ले. प्रो. डॉ. वि. भि. कोलते, नागपूर)

थोडा पूर्वेतिहास

महानुभाव वाङ्मयाचे संशोधन हा मध्यप्रदेशाचा एक महत्वाचा विशेष होय, असे नेहमी म्हटले जाते; आणि ते बऱ्याच अंशी खरे आहे. तथापि या विधानाचे थोडे स्पष्टीकरण करणे अवश्य आहे. काटेकोरपणाने पाहिले तर महानुभाव वाङ्मय प्रकाशित करण्याला खास महानुभावांनीच सुरुवात केलेली आढळते. या कार्याला वऱ्हाडात खामगाव (जि. बुलडाणा) येथे आरंभ झाला. 'श्री. गोपिराज राजधर पंजाबी, मानभाव' यांनी 'पाठाची पोथी' (म्हणजे चक्रधर-सिद्धांत-सूत्रपाठाची पोथी) सांकेतिक लिपीमध्ये शिळा-प्रेसवर खामगाव येथे छापून प्रथम प्रसिद्ध केली. मला या पोथीची प्रत मिळाली. पण तिची आरंभीची व शेवटची पाने फाटली असल्यामुळे ती नक्की कोणत्या साली व कोणत्या छापखान्यात छापली होती हे सांगता येत नाही. तथापि ही शिळाप्रेसवरील पोथी म्हणजे छापून प्रसिद्ध झालेले अगदी पहिले महानुभावीय पुस्तक होय अशी माहिती श्री. गोपीराज, श्रीयक्षदेव इत्यादि महंताकडून मिळाली. पुढे खामगाव येथेच 'सिद्धांतकल्पतरु' छापखान्यात संतोषमुनि कृष्णदास यांचे 'रुक्मिणी-स्वयंवर (१८८९); भास्कर कवि विरचित 'भागवतसार-चाळिसी' (१८९१) इत्यादि पुस्तके श्री. गोपिराज राजधर यांनी छापून प्रसिद्ध केली. शिळाप्रेसवरील उपरोक्त पाठपोथी ही त्यापूर्वीची असल्यामुळे छापून प्रसिद्ध झालेले ते पहिले पुस्तक होय या माहितीला पाठपुरावा मिळतो. सारांश, महानुभाव वाङ्मयाच्या मुद्रणाला व प्रकाशनाला मध्यप्रदेशात प्रारंभ झाला हे यावरून दिसून येईल. श्री. गोपिराज राजधर यांच्याकडून खामगाव येथे हे कार्य चालू असतांनाच सोलापूर येथे कै. बाळकृष्ण दादा कानडे हे इ. स. १८८९ पासून स्वतःच्या 'सच्चिदानंद' छापखान्यातून महानुभाव पंथाची पुस्तके छापू लागले. तिकडे पेशावर येथून 'श्रीमन्महंत लक्षराज महानुभाव शिष्य दत्तराज अराधे' यांनी सुमारे १८९९ पासून 'महात्म-काव्य-प्रकाशना 'चे कार्य सुरू केले. त्यासाठी त्यांनी लाहोर येथे 'श्रीदत्त प्रकाशन यंत्रालय' काढले होते. 'गीता गोपाळदासी' म्हणजे पंडित गोपाळमुनी महानुभावकृत श्रीमद्‌भगवद्‌गीतेची महाराष्ट्री टीका हा महत्त्वाचा ग्रंथ इ. स. १९०० मधे याच यंत्रालयात छापून प्रसिद्ध झाला. हेच महानुभावांचे पहिले छापील पुस्तक होय असा निर्देश डॉ. य. खु. देशपांडे यांनी केलेला आहे. " महानुभावांचे

पहिले छापील पुस्तक म्हणजे श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील " गोपाळदासी " नावाची सरळार्थ टीका होय." (म. म. वा. पृ. ९) असे ते म्हणतात. पण हे त्यांचे विधान अक्षरशः बरोबर मानता येत नाही. कारण इ. स. १९०० मध्ये प्रसिद्ध झालेल्या ' गोपाळदासी ' टीकेच्या ग्रंथातच शेवटी, छापून तयार असलेल्या इतर काही पुस्तकांची यादी दिलेली आहे. श्री. कानडे यांनी १९०७ मध्ये छापून प्रसिद्ध केलेल्या ' श्रीपाठसमुदाया ' च्या प्रस्तावनेत '.... एका वकीलाच्या साह्याने शके १८११ (= इ. स. १८८९) साली " सच्चिदानंद " या नावाचा छापखाना चालू करून महानुभाव पंथाची पुस्तके छापणे सुरू केले " असे म्हटले आहे. त्यावरून १८८९ च्या सुमारास महानुभाव ग्रंथास मुद्रणसंस्कार लाभावयास सुरवात झाली असावी असे दिसते. पण त्याच्याहि पूर्वी खामगाव येथे या कार्याला प्रारंभ झाला होता याचा उल्लेख वर केलेलाच आहे. पुढे श्री. दत्तलक्षराजांनीच चित्रशाळा मुद्रणालयातून १९०१ मध्ये 'मतिरत्नाकर' व 'दर्शनप्रकाश' व १९०७ मध्ये ' ज्ञानप्रबोध ' ही काव्ये छापून प्रसिद्ध केली १९१० मध्ये श्री. भास्कर महानुभाव पुणेकर यांनी आर्यभूषण मुद्रणालयात भास्कर कवीश्वराचा 'एकादश स्कंध' छापून प्रसिद्ध केला. हे सर्व प्रयत्न महानुभाव मंडळींनी केलेले होते. त्यात श्री. गोपिराज राजधर व श्रीदत्तलक्षराज हे प्रमुख होते. श्री. गोपिराज राजधर यांना आद्य प्रकाशक म्हणून मानाचे पान देणे योग्य असले तरी संशोधन–कार्यात सर्व दृष्टींनी स्वतः लक्ष्य घातलें ते श्रीदत्तलक्षराजांनीच. त्याचे वास्तव्य ज्याप्रमाणे पेशावरला असे त्याचप्रमाणे चांदूर बाजार (ता. मोर्शी. जि. अमरावती) येथेहि असे. त्यामुळे श्री दत्तलक्षराज महानुभाव हे मध्यप्रदेशातील पहिले महानुभाव–वाङ्मय–संशोधक ठरतात.

राजवाडे, चांदोरकर व भावे

या सुमाराला म्हणजे इ. स. १९१० मध्ये कै. राजवाडे यांनी महानुभावीय सांकेतिक लिपी स्वतंत्रपणे उलगडून दाखविली. भारत इतिहास संशोधक मंडळाच्या शके १८३२ (इ. स १९१०) च्या अहवालातून आणि शके १८३५ (इ. स. १९१३) च्या 'वार्षिक इतिवृत्ता'तून त्यांनी महानुभावीय सांकेतिक लिपीच्या किल्ल्या स्वतंत्रपणे शोधून प्रसिद्ध केल्या. अर्थात् महानुभावेतर संशोधकात संशोधनाचा अग्रमान कै. राजवाडे यांच्याकडे जातो. श्री. पां. मा. चांदोरकर व श्री. गो. का. चांदोरकर यांनीहि या संशोधनात काही काळ लक्ष्य घातले होते. श्री. पां. मा. चांदोरकर यांनी ' मानभावी वचनपाठ ' (चक्रधर सिद्धांत सूत्रे) भा. इ. सं. मं. सप्तम संमेलनवृत्तात प्रथम प्रसिद्ध केला. पण या संशोधनात विशेष लक्ष्य घातले ते श्री. वि. ल. भावे यांनी. इ. स. १९१९ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'महाराष्ट्र सारस्वता' च्या दुसऱ्या आवृत्तीत एका स्वतंत्र प्रकरणात महानुभाव पंथ व वाङ्मय यांचा ओझरता परिचय त्यांनी लिहिला व सकळ आणि सुंदरी लिपी यांच्या किल्ल्याहि प्रसिद्ध केल्या.

इ. स. १९२४ च्या एप्रिलमध्ये मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाच्या रौप्य-महोत्सव-प्रसंगी मुख्य वक्ते म्हणून त्यांनी 'महाराष्ट्र-भाषा-सरस्वतीच्या महालातील एक अज्ञात दालन' नावाचा निबंध वाचून (विविधज्ञानविस्तार. मे १९२४) महानुभाव वाङ्मयाची तोंडओळख महाराष्ट्राला करून दिली. 'महाराष्ट्र सारस्वता' च्या तिसऱ्या आवृत्तीच्या पहिल्या भागात (इ. स. १९२४) 'श्रीचक्रधर व महानुभाव पंथ', आणि 'महानुभाव आद्यग्रंथ' अशी दोन स्वतंत्र प्रकरणे लिहिली; व इतर प्रकरणात कालक्रमानुसार बाकीच्या महानुभावीय ग्रंथांचा इतिहास त्यांनी नमूद केला. अर्थात् महानुभाव पंथ आणि वाङ्मय यांची माहिती संशोधून ती महाराष्ट्रासमोर इतक्या विस्ताराने मांडण्याचे श्रेय श्री. वि. ल. भावे यांनाच आहे. या कामात प्रारंभी त्यांना श्रीदत्तलक्षराजांचे व नंतर श्रीदत्तलक्षराज व श्री गोपीराज (महात्मा हरिराज बाबा मुसाफीर) महंत यांचेच साह्य झाले. महाराष्ट्र-सारस्वत (आवृत्ति दुसरी) या ग्रंथाच्या उपसंहारात " येथे मध्येच दत्तराज महंत भेटले. प्रवासाला निघतांना आपल्याला सगळ्यांनी बजाविले की या महंताच्या मठाकडे जाऊ नका. ते तुम्हाला आपल्या सावलीला देखील उभे करणार नाहीत. तरी पण जरा धिटाईने मी त्यांचेकडे वळलोच आणि थोडी रदबदली करून पाहिली. तो केवढा चमत्कार ! महंतांनी आपल्या कंबरेच्या किल्ल्याच तुमचे स्वाधीन केल्या आणि मठात हिंडून सर्वभर मजा पाहण्याचा आग्रह केला. " असा निर्देश भावे यांनी स्वतःच केला आहे. महाराष्ट्र-सारस्वताची तिसरी आवृत्ति निघण्यापूर्वी इ. स. १९२३ साली श्रीदत्तराज महंत व श्रीहरिराज बाबा महानुभाव हे सतत सात महिने आपल्या सर्व पोथ्या घेऊन श्री. भावे यांच्याकडे जाऊन राहिले होते. त्यामुळेच महानुभाव वाङ्मयाचे अज्ञात दालन खुले होणे शक्य झाले.

महाराष्ट्र-सारस्वतातील माहितीशिवाय श्री. भावे यांनी १९२४ मध्ये 'महानुभावीय महाराष्ट्र ग्रंथावली-कविकाव्यसूची' व 'वच्छहरण' काव्य संपादून प्रसिद्ध केले. त्यांनीच संपादन केलेले 'शिशुपालवध' हे काव्य त्यांच्या मृत्युनंतर इ. स. १९२६ मध्ये प्रसिद्ध झाले. या तिन्ही ग्रंथांच्या निर्मितीस वरील दोन महंतांचेच साह्य झाले. इ. स. १९२७ मध्ये श्री. मो. स. मोने (अध्यापिका शाला हिंगणे, पुणे) यांनी पंडित भीष्माचार्यकृत 'पंचवार्तिक' छापून संगृहीत केले. या पुस्तकाचे प्रकाशक श्रीदत्तराज व श्रीगोपीराज महानुभाव हेच असून त्यांनीच पाठवलेल्या नकलावरून श्री मोने यांनी ते छापून घेतले.

पहिले संशोधक व प्रकाशक : महंत श्रीदत्तलक्षराज

यावरून लक्ष्यात येईल की इ. स. १९०७ पर्यंत श्रीदत्तराजांनी महानुभाव वाङ्मयाच्या संशोधनाचा व प्रसिद्धीचा उपक्रम स्वतंत्रपणे स्वतः केला तर त्यानंतर १९२४ पर्यंत या बाबतीत श्री. भावे यांना सर्व प्रकारे साह्य करून त्यांच्याकडून तो उपक्रम करविला. या कार्यात इतराप्रमाणेच श्रीगोपीराज महंत

'महानुभावांचे चरित्र-ग्रंथ' (भा. इ. सं. मं. त्रै. व. १३-२) हा लेख अधिक महत्त्वाचा आहे. 'भीष्माचार्य पाठ म्हणून चरित्रग्रथाच्या सुंदरी लिपीच्या' पोथीतील 'इतिहास' प्रकरणातील लीळाचरित्रादि चरित्र-ग्रंथांच्या उत्पत्तीचा उतारा या लेखात डॉ. देशपांडे यांनी दिला आहे. महानुभावीय संशोधकांना या उताऱ्याचा अनेक दृष्टींनी उपयोग झालेला आहे.

यानंतर डॉ. देशपांडे यांनी लिहिलेला महत्त्वाचा लेख 'श्रीज्ञानेश्वर आणि महानुभाव' हा असून तो 'श्रीज्ञानेश्वर दर्शन' भाग १ (पृ. १३९ ते १५७) मध्ये प्रसिद्ध झालेला आहे. वारकरी पंथ आणि महानुभाव पंथ यांचे तुलनात्मक निरीक्षण करून ज्ञानेश्वरांच्या नावावर प्रसिद्ध असलेला योगवासिष्ठ हा ग्रंथ 'महानुभावीय' असावा म्हणून कित्येकांनी प्रतिपादिलेल्या मताचा त्यात त्यांनी सविस्तर विचार केला आहे. हा ग्रंथ महानुभावीय नाही, तो ज्ञानेश्वरांचा असावा, असे आपले मत त्यांनी मांडले आहे. याशिवाय 'महाराष्ट्रीय ज्ञानकोश' (विभाग १८), 'महाराष्ट्र सांवत्सरिक १९३२' इत्यादि संदर्भ-ग्रंथातहि डॉ. देशपांडे यांनी महानुभाव पंथ व वाङ्मय यावर अनेक परिचयात्मक लेख लिहिलेले आहेत.

श्री. वा. ना. देशपांडे

डॉ. य. खु. देशपांडे यांचे हे संशोधन-कार्य चालू असतांना शारदा-श्रमाचे दुसरे एक आधारस्तंभ श्री. वा. ना. देशपांडे यांनीहि महानुभाव वाङ्मय-संशोधन-कार्याचा ओनामा गिरविण्याला सुरवात केलेली होती. कै. राजवाडे व कै. वि. ल. भावे यांचे लिखाण वाचून महानुभाव वाङ्मयाकडे त्यांचे लक्ष्य वेधले गेले हे खरे असले तरी १९२५ मध्ये डॉ. य. खु. देशपांडे यांच्या मध्यस्थीने महानुभावपंथीय महंतांशी त्यांच्या ज्या ओळखी झाल्या त्यातूनच त्यांच्या संशोधन-कार्याला खरी सुरवात झाली. जून १९२७ च्या विविधज्ञानविस्तारात 'आद्य मराठी कवयित्री' हा त्यांचा लेख प्रसिद्ध झाला व त्यानंतर जुलै ते डिसेंबर १९२७ पर्यंतच्या अंकातून 'महदंबेचे धवळे' हे त्यांनी संपादिलेले काव्य क्रमशः प्रसिद्ध झाले. महदंबेच्या धवळ्यासहित या आद्य मराठी कवयित्रीवरील आपला हा प्रबंध पुस्तकरूपाने काढतांना श्री. वा. ना. देशपांडे यांनी लिहिले की "प्रस्तुत प्रबंधातील महदंबेची हकीकत ही सांप्रदायिक माहिती होय, ऐतिहासिक सत्य नव्हे. अर्थात् उद्याच्या संशोधनाने तीत काय फेरबदल करावा लागेल हे कोणी सांगावे?" यावरून संशोधनाला सुरवात करतांना आरंभापासून त्यांनी कशी सावधगिरी बाळगली याची कल्पना येऊ शकेल. विविधज्ञानविस्ताराच्या नोव्हेंबर-डिसेंबर १९२७ च्या अंकात 'महानुभावांचा वेद' व ऑक्टोबर १९२८ च्या अंकात 'शिशुपाल-वधकर्ता भास्करभट्ट कवीश्वराचार्य' हे त्यांचे दोन महत्त्वाचे शोधनिबंध प्रसिद्ध

झाले. 'महानुभावांचा वेद' या लेखात सिद्धांतसूत्रपाठाचे सर्वांगीण समालोचन करून महानुभावांच्या तत्त्वज्ञानाची चिकित्सक दृष्टीने ओळख करून दिलेली आहे. मराठी भाषेतून या तत्त्वज्ञानाचा ओझरता परिचय करून देणारा हा पहिलाच लेख असल्यामुळे तो महत्त्वाचा ठरतो. 'भास्करभट्ट कवीश्वराचार्य' या लेखात त्या कवीविषयीची सांप्रदायिक माहिती श्री. देशपांडे यांनी विस्ताराने दिलेली असून ऐतिहासिक दृष्टचा व पुढील संशोधनाने तिच्यात फेरफार करावे लागण्याची शक्यता त्यांनी या लेखातहि नमूद करून ठेवलेली आहे. १९२९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'श्री ऋद्धिपुरवर्णन' (संपादक : य. खु. देशपांडे) या काव्यावर ऑगस्ट १९२९ च्या विविधज्ञानविस्तारात श्री. वा. ना. देशपांडे यांनी लिहिलेले परीक्षणहि महत्त्वाचे आहे. कारण महानुभावीय ग्रंथाच्या संपादित संहितेचे चिकित्सक दृष्टीने केलेले हे पहिलेच परीक्षण होय.

मध्यप्रदेशातील महानुभाव-वाङ्मय-संशोधनाचे केंद्र प्रारंभी यवतमाळ येथेच होते. तेथील डॉ. य. खु. देशपांडे आणि श्री. वा. ना. देशपांडे हे या क्षेत्रातील बिनीचे संशोधक होत. यानंतर म्हणजे साधारणपणे १९२९ नंतर नागपूर येथे व १९३१ नंतर उमरावती येथे महानुभाव-वाङ्मय-संशोधनाची नवीन केंद्रे निर्माण झाली. नागपूर येथील श्री. नी. ब. भवाळकर आणि श्री. ह. ना. नेने व उमरावती येथील श्री. वि. भि. कोलते यांनी या संशोधन-कार्याकडे आपले लक्ष्य वळविले. या नवीन संशोधकांचे कार्य चालू असतांनाच श्री. वा. ना. देशपांडे यांचेहि कार्य सुरू होते. पूर्वी विविधज्ञानविस्तारातून प्रसिद्ध केलेल्या महदंबेच्या धवळ्यांची एक अधिकृत संहिता तयार करून पाठभेद, शब्दकोश व प्रस्तावना यासह श्री. वा. ना. देशपांडे यांनी ती १९३५ मध्ये पुस्तकरूपाने प्रसिद्ध केली. "जुन्या ग्रंथांची अस्सल संहिता ठरविणे हे एक शास्त्रच आहे. निरनिराळ्या ठिकाणी, निरनिराळ्या काळात नक्कललेली हस्तलिखिते परस्परांशी रुजवातून घेऊन अस्सल संहिता कायम करण्याची जी शास्त्रमान्य पद्धति ती या धवळ्यांच्या बाबतीत अंमलात आणिल्याने संहितेच्या खरेपणाबद्दल खात्री बाळगण्यास हरकत नाही. प्रस्तावनेमध्ये लेखिकेची माहिती, धवळ्यांचा उगम, त्यातील भाषा व व्याकरण यांची छाननी इतक्या गोष्टी दिल्या आहेत. व्याकरणातील वर्ण-प्रक्रिया, नाम-सर्वनाम-क्रिया-विभक्ती प्रत्यय, सामान्यरूप, निपात इ. प्रधान बाबी सोदाहरण व ससंदर्भ विवेचिल्या आहेत. एवढेच नव्हे तर त्यांना जुन्या प्राकृतातील दाखले दिले आहेत व त्यामुळे त्यांना विशेष महत्त्व आले आहे." हा या पुस्तकावरील प्रो. कृ. पां. कुळकर्णी यांचा अभिप्राय श्री. वा. ना. देशपांडे यांच्या कार्याचे महत्त्व पटवून देण्यास पुरेसा आहे. यातील विवेचनातून निर्माण झालेल्या प्रश्नासंबधी श्री. देशपांडे यांनी 'केसरी'तून केलेली चर्चाहि उद्बोधक आहे

या नंतरचा श्री. वा. ना. देशपांडे यांचा महत्त्वाचा ग्रंथ म्हणजे 'स्मृतिस्थळ' (इ स. १९३९). यातच 'वृद्धाचार' हे प्रकरणहि समाविष्ट करण्यात आले आहे. 'स्मृतिस्थळा'संबंधीची ओळख 'एक अपूर्व प्राचीन गद्यग्रंथ' या लेखात (विश्ववाणी डिसें. १९३३) त्यांनी करून दिलेली होती. 'वृद्धाचार' हे प्रकरणहि 'महाराष्ट्र साहित्य पत्रिके'त (वर्ष ९ अंक ३) प्रसिद्ध केले होते. श्री. वा. ना. देशपांडे यांनी संपादिलेल्या 'स्मृति–स्थळा'त अनेक महानुभावीय लेखकासंबंधीच्या आख्यायिका आलेल्या असल्यामुळे या ग्रंथाच्या प्रकाशनाने नवीन संशोधनाला फार मोठी मदत झाली यात शंका नाही. या ग्रंथाच्या प्रकाशनापूर्वी वामनरावांनी लिहिलेल्या 'महाराष्ट्र काव्यदीपिका' (विश्ववाणी जून १९३५) या लेखाचा उल्लेख करणे अवश्य आहे. लक्ष्मीधर कवीने लिहिलेल्या या ओवीबद्ध प्रकरणात 'अ वी' छंदाची माहिती आलेली असल्यामुळे ती प्रसिद्ध झाल्याने 'ओवी' छंदाच्या चर्चेत महत्त्वाची भर पडली.

श्री. नेने–भवाळकर : संशोधन मंडळ

यवतमाळ येथील शारदाश्रमात हे संशोधनाचे कार्य चालू असतांनाच नागपूर व उमरावती येथे नवीन केंद्रे निर्माण झाल्याचा उल्लेख पूर्वी केलेलाच आहे. यापैकी नागपूरचे केंद्र आधी निर्माण झाले. या केंद्रातील संशोधक श्री. नी. ब. भवाळकर व श्री. ह. ना. नेने हे होत. यांचा विशेष असा की त्यांनी प्रारंभी महानुभावांच्या आध्यात्मिक व तत्त्वज्ञानात्मक ग्रंथाकडे लक्ष्य दिले. हे ग्रंथ प्रायः गद्यात लिहिलेले असून त्यांचा मूलाधार 'श्रीचक्रधर–सिद्धांत–सूत्रे' होय. १९२९ साली नागपूरस्थ विरक्त कपाटेश्वर महानुभावांचा परिचय झाल्यामुळे या दोन्ही संशोधकांचे लक्ष्य या धार्मिक वाङ्मयाकडे वळले आणि विरक्त कपाटश्वरांच्या प्रोत्साहनानेच 'श्री चक्रधर सिद्धांत सूत्रे' (भाग पहिला) हा ग्रंथ त्यांनी १९३१ साली प्रसिद्ध केला. या ग्रंथाचे संपादन व प्रसिद्धीकरण हा महानुभाव वाङ्मयाच्या संशोधन–क्षेत्रातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा मानला पाहिजे. कारण त्यामुळे महानुभाव तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाचा पाया अधिकृतपणे भरभक्कम घातला गेला. या ग्रंथाच्या संपादनासाठी या दोन्ही संशोधकांना वाचाव्या लागलेल्या हस्तलिखितांची यादी पाहिली तरी त्यांच्या प्रचंड उद्योगाची कल्पना येऊ शकते. या ग्रंथाच्या संपादनामुळे प्राचीन मराठी गद्याचे अनेक उतारे अभ्यासकासमोर आले, हाहि एक महत्त्वाचा विशेष होय संबंधित ग्रंथातील भरपूर उतारे व भाषाशास्त्रविषयक टीपा वगैरे देऊन संपादिलेला महानुभाव य गद्याचा हा पहिलाच ग्रंथ होय.

१९३७मध्ये या दोन्ही संशोधकांनी मिळूनच 'दृष्टांत-पाठ' प्रसिद्ध केला. तो मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेतील पहिले पुष्प म्हणून प्रसिद्ध झालेला आहे. सिद्धांतसूत्रपाठाप्रमाणेच हा दृष्टांतपाठहि त्यांनी अतिशय परि-

श्रमपूर्वक संपादन केलेला आहे. चक्रधरनिरूपित मूळ दृष्टांत, त्यावर केशीराज व्यासाचे दार्ष्टांतिक, दृष्टांतावर 'दृष्टांतस्थळा'च्या व इतर हस्तलिखित ग्रंथांच्या आधारे दिलेल्या विषयविवेचनात्मक टीपा, याशिवाय दृष्टांतस्वरूपासंबंधी लक्षणरत्नाकर व बत्तीस लक्षणाचा टप यातील उतारे, दृष्टांतपाठाचे केशिराजबासक्स लापणिक, दृष्टांत–स्तोत्र, आणि व्याकरणविषयक टीपा याची परिशिष्टे जोडलेली असल्यामुळे ग्रंथांचे संपादन फार उपयुक्त झाले आहे.

श्री. नेने–भवाळकर या संशोधकांनी या दोन्ही ग्रंथांचे संपादन का केले हे त्यांच्याच शब्दात सांगता येईल. दृष्टांतपाठाच्या प्रस्तावनेत शेवटी ते म्हणतात, "या महानुभावीय वाङ्मयाचा परिचय झाल्यास सातआठ वर्षे झाली. त्यातील अध्यात्म–स्वरूपाचे ग्रंथ पाहता एक विशिष्ट लिखाण–पद्धति व सिद्धांताची मांडणी करण्याची धाटणी त्यात सर्वत्र आढळली. त्यावरून ते ग्रंथ पूर्णपणे ध्यानात येण्यासाठी चक्रधराची सूत्रे, लीळाचरित्रातील लीळा आणि दृष्टांतपाठातील चौदोत्तरशत दृष्टांत, यांचा अभ्यास आवश्यक वाटू लागला. १९३१ मध्ये 'लक्षणान्वयपाठ' प्रसिद्ध केला तेव्हा जे भाष्य, स्थळ, बंध आदि ग्रंथ पहावे लागले त्यामुळे आणि प्रमेयांचा आणि 'लक्षणरत्नाकराचा' परिचय झाल्यावर असे पक्के वाटू लागले की केवळ सूत्रे जर प्रकरणवशाच्या अनुसंधानाशिवाय दुर्बोध तर प्रमेये ही लीळा आणि दृष्टांत यांच्या परिचयाशिवाय अर्थविहीन, तेव्हा लीळाचरित्र व दृष्टांतपाठ व चक्रधर–सूत्रसमुच्चय यांचे प्रकाशन महत्त्वाचे वाटून दृष्टांतपाठाची सटीप आवृत्ति प्रथमतः तयार करण्याचा बेत कायम केला व तो तयार होत असताना जी थोडीफार सवड मिळाली त्यात रा. नेने यांनी चक्रधरोक्त सूत्रपाठ व लीळाचरित्र एकांक व पूर्वार्ध भाग हे तीन साधन–ग्रंथ प्रसिद्ध केले." या उताऱ्यावरून या दोन्ही संशोधकांचा महानुभावीय आध्यात्मिक वाङ्मयाचा अभ्यास कसा पद्धतशीर व योजनाबद्ध चालला होता याची कल्पना येईल. त्यांच्या या अभ्यासाचे फळ त्यांनी संकलिपिलेल्या 'महानुभावपंथ' या ग्रंथाच्या द्वारे महाराष्ट्राला मिळावयाचे होते. पण दुर्दैवाने तो योग जुळून आला नाही.

श्री. ह. ना. नेने यांचे संशोधन–कार्य

या दोन ग्रंथांचे संपादन नेने-भवाळकर या दोघांनी केले. याव्यतिरिक्त श्री. भवाळकरांच्या नावावर स्वतंत्र संशोधन फारसे नाही विविधज्ञानविस्तारात छापलेले 'महावाक्यप्रमेय', श्री. बाळकृष्ण शास्त्री यांनी संगृहीत केलेल्या यादीत श्री. भवाळकरांच्या नावावर घातलेले असले तरी त्याची मूळ प्रतिलिपी श्री. ह. ना. नेने यांनीच केली होती, असे कळते. 'महानुभावांचा एक प्राचीन ग्रंथ' या मथळ्याखाली 'शय्यापालना–प्रमेय' नावाच्या एका लहानशा गद्यप्रबंधावर त्यांनी परिचायक लेख लिहिला होता.

तो मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या 'निवडक निबंध' खंड १ मध्ये समाविष्ट करण्यात आलेला आहे. वरील दोन ग्रंथाव्यतिरिक्त श्री. ह. ना. नेने यांचे स्वतंत्र संशोधन मात्र विपुल आहे. त्यात 'श्री चक्रधरोक्त सूत्रपाठ' व 'लीळाचरित्र' हे ग्रंथ महत्त्वाचे आहेत. नेने–भवाळकरांनी पूर्वी 'लक्षणान्वय-सूत्रपाठ' प्रसिद्ध केलेला असला तरी संपूर्ण सूत्रपाठ महाराष्ट्रासमोर आलेला नव्हता. तो श्री. नेने यांनी प्रथम १९३५ मध्ये व नंतर विस्तृत उपोद्घातासहित १९४२ मध्ये आणला. याच कालावधीत लीळाचरित्राचे सर्व भाग (एकांक, पूर्वार्ध व उत्तरार्ध) त्यांनी प्रसिद्ध केले. या दोन्ही प्रकाशनांचा हेतु व कार्य श्री. नेने यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे देता येईल. "इ. स. १९३१ साली श्री. नी. ब. भवाळकर व श्री. ह. ना. नेने यांनी संपादिलेला 'श्रीचक्रधर सिद्धांत सूत्रे' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्या ग्रंथावरील परीक्षणांच्या निमित्ताने, नियतकालिकात व वर्तमानपत्रात 'महानुभावांचे आचारविचार' यासंबंधी चर्चा व विपर्यस्त वाद सुरू झाले. त्या वादविवादाच्या धुराळ्यात खऱ्या गोष्टी दूरच राहून गेल्या. वादाच्या बाबतीत दिलेले आधार व पुरावे अप्रकाशित ग्रंथातील असल्यामुळे, ते पडताळून पाहण्याची सोय तटस्थ वाचकांना नव्हती. अशा परिस्थितीत महानुभाव–वाङ्मयाला सर्वस्वी मूळाधार असलेला सूत्रपाठ मराठी बाळबोध लिपीत प्रसिद्ध करणे अत्यंत श्रेयस्कर वाटून त्या रीतीने विचार सुरू झाला. महानुभाव पंथ वैदिक की अवैदिक; आस्तिक की नास्तिक; बौद्ध, जैन व महानुभाव यात भेद कोणता; सनातन धर्मापासून महानुभाव तत्त्वज्ञान कितपत सुसंगत व विसंगत; श्रीचक्रधरांनी आपल्या शिष्यांना कोणते आचार पाळण्यास सांगितले; स्त्रियांना कोणता आचारधर्म सांगितला; मराठी गद्याचे स्वरूप त्यावेळी कोणत्या प्रकारचे होते; महानुभाव पंथ ज्ञानेश्वरकालीन कसा इत्यादि प्रश्न त्यावेळी चर्चिले गेले. 'सूत्रपाठ' बालबोध लिपीत वाचकांना उपलब्ध झाल्यास अशा अनेक प्रश्नांचा उलगडा वाचकांना स्वतः करून घेणे शक्य होईल असे वाटले"–आणि या भावनेने सूत्रपाठाचे प्रकाशन झाले.

'लीळाचरित्र' म्हणजे श्रीचक्रधरस्वामींचे चरित्रच. ते प्रकाशित झाल्याने, वर उपस्थित झालेल्या अनेक प्रश्नांचा उलगडा होण्याला फार मदत झाली. शिवाय हा ग्रंथ म्हणजे मराठीतील आद्य गद्यग्रंथ होय. त्यामुळे त्याच्या प्रकाशनाने मराठी गद्याचे दालन चांगले समृद्ध झाले. मात्र 'सूत्रपाठ' व 'लीळाचरित्र' हे दोन्ही ग्रंथ ज्या भाषाशास्त्रीय दृष्टीने संपादित व्हायला पाहिजेत तसे आरंभी झाले नाहीत. ही उणीव श्री. नेने यांनी १९५१ मध्ये लीळाचरित्राच्या एकांक विभागाची विस्तृत उपोद्घात, टीपा व परिशिष्ट यासह जी आवृत्ति प्रसिद्ध केली त्यामुळे भरून निघाली. 'सूत्रपाठ' व 'लीळाचरित्र' याप्रमाणेच 'रत्नमाळास्तोत्र' व 'लक्षण–रत्नाकर' हे दोन महानुभावीय संस्कृत ग्रंथ श्री. नेने यांनी प्रसिद्ध केले. 'रत्नमाळास्तोत्र' म्हणजे श्रीचक्रधरस्वामींचे संस्कृत श्लोकबद्ध चरित्र होय. या ग्रंथाचा केवळ

उत्तरार्ध छापून काढिला. 'लक्षण–रत्नाकर' हा महानुभावीय पंडित आनेराज याने लिहिलेला अर्थनिर्णयशास्त्रावरील प्रबंध होय. हा ग्रंथ प्रसिद्ध करतांना श्री. नेने यांनी त्यावरील बालप्रबोधिनी, बत्तीस लक्षणाची टीप व द्वात्रिलक्षण टीका या तीन मराठी टीका छापल्या असल्यामुळे या ग्रंथाला मराठीच्या दृष्टीनेहि महत्त्व प्राप्त झाले आहे. महानुभाव पंडित चक्रधराच्या सूत्रांचा अर्थ लावतांना किती साक्षेप बाळगीत हे यावरून फार चांगले दिसून येते.

श्री. नेने यांचे स्फुट लेख

या मुख्य ग्रंथाशिवाय श्री. नेने यांनी आचारस्थळ (त्याग प्रकरण) आणि 'प्रसादसेवा' 'पूजावसर' 'मूर्तिज्ञान' व 'नामाचे दहा ठाय' ही लहान-लहान पण अत्यंत रसाळ प्रकरणे समाविष्ट करून एक छोटेसे पुस्तक प्रसिद्ध केले. याशिवाय वेळोवेळी महानुभावीय वाङ्मयावर त्यानी अनेक संशोधनपर लेख लिहिले. 'अन्वयस्थळ' 'वृद्धाचार' 'लक्षणरत्नाकर' यावरील परिचयात्मक लेख, 'नरेंद्र कवीच्या रुक्मिणीस्वयंवरावर अधिक प्रकाश,' 'सह्याद्रि महात्म्य', 'पंचोपाख्यानाची महानुभावीय प्रत' इत्यादि निबंध त्यांनी भारत इतिहास संशोधक मंडळात वाचले; तर 'प्राचीन महाराष्ट्राच्या चतुःसीमा,' 'चरित्र अबाव अन्वय,' 'स्मृतिस्थळ' इत्यादि निबंध त्यांनी मध्यप्रांत संशोधन मंडळात वाचले. महानुभावीय ग्रंथ स्वतः वाचून त्यांचा परिचय करून घेण्याचा व देण्याचा श्री. नेने यांचा स्तुत्य प्रयत्न या संशोधनपर निबंधातून दिसून येतो. त्यामुळे महानुभाव वाङ्मयाच्या इतिहास–लेखनाची सामुग्री ते कशी दक्षतेने सिद्ध करीत होते याची कल्पना येऊ शकेल. याशिवाय लीळाचरित्रांतील काही आख्यायिकांच्या द्वारे १३ व्या शतकातील महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक व ऐतिहासिक परिस्थितीची माहिती करून देणारे लहान लहान लेख त्यांनी 'विहंगम' मासिकातून लिहिले होते.

पंडित बाळकृष्णशास्त्री व कृष्णशास्त्री घुले

श्री. नेने–भवाळकरांच्या 'श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रा'च्या प्रसिद्धीनंतर त्या ग्रंथाच्या परीक्षणांच्या निमित्ताने जे वाद सुरू झाल्याचा उल्लेख वर आलेला आहे ते वाद म्हणजे मध्यप्रांतातील दुसरे दोन प्रसिद्ध संशोधक पंडित बाळकृष्णशास्त्री महानुभाव व पंडित कृष्णशास्त्री घुले यांच्यामधील होत. पंडित बाळकृष्णशास्त्री हे माहूरचे असले तरी त्यांचे बरेचसे राहणे चांदूरबाजार, अमरावती, नागपूर वगैरे ठिकाणी होत असल्यामुळे त्यांना मध्यप्रांतातील संशोधक म्हणायला काहीही हरकत नाही. दुसरी गोष्ट अशी की, त्यांनी जे संशोधन व लेखन केले ते मध्यप्रांतात राहूनच केले. त्यामुळे त्यांच्या संशोधन–कार्याचा आढावा घेणे आवश्यक ठरते. पंडित बाळकृष्णशास्त्री हे महंत श्रीदत्तराज यांचे पट्टशिष्य. साधारणपणे १९३१ पासून त्यांनी

महानुभावीय संशोधन–कार्यात लक्ष घातले. ते स्वत: महानुभाव असल्यामुळे हे कार्य करणे त्यांना जसे सुलभ होते तसेच अनेकदा गैरसोईचेहि होते. याचे बरेवाईट सर्व परिणाम त्यांना भोगावे लागले. आरंभी त्यांच्या लेखांचे स्वरूप खंडनात्मक होते. श्रीमुकुंदराज महंत यांनी हिंदीत लिहिलेल्या आपल्या श्रीचक्रधर–चरित्राच्या भूमिकेत श्रीचक्रधरस्वामी हे अन्हिलवाडा येथील सोळंकी कुळातील विशाळदेवाचे पुत्र होते, अर्थात् ते क्षत्रिय होते असे प्रतिपादन केले. त्यांचे खंडन करण्यासाठी 'श्रीचक्रधर चरित्र भूमिकापर ऐतिहासिक दृष्टि' हा प्रबंध श्री. बाळकृष्णशास्त्री यांनी लिहिला. तो ११३१ व १९३२ च्या 'विविधज्ञानविस्तारा'तून प्रसिद्ध झालेला आहे. या प्रबंधाला यवतमाळच्या शारदाश्रमातर्फे डॉ. य. खु. देशपांडे यांनी पुरस्कार लिहिला. श्री. बाळकृष्ण-शास्त्री यांनी ताम्रपट, शिलालेख आणि अनेक संस्कृत, मराठी, हिंदी व इंग्रजी ग्रंथ यांच्या आधारे श्रीचक्रधरस्वामी हे नागर ब्राह्मण असून सोळंकी वंशोद्भव विशाळदेव व चक्रधराचे वडील विशाळदेव ह्या भिन्न व्यक्ति होत असे दाखविले आहे. तसे करतांना श्रीचक्रधरस्वामींचा दीक्षाकाल सांप्रदायिक-दृष्टचा शके ११८६ असला तरी त्यावेळच्या सिंहस्थाच्या अनुरोधाने विचार केला असता ११९० मानला पाहिजे असेहि त्यांनी प्रतिपादन केले. पुढील अनेक वादांचे मूळ श्री बाळकृष्णशास्त्री यांच्या या प्रतिपादनामुळे रोवले गेले.

'श्रीचक्रधर सिद्धांत सूत्रे' या नेने–भवाळकर संपादित ग्रंथाचे परीक्षण करण्याच्या निमित्ताने नागपुरातील विद्वान पंडित श्री. कृष्णशास्त्री घुले यांनीहि उपलब्ध महानुभाव वाङ्मयाचा चांगला अभ्यास केला. वागीश्वरीतून (वर्ष ३ मार्गशीर्ष व पौष जोड अंक) लिहिलेल्या आपल्या परीक्षणात 'चक्रधर खरोखरच ज्ञानेश्वरपूर्वकालीन होते काय' आणि 'चक्रधर-सिद्धांतसूत्रे ही खरोखरच ज्ञानेश्वराच्या पूर्वीची आहेत काय ?' असे मुद्दे उपस्थित करून त्यांना आपल्या परीने त्यांनी नकारात्मक उत्तर दिले होते. या प्रश्नांना श्री बाळकृष्णशास्त्री यांनी 'वागीश्वरी' च्याच (१९३३ सप्टेंबर–नोव्हेंबर) अंकातून एक लेखमाला लिहून उत्तर दिले. याच निमित्ताने आनेराजबास उर्फ गोपाळ पंडित यांच्या नावावर असलेला एक स्वतंत्र सूत्रपाठ प्रक्षिप्त असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. त्यामुळे पंथातील पारि-मांडल्य आम्नायाचे महंत रुष्ट झाले. त्यावेळच्या 'वागीश्वरी' 'महाराष्ट्र' वगैरेच्या अंकातून हा उद्बोधक वाद आलेला आहे. हा वाद चर्चेचा स्वरूपाचा होता व त्याची पातळी उच्च होती असे म्हटले पाहिजे.

महानुभावीय वाङ्मयासंबंधीच्या चर्चेत भाग घेऊन विद्याभूषण श्री. कृष्णशास्त्री घुले यांनी संशोधनाला चांगली मदत केलेली आहे. नेने–भवाळकरांच्या 'श्रीचक्रधर सिद्धांतासूत्रा' प्रमाणेच त्यांच्या 'दृष्टांतपाठा'चेहि त्यांनी चिकित्सक दृष्टीने परीक्षण लिहिले. (महाराष्ट्र १४ व २१ फेब्रु. १९३७). चक्रधराने सांगितलेले दृष्टांत हे परंपरागत असून ते त्यांनी

जनतेपासून उचलले असावेत, दृष्टांतांची भाषा खास चक्रधरांची नसून ती त्यांच्या शिष्यांची असावी वगैरे अनेक प्रश्न तर्कदृष्टचा त्यांनी उपस्थित केले. श्री. वा. ना. देशपांडे यांच्या 'आद्य–मराठी–कवयित्री 'चे परीक्षण करतांनाहि त्यांनी (विहंगम १९३५) धवळचांचे महदंबाकर्तृत्व संशयातीत नसल्याचे अशाच रीतीने दाखविले होते. या परीक्षणाप्रमाणेच शिशुपाळवधाच्या काळनिर्णयाविषयी जो वाद निर्माण झाला त्यासंबंधी 'वादाची फलश्रुति ' सांगणारे दोन लेखांक लिहून चर्चेत त्यांनी फार महत्त्वाची भर टाकली. या लेखांचा उल्लेख पुढे येईलच. शास्त्रीबोवांच्या हातून प्रत्यक्ष संशोधनाचे कार्यसुद्धा थोडेफार झालेले आहे. उदा. १९३६ मध्ये त्यांनी 'महाराष्ट्रीय आद्य चरित्रकार महिमभट्ट संकलित श्री लीलाचरित्र ' (उत्तरार्ध) संपादून प्रसिद्ध करण्याला सुरुवात केलेली होती. या ग्रंथाचा पहिला भाग म्हणजे उत्तरार्धाच्या आरंभीच्या २७ लीळांचे एक पुस्तक १९३६ मध्ये त्यांनी प्रसिद्ध केले. या त्यांच्या कार्याला म. हरींद्र जितेंद्र व्यास यांचे साह्य व प्रोत्साहन होते. पुढील भाग का प्रसिद्ध झाले नाहीत हे कळत नाही.

'श्रीचक्रधरसिद्धांतसूत्रां 'च्या परीक्षणाच्या निमित्ताने श्री. कृष्णशास्त्री घुले यांच्याशी झालेल्या वादातून बाहेर पडल्यानंतर श्री. बाळकृष्णशास्त्री यांनी 'विहंगम ' मासिकातून 'महानुभाव पंथावरील आक्षेप व त्यांचे निरसन ' या मथळचाखाली एक विस्तृत लेखमाला लिहिली. प्रा. पेंडसे, प्रा. दांडेकर व श्री. का. आ. पाध्ये यांनी आपापल्या पुस्तकातून घेतलेल्या अनेक आक्षेपांचे शास्त्रीबुवांनी साधार खंडन केले. 'चक्रधराने नवीन पंथ का स्थापिला ', 'महानुभाव पंथ हा अवैदिक, पाखंडी, चातुर्वर्ण्यविरोधक व यादवराज्यविघातक होय ', 'महानुभाव पंथातील मूर्तिपूजा ', 'महानुभाव पंथातील स्त्रीसंन्यास ' इत्यादि प्रश्नांची चर्चा या लेखमालेत आलेली आहे. ही सर्व चर्चा पंथविषयक असली तरी त्यातून अनुषंगाने महानुभाव वाङ्मयाशी संबद्ध असलेल्या अनेक प्रश्नावर चर्चा होत असे.

केवळ वाङ्मयविषयक संशोधनहि श्री. बाळकृष्णशास्त्री यांनी पुष्कळ केले आहे. त्यात 'श्री चक्रधर–सिद्धांत–सूत्रां'चे परीक्षण, 'वृद्धाचाराचे पाठ-संशोधन', 'महानुभाव पंथ आणि कै. राजवाडे व चांदोरकर' (संशोधक) इत्यादि लेख महत्त्वाचे ठरतील. शिशुपालवधाच्या कालनिर्णयालाहि श्री. बाळ-कृष्णशास्त्री यांच्या संशोधनाने फार चांगली मदत झाली. त्यांच्या सर्व संशोधनाचा सारभूत ग्रंथ म्हणजे 'महानुभाव पंथ' हा होय. तो उमरा-वती येथील आध्यात्मिक साहित्य प्रकाशनाचे तिसरे पुस्तक म्हणून १९४७ मध्ये प्रसिद्ध झाला. महानुभाव पंथासंबंधी वारंवार निर्माण झालेल्या वादा-वरील चर्चांचे, सार या ग्रंथात अभ्यासकांना पहावयास सापडते.

वि. भि. कोलते : शिशुपालवध–काल–निर्णयाचा वाद

महानुभाव–वाङ्मय–संशोधनाच्या या क्षेत्रात मी स्वतःहि आपल्या शक्तिप्रमाणे थोडेफार कार्य करण्याचा प्रयत्न केलेला आहे. भास्करभट्ट बोरीकरांचे ' शिशुपालवध ' हे काव्य मला एम्. ए. साठी अभ्यासावे लागले. त्यामुळे महानुभाव वाङ्मयाकडे माझे लक्ष्य वेधले. १९३२ च्या मार्चमध्ये प्रसिद्ध झालेल्या ' किंग एडवर्ड कॉलेज मॅगेझीन ' मध्ये महानुभाव पंथ व वाङ्मय यांचा परिचय करून देणारा एक लेख मी लिहिला. तो माझा या क्षेत्रातील प्रवेशाचा प्रारंभ मानता येईल. त्यानंतर ' भानुविजय ' व इतर ग्रथांच्या आधारे भास्करभट्ट बोरीकरांचे चरित्र व शिशुपालवधाचे विस्तृत रसग्रहण करणारी एक लेखमाला मी विविधज्ञानविस्तार (ऑगस्ट ते डिसेंबर १९३२) मासिकात लिहिली. याच वेळी यवतमाळ येथील महानुभावीय वाङ्मय–संशोधक श्री. वा. ना. देशपांडे व त्यांच्या द्वारा डॉ य. खु. देशपांडे यांच्याशी माझा परिचय झाला. या दोघांच्या प्रोत्साहनानेच मी महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधन-कार्याकडे वळलो. भास्करभट्टाच्या एकादश-स्कंदाचे (उद्धव-गीतेचे) मी संपादन करावे असे श्री. वा. ना. देशपांडे यांनी मला सुचविले. डॉ. य. खु. देशपांडे यांनी शारदाश्रमातील हस्तलिखिते दिली त्यावरून सपादिलेली 'उद्धवगीता' १९३५ मध्येच मी प्रसिद्ध केली. हे पुस्तक 'शारदाश्रम' ग्रंथमाले-तून प्रकाशित झाले. १९३२ मध्येच पंडित बाळकृष्णशास्त्री यांच्याशी माझा परिचय झाला. सिंहस्थाच्या निमित्ताने त्यांनी ठरविलेला चक्रधराचा दीक्षाकाल व प्रयाणकाल, शिशुपालवधाचा लेखनकाल, 'भानुबिजयाची' अधिकृतता इत्यादिसंबंधी मी निराळ्या दृष्टीने विचार करू लागलो. याच सुमारास भास्करभट्टाचे चरित्र लिहिण्याचे साधन म्हणून श्री. वा. ना. देशपांडे यांनी आपल्याजवळील 'नागदेवाचार्य–स्मृति' या पोथीची नक्कल माझ्या स्वाधीन करून मला मार्गदर्शनहि केले. या सर्व प्रश्नांचा विचार करून 'भास्करभट्ट बोरीकर : चरित्र व काव्यविवेचन' हे पुस्तक मी १९३५ मध्ये प्रसिद्ध केले. तत्पूर्वी शिशुपालवधाच्या कालासंबंधीचा निबंध मी मध्यप्रांत संशोधन मंडळात वाचला. तो निबंध व भास्करभट्ट बोरीकर या पुस्तकाचे प्रकाशन यामुळे फार मोठे वादळ निर्माण झाले. चक्रधराचा प्रयाण-काल व शिशुपालवधाचा लेखनकाल हे वादाचे मुद्दे होते. यासंबंधीच्या चर्चेत श्री. बाळकृष्ण शास्त्री यांनी माझा पाठपुरावा केला; तर महंत श्रीदत्तलक्षराज, श्री यक्षदेव महंत आदींनी मला विरोध केला. या प्रश्नासंबंधी ' वादाची फलश्रुती ' या मथळ्याखाली पंडित कृष्णशास्त्री घुले यांनी ' महाराष्ट्रात ' (ता. ११ व २६ एप्रिल १९३६) दोन विस्तृत लेखांक लिहिले. त्यावर उत्तर–प्रत्युत्तरेहि झाली. (जुलै ते सेप्टेंबर १९३६). ही चर्चा ' महाराष्ट्रात ' बरेच दिवसपर्यंत रंगली. श्री. घुले शास्त्री यांनी माझी विधाने खोडून काढण्याचा प्रयत्न केला. त्यांना शिशुपालवधाचा सांप्रदायिक शक ११९५ हा

मान्य होता असेहि नाही. 'शिशुपालवधाचा कालनिर्णय अनिर्णीत राहतो' हा त्यांच्या लेखांचा निष्कर्ष म्हणून सांगता येईल या चर्चेला, इतकेच नव्हे तर इतर संशोधनविषयक निबंधांना 'महाराष्ट्रा'त सविस्तर प्रसिद्धी देऊन 'महाराष्ट्रा'च्या संपादकांनी आणि विशेषतः सहसंपादक श्री. ग. त्र्यं. माडखोलकर यांनी महानुभावीय वाङ्मय–संशोधनाला बहुमोल मदत केली. या कालनिर्णयाच्या संबंधी महंत श्री. मुरलीधर शास्त्री, भुसावळ यांनीहि तेथील 'पूर्णेंदु' मासिकात एक लेखमाला लिहून माझी विधाने चुकीची असल्याचे दाखविण्याचा प्रयत्न केला होता. तेव्हा त्यांचाहि या ठिकाणी निर्देश करणे आवश्यक आहे.

वादविषय झालेल्या 'भास्करभट्ट बोरीकर' या पुस्तकानंतर मी पुढील महानुभावीय गद्यपद्य ग्रंथ संपादून प्रसिद्ध केले. नरेंद्रकृत रुक्मिणी–स्वयंवर (१९४०); श्रीगोविंदप्रभु चरित्र (१९४४); स्थानपोथी (१९५१); व दामोदर पंडित विरचित 'वछाहरण' हे काव्य (१९५३). याशिवाय 'महानुभाव तत्त्वज्ञान' (१९४५); 'महानुभावांचा आचारधर्म' (१९४८) व 'श्रीचक्रधर चरित्र' (१९५२) हे तीन ग्रंथ मी स्वतः लिहिलेले आहेत. पहिल्या दोन ग्रंथांच्या प्रसिद्धीमुळे महानुभावांचे तत्त्वज्ञान व आचारधर्म यांची सविस्तर ओळख वाचकांना होऊ शकली. 'श्रीचक्रधर चरित्र' या ग्रंथाच्या प्रकाशनाने चक्रधराचे चरित्र सरळ मराठी भाषेत वाचकांना उपलब्ध झाले. चक्रधरांच्या प्रयाणासंबंधीची काही नवीन माहिती या ग्रंथात प्रथमच प्रसिद्ध झालेली आहे.

स्फुट लेख

याशिवाय महानुभावीय वाङ्मयासंबंधी व पंथासंबंधी मी अनेक स्फुट लेख लिहिले आहेत. त्यापैकी 'हेमाडपंताचा हृदयद्रावक खून' (महाराष्ट्र-शारदा १९३६); 'महानुभाव पंथ की परमार्ग' (लोकशिक्षण १९३६); 'चक्रधर आणि ज्ञानदेव' (मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय १९५०); 'महानु-भाव पंथाचे अवैदिकत्व' (नवभारत ऑगस्ट १९४८) इत्यादि लेखांचा निर्देश करणे अवश्य आहे. हेमाद्रीच्या वधासंबंधी 'A Note on the date of Hemadri's death' या मथळ्याखाली नागपूर युनिव्हर्सिटी जर्नल १९३९ मध्ये मी एक लहानसा लेख लिहिला होता. त्यासंबंधी म. म. वा. वि. मिराशी यांनी 'नवभारत' (नोव्हेंबर १९४९) मध्ये 'हेमाद्रीचा अंतकाळ' या नावाचा लेख लिहून चर्चा केली आहे. चक्रधराच्या प्रयाणा-नंतर लौकरच हेमाद्रीचा रामदेवराव यादवाकडून वध करण्यात आला असे मी महानुभाव–पोथ्यांच्या आधारे दाखविले होते. म. म. मिराशींच्या मते शिलालेखाच्या पुराव्यावरून चक्रधराच्या प्रयाणानंतर हेमाद्री दहाबारा वर्षे तरी जिवंत होता असे दिसून येते. हेमाद्रीने रामदेवराव यादवाकडून चक्र-धराचा वध करविला, हा महानुभावीय पोथ्यांच्या आधारे मी माझ्या 'श्रीचक्रधर चरित्रात' दिलेला वृत्तांतहि चर्चेचा विषय झालेला आहे. मध्यप्रांत संशोधन मंडळाच्या १९५४ च्या वार्षिक सभेत प्रा. सुरेश डोळके

यांनी या विषयाची चर्चा करून चक्रधराचा वध झाला नसून ते उत्तरापंथे गेले असावेत असे आपले मत एका निबंधाद्वारे मांडले. ‘स्थानपोथी’ ‘श्रीचक्रधर चरित्र’ इत्यादि पुस्तकावर त्यांनी ‘तरुण भारता’ तून परीक्षणे लिहिली असून अलीकडेच ‘सत्यकथे’ त (जून १९५४) ‘चक्रधराचे चारित्र्य’ या विषयावर एक लेख प्रसिद्ध केलेला आहे. त्यावरून महानुभावीय वाङ्मय-संशोधनाच्या क्षेत्रात ते चागली कामगिरी करू शकतील असे वाटते. मुंबई येथील प्रा. न. र. फाटक हे महानुभाव पंथाविषयी अधुनमधून लिहीत असतात. ‘चित्रमयजगत्’ (जुलै ११४८) च्या अंकात ‘चक्रधर–चरित्र व महानुभाव’ या मथळ्याखाली त्यांनी एक विस्तृत लेख लिहिला होता. तो ‘खाडसाळपणाचा’ वाटल्यामुळे कै. गंगाराम मठाजी ठवरे (नागपूर येथील सुप्रसिद्ध हरिजन–पुढारी) यांनी प्रा. फाटकांच्या लेखाला उत्तर म्हणून ‘श्रीचक्रधर व महानुभाव’ हे लहानसे पुस्तक लिहून प्रसिद्ध केले. (एप्रिल १९५०) त्यात त्याचा व्यासंग दिसून येतो. श्री. ठवरे हे स्वतः महानुभाव पंथानुयायी होते. त्यांच्या हातून महानुभाव वाङ्मयाचे कार्य पुष्कळ झाले असते असे त्यांच्या या पुस्तकावरून अनुमान करता येते. पण त्यांच्या अकाली निधनामुळे आपण त्याला मुकलो ही दुर्दैवाची गोष्ट होय.

पोथ्या मिळविण्याच्या अडचणी

मध्यप्रदेशात झालेल्या महानुभावीय वाङ्मयविषयक संशोधनाचा हा
असा आढावा आहे. यात काही महानुभाव महंतांचा उल्लेख करणे अवश्य
वाटते. महानुभावीयेतर संशोधकांना आवश्यक त्या पोथ्या मिळवून देणे हे
एक अत्यंत महत्त्वाचे कार्य होते. कारण सामान्यतः महानुभाव लोक पंथीया-
व्यतिरिक्त इतर कोणालाहि आपल्या पोथ्या दाखवीत नाहीत. यामुळे या
पंथाचे तत्त्वज्ञान व वाङ्मय इतरापर्यंत पोचू शकले नाही आणि म्हणून या
पंथाविषयी अनेक गैरसमजुती महाराष्ट्रामध्ये पसरल्या हे सर्वांना ठाऊकच
आहे. विष्णुबुवा जोग यांनी एणगाव मुक्कामी (पूर्व खानदेश) काढलेल्या
काही अनुदार उद्‌गारामुळे महानुभाव महंतांना आपले वाङ्मय इतरांना दाखवि-
ण्याची आवश्यकता वाटली. या आवश्यकतेमुळेच वाङ्मयप्रकाशनाचेहि महत्त्व
त्यांना पटले. म्हणून श्रीदत्तराज महंत व श्री हरिराज बुवा म्हणजे
हल्लीचे महंत गोपीराज हे कै. भावे यांच्याकडे आपल्या पोथ्या घेऊन सात
महिने राहिले असल्याचा निर्देश आरंभी आलेलाच आहे. भावे यांच्या निधना-
नंतर इतर संशोधकांनाहि या महंतांनी फार मोलाचे साह्य केले. श्रीदत्त-
लक्षराज व श्रीगोपीराज महंताप्रमाणेच श्री यक्षदेव महंत, इ. श्रीकृष्णराज
दादा लासूरकर, महंत श्री बाळकृष्ण शास्त्री, महंत श्री मुरलीधर शास्त्री,
महंत श्री विरक्तकपाटेश्वर, महंत श्री हरीन्द्र जितेन्द्र व्यास श्री. कृष्णराज
दादा महानुभाव (भूतपूर्व संपादकः ‘महानुभाव’ व आध्यात्मिक साहित्य प्रका-
शन संस्थेचे संचालक) इत्यादिकांचेहि या बाबतीत फार साह्य झाले. ही मंडळी
पोथ्या देण्यासाठी पुढे आली नसती तर इतके कार्य होऊ शकले असते की नाही
याची शंकाच आहे.

या पोथ्या मिळवतांना महानुभाव महंतांची प्रसन्नता राखणे, निदान त्यांच्या धार्मिक भावना दुखावल्या जाऊ न देण्याची काळजी घेणे फार महत्त्वाचे असते. ही काळजी न घेतली तर कार्य कसे कठीण होते याचा मला चांगलाच अनुभव आहे. महानुभाव तत्त्वज्ञानाच्या अभ्यासाला सुरवात करतांना मला जो अनुभव आला तो या ठिकाणी सांगणे अवश्य आहे. 'महानुभाव तत्त्वज्ञाना'च्या प्रारंभी मी तो दिलेला आहे. तोच येथे उद्धत करतो. हा अनुभव असा : "माझ्यासमोर पहिली अडचण उभी राहिली ती पोथ्या मिळविण्याची. सामान्यत: सनातनी महानुभाव महंत हा आपल्याजवळील कोणतीहि पोथी पंथीयेतरांच्या हातात देण्याला तयार नसतो. माहूरकर महंत श्री. दत्तलक्षराज यांच्या प्रयत्नांनी ही वृत्ति अलिकडे पुष्कळच निवळली आहे. पण ती केवळ काव्यादिकांच्या बाबतीतच. धार्मिक किंवा तत्त्वरहस्याचे उद्‌घाटन करणाऱ्या पोथ्यांच्या बाबतीत मात्र पूर्वीची सनातनी वृत्ति अजूनहि बव्हंशी कायमच आहे. काव्याच्या पोथ्या लागतील तितक्या न्या, पण धार्मिक पोथ्या मात्र आम्ही तुम्हाला देणार नाही, असे उत्तर बरेच वेळा ऐकावे लागते. त्यातून माझा 'भास्करभट्ट बोरीकर : चरित्र व काव्यविवेचन' हा ग्रंथ (१९३५) प्रसिद्ध झाल्यानंतर तर महानुभाव महंतांचा माझ्यावर रोष फार. पंथातील प्रमुख महंत श्रीदत्तलक्षराज व श्रीयक्षदेव यांचाच रोष ओढवून घेतल्यामुळे मला काही दिवस काव्याच्या व स्मृति–वृद्धाचार–वृद्धान्वयांच्याहि पोथ्या मिळणे कठीण होऊन बसले, मग धार्मिक रहस्याची पोथी माझ्या हातात सहजासहजी कुणीहि टाकणे कसे शक्य होते ? पण या अडचणीतूनहि श्री बाळकृष्ण शास्त्री व श्री. गोपीराज महानुभाव यांच्या अविश्रांत खटपटीने मी बाहेर पडलो. महानुभाव तत्त्वज्ञानासंबंधी मी जे काय लिहीन ते पंथातील प्रमुख महंतांना दाखवून त्यांची संमती घेतल्याशिवाय प्रसिद्ध करणार नाही अशी आण घेतल्यावर महंत श्री. दत्तलक्षराज व श्री. यक्षदेव यांची प्रसन्नताहि मला मिळवता आली. आणि मग महानुभावीय पोथ्यांचे सुप्रसिद्ध संग्राहक श्री. गोपीराज आणि श्री. कृष्णराजदादा लासूरकर पारिमांडल्य यांनी आपल्या संग्राहचे दरवाजे मला मोकळे करून दिले. श्री. गोपीराजांनी तर आपल्याजवळील जवळजवळ दीडशे पोथ्या माझ्या स्वाधीन केल्या. इतकेच नाही तर मी उमरावतीला असेपर्यंत ४–५ वर्षे माझ्याजवळ तो संग्रह त्यांनी राहू दिला."

श्री. दत्तलक्षराज, श्री .बाळकृष्ण शास्त्री, श्री. हरींद्र जितेंद्र व्यास इत्यादि महंत मंडळी आता निघून गेली असली तरी श्री. गोपीराज महंत, श्री. कृष्णराज दादा लासूरकर, श्री. मुरलीधर शास्त्री इत्यादि महानुभाव आजहि पोथ्या देण्याचे कार्य अत्यंत आस्थेने करीत असतात. यांचा शक्य तो उपयोग अधिकाधिक प्रमाणात करून घेणे अवश्य आहे.

उपसंहार

महानुभावीय वाङ्मयाच्या संशोधन–क्षेत्रात काम करण्यासाठी आता अधिकाधिक मंडळी पुढे येणे आवश्यक आहे. डॉ. य. खु. देशपांडे व श्री. वा. ना. देशपांडे यांचे संशोधन–कार्य थांबल्यासारखेच आहे. श्री. वा. ना. देशपांडे या कार्यात पुन्हा लक्ष घालतील तर ते फार मोलाची मदत करू शकतील. श्री. हरिभाऊ नेने यांच्या निधनामुळे या क्षेत्राची फार हानी झाली आहे. मध्यप्रदेशातून नवीन मंडळी अद्याप पुढे आलेली नाही. प्रा. डोळके यांनी काही चर्चात्मक लेख लिहिले तरी नवीन संशोधन, संपादन व प्रकाशन या कार्याकडे अजून दृष्टि वळविली नाही. हैद्राबाद येथील प्रो. भुसारी व प्रो. माढेकर हे या बाजूस आता वळले आहेत. श्री. माढेकर यांनी संपादित केलेले कवि कृष्णमुनि चोरमागे–विरचित रुक्मिणी–स्वयंवर 'प्रतिष्ठान' या मासिका-तून क्रमशः प्रसिद्ध होत आहे. लौकरच ते स्वतंत्र पुस्तक रूपाने बाहेर पडेल. त्याचप्रमाणे प्रा. माढेकर व प्रा. भुसारी यांच्या जोड संपादकत्वाखाली नागराजबासाचे 'प्रतिष्ठान महात्म्य' प्रसिद्ध होणार असल्याचेहि निश्चित झाले आहे. डॉ. मा. गो. देशमुख यांनी गोपाळ कवीने लिहिलेल्या 'रुक्मिणी–स्वयंवर' या हस्तलिखित काव्याच्या आधारे नागपूर येथील अ. भा. प्राच्य परिषदेत (१९४६) 'मराठीच्या साहित्यशास्त्रावर नवा प्रकाश' हा एक संशो-धनात्मक निबंध वाचला होता. याच सुमारास 'शिशुपालवधा' ची अधिकृत संहिता संपादून प्रसिद्ध करण्याचा आपला संकल्प त्यांनी जाहीर केला होता. तो त्यांनी लौकर तडीला नेणे आवश्यक आहे. त्यांच्या प्रमाणेच मध्यप्रदेशातून काही तरुण संशोधक या कार्याकडे वळतील तर मराठी भाषेचे हे जुने वाङ्मयधन वाचवण्याच्या, इतकेच नव्हे तर व्यवस्थित रीतीने जनतेसमोर मांडण्याच्या कामी फार मदत होईल. विदर्भ साहित्य संघासारख्या मध्यवर्ती संस्थेने हे कार्य हाती घेतले पाहिजे. सर्वांना आधारभूत झालेला 'महानुभावीय मराठी वाङ्मय' हा डॉ. य. खु. देशपांडे यांचा ग्रंथ विदर्भ साहित्य संघाने प्रसिद्ध केला होता या गोष्टीचा पुन्हा एकदा निर्देश करावासे वाटते. विदर्भ साहित्य संघाचे नुकतेच दिवंगत झालेले अध्यक्ष, प्रसिद्ध महानुभावीय वाङ्मय–संशोधक श्री. ह. ना. नेने यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ अशा कार्याची काही योजना विदर्भ साहित्य संघाने आखल्यास ती सर्व दृष्टींनी उचित होईल.

या लेखाचे शुद्धलेखन लेखकाने लिहिल्याप्रमाणे ठेवले आहे

मध्यप्रदेशीय मराठी वाङ्मय

(ले.–प्रा पांडुरंग कृष्ण सावळापूरकर, नागपूर)

प्रास्ताविक

इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रांत स्थापन झाल्यानंतरच आधुनिक मराठी वाङ्मयाचा प्रारंभ झाला असें मानण्यांत येतें. १८०० नंतर नवीन पद्धतीच्या शिक्षणास जरी प्रारंभ झाला असला, तरी पहिलीं पाऊणशे वर्षें मराठी वाङ्मय हें भाषान्तररूप वा परभृत अवस्थेंतच होतें. पुढे १८७४ नंतर निबंधमालेपासून आधुनिक मराठी वाङ्मयाचें खरें तेजस्वी स्वरूप प्रगट होऊं लागलें. याचा अर्थ असा कीं, आधुनिक मराठी वाङ्मयाच्या संसारास अवघीं पाऊणशे ऐंशी इतकींच वर्षें झालीं आहेत. पण शिक्षणप्रसार, सामान्य लोकजागृति, जागतिक विचारप्रवाह व वाङ्मयनिर्मिति यांचें निरीक्षण व त्याचा झालेला परिणाम आणि या सर्वांपेक्षाहि मुद्रणकला व अन्य शास्त्रीय शोध यांनी जगांतील सर्व देशांत झालेली परस्पर विचारांची देवाण घेवाण या सर्वांचा संकलित परिणाम म्हणून मराठी वाङ्मयानेंहि सर्व क्षेत्रांत झपाट्याने प्रगति केली; व तें वाङ्मय हिन्दुस्थानांतील कोणत्याहि प्रगत देशभाषेंतील वाङ्मयापेक्षा कोणत्याहि बाबतींत कमी नाही असें म्हणावयास हरकत नाही.

इंग्रजांचें राज्य महाराष्ट्रामध्ये प्रथम मुंबई प्रांतांत स्थापन झालें. नागपूरला १८५३ पर्यंत भोसल्यांचेंच राज्य असल्यामुळे नवीन विद्या व विचार यांचा प्रवेश साहजिकच या बाजूला सुमारें अर्धशतक उशीरा झाला. मध्यप्रदेशांत इंग्रजी राज्य आलें, तेव्हा पूर्वेकडे बंगाल व पश्चिमेकडे मुंबई–पुणे येथे इंग्रजी विद्या घेतलेल्या कांही पिढ्या होऊन गेलेल्या होत्या. म्हणून इकडे इंग्रजी राज्याच्या कारभारासाठी जी कामगार व अधिकारी मंडळी आणली गेली, ती मुख्यत: कलकत्ता व पुणे येथूनच होती. इंग्रजी कामास बंगाली व मराठी कामास पुणेकर असे त्या वेळीं प्राय: आणले जात. या व इतर अनेक गोष्टींमुळे आमचा प्रांत हा मागासलेला प्रांत आहे, अशी त्या वेळीं समजूत असे. या प्रांतांत नागपूर विद्यापीठ होण्यापूर्वी प्रथम कलकत्ता व नंतर अलाहाबाद या विद्यापीठांचा अंमल चालू होता. त्यामुळेहि बंगाली लोकांचें इकडील राज्यकारभारांत अनेक वर्षें वर्चस्व राहात आलें. पण कोणत्याहि बंगाली गृहस्थाने मराठी भाषा शिकून त्या भाषेंत वाङ्मय निर्माण करण्याचा बुद्धिपुरस्सर प्रयत्न केला नसल्याने, मराठी वाङ्मयाचा विचार करतांना बंगाली लोकांचा विचार करण्याची आवश्यकता नाही. पुण्याहून इकडे येऊन स्थायिक झालेल्या मंडळींनी मात्र मराठी वाङ्मयांत भर घालण्याचें कार्य या प्रांतांत प्रारंभीं केलें, हें श्रेय त्यांना देणे जरूर आहे. राज्य-

कारभारासाठी जशी पश्चिम महाराष्ट्रांतून मंडळी येत, तशी वकिली सारखे धंदे करण्यासाठीहि तिकडून कित्येक विद्वान् लोक येऊन वऱ्हाड–नागपुरांत स्थायिक झाले; व त्यांनीहि मराठी वाङ्मयनिर्मितीस हातभार लावला.

इंग्रजी राज्य व त्या अनुषंगाने पुण्याकडील सिद्ध विद्वान् इकडे येण्या-पूर्वी या प्रांतांत लेखनाची गोडी अगदीच नव्हती, असें समजण्याचें मात्र कारण नाही. भोसल्यांच्या आश्रयाने व कांही अशीं लोकाश्रयानेहि या प्रांतांत वैयाकरणी, नैय्यायिक, हरिदास, पुराणिक इत्यादि विद्वानांची परंपरा झाली होती; व साधारण जनांसाठी ते आपल्या ज्ञानाचा मराठी माध्यमाद्वारें उपयोगहि करीत. नागपूरकर भोसल्यांच्या पोथीखान्यांत कांही पट्टीचे लेखक होते. तत्कालीन पत्रव्यवहार, बखरी इत्यादींमध्ये लेखनकौशल्य दाखविणारे कांही कारकुनी वळणाचेहि लोक असत. पण आधुनिक वाङ्मयनिर्मितीसाठी या लोकांनी कोणतीहि स्फूर्ति त्या काळांत दिली नाही.

प्रारंभींची वाङ्मय–निर्मिति

गेल्या शतकांतील उत्तरार्धांत, विशेषतः शेवटच्या पाव शतकांत, या बाजूला शाळा, कॉलिजे, छापखाने, वर्तमानपत्रें, मासिकें वगैरे निघूं लागून मराठी वाङ्मयाचा पाया घातला गेला 'नीरजोल्लास' मासिक इत्यादि त्या वेळचे प्रयत्न होत. वामन दाजी ओक यांचा प्राचीन कवींच्या काव्य-प्रसिद्धीचा उद्योग हा या प्रांतांत झालेला विशेष प्रयत्न म्हणतां येईल. त्यानंतर चालू शतकाच्या पहिल्या तीस वर्षांत मराठी वाङ्मयनिर्मितीचा उद्योग फार झपाटयाने सुरू झाला, असें म्हणावयास हरकत नाही. नागपूरच्या तत्कालीन मॉरिस कॉलेजांत शिकणाऱ्या मंडळींना ही स्फूर्ति विशेष लाभली; व त्यांतून कै. म. म. कृष्णशास्त्री घुले, डॉ दप्तरी, कै. नी. व. भवाळकर, कै. अ सा. साठे, कै. ना. रं. अळकर डॉ. केतकर असे पंडित उदयाला आले. वर्तमानपत्रांच्या धंद्यांत कै. माधवराव पाध्ये, कै हरिपंत पंडित, कै अच्युतरावजी कोल्हटकर, कै. गो. अ. ओगले, कै. ना. अ. द्रविड, श्री. शंभुराव गोखले इत्यादि मंडळींनी विशेष प्रगति केली. या वाङ्मयनिर्मितीस स्फूर्ति देणारे कांही राजकीय व सामाजिक कार्यकर्तेहि या प्रांतांत शहरोशहरीं झाले आहेत. लो. टिळकांचे युयुत्सु राजकारण या प्रांतांत चालविणारे डॉ. मुंजे, उधोजी यांच्यासारखे लोक होते. यांनी स्वतः कांही लिहिलें नाहीं हें खरें आहे; पण त्यांनी इतरांना लिहावयास लावलें हें कांही खोटें नाही.

१९०१ ते १९३५ च्या काळांत नाटय, कादंबरी, काव्य, संशोधन, निबंध, भाषांतरें, वैद्यकशास्त्र, धर्मशास्त्र, वेदान्तशास्त्र इत्यादि सर्वच क्षेत्रांत थोडी थोडी भर या प्रांताने घातली आहे. कोल्हटकरांसारख्या नाटककारांचें महत्वाचें वाङ्मय याच प्रांतांत लिहून झालें. नाटककार गडकरी यांच्यावरहि या प्रांताचा हक्क पोंचतो. केतकर, बेहेरे, बा. सं. गडकरी, कै. वि. वि. केळकर, मांजरेकर यांच्या कादंबऱ्या, साठे, उपाध्ये, बेहेरे, टेकाडे, बी, बोबडे यांच्या

कविता, घुले, दप्तरी, भवाळकर, य. खु. देशपांडे यांचें संशोधन, घुले यांचें ऋग्वेदाचें भाषांतर, दप्तरीचें धर्मरहस्य, करणकल्पलता इत्यादि महत्वाचे मराठी ग्रथ या काळांत झाले.

पश्चिममहाराष्ट्रांतील नियतकालिकांत आपणांला मानाचें स्थान मिळण्याचा फारसा संभव नाही, तेव्हां आपली ही उपेक्षितावस्था घालवून टाकण्यासाठी एतत्प्रांतस्थ लोकांनी १९२० नंतर विशेष प्रयत्न केले. विदर्भ साहित्यसंघाचा जन्म अशाच मनोवृत्तींतून झाला आहे. पुढे नागपुरास 'वागीश्वरी' मासिक निघालें व तें ५–६ वर्षें चांगलें चाललें. १९३३ मध्यें नागपुरास महाराष्ट्र साहित्यसंमेलनाचें अधिवेशन तरुण हौशी मंडळींनी बोलावून यशस्वी करून दाखविलें होतें. या संमेलनानंतर जानेवारी १९३४ मध्यें मध्य-प्रान्त संशोधन मंडळाची स्थापना झाली. १९३३ पर्यंत या प्रांतांत निर्माण झालेल्या मराठी वाङ्मयाचा आढावा कै. बापूसाहेब भवाळकर यांनी संमेलनाच्या निमित्ताने घेतला असल्यामुळे येथे तो घेण्याची गरज नाही. शिवाय प्रस्तुत लेखाचा उद्देश १९३४ नन्तरच्या वाङ्मयाबद्दलच लिहिण्याचा असल्याने एवढी स्थूल माहिती पार्श्वभूमि म्हणून पुरेशी झाली.

१९३४ च्या सुमारास कांही जुने लेखक, कवि व पंडित जसे सिद्धावस्थेत होते, तसेच कांही साधकावस्थेंतहि होते इतक्या काळांत त्यांनाहि सिद्धावस्था प्राप्त झाली आहे. या काळांत वैदिक, शास्त्रीय, महानुभावीय इत्यादि शाखांत जें संशोधन झालें, त्याचाहि आढावा या लेखमालेंतून अन्यत्र घेण्यांत आला आहे. त्यामुळें आम्ही तदितर वाङ्मयाचा परामर्श घेण्याकडे वळतों.

कादंबरी वाङ्मय

या प्रान्तांत बा. सं. गडकरी, ना. के. बेहेरे हे जुन्या पिढीतील कादम्बरीकार सुदैवाने विद्यमान आहेत. यांच्या एकदोन कादम्बऱ्या गेल्या वीस वर्षांतहि निर्माण झाल्या आहेत. मात्र कादम्बरी वाङ्मयाच्या क्षेत्रांत इतकें भराभर परिवर्तन झालें कीं, हे दोन कादम्बरीकार त्या चढाओढींत मागे पडले म्हटलें तरी चालेल. त्यानन्तर श्री. पु. य. देशपांडे व श्री. ग. त्र्यं. माडखोलकर या दोघांचा क्रमांक लागतो. श्री. देशपांडे यांची 'बंधनाच्या पलीकडे' १९२५ च्या सुमारास प्रसिद्ध झाली; व माडखोलकरांच्या कादम्बरी लिखाणाचा प्रारंभ १९३० नन्तर झाला. त्यानन्तर या दोघांहि लेखकांनी आपापल्या परी लिखाण केलें. श्री. देशपांडे यांनी 'विशाल जीवन' लिहिलें, पण त्यांच्या कादंबऱ्यांची संख्या माडखोलकर यांच्या मानाने फारच तोकडी आहे. माडखोलकरांनी मात्र 'मुक्तात्मा' पासून जो कादंबऱ्या लिहिण्यास प्रारंभ केला तो प्रायः अजून चालू आहे. 'मुक्तात्मा पासून प्रमद्वरे पर्यंत' व 'कादंबरीकार माडखोलकर' या नांवाचें त्यांच्या कादंबऱ्यासंबंधी समीक्षणात्मक दोन स्वतंत्र ग्रंथहि प्रसिद्ध झाले आहेत. देशपांडे यांची शैली किंचित् बोजड, विषय विचारप्रधान, कथानक किंचित् सैल असें दिसतें. त्यांच्या पहिल्या

कादम्बऱ्यांत प्रतिपादन केलेलीं मतेंहि त्यांनीं बदलविलीं असें दिसतें आणि तें स्वाभाविकहि आहे उलट माडखोलकरांच्या कादंबरीलेखनांत कलात्मक अंग अतिशय राहूं लागलें.

याच कालखंडांत 'राजकीय कादम्बरी' हा नवा वाङमयप्रकार सुरू झाला. कादंबरींतील पात्रें प्रणयाबरोबर या देशांतील इतर राजकीय उलाढाली करूं लागलीं तर ती राजकीय कादंबरी होय असा सामान्यतः संकेत ठरला. देशपांडे आणि माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांत हें राजकीयपण विशेष आलें. गांधीवाद, साम्यवाद व महायुद्ध यांनी उत्पन्न केलेले इतर वाद या सर्व वादांचा परिणाम या दोन्ही कादंबरीकारांच्या कादंबरीवाङमयावर झाल्याचें दिसून येतें. त्यामुळे त्या कादंबऱ्यांतील पात्रें तत्कालीन वाटतात. या दोघांनी प्रतिपादन केलेलीं मतें कोणाला आवडतील किंवा आवडणार नाहीत. तो प्रश्न अलाहिदा आहे. पण या प्रांताच्या गेल्या दोन दशकांतील कादंबरी वाङ्मयांत त्यांचें स्थान महत्वाचें आहे यात शका नाही.

माडखोलकरांच्या राजकीय कादंबऱ्यांतून मध्यप्रदेशांत घडलेल्या राजकारणाचें प्रतिबिंब विशेष पडलें आहे हें तर खरेंच पण त्यांतील कांही पात्रांचें या प्रांतांतील महत्त्वाच्या जिवन्त व्यक्तींशीं साम्यहि आहे. त्यामूळे या प्रांताच्या राजकीय जीवनाची माहिती असणाऱ्या वाचकांस या कादंबऱ्यांतून विशेष बोध होतो. कादंबरींतील पात्रांवरून विशेष व्यक्तीचा बोध होणे चागलें किंवा वाईट यासंबंधी दोन मतें असणें संभवतें. डॉ. केतकर यांनी असेंच केलें. त्यावर कै. वा. म. जोशी यांनी केलेली टीका सामान्यतः माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांसहि लागू पडेल.

माडखोलकरांनी आपल्या कादंबऱ्यांच्या रचनेंत विविध पद्धति अवलंबिलेल्या आहेत. त्यांत 'भंगलेलें देऊळ' ही कादंबरी आत्मचरित्रात्मक आहे. 'एका निर्वासिताची कहाणी' या नांवाची जी आत्मकथा माडखोलकरांनी लिहिली, ती वस्तुतः कादंबरी नव्हे. पण त्या पुस्तकाची देखील धाटणी कादंबरीइतकीच रोचक आहे.

श्री. देशपांडे यांच्या कादंबऱ्यांची संख्या पांच आणि श्री. माडखोलकर यांच्या कादंबऱ्यांची तेरा आहे.

या नंतरचे एतत्प्रांतस्थ कादंबरीकार श्री. शंकर बाळाजी शास्त्री होत. सामान्यतः १९३६ नंतर यांच्या कादबरीलेखनास प्रारंभ झाला. त्यांच्या ८–९ कादंबऱ्यांपैकी दोन कादंबऱ्या मूळ बंगालीवरून लिहिल्या असून, एक मूळ हिंदीवरून लिहिलेली आहे. शास्त्रीचें लिखाण प्रसन्न आणि निरामय स्वरूपाचें आहे. मात्र इतर कादंबरीकारांच्या मानाने शास्त्री यांची प्रसिद्धि कमी झाली असें वाटतें. शास्त्रींनी देखील आपल्या कादंबऱ्यांतून नवीन विचारांचा उपयोग केला आहे.

या नंतर या प्रांतांतील नांव घेण्यासारखे नव्या पिढींतील कादंबरीकार श्री. पु. भा. भावे होत. श्री. भावे हे गेल्या १०–१५ वर्षांत विशेष पुढे आले.

उपरोधिक, खोचक पण हितकारक लिखाण करण्यांत भावे यांचा हातखंडा आहे. भावे मुख्यतः लघुकथालेखक आहेत. पण त्यांच्या 'अकुलीना' इत्यादि कादंबऱ्या आहेत, त्याहि फार उच्च दर्जाच्या आहेत. आगामी काळांत भावे यांच्या हातून अनेक कादंबऱ्या लिहून होतील अशी अपेक्षा आहे. श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध यांनी 'क्षिप्रा' लिहून या प्रांतांत पदार्पण केलें आहे.

ज्यांनी एखाद दुसरी कादंबरी लिहिली असून, अनेक कारणांमुळें ज्यांचीं नांवें सर्वतोमुखीं झालीं नाहीत असे कांहीं अप्रसिद्ध कादंबरीकार आपल्या प्रांतांत आहेत. सुमारे २० वर्षापूर्वी 'संघप्रयोग' या नांवाची एक कादंबरी लिहिणारे पौनी येथील श्री. जांभोरकर, त्यानंतर 'आदिमाया'कार प्रा. वनमाली, 'अपोलो बंदर' कार श्री. अ. तु. वाळके व कांहीं वर्षांमागे 'सुरुंग' ही कादंबरी लिहिणारे नागपूरचे श्री. ल. मा. वखरे अशीं थोडीं नांवें या सदरांत मोडतात.

कादंबरीनिर्मितींत या प्रांतांत पुरुषांबरोबर स्त्रियांनीहि, थोड्या प्रमाणांत कां होईना, भाग घेतला आहे. ग. ता. साने या मूळच्या याच प्रांतातल्या असून त्यांनी ८।१० कादंबऱ्या लिहिल्या आहेत. कलात्मकता किंवा रोचकता ही कदाचित् त्यांच्या कादंबऱ्यांत कमी असली, तरी इतर अनेक गुणांचा त्यांत आढळ आहे यांत शंका नाही. कु. लीला देशमुख यांनीहि ४।५ कादंबऱ्या लिहिल्या असून स्वतःच्या लिखाणाबद्दल कांहीं अपेक्षा त्यांनी निर्माण केल्या आहेत. सौ. सुमति धनवटे यांचें पदार्पण या क्षेत्रांत अगदीच नवें असलें तरी तें उल्लेखनीय आहे. श्रीमती शांता शेळके याहि कादंबरीकार आहेत. त्या आता नागपूरला स्थायिक झाल्या असल्यामुळे या प्रांताला त्यांचेवर हक्क सांगण्याला हरकत असूं नये.

लघुकथा वाङ्मय

लघुकथा ही गेल्या पाव शतकाची मराठी वाङ्मयास देणगी आहे असें म्हटलें तरी चालेल. किंबहुना लघुकथेने कादंबरी व काव्य या दोन्ही विभागांचा आपल्या अवताराने संकोच केला आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. या वाङ्मय प्रकाराची जी स्थिति महाराष्ट्राच्या अन्य भागांत आहे, तशीच या प्रांतांतहि आहे. कादंबरी लिहावयास जास्त परिश्रम लागतात व दमहि बराच टिकावा लागतो. त्या मानाने लघुकथेमध्ये थोड्या श्रमांत भागण्यासारखें असतें. शिवाय नियतकालिकांचें स्थान हें कथाप्रसिद्धीस अनेकांना अगदी सुलभ असल्यामुळेंहि नवनवीन कथाकारांची निपज होत आहे. या कथाकारांपैकी कांहींचे कथासंग्रह प्रसिद्धहि झाले आहेत. वर जे जे कादंबरीकार म्हणून उल्लेखिले आहेत ते ते लघुकथाकारहि आहेतच. विशेषेकरून पु. भा. भावे यांचें स्थान लघुकथाकार म्हणूनहि अनन्यसाधारण आहे. किंबहुना कोणत्याहि मासिकांत त्यांची कथा नाही असें सहसा आढळावयाचें नाही.

पंधरा वीस वर्षांपूर्वी श्री. प्रभाकरराव मांजरेकर व श्री. व्यं. शं. वकील यांच्या लघुकथा 'रत्नाकरा'दि मासिकांत येत असत. त्यानंतर १९४० मध्ये श्री. मांजरेकर यांचा 'उषःप्रभा' नांवाचा लघुकथासंग्रहहि प्रसिद्ध झाला होता. त्यानंतर वामनराव चोरघडे हे या प्रांतांतील गेल्या वीस वर्षांत उदय पावलेले नामवंत कथाकार होत. श्री. चोरघडे हे गांधीवादी विचारसरणीचे कथाकार असून त्यांची स्वभावचित्रें हीं बहुधा ग्रामीण विभागांतील असतात. त्यांच्या लघुकथा भिन्न भिन्न नियतकालिकांत प्रथम प्रसिद्ध होऊन मागाहून त्यांचे संग्रह प्रसिद्ध झालेले आहेत. 'पाथेय' इत्यादि त्यांचे कथाग्रंथ प्रसिद्धच आहेत श्री भ रा. देशपांडे या वऱ्हाडी लेखकाचा 'रेघोटया' नांवाचा कथासंग्रह १९३९ सालीं प्रसिद्ध झाला होता.

श्री. शरच्चंद्र टोंगो हेहि वऱ्हाडांतील प्रसिद्ध लघुकथाकार आहेत. त्यांचा 'झेलम' नांवाचा कथासंग्रह १९४९ च्या सुमारास प्रसिद्ध झाला होता. श्री. पद्माकर निमदेव हेहि वऱ्हाडचे लघुकथाकार वाचकांच्या डोळ्यासमोर आहेत. काटोलचे श्री. पु. वा. बाचासुंदर यांच्या लघुकथा कित्येक वर्षें नियमाने 'किर्लोस्कर' मध्यें येत असत. पण आतां त्या दिसत नाहीत. नागपूरच्या तरुण कथाकारांत श्री. भा. द. भावे, श्री. व्यं. नी. पंडित श्री. य. बा. शास्त्री, श्री. शांताराम, सौ. इंदुमती शेवडे, श्री. ना. रा. शेंडे, श्री. गो. रा. दोडके प्रभृति नांवें उल्लेखनीय आहेत. श्री. दोडके यांच्या कथा 'अभिरुचीं'त मधून मधून प्रसिद्ध झाल्या असून, सध्या 'युगवाणींत'हि अवतीर्ण होत आहेत. इंग्रजी कथालेखनाचा दोडके यांच्यावर परिणाम झाला असला, तरी इकडील खास घटना ते मोठ्या कुशलतेने रंगवितात

'शान्ताराम' हेहि तरुण कथालेखकांत एक अग्रगण्य लेखक होत. त्यांची लेखनशैली रोचक व बोचक दोन्ही प्रकारची असते. त्यांचा 'सावळाच रंग तुझा' नुकताच प्रसिद्ध झाला आहे. ज्येष्ठ लेखकांत प्रा. कुसुमावतीबाई देशपांडे यांच्या तुरळक कथा केव्हां केव्हां आढळून येतात. वनमाली यांनीहि ४–५ कथा लिहिल्या आहेत.

श्री. टेकाडे हे जरी कवि म्हणून प्रसिद्ध असले, तरी मधली कांही वर्षें त्यांनी 'गोष्टी' लिहिण्याचा प्रयत्न करून पाहिला होता. या त्यांच्या कथा मुख्यतः 'चित्रमयजगतां'त प्रसिद्ध होत असत. परंतु लघुकथाकार म्हणून यांना मोठेंसें यश मिळालें नाहीं; व त्यांनी तो कथालेखनाचा उद्योगहि पुढे बंद केला.

प्रा. भा. श्री. परांजपे, श्री. के. बोबडे, श्री. प्र वि. चिचणीकर, सौ. इंदुमती शेवडे, श्री. शेंडे इत्यादि नवीन लघुकथालेखक १९३८ नंतर चमकले. यांच्या कथा 'किर्लोस्करां'तून मुख्यतः प्रसिद्ध झाल्या. पैकीं कथासंग्रह प्रसिद्ध होण्याचें भाग्य श्री. य. बा. शास्त्री, श्री. शांताराम,

श्री. भा. श्री. परांजपे आणि सौ. इंदुमती शेवडे यांनाच
लाभलें. श्री. राम डोके हे नवीन कथालेखक गेल्या दोन
तीन वर्षांत उदयास आले असून, आपल्या विनोदी व खोचदार लेखणीने
ते अल्पकाळांत वाचकांचे आवडते झाले आहेत.

या शिवाय गेल्या ४–५ वर्षात इतके नवनवीन शिकाऊ लघुकथाकार
आपल्या प्रान्तांत उत्पन्न होत आहेत की, त्यांचा नामनिर्देशहि या लहानशा
लेखांत करणें शक्य नाही. विशेषेकरून 'तरुण भारता'च्या रविवारच्या साप्ताहिक
अंकांत कोणत्या ना कोणत्या नव्या लेखकाची कथा आढळूं लागली आहे.

या सर्व कथालेखकांच्या कथांना विशिष्ट वळण लागून ते मराठी
वाङ्मयांत मोलाची भर घालोत अशी इच्छा करूं या.

नाट्य वाङ्मय

कादंबरी किंवा लघुकथा या मानाने नाट्यवाङ्मय या प्रांतांत गेल्या
वीस वर्षांत म्हणावें तसें पुष्ट झालें नाही. याला कारणेंहि अर्थात् तशींच
आहेत. १९३२ नंतर सर्वत्रच बोलपटाचें साम्राज्य झालें असल्यामुळे
रंगभूमीला उतरती कळा लागली; व रंगभूमि टिकवून धरण्याचे जे प्रयत्न
झाले त्यांतहि जुन्याच नाटकाचा जीर्णोद्धार करण्याचा प्रयत्न झाला.
आणि जीं नवीं नाटकें लिहिण्यांत आलीं तीं या प्रान्तांतील लेखकांनी
लिहिलेलीं नव्हेत. नाही म्हणावयाला हंबर्डे यांचे '१८५७' हे १९३९ त
प्रसिद्ध झालें होतें, पण तें नाटक मोठ्या योग्यतेचें ठरलें नाही. अशीच
इतरहि कांही नाटकें झालीं. आपल्या प्रान्तांत प्रसिद्ध नाटककार कै. श्री. कृ.
कोल्हटकर, वीर वामनराव जोशी, श्री. ना. रा. बामणगांवकर व श्री.
वा. वा. भोळे हे होत. श्री. आनन्दराव टेकाडे यांनीहि 'मधुर मीलन' व
'मथुरा' अशीं दोन नाटकें लिहिलीं होतीं. पण या सर्वांचा नाट्यावतार वीस
वर्षापूर्वीच होऊन समाप्तहि झाला असल्यामुळें प्रस्तुत लेखांत त्याचा
समावेश करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

आज या प्रान्तांत नांव घेण्यासारखे नाटककार श्री. नाना जोग हे
दिसतात. त्यांचे 'सोन्याचे देव' अनेकांनीं पाहिले आहेत. श्री. विश्राम बेडेकर
यांचें 'ब्रम्हकुमारी' आणि श्री. पु. भा. भावे यांची 'विषकन्या' हीं नाटकें
उल्लेखनीय आहेत. त्याबरोबरच प्रो. मधुकर आष्टीकर यांनीं लिहिलेल्या
नाटिका आणि प्रहसनें यांचाहि निर्देश करणें अवश्य आहे. कल्पकता आणि
विनोद हे त्यांच्या नाट्यगुणांचे मुख्य घटक आहे नाटक लिहिणें ही जशी रंग-
भूमीची सेवा आहे तसेंच नाट्यासंबंधीं अन्य प्रयत्न करणें हीहि नाट्यसेवाच आहे.
प्रत्यक्ष वाङ्मयनिर्मितीशी तिचा संबंध थोडा असला, तरी येथे त्या प्रयत्नांचा
उल्लेख करावयाला हरकत नाही. डॉ. बर्वे यांच्या प्रयत्नाने 'अभिनव

नाटच मंदिर ' येथे स्थापन झालें होतें; व त्या संस्थेने नाटकांचा पुनरुद्धार करण्यासंबंधी फार खटपट केली. त्याबरोबरच 'नागपूर नाटचमंडळ' या नागपुरांतील रसिक नाटचप्रेमी, हौशी नट आणि नाटककार यांनीं चालविलेल्या संस्थेच्या कार्याचाहि उल्लेख करणें आवश्यक आहे. या मडळानें दिल्ली पर्यंत नागपूरच्या या क्षेत्रांतील कामगिरीचा लौकिक पोंचविला आहे नागपूर विद्यापठांतहि नाटचाचा अभ्यासक्रम चालू व्हावा असा प्रयत्न झाला. श्री काका सहस्रबुद्धे यांची कांहीं नाटकें व विदर्भ नाटच मंदिर यांचाहि उल्लेख होणे जरूर आहे. या सर्व प्रयत्नांतून नाटचविषयक वाड्मय कांहींसें निर्माण झालें. नाटचाचा इतिहास, नाटचपरीक्षण इत्यादि ग्रन्थ हे या प्रयत्नाचें फळ आहे. त्या ग्रंथांचा उल्लेख इतर ठिकाणीं येईलच. सध्या विदर्भ साहित्यसंघाच्या आवारांत एक नाटचगृह बांधण्याचा प्रयत्न चालला असून, हौशी नटमंडळी त्यासाठीं कांही नाटकेंहि बसवीत आहेत. या सर्वांचा संकलित परिणाम म्हणून नवीन मराठी नाटकें एतत्प्रांतस्थ लेखकांकडून लिहिलीं जाण्याचा सम्भव आहे. गणेशोत्सव, रेडिओ यासाठी नाटिका व श्रुतिका मात्र लिहिल्या जात आहेत. या बाबतींत श्री. मधुकर आष्टीकर व श्री. पु. व्यं. दारव्हेकर यांचीं नांवें उल्लेखनीय आहेत. त्यांच्या नाटचगुणांत चमक आहे.

काव्य वाङ्मय

काव्यवाङ्मयनिर्मितीसंबंधी या प्रांताने गेल्या २० वर्षात भरदार प्रगति केली आहे. बी, वेहेरे. टेकाडे, उपाध्ये, कविभूषण, खापर्डे हे या प्रांताचे गेल्या पिढीतील अग्रगण्य कवि होत पण यांचे काव्यसंग्रह वीस वर्षांपूर्वीच प्रसिद्ध होऊन गेले आहेत. बोबडयांचा काव्यसंग्रह त्यांच्या मृत्युनंतर १९३७ त प्रसिद्ध झाला. यांपैकीहि जे विद्यमान कवि आहेत, त्यांच्या तुरळक कविता कोठे कोठे आढळतात. पण एकंदर यांचा बहर संपला म्हणावयाला हरकत नाही तेव्हा प्रस्तुत लेखांत या कवींच्या निर्मितीचा उल्लेख असण्याचें कारण नाही.

गेल्या वीस वर्षांत उदयास आलेल्या कवींमध्ये श्री. आ. रा. देशपांडे उर्फ अनिल यांचें स्थान अगदी स्वतंत्र आहे श्री अनिल यांनी मानवतावाद प्रतिपादन केला असून रचनेचीहि अगदी नवीन दृष्टि वाचकांना दिली आहे, असें म्हणण्यास हरकत नाही मुक्तछंद लिहिणें व त्याची शास्त्रीय चर्चा करणें हीं दोन्ही कामें अनिल यांनी केलीं आहेत 'फुलवात', 'भग्नमूर्ति', 'पेर्ते व्हा', 'चिनी निर्वासितास' इत्यादि त्यांचे काव्यग्रंथ प्रसिद्धच आहेत. आशावादी व सहानुभूतीची दृष्टि, रचनेतील कोमलपणा व नवीन प्रयोगांची हौस इत्यादि अनेक गुणांनी अनिलांची कविता फार वाचनीय झाली आहे.

अनिलांबरोबरच वा. ना. देशपांडे, गु. ह. देशपांडे व ना. घ. देशपांडे या तिन्ही वऱ्हाडी देशपांड्यांचा कवि म्हणून उल्लेख करणें अपरिहार्य आहे. श्री. वा. ना. देशपांडे यांच्या काव्यरचनेत भावनांपेक्षाहि कल्पना व पांडित्य

यांचाच भाग विशेष आहे. त्यांच्या उपमा–उत्प्रेक्षांत अनेक शास्त्रांची तोंड-ओळख होत असते. त्यांची रचना एकंदर प्रौढ व फारच टापटीपीची असून वृत्तविषयक नवे नवे प्रयोग त्यांनी केले आहेत. 'आराधना' हा त्यांचा काव्यसंग्रह तीन आवृत्त्या निघण्याइतका लोकप्रिय झाला आहे. गु. ह. देशपांडे यांनी गूढगीतांत विशेष प्रावीण्य मिळविलेलें दिसतें. ना. घ. देशपांडे यांच्याहि रचना बहारदार आहेत. अकोल्याचे दामले, यवतमाळचे हूड यांचेंहि कवि म्हणून स्वतंत्र स्थान आहे. श्री. हूड यांचा 'पराग' पुष्कळांच्या परिचयाचा असेल.

कवि हेमन्त उर्फ श्री. मो. ज्ञा. शहाणे यांच्याहि कविता पूर्वी प्रसिद्ध होत असत. आतां त्यांची प्रतिभा आटली असावी असें दिसतें. १९४० पर्यंत श्री. प्र. ना. श्रौती, श्री. अडावतकर, श्री. शं. बा. नेरकर हेहि कवि म्हणून प्रसिद्ध होते. पण आतां त्यांनीहि कविता करणें सोडलें असावें. श्री. व्यं. शं. वकील यांची 'अश्रुफुलें' सुवासिक आहेत. याशिवाय नागपूरचे उल्लेखनीय कवि म्हणजे प्रो. या. मु. पाठक, डॉ. वि. भि. कोलते, प्रो. भ. श्री. पंडित, श्री. राजा बढे आणि श्री. मा. कृ. पारधी हे होत. श्री. या. मु. पाठक यांचें 'शशिमोहन' वीस वर्षांपूर्वींच प्रसिद्ध झालें. त्यानंतर त्यांची काव्य-रचना आजतागायत चालू असून, मुक्तछंदादि नवीन प्रकारांचीहि त्यांनी वहिवाट केली आहे. प्रो. पंडित यांचा 'पिचलेला पावा' बऱ्याच वर्षांपूर्वी झाला. 'उन्मेष आणि उद्रेक' व 'सुवास आणि रस' हे दोन कवितासंग्रह अलिकडे प्रसिद्ध झाले आहेत. पंडित यांच्या कवितांची रचना प्रसादपूर्ण व भावनाप्रधान आहे. श्री. राजा बढे यांची भावगीतें ध्वनिमुद्रिकांतून अत्यंत लोकप्रिय झालीं असून, त्यांचे छोटे संग्रहहि प्रसिद्ध झालेले आहेत. श्री. अनिल, श्री. ना. घ. देशपांडे, श्री. पारधी प्रभृति कवींच्या कविता ध्वनि-मुद्रित झालेल्या आहेत. डॉ. कोलते यांनी मात्र 'लव्हाळीं' हा त्यांचा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाल्या पासून प्रायः नवीन कविता लिहिली नाहीं. ते काव्यरचनेपासून संशोधनाकडे वळले.

श्री. कान्त व श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध हे दोन्ही कवि आतां याच प्रांतांत स्थायिक झालेले असल्यामुळे त्यांच्या काव्यावर याच प्रांताचा हक्क पोंचतो. या दोन्ही कवींची शैली स्वतंत्र आहे. श्री. मामा रामभजनी यांची 'शर्वरी'हि विसरतां येणार नाहीं.

क्रान्तदर्शी बुधे हे नागपुरांतील उदीयमान कवि असून, त्यांचा 'हिम-शिखरें' हा गद्यकाव्याचा संग्रह नुकताच प्रसिद्ध झाला आहे. यांत अध्यात्म-वादी गद्यकाव्य आहे. वाशिमचे द. चिं. सोमण यांची 'झिमझिम' आणि इतर काव्यसंग्रह हेहि काव्यवाङ्मयांत समाविष्ट केले पाहिजेत. वर्ध्याचे तरुण कवि श्री. कोलते यांचा नुकताच प्रसिद्ध झालेला 'जीवनगंगा' हा काव्य-संग्रह त्यांच्याबद्दल बऱ्याच अपेक्षा निर्माण करतो.

श्री. मनोहर देव व वसंत बराडपांडे या दोन कवींचा मुद्दाम उल्लेख केला पाहिजे. या दोन्ही नागपूरी कवींच्या काव्याची रचना अतिशय सुश्लिष्ट असून, त्यांत गेयता भरपूर आहे. अलिकडच्या कवितावाचनाच्या काळांत गायनयोग्य कविता करणारे जे थोडेसे दुर्मिळ कवि आहेत, त्यांत त्यांची गणना होते.

कवयित्रींमध्यें गेल्या वीस वर्षांत सौ. मनोरमाबाई नावलेकर यांचें नांव विशेष डोळयांपुढे येतें. त्यांची 'पणती' अजून प्रकाश देते. सौ. विमलाबाई देशपांडे यांची कविता तुरळक असली तरी उल्लेखनीय आहे. श्रीमती शांता शेळके यांचा आतां एतत्प्रान्तस्थ कवयित्रींत उल्लेख करावयास हरकत नाही. लीला वाचासुंदर या कवयित्रीचा 'काहूर' हा कवितासंग्रह १९५१ सालीं प्रसिद्ध झाला. पण तो सामान्य स्वरूपाचा आहे.

काव्यप्रदेशांत भक्तिमार्गी काव्याचा स्वतंत्र उल्लेख करण्याची आवश्यकता आहे. सध्यांचा काळ भक्तिमर्गी काव्याला प्रतिकूल आहे अशी अनेकांची समजूत आहे. पण श्रीसंत तुकडोजीमहाराज यांची रचना ही समजूत खोटी पाडण्यास समर्थ आहे. संत तुकडोजींची हिंदीइतकीच मराठी कवनेंहि आबाल-वृद्धांच्या तोंडीं असून, तीं फार परिणामकारक ठरलीं आहेत. भक्ति, समाजसेवा, देशभक्ति इत्यादि अनेक सद्गुणांनी रसरसलेलीं हीं गाणीं मराठी वाङ्मयांत स्वतंत्र स्थान घेण्यासारखीं आहेत, यांत तिळमात्र संशय नाही. गेल्या वीस वर्षांत तुकडोजीमहाराजांच्या काव्याचे अनेक लहान मोठे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

या प्रांतांतील कवींचा प्रातिनिधिक संग्रह काढण्याचा 'विदर्भवीणा' हा पहिलाच प्रयत्न होय. या 'वीणें'त तत्कालीन सर्व प्रसिद्ध कवींचा समावेश झाला आहे. इतरहि कांही प्रातिनिधिक संग्रह निघाले, पण ते फारसे उल्लेखनीय नाहीत. अगदी अलिकडे नागपूर येथें 'प्रारंभ' व 'मुजरा' आणि चांदा येथें गो. बा. पुल्लीवार यांचा 'चंद्रपुरी कवि' आणि काटकर यांचा 'कविताकुंज' या नांवाचे प्रातिनिधिक कवितासंग्रह प्रसिद्ध झाले आहेत.

नवकाव्याच्या रचनेचा परिणाम अलिकडे इतका सार्वजनिक झालेला आहे की, त्याचें अनुकरण करणारे भरपूर नवीन कवि निघूं लागले आहेत. मुक्तछंद किंवा विद्युन्माला वृत्ताचें मात्रात्मक स्वरूप करून होणारी दोह्यासारखी धावती रचना हीच बहुतेकांनी वापरली आहे. 'तरुण भारता'चा गेला दिवाळी अंक पाहिला म्हणजे अशा काव्यप्रांगणांत प्रवेश करूं इच्छिणाऱ्या सुमारे पन्नास नवीन कवींचें तरी दर्शन होतें. आणखी १०-१५ वर्षांनी या कवींच्या यशाचा निर्णय करतां येईल.

लघुनिबन्ध

या नांवाचा वाङ्मयप्रकार १९२५ नंतर मराठींत रूढ झाला असून, त्यांत प्रा. भ. श्री. पंडित, भावे, शान्ताराम, दोडके इत्यादि मंडळी अग्रेसर आहेत.

यांपैकी कांहींचे संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. वऱ्हाडचे सुप्रसिद्ध वकील क. श्री. पु. सरमुकद्दम यांचा ' यशाचे दीपस्तंभ ' हा संग्रह फारसा प्रसिद्धि पावला नसला तरी चांगला आहे.

निबन्ध वाङ्मय

या विभागांत या प्रांताने गेल्या वीस वर्षांत इतर कोणत्याहि वाङ्मय विभागापेक्षा जास्त भरीव कामगिरी केली आहे. श्री. कृ. कोल्हटकर यांच्या शिष्यांनी कोल्हटकरलेखसंग्रह प्रसिद्ध केला; व लो. ना. अणे यांचे लेख व भाषणें यांचाहि संग्रह प्रसिद्ध झाला. या दोन्ही प्रयत्नांस उणीपुरीं वीस वर्षे व्हावयास आलीं आहेत. हे दोन्ही संग्रह विविध विषयांवरील लेखांनी खच्चून भरले आहेत.

या नंतर आपल्या प्रांतांतील अतिश्रेष्ठ शैलीकार श्री. काका कालेलकर व श्री. विनोबा भावे हे होत. या दोघांचीहि लेखणी अति रसाळ आणि भारतीयत्वाने ओथंबलेली अशी आहे. कालेलकरांची ' जि ंत व्रतोत्सव ', ' लोकमाता ' इत्यादि निबंध पुस्तकें आणि विनोबांचा ' मधुकर ' प्रसिद्धच आहेत. एका दृष्टीने कालेलकरांपेक्षाहि विनोबांची शैली जास्त प्रसादपूर्ण आहे. प्राचीन आकर ग्रंथांचें क्रियापूर्ण ज्ञान त्यांच्या ठायीं मुरून गेलें असल्यामुळें ते जें लिहितात तेंच सुभाषित होतें.

डॉ. दप्तरी यांचें स्थान विचारी निबंधकारांत घालावयाला हरकत नाही. साहित्यिक शैली त्यांच्या ठिकाणीं नसली, तरी सुविचार व तळमळ हे त्यांच्याजवळ भरपूर आहेत. ' स्वतंत्र हिंदुस्थानचा पुढील मार्ग ' हें त्यांचें
छोटेंसें निबंध--पुस्तक विधायक सुविचाराच्या दृष्टीने केवळ अमूल्य आहे.
श्री. बा. ग. खापर्डे यांची कांहीं छापील साहित्यिक भाषणेंहि उत्तम
निबंधांत मोडतील.

या नंतर उत्तम निबंधकारांत म. म. मिराशी, श्री. अप्रबुद्ध कै. पुण-
तांबेकर, कै. भवाळकर, कै. नेने इत्यादींची गणना करावी लागेल.
यांपैकी श्री. अप्रबुद्धाचे निबंध ' वैदिक ' व म. म. मिराशी यांचे
निबध मुख्यत: संशोधनपर असल्यामुळे त्यांचा परामर्ष अन्य लेखांत
आला आहे. कै. नेने यांच्याहि निबंधाची तीच अवस्था आहे. कै. भवाळकर
यांनी लिखाणच अल्प केलें. त्यांत निबंधहि थोडेच आहेत. कै. पुणतांबेकर
यांच्या लिखाणांत कलात्मकता नसली, तरी माहिती, जोरकसपणा आणि आत्म
प्रत्यय फार आहे.

प्रा. बनहट्टी आणि डॉ. पेंडसे यांचा स्वतंत्र उल्लेख करण्याजोगें निबंध-
लेखनकार्य त्यांच्या हातून झालें आहे. साहित्य, नाट्य, व्यक्तिचित्रणे, चरित्रें,
समीक्षण इत्यादि अनेक विषयांवर प्रा बनहट्टी यांनी लिहिलें असून, तर्ककर्क-
शता हा त्यांचा मोठाच गुण आहे. डॉ. पेंडसे यांच्या निबंधांतहि प्राचीन वाङ्-
मयाचा खोल अभ्यास दिसून येतो. मीमांसाभूषण पु. बा. साठे यांचेहि निबंध
विचारप्रवर्तक असतात. श्री. दादा धर्माधिकारी हेहि उत्तम शैलीकार आहेत.

या नंतर वऱ्हाडचे वा. ना. देशपांडे यांचा उल्लेख टाळतां येणार नाही. 'विचारसमीक्षा' हा त्यांचा निबंधसंग्रह प्रसिद्धच आहे. श्री. देशपांडे यांच्या निबंधांत खोल बुद्धिमत्ता व विवेचकता दिसून येते.

श्री. माडखोलकर यांचें नांव उत्तम कादंबरीकार म्हणून वर आलें आहे. पण उत्तम निबन्धकार म्हणूनहि त्यांची योग्यता या प्रांतांत अनन्यसाधारण आहे. वर्तमानपत्रांत व नियतकालिकांत जें त्यांना लिहावें लागलें तें तर त्यांचे निबंध आहेतच. पण याशिवाय विविध विषयांवर त्यांनी जे हौसेने लिहिलें, त्याचीहि गणना उत्तम निबंधांतच करावी लागेल. उत्तम शैलीकार म्हणून माडखोलकर यांची योग्यता फार मोठी आहे. त्यांच्या निबंधांचीं पुस्तकें प्रसिद्ध झालेलीं आहेत.

डॉ. कोलते, डॉ. मा. गो देशमुख, प्रा. कुसुमावतीबाई देशपांडे यांनीहि प्रसंगोपात्त चांगलें निबंधलेखन केलें आहे. कै. वा. वा. फडणीस हे एक प्रभावी निबंधकार होऊन गेले त्यांच्या लेखांचा संग्रह प्रसिद्ध झाला पाहिजे.

आता पर्यन्त स्फुट निबधलेखनाचाच मुख्यतः विचार केला. पण गंभीर विषयावर विवेचनपर ग्रंथ हेहि निबंध वाङ्मयांतच मोडतात. ज्याला प्रबंध म्हणतां येईल अशा प्रकारची ग्रंथोत्पत्ति गेल्या वीस वर्षांत बरीच झाली आहे. वैदिक, महानुभाव व अन्य प्रकारच्या संशोधनपर ग्रंथांचा परामर्श अन्यत्र घेतला गेला आहे. याशिवाय जे ग्रंथ झाले त्यांचा उल्लेख या लेखांत करीत आहे.

कै. नाना आठवले यांचा 'बालकांचा मनोविकास' ह. वा. देशपांडे यांचा 'राजपूत संस्कृति' गो. बा. टोंगू यांची 'सूर्यकिरणचिकित्सा', डॉ. मा. ग. पटवर्धन यांचा 'आरोग्य आणि प्रथमोपचार', गोविंद देवराव गुरुजी यांचे 'मृदंग तबला वादन', बाळशास्त्री हरदास यांचा 'भारतीय क्रांतिकारकांचा इतिहास' व 'रामायणमहाभारतावरील व्याख्यानें', प्रा. वनहट्टी यांची 'ज्ञानोपासना', डॉ पेंडसे यांचा 'ज्ञानेश्वराचें तत्वज्ञान' व 'महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास', कै. नेने यांचें 'मानसशास्त्र', डॉ. दप्तरी यांचा 'जैमिन्यर्थ दीपिका' व 'धर्मविवाद स्वरूप' म सी. मुंडले यांचा 'गीताप्रणीत व्यवहार शास्त्र' अशा अनेक ग्रंथांचा उल्लेख करता येईल.

टीकात्मक वाङ्मय

टीकात्मक किंवा समीक्षणात्मक वाङ्मय हा निबंधलेखनाचाच एक प्रकार आहे. पण त्यांत वेगळेंच वैशिष्टच असल्यामुळें त्याचा स्वतंत्र उल्लेख करावासा वाटतो. माडखोलकर, प्रा. कुसुमावतीबाई देशपांडे व अलिकडे बाळशास्त्री हरदास हे उत्तम समीक्षक व टीकाकार म्हणून नावाजलेले आहेत. गेल्या कांही वर्षांत बाळशास्त्री हरदास हे साप्ताहिक 'महाराष्ट्रां'तील 'साहित्य-समालोचना'चें सदर लिहीत असतात. माडखोलकरांनी पूर्वी हें कार्य केलेलेंच आहे. प्रा. कु. देशपांडे यांनी घेतलेला 'मराठी कादंबरीचा परामर्श' दोन भागांत प्रसिद्धच आहे. डॉ. मा. गो. देशमुख यांचा 'मराठीचें साहित्यशास्त्र'

हा उत्तम समीक्षा ग्रंथ आहे. प्रि. मोहगांवकर यांचें ' मराठीचें शस्त्रागार ' लहानसेंच पण तीक्ष्ण आहे.

श्री. द. रा. गोमकाळे यांचें नांव नाटचाचे मार्मिक टीकाकार म्हणून घेणे भाग आहे. अलिकडे त्यांनी कोल्हटकर, रांगणेकर इत्यादि नाटककारांवर परामर्शात्मक निबंधग्रंथ लिहिले आहेत. याशिवाय श्री. चं. प. भिशीकर, श्री. के. ए. पोतदार वगैरे प्रसंगोपात्त पुस्तकपरीक्षणाचें कार्य करीत असतात. तरुण पिढीतील टीकाकारांत श्री. पां. ब. गाडगीळ यांचा उल्लेख करणें अवश्य आहे. त्यांचे टीका लेख सडेतोड आणि खोंचदार असतात. प्रा. पंडित व प्रा. अ. ना. देशपांडे यांनी अनुक्रमें अर्वाचीन मराठी काव्य व गद्य यांचे इतिहास लिहिलें आहेत तोहि समीक्षणाचा एक प्रकार असल्यामुळें येथे त्यांचा मुद्दाम उल्लेख केला आहे. टीकाग्रंथांत ' हरिपाठरहस्य ' हा बाबाजी महाराज पंडित यांचा ग्रंथ अद्वितीय आहे.

शास्त्रीय वाङ्मय

शास्त्रीय या सदरांत जसे पदार्थविज्ञान व रसायनशास्त्र येतें, तसेंच अर्थ-
शास्त्र, तर्कशास्त्र, नागरिक शास्त्र, वैद्यकशास्त्र, ज्योतिषशास्त्र यांचाहि
अंतर्भाव करायला हरकत असूं नये. यापैकी धर्म, वेदांत, ज्योतिष व वैद्यक-
यांत डॉ. दप्तरी यांजइतकें विपुल लिखाण कोणींच केलें नाही. मंत्रशास्त्रावर
खरेशास्त्री आणि फलज्योतिषावर काटवे यांचे ग्रंथ चांगलेआहेत इतर शास्त्रां·
वर केवळ शालेय पुस्तकें झालीं आहेत. त्यांचा उल्लेख करण्याचें कारण नाही.
पण, ज्यांची योग्यता शालेय ग्रंथाहून कांही विशेष आहे, त्यांचा
मात्र निदान उल्लेख तरी केला पाहिजे. नागपूर विद्यापीठानें
महाविद्यालयीन शिक्षणाचें माध्यम मराठी केल्यापासून अनेक शास्त्रांवर
मराठींत ग्रंथ होऊं लागले आहेत. पदार्थविज्ञान व रसायन यावर तर विद्या-
पीठानेच अधिकृत ग्रंथ प्रकाशित केले आहेत. तें भाषांतररूप असले तरीहि
मराठी ग्रंथांत त्यांनी अमूल्य भर टाकली यांत शंका नाही. प्रा. मुंजे यांचें
'अर्थशास्त्र', कै. पुणतांबेकर यांची 'नागरिक नीति' इत्यादि पुस्तकें सामान्य
वाचकांसहि वाचनीय आहेत. प्रो. जागीरदार, प्रो. शास्त्री, प्रो. व. मं. सिरसी-
कर,प्रो. म. अ. चान्सरकर प्रभृति लेखकांचीं पुस्तकें विद्यार्थ्यांना उपयुक्त आहेत.

चरित्र वाङ्मय

चरित्र वाङ्मयाचें दालन अगदी रोडच राहिलें. अप्रबुद्धांनी महर्षि पट-
वर्धनाचें चरित्र लिहून बराच काळ लोटला. यानंतर माडखोलकरांचीं 'दोन तपें'
श्रीमंत दादासाहेब धनवटे यांचें आत्मचरित्र आणि बॅ. गो. वि. देशमुख यांची
'कालसमुद्रांतील रत्नें' हीं तीन नांव घेण्यासारखीं आत्मचरित्रें आहेत. श्री
माडखोलकर यांच्या ' चिपळूणकर : काळ आणि कर्तृत्व ' या प्रबंधाची चौथी
आवृत्ति नुकतीच प्रसिद्ध झाली आहे. श्री. ज. रा. जोशी यांनी

डॉ. खरे यांचें चरित्र दोन खंडांत लिहिलें आहे. तसेंच 'वेचलेले मणी' हे कै. डॉ. केदार यांचें चरित्र त्यांच्या पत्नी श्रीमती रमाबाई केदार यांनी लिहिलें आहे तें फारच सरस उतरलें आहे.

विनोदी वाङ्मय

स्वतंत्र विनोदी वाङ्मय असें या प्रांतांत गेल्या वीस वर्षांत फार कमी झालें. अनेक लेखांतून प्रसंगोपात्त विनोद येणे वेगळें व स्वतंत्र लेख आणि प्रहसनें लिहिणे वेगळें. या दृष्टीने पाहिलें तर पु. भा. भावे, शं. वा. कुळकर्णी, मु. बा. गडकरी, मधुकर आष्टीकर, पु. व्यं. दारव्हेकर, राम डोके, केशव केळकर, भालचंद्र इत्यादि थोडेसे लेखक विनोदी लेख, नाटिका व प्रहसनें लिहिणारे म्हणून दृष्टीपुढे येतात.

बाल वाङ्मय

बाल वाङ्मयाची निपज जी या प्रांतांत झाली आणि होत आहे, ती मुख्यतः नियतकालिकांच्या द्वारेंच. श्री. बा. रा. मोडक यांनी खास मुलांकरिता 'मुलांचें मासिक' गेलीं पंचवीसावर वर्षं चालविलें आहे. त्यांतून बालवाङ्मय प्रसिद्ध झालें आहे. हायस्कूलच्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने उपयोगाचें असें 'विकास' साप्ताहिक निघालें होतें. पण तें बंद पडलें. अलिकडे साप्ताहिक 'तरुण भारत', 'राष्ट्रशक्ति' इत्यादींतून बालवाचकांसाठी कांही निश्चित जागा राखून ठेवली असते. पण हें सर्व वाङ्मय पुस्तकरूपाने निघण्याचा संभव फार कमी दिसतो. प्रा. भ. श्री. पंडित आणि श्री. वा. ना. विगम यांच्या शिशुगीतसंग्रहाचा येथे उल्लेख करावा लागेल.

"पराग" नांवाचें एक मासिक नागपुरांत नुकतेंच निघालें असून श्री. ह. गो. येगांवकर हे त्याचे संपादक आहेत. ते बालवाचकांसाठीच निर्माण झालें असून बरें कार्य करीत आहे. श्री. भा. श्री. परांजपे, दिनकर देशपांडे व कु. मालिनी टोंगू यांची कांही पुस्तकें मुलांसाठी म्हणून प्रसिद्ध झालीं आहेत.

आकाशवाणीच्या नागपूर केंद्रांत होणारा बाल विहार व शालेय कार्यक्रम यांतील कांही भाग एकत्रित करून प्रसिद्ध केले, तर बालवाङ्मयांत चांगली भर पडेल असें वाटतें. बालविहाराच्या क्षेत्रांत सौ. सुशीलाबाई कुळकर्णी यांनी चांगलें नांव कमाविलें आहे.

नियतकालिकें

वाङ्मयाचा इतिहास लिहावयाचा म्हणजे नियतकालिकांचाहि परामर्श घेणें आलेंच. नागपूरचें 'महाराष्ट्र' हें जुनेंच नियतकालिक आहे. 'तरुण भारत' हें गेलीं दहा वर्षं अत्युत्कृष्ट कार्य करीत आहे. अमरावती येथील 'उदय' अकोला येथील 'मातृभूमि' हीं जुनीं पत्रें झालीं. मध्यंतरी 'सावधान', 'समाधान' 'निःस्पृह' 'भवितव्य' हीं बरीं होतीं. इतरहि अनेक वर्तमानपत्रें प्रांतांत चालू आहेत. या शिवाय नवीन पत्रांचें निघणे बुडणे चालूच आहे.

वर वर्णिलेलीं दैनिकें किंवा साप्ताहिकें यांच्या द्वारें वाङ्मयसेवा होण्याचा अवसर कमी असतो. पण मासिकांच्या द्वारा ती चांगली होऊं शकते. शिवाय मासिकांच्या फायली पुष्कळ लोक पुस्तकांसारख्या जपून ठेवतात म्हणून मासिकांचा उल्लेख करणें आवश्यक आहे.

'वागीश्वरी'चा उल्लेख मागे आलाच आहे. पण हें अत्युत्तम मासिक १९३५ च्या सुमारास बंद पडलें. त्या नंतर 'विश्ववाणी' कांही दिवस चालून बंद पडलें. याच काळांत 'विहंगम', 'स्वच्छंद' इत्यादि मासिकांचा प्रयत्न झाला. 'ग्रामणी' हें ग्रामपंचायतविषयक मासिक नागपुरांत निघत होतें. तेहि पंचत्वाला गेलें. 'उन्मेष'चा प्रयत्न १९४८ त झाला. पण पांच अंकावर त्य चे अंक जगानें पाहिले नाहीत. 'पूजा' ' मधुवन ' या मासिकांचा अवतारहि अल्पकालिक ठरला. त्यानंतर निघालेली 'सुषमा' चालू आहे. 'गुरुदेव' हें सांप्रदायिक मासिक त्या क्षेत्रांत बरें आहे. 'न्यायबोध' हें कायद्याच्या क्षेत्रांत चांगलें काम करीत आहे. त्यांत प्रसिद्ध होणारे खटले व इतर लेख हे वाङ्मय दृष्टीनेंहि बरे असतात. या प्रांतांत उत्तम रीतीने चालत असलेल्या मासिकांत 'उद्यम'चा वरचा क्रमांक लागेल. औद्योगिक विषयास वाहिलेंलें असूनहि त्यांतील रोचकता कमी होऊं नये हा या मासिकाचा प्रयत्न आहे. त्यासाठी संपादक श्री. वि. ना वाडेगांवकर हे स्तुतीस पात्र आहेत. 'वऱ्हाड शाळापत्रक' अमरावतीचें. तें सरकारी पाठिंब्यावर निघणारें मासिक असून शिक्षणक्षेत्रांत बरी कामगिरी करणारें होतें.

त्या नंतर उल्लेखनीय मासिकांत वि. सा. सं. च्या 'युगवाणी' मासिकाचा क्रमांक लागेल. दरमहा उत्तम वाङ्मय पुरविण्याचें व्रतच या मासिकानें घेतलें आहे आणि त्याला एक प्रकारचें प्रातिनिधिक स्वरूपहि मिळालें आहे.

'राष्ट्रशक्ती'चे विजयादशमी व पाडवा यांचे विशेषांक,' महाराष्ट्र' व 'तरुण भारत' यांचे दिवाळी विशेषांक हेहि उत्तम वाङ्मयांत भर टाकीत असल्यामुळे त्याचा उल्लेख करावा लागेल. अर्थात् या मासिकांच्या व विशेषांकाच्या द्वारा कथा, काव्य, लेख या सर्वच क्षेत्रांत भर पडली आहे.

भाषांतर वाङ्मय

मराठी भाषेंत इतर उत्तमोत्तम भाषांचें वाङ्मय मधून मधून भाषांतरित होत असतें. पूर्वी इंग्रजी ग्रंथांचीं भाषांतरें रूपांतरें होण्याचा काल होता. तो आता संपला. आतां इंग्रजी कल्पना घेऊन स्वतंत्रपणें रचना कोणी कोणी करतात. बंगाली भाषेंतील कित्येक कादंबऱ्याचें मराठी भाषांतर झाल्याचा उल्लेख वर आला आहे व संस्कृत ग्रंथांच्या मराठी भाषांतराचा समावेश दुसऱ्या एका लेखांत झाला आहे. पण या सर्वांपेक्षा हिंदी आणि मराठी या ज्या या प्रांताच्या प्रमुख भाषा, त्यांनी एकमेकीच्या वाङ्मयाचा परस्पर परिचय करून घेणे आवश्यक

असल्यामुळें या आदानप्रदानाचा उद्योग करणारे कांही साहित्यिक आपल्या प्रांतांत आहेत. त्यांत श्री. श्रीधर नारायण हुद्दार आणि श्री. आनंदराव जोशी यांची मुख्यत: गणना होते. श्री. हुद्दार यांनी स्वामी सत्यदेवांच्या अनेक ग्रंथांचीं मराठींत भाषांतरें केलीं; व श्री. आनंदराव जोशी यांनी प्रेमचंदादि लेखकांचीं पुस्तकें मराठींत आणलीं. आपल्या प्रांताला कांही काळ लाभलेले श्री. प्रभाकर माचवे यांचीहि कामगिरी या बाबतींत उल्लेखनीय आहे. श्री. मा. ज. कानेटकर यांनीं केलेल्या टॉल्स्टॉयच्या प्रबंधाचें भाषांतरहि उल्लेखनीय आहे. भारतीय भाषांतील उत्तमोत्तम वाङ्मयाच्या परस्पर परिचयाचा उद्योग मोठ्या प्रमाणावर झाल्यास तो एकराष्ट्रीयत्वास उपकारकच होईल.

लोक वाङमय

लोक वाङमय या शद्वाचा अर्थ फार व्यापक घेतला पाहिजे असें जरी प्रस्तुत लेखकाचें मत असलें तरी येथें त्याचा वापर प्रचलित संकेतित अर्थानेंच केला आहे. ग्रामीण विभागांत अशिक्षित लोकांमध्यें परंपरेने चालत आलेल्या कहाण्या व गीतें यांचा या वाङमयांत समावेश होतो. या गद्य पद्यात्मक वाङमयामधील पद्य विभाग हा फार समृद्ध असून तो विशेषेकरून स्त्रियांनी निर्माण केला आहे हें त्यांचें वैशिष्टय होय. संसारांत सामान्यत: अनुभवावयास येणारे सर्व प्रसंग व रस या गीतांत तुडुम्ब भरले असतात. यांचा कर्ता अज्ञात असतो. प्रसादगुण आणि रचनेचा साधेपणा हा या गीतांचा विशेष होय. देवताविषयक, धंदेविषयक, नीतिविषयक व संसार-विषयक असे अनेक विभाग या स्फुट पद्यांत पडूं शकतात.

अशा लोकगीतांचें संकलन, त्यावरील भाष्यासह, करण्याचा उद्योग या प्रांतांत ज्यांनी केला अशा मंडळींत काका कालेलकर, वा. कृ. चोरघडे, वि. वा. जोशी (चांदा), पां. श्री. गोऱ्हे, ना. रा. शेंडे आणि अलिकडे डॉ. अत्तरदे यांचा समावेश होतो. या संबंधांत यांनी संकलित केलेले गीतसंग्रह प्रसिद्ध आहेत. श्री. शेंडे यांचा उल्लेख मागे लघुकथेच्या क्षेत्रांत आला आहे तथापि इतरहि वाङमय शाखांत त्यांनी यथामति संचार केला असून प्रस्तुत लोकवाङमयाच्या क्षेत्रांत त्यांनी केलेली कामगिरी उल्लेखनीय आहे. दलित समाजाचे अंतरंग श्री. शेंडे यांना इतरापेक्षां जास्त चांगलें समजलें आहे. त्यांच्या एतद्विषयक पुस्तकास मध्यप्रदेश शासन साहित्य परिषदेने पारितोषिक देऊन त्यांचा यथोचित गौरव केला व त्यांना राजमान्यता दिली हें त्यांच्या या शाखेंतील विशेष पराक्रमाचें द्योतक आहे.

श्री. वा. वि. जोशी यांचा निवास जंगल विभागांत असूनहि त्यांनी लोकसाहित्याबरोबरच इतरहि अनेक प्रकारची साहित्यसेवा केली हें त्यांना भूषणावह आहे. अजून या लोकवाङमयाच्या क्षेत्रांत संचाराला भरपूर जागा मोकळी आहे.

इतर लेखक

आतां पर्यंत वाङ्मयाच्या स्वतंत्र शाखा घेऊन त्यांचें विवेचन केलें. त्यांत प्रसंगोपात्त कांही लेखकांचीं नांवें आलीं आहेत. पण ज्यांनी कोणतीहि एक शाखा परिपुष्ट केली नाही, पण प्रत्येक शाखेत ज्यांची थोडी थोडी गति आहे, असेहि किरकोळ लेखक अनेक आहेत. एक दोन कविता, चार पांच लघुकथा व लघुनिबंध, पांच पन्नास भारदस्त लेख इतरांच्या आग्रहावरून किंवा विशेष कारणास्तव ज्यांनी लिहिले त्यांत श्री. ह. कृ. मोहनी, श्री. मा. ज. कानेटकर, श्री. श. वा. रानडे, श्री. र. वि. कुळकर्णी, श्री. रा. वि. काळी, श्री. रा. पु. सगदेव प्रभृति लेखकांबरोबर प्रस्तुत लेखकाचीहि गणना होते.

प्रकाशन संस्था

या प्रांतांतील प्रकाशनसंस्थांनी उत्तमोत्तम मराठी पुस्तकें प्रसिद्ध करून वाङ्मयनिर्मितीस हातभार लावला आहे. यास्तव त्यांच्या कार्याचाहि गौरवपर उल्लेख करणें मी माझें कर्तव्य समजतों.

केवळ शालेय पुस्तकांचें प्रकाशन करणाऱ्या ज्या संस्था आहेत, त्या आमच्या कक्षेंत येत नाहीत. पण ज्ञानपूर्ण पुस्तकें प्रकाशित करून प्रसंगीं ज्यांनी पदरमोड केली त्यांचें कार्य वाखाणण्यासारखेंच आहे.

गेल्या वीस वर्षांत या प्रांतात उत्पन्न झालेल्या अशा प्रकाशनसंस्थांत श्री. श्री. ना. हुद्दार यांच्या अभिनव ग्रंथमालेचा कालक्रमाने प्रथम उल्लेख करावा लागेल. १९२५ ते १९३५ या काळांत या मालेने बरीं पुस्तकें प्रकाशित केलीं. या नंतर प्रो. श्री. ना. बनहट्टी यांची नवभारत ग्रंथमाला व सुविचार प्रकाशन मंडळ यांची गणना होते. किंबहुना प्रांतांत गुणाने अग्रगण्य अशी ही प्रकाशन संस्था आहे. या मालेने अेतत्प्रांतस्थ विद्वानांचीं पुस्तकें तर प्रसिद्ध केलींच, पण पश्चिम महाराष्ट्रांतील विद्वानांचींहि पुस्तकें प्रकाशित करून या प्रांताच्या वाङ्मय निर्मितीस अप्रत्यक्षपणे हातभार लावला. केळकरांचें राज्यशास्त्र, ना. ह. आपटे यांची अमेरिका, वि. रा. शिंदे यांचा अस्पृश्याचा प्रश्न अशा सारखे मौलिक ग्रंथ या मालेने प्रकाशित केले आहेत.

नागपुरांतील वीणा प्रकाशन व नागपूर प्रकाशन याहि प्रकाशनसंस्थांचें कार्य नांव घेण्यासारखें आहे. मात्र या दोन्ही संस्थांनी मुख्यतः ललित वाङ्मयच प्रकाशनास घेतलें, त्यांत एतत्प्रांतस्थ लेखकांबरोबरच मध्यप्रदेशा-बाहेरील नामवंत लेखकांच्याहि कादंबऱ्या प्रकाशित केल्या आहेत.

शास्त्रीय ग्रंथमाला नांवाची एक ग्रंथमाला या प्रांतांत १९३० पूर्वीच अस्तित्वांत आली होती. अजूनहि ती विद्यमान असून मधून मधून कांही ज्योतिषशास्त्रविषयक पुस्तकें काढीत असते. एक तर या पुस्तकांचा विषय गणिताचा असल्यामुळे, सामान्य लोकांना दुर्बोध. आणि म्हणून हीं पुस्तकें प्रकाशित करणे आंतबट्याचें ठरतें. त्यामुळे कित्येक वर्षांत एखादा ग्रंथ

बाहेर येण्याचा योग येतो. तथापि शुद्ध ज्ञानदानाचा हा प्रयत्न अभिनंदनीय आहे. पूजा प्रकाशन व गुरुदेव ग्रंथ प्रकाशन या संस्थांनीहि चांगलीं पुस्तकें प्रसिद्ध करण्याचा उद्योग चालविला आहे.

उमरखेड येथील उत्तमश्लोक मंडळ, यवतमाळचा शारदाश्रम, नागपूरचे मध्यप्रदेश संशोधन मंडळ यांनीहि भरीव पुस्तकें प्रकाशित केलीं आहेत. गांधीवादी विचारसरणीचीं पुस्तकें वर्ध्याहून प्रसिद्ध होत असतात.

उपसंहार

सारांश, गेल्या वीस वर्षांत या प्रांतांतहि वाङ्मयीन जागृति भरपूर झाली असून मोठ्या शहरांप्रमाणेच लहान गांवांतहि हौशी लोकांचीं वाङ्मय मंडळें निघत आहेत. कॉलेजांतून जसे वार्षिकांचे छापील अंक निघतात तसे ते शाळांतूनहि निघतात. पण ते बहुधा हस्तलिखित स्वरूपांत. शाळाव्यतिरिक्त इतरहि विद्यार्थी हस्तलिखित मासिकें परिश्रमपूर्वक काढीत असतात. भावी उच्च वाङ्मयनिर्मितीची ही पूर्व तयारी म्हणूनच हा उल्लेख केला.

गेल्या वीस वर्षांत या प्रांतांत उत्पन्न झालेल्या मराठी वाङ्मयांत एकंदर कोणकोणत्या भिन्न भिन्न प्रवृत्ति दिसून येतात; व त्या एकंदर समाजहिताला कितपत पोषक आहेत याचा विचारहि मनोरंजक व उपयोगी होईल. पण तो या लेखाचा विषय नव्हे.

वरील धावत्या आढाव्यांत अनवधानाने आणि स्थलाभावानें कांहींचा उल्लेख गळला असण्याचा संभव आहे, तरी त्यांनी क्षमा करावी.

मध्यप्रदेशांतील प्राचीन स्थापत्यकला व शिल्पकला

(डॉ. मो. गं. दीक्षित, सागर)

प्रस्तुत ग्रंथाच्या संपादकांनी मध्यप्रदेशांतील प्राचीन स्थापत्यकला व व शिल्पकला ह्या विषयांचें थोडेसें विवेचन करण्यास मला आज्ञापिलें आहे. व त्यांच्या ह्या विनंतीस मान देऊन मी येथे ह्या दोन्ही कलांचा विकास कसा झाला, ह्याचें थोडक्यांत दिग्दर्शन करणार आहे.

मध्यप्रदेशांतील स्थापत्यकला व मूर्तिकला ह्यांचा अभ्यास ह्या प्रदेशांतील पुराणवस्तुसंशोधनाच्या इतिहासाशी इतका निगडित आहे की, ह्या विषयाचें विवेचन ह्या ग्रंथांत पूर्वी येऊन गेलें असलें तरीं पुनरुक्तीचा दोष पत्करूनहि त्याचें संकलित स्वरूप येथे पुन्हा मांडणें इष्ट होईल.

जनरल कनिंगहॅम यांचें प्राथमिक संशोधनकार्य

मध्यप्रदेशांतील प्राचीन इतिहास--संशोधनास खरी सुरवात ब्रिटिश राजवटीच्या प्रारंभीं, नवीन आक्रमण केलेल्या प्रदेशांत सैन्याच्या हालचालींस सुलभ असे रस्ते तयार करणें व तदनुषंगानें केवळ आवड म्हणून त्या त्या प्रदेशाची यथापूर्ण माहिती करून घेणें ह्या तत्कालीन अधिकारी, लष्करी इंजिनीअर्स वगैरेंच्या हौशींतून निर्माण झाली. इ. स. १८६२ मध्यें जनरल सर अलेक्झांडर कनिंगहॅम ह्यांची केन्द्रिय सरकारनें पुराणवस्तुसंशोधनाचें स्वतंत्र खातें निर्माण करून त्यावर पहिले डायरेक्टर जनरल म्हणून नेमणूक केली; प्रतिवर्षी भारतांत भ्रमण करून पुरातत्त्वदृष्टया महत्त्वाच्या स्थळांची नोंद करणें व त्यांचें वर्णन प्रसिद्ध करणें अशा तऱ्हेचे महत्त्वाचें पण बरेचसें प्राथमिक स्वरूपाचें काम त्यांचेकडे सोपविण्यांत आलें होतें. दुर्गम अशा प्रदेशांत हिंडून, बारकाईने माहिती गोळा करून ती योग्य त्या स्वरूपांत तांतडीनें व अगदी कसोशीनें मांडण्यांत ह्या अधिकाऱ्यानें कोणतीच कसूर केली नाही. त्यांचे २५ खंडांत प्रसिद्ध झालेले अहवाल पाहिले म्हणजे त्यांनी केलेल्या कामाचें प्रचंड स्वरूप नजरेस येऊन मन आश्चर्यानें थक्क होऊन जातें. सर अलेक्झांडर कनिंगहॅम ह्यांनी इ. स. १८७०-७१ मध्यें छत्तिसगढ विभागांत मोठा दौरा काढून राजीम, सिरपुर, आरंग, बिलासपुर, रतनपुर, सिवरीनारायण, जांजगीर, पाली वगैरे अनेक ठिकाणचीं देवालयें व त्यांतील शिल्पांची माहिती मिळविली व त्या विषयीचा अहवाल Archaeological Survey Report, Vol. VII 'पुराण वस्तुसंशोधनाचा अहवाल,' पु. ७ मध्यें प्रथम प्रसिद्ध

केला होता. त्यानंतर त्यांचे लक्ष जबलपुर व त्याच्या आसमन्तातील भाग ह्याकडे वळलें व त्यांनी आपले सहकारी मि. बेग्लर ह्यांस ह्या भागांतील क्षेत्रांचें निरीक्षण करून त्या विषयीचा अहवाल देण्यास इ. स. १८७३–७५ मध्ये पाठविलें होतें. त्यांचा हा अहवाल पुराणवस्तु-संशोधन अहवाल पु. ९, ५४–६० ह्यांत प्रसिद्ध झालेला आहे. ह्या भागांतील विशिष्ट स्वरूपाची काल–गणना असलेले कलचुरि राजांचे लेख शोधण्यांत व ही कालगणना निश्चित करण्यासाठी स्वतः कनिंगहॅम ह्यांनीं अतोनात परिश्रम घेतले. किंबहुना ह्या लेखांमुळेच मध्यप्रदेशांतील एतद्विषयक संशोधनास चालना मिळाली असें म्हणण्यास हरकत नाही. याच सुमारास (इ. स. १८६३ सालीं) तत्कालीन सरकारी धोरणास अनुसरून नागपुरांत एक मध्यवर्ती संग्रहालय स्थापून त्यांत प्रांतांतील वेगवेगळ्या प्रकारचे शिलालेख व मूर्ति ह्यांचा संग्रह करण्यांत आला. कमी अधिक प्रमाणांत हा उद्योग सुमारें २० वर्षें तरी चालला होता. त्यापुढे मात्र हें काम थंडावलें असें दिसतें.

पुरातत्त्वीय संशोधनाचे दृष्टीनें कनिंगहॅम ह्यांचें कार्य भरीव असें झालें तरी ह्याविषयीचे प्रयत्न ह्यापूर्वी झाले नव्हते असें मात्र नाहीं. कर्नल जेन्किन्स हा नागपुरास रेसिडेंट असतांना त्यानें विनायकराव औरंगाबादकर नांवाचे इसमास अशा प्रकारची माहिती मिळविण्यास पाठविल्याचे पुरावे आढळतात. तसेच कर्नल यूल ह्यांनी इसवी सन १८६०–६१ सालीं बंगाल एशियाटिक सोसायटीचे त्रैमासिकांत, तसेच डॉ. हॉल ह्यांनीं १८७३ मध्यें अमेरिकन ओरिएन्टल सोसायटीचे त्रैमासिकांत मध्यप्रदेशच्या पुरातत्त्वाविषयीं कांहीं लेख लिहिलेले आढळतात. परंतु हें सर्व लिखाण प्रवास–वृत्तांत किंवा सहज प्रसंगानें केलेली चर्चा अशा स्वरूपाचें असल्यामुळें अगदी प्राथमिक अवस्थेंतील वाटतें. हीच अवस्था मेडोज टेलर, हिस्लॉप, स्टिव्हनसन प्रभृति लेखकांची आहे.

हेन्री कझिन्स यांचा दीर्घोद्योग

मध्यप्रदेशांतील प्राचीन अवशेषांच्या संशोधनाचे प्रयत्न त्यानंतर इ. स. १८९३–९४ ह्या वर्षी पुण्यास मि. हेन्री कझिन्स ह्या अधिकाऱ्याची वेस्टर्न सर्कलचा सुपरिंटेंडेंट ह्या नात्यानें नेमणूक झाली, तेव्हापासून अधिक कसोशीनें करण्यांत आले असें दिसतें. ह्या अधिकाऱ्यांत कनिंगहॅमसारखे अष्टपैलुत्व, पुरातत्त्व विषयांच्या प्रांगणांत चौफेर धावणारी बुद्धिमत्ता अथवा महत्त्वाकांक्षा नसली तरी तो एक कष्टाळू आलेखक (ड्रॉफ्टस्मन–सर्व्हेअर) होता, व त्या काळीं नुकत्याच उदयास येऊ लागलेल्या छायाचित्रलेखनकलेचा एक निःसीम उपासक होता. आपल्या ह्या दोन्ही कलांची त्यानें आपल्या संशोधनास भरपूर मदत करून घेतली. इ. स. १८९३–९४

सालीं स्थानिक अधिकाऱ्यांनी पुरविलेल्या माहितीच्या आधारें त्यानें मध्यप्रदेशांतील पुरातन महत्त्वाच्या स्थळांची एक सूचि (A List of Antiquarian Remains in the Central Provinces and Berar) प्रकाशित केली, परंतु त्यांत ग्रथित केलेल्या माहितीवरच केवळ संतुष्ट न रहातां त्यानें मध्यप्रदेशांत, विशेषतः वऱ्हाडचे भागांत, सालोसाल वेगवेगळ्या स्थळांस भेट देऊन, ज्यास हेमाडपंती पद्धतीचें शिल्प अशी संज्ञा आहे त्या शिल्पाचा विशेष अभ्यास केला व त्याविषयींचे आपले सिद्धांत कित्येक वर्षांनंतर इ. स. १९३१ सालीं प्रसिद्ध झालेल्या आपल्या Mediaeval Temples of the Dakhan 'दक्खनमधील मध्ययुगीन देवालयें' ह्या पुस्तकांत सविस्तर मांडले. ह्या कामासाठीं त्यानें तत्कालीन Wet Process च्या सहाय्यानें घेतलेले असंख्य फोटोग्राफ व तयार केलेले नकाशे ह्यांचा जो प्रचंड संग्रह आज सरकारी खात्याच्या दफ्तरीं आहे, त्यावरून त्याच्या दीर्घोद्योगीपणाची साक्ष मिळते.

मध्यप्रदेशाची उपेक्षा

इ. स. १९०२ मध्यें कर्झनशाहींत सरकारी पुराणवस्तुसंशोधन खात्याची पुनर्रचना होऊन त्या खात्याचीं सूत्रें सर जॉन मार्शल ह्यांचे हातीं गेलीं. सुमारें २७ वर्षांच्या प्रदीर्घ काळांत हडाप्पा संस्कृतीचा शोध, तक्षशिला, सारनाथ, नालंदा व तत्सम सुप्रसिद्ध बौद्ध धर्मक्षेत्रांचें उत्खनन वगैरे अनेक प्रकारांनी भारत सरकारच्या पुराणवस्तुसंशोधन खात्याची प्रगति झालेली दिसली तरी यशाच्या दृष्टीनें फारच थोडा वांटा मध्यप्रदेशाकडे आला. नाही म्हणावयास, सिरगुजा संस्थानांतील रामगड गुंफेचा शोध (इंडियन अँटिक्वेरी पु. ३४, पृ १९७), क्वचित् जबलपुरजवळच्या भेडाघाट येथील चौसष्ट योगिनींच्या मंदिराचे कांही संशोधन, इ. स. १९०९–१० सालीं छत्तिसगडांतील विटांचे बांधकाम असलेल्या मंदिराविषयी एक लेख, असें किरकोळ स्वरूपाचें संशोधन–अध्ययन ह्या काळांत मध्यप्रदेशविषयक झालेलें आढळतें. किंबहुना ह्या प्रांताची बरीचशी उपासमारच ह्या काळांत झाली असें म्हटलें तर मुळीच अतिशयोक्ति होणार नाही. ह्या बद्दलची कारणपरम्परा काय असेल ती असो, परंतु लांबवरच्या प्रवासाच्या साधनांची अननुकूलता, सरकारी खात्याच्या केंद्रांची पुणें तसेंच पाटणा इत्यादि दूरदूरच्या ठिकाणीं विभागणी, प्रत्यक्ष संशोधनापेक्षा दैनंदिन कारभारविषयक कामाकडे अधिकाधिक लक्ष पुरविण्याची जरूरी, अधिकारी वर्गांतील अनुत्साह, इत्यादींमुळे मध्यप्रदेशांत हा विषय जितक्या प्रकर्षानें बहुजनसमाजापुढें किंवा अभ्यासकांपुढें यावयास पाहिजे होता तितका येऊं शकला नाही हें खरें. नाहीं म्हणावयास, ह्या काळांतले श्री. राखालदास बानर्जी, पुराणवस्तुखात्यांतील पश्चिम विभागाचे अधिकारी, हें मात्र त्यास अपवाद दिस-

तात. इ. स. १९१९–२० साली रेवा संस्थानांतील प्राचीन अवशेषांची पहाणी करण्याच्या निमित्तानें त्यांनी जबलपुरजवळील त्रिपुरी येथें राजधानी असलेल्या हैहयवंशीय (कलचुरि) स्थापत्य व शिल्पकलेची अतिशय बारकाईनें पहाणी करून, त्यांनी ह्याविषयीचे आपले सिद्धान्त विस्ताररूपानें आपल्या The Haihayas of Tripuri and their Monuments 'त्रिपुरीचे हैहय आणि त्यांच्या इमारती' ह्या ग्रथांत समाविष्ट केले. केवळ स्थानिक स्वरूपाचें असें ह्या ग्रथाचें स्वरूप मर्यादित नसून, मध्यप्रदेशाचा उत्तर भाग, विंध्यप्रदेश इत्यादि दूरवर पसरलेल्या एका शिल्पप्रकाराचें सामूहिक दर्शन ह्या दृष्टीनेहि हा ग्रंथ फार महत्त्वाचा आहे. किंबहुना वर उल्लेखिलेला कझिन्स ह्यांच्या Mediaeval Temples of the Dakhan ह्या ग्रंथांतील विदर्भापुरता भाग व बानर्जी ह्यांचे The Haihayas of Tripuri and their Monuments हें पुस्तक, ह्या दोन ग्रंथांव्यतिरिक्त मध्यप्रदेशांतील स्थापत्य व शिल्पकला ह्यांचा मोठ्या प्रमाणात परामर्श घेतलेला दुसरा एकही संदर्भग्रंथ नाही. पुढे अधिकाधिक माहितीमुळे पडणारी भर लक्षांत घेता ह्यांतून ग्रथित झालेली माहिती अपुरी, तोकडी आहे व त्यांतील सिद्धान्त संशोधनामुळें फेरफार करावे लागणारे आहेत हें उघड आहे.

खाजगी संस्था व व्यक्ति यांचें कार्य

पुरातत्त्वविषयक संशोधन ही सामान्यत: सरकारी खात्याची मिरासदारी असा ब्रिटिश राजवटींतील दण्डक असला तरी मध्यप्रदेशांतील संशोधनात खाजगी प्रयत्नामुळे झालेल्या संशोधनास वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. मध्यप्रदेश संशोधन मंडळ, महाकोसल इतिहास–समिति, शारदाश्रम इत्यादि संस्था, तसेच स्वर्गीय रायबहादूर हिरालाल, पं. लोचनप्रसाद पाण्डेय, म. म. वा. मिराशी, डॉ. कटारे इत्यादि अन्य संशोधक ह्यांच्या परिश्रमांमुळें मध्यप्रदेशांतील पुरातत्त्वाचे पैलू आतां नजरेसमोर येऊ लागले आहेत. तसेच सागर विद्यापीठाचे वतीनें व प्रान्तीय सरकारचे आर्थिक मदतीने जबलपूरजवळ त्रिपुरी, त्यानंतर रायपुर जिल्ह्यांत सिरपुर येथें सुमारे ४ वर्षें उत्खनन कार्य चालू आहे. अलिकडे प्रान्तीय सरकारने पुरातत्त्वेतिहासाचा एक नवीन विभाग उघडण्याचाही आपला मनोदय प्रगट केला आहे. 'प्रसादचिन्हानि पुरःफलानि' ह्या न्यायाने मध्यप्रदेशाचे पुरातत्त्वास योग्य ती दिशा लागेल, अशी आशा आपण करण्यास आता हरकत दिसत नाही.

स्थापत्य व मूर्तिकलेचा विकास

आतापर्यंत पुरातत्त्वेतिहासाच्या अनुरोधानें मध्यप्रदेशांतील स्थापत्य व मूर्तिकला ह्यांच्या अभ्यासाचे प्रयत्न कसकसे झाले ह्याचें विवेचन केलें. आता प्रस्तुत निबंधाच्या दुसऱ्या भागांत, मध्यप्रदेशांतील स्थापत्य व मूर्तिकलेचा विकास ह्यांचें स्पष्टीकरण करण्याचें योजलें आहे.

मध्यप्रदेशांतील कलेच्या इतिहासास खरोखर पाहिलें तर अगदी प्रागैतिहासिक कालापासून सुरवात होते; व त्या दृष्टीने ह्या प्रान्तातील सर्वात जुना कलापूर्ण अवशेष म्हणजे बालाघाट जिल्ह्यांत गुंगेरिया ह्या गांवीं सांपडलेली चांदीच्या पत्र्याची चपटी वृषभाकृति ही होय. ही वृषभाकृति म्हणजे जवळजवळ रानटी अवस्थेंत असलेल्या मानवानें इसवी सनापूर्वी अदमासें १६००–१७०० वर्षांपूर्वी तरी तयार केलेली असावी. ह्यानतरच्या काळांतील म्हणजे मनुष्यप्राण्यास शेतीचें ज्ञान, पशुपालन इत्यादि कला अवगत झाल्यांनंतरचे काळांतील, कांही चित्रा-वशेष पचमढी तसेंच होशंगाबाद येथील गुहांचे समूहांत तसेंच रायगढ जिल्ह्यांत सिंघणपुर, कबरा पहाड इत्यादि ठिकाणीं आढळून येतात. ही चित्रें खडकावर गेरु, चुना किंवा स्थानिक वेगवेगळया रंगाची माती ह्यांच्या सहाय्यानें रगविलेली असून त्यांचा विषय मुख्यत: वन्य पशूंची चित्रें, त्यांची शिकार, मानवी युद्धप्रसंग ह्यावर आधारलेला आहे. ह्या चित्रांचा काल, तसाच कालक्रम ह्याविषयीं अद्याप फारसा अंदाज बांधतां येत नसून त्यांचें स्थूल वर्गीकरण फक्त झालेलें आहे. ह्या चित्रांविषयींचें विवेचन मुख्यत: श्री. मनोरंजन घोष, कर्नल गॉर्डन, श्री. ब्रिजवासी लाल ह्यांचे लिखाणांतून आलेलें असून, त्यांच्या वर्गीकरणाविषयीं कर्नल गॉर्डन ह्यांनी घेतलेले परिश्रम विशेष उल्लेखनीय आहेत.

अंधकारमय कालखंड

प्रागैतिहासिक कालापासून मौर्यकालापर्यंतचा मध्यप्रदेशाचा इतिहास जवळजवळ अंधकारमय आहे. कांही वर्षापर्यंत जबलपुरजवळील रूप-नाथाचा अशोकाचा शिलालेख, तसेच देवटेक येथील लेख इत्यादिपुरतेंच आपले मौर्य काळाबद्दलचें ज्ञान मर्यादित होतें. परंतु आता त्रिपुरी येथील उत्खननांत मौर्यकालीन मातीच्या वर्तुळाकृति खापरांनी बांधून काढलेल्या विहिरी, कांही मृण्मय मूर्ति, मणी वगैरे साहित्य मिळालें आहे. तेथें सांपडलेल्या अवशेषांवरून त्या काळांत दगडी जोतें असलेलीं व वर कच्च्या मातीच्या भिंती असलेलीं घरें बांधण्याची पद्धत सरसहा रूढ होती असें दिसून येतें. जोत्याची रचना फार ओबडधोबड, पण पुष्कळ खोलपर्यंत पाया घेऊन केलेली आढळते व त्यांवरून घरांच्या टिकाऊ-पणाकडे लक्ष पुरविलें जाई, तसेंच पाण्याचा निचरा योग्य प्रकारें होत आहे किंवा नाहीं हें पहाण्याकडे अत्यंत सावधगिरी बाळगली जाई, असें दिसतें.

शातवाहन कालांतील बहुसंख्य नाणीं मध्यप्रदेशांत सांपडूनहि त्या काळचे प्रत्यक्ष शिल्पावशेष फारच थोडे उपलब्ध आहेत. नाही म्हणा-वयास, भांदक व पातूर येथील गुंफा मध्यप्रदेशांतील तत्कालीन स्थाप-त्याची थोडीफार कल्पना करून देतात. परंतु ह्या गुंफांत देखील परिवर्तन झालें असल्याची शक्यता असल्यामुळे त्यांचें स्थापत्य प्रमाणी-

भूत (representative) मानतां येत नाहीं. तथापि महाराष्ट्रातील इतर लेण्यांप्रमाणेंच हाही कला-प्रकार मध्यप्रदेशास अपरिचित नव्हता असें दिसतें

त्रिपुरी येथील उत्खननांत विटांनी बांधलेले दोन बौद्ध विहार, तत्कालीन पाण्याची एक मोठी विहीर इत्यादि वास्तु सांपडल्या आहेत. त्यावरून मोठ्या आकाराच्या विटांचें पक्कें बांधकाम करण्याच्या शातवाहनकालीन वास्तुशिल्पावर चांगला प्रकाश पडतो. रुंद पाये, रेखीव बांधकाम व सूत्रबद्ध रचना ही ह्या वास्तूंची वैशिष्टयें म्हणून सहज गणतां येतील. विशेष प्रकारें कोरीव काम करून भाजलेल्या मातीच्या मुद्रा करण्याची ही पद्धति ह्या काळीं प्रचलित असलेली दिसते. त्रिपुरीस सांपडलेल्या मृण्मय मूर्तींत दक्षिणी व उत्तरी असें दोन्ही पद्धतीचें मिश्रण झालेलें दिसतें. दगडावरील कोरीव कामांत, शुंग पद्धतीचा अवलंब करून ओबड धोबड कोरीव काम असलेलीं दोन अर्धचित्रें भेडाघाट येथें तसेच विरगुजा संस्थानांतही मिळालीं आहेत. त्यावरून शिल्पकलेचा थोडासा अंदाज बांधतां येतो. छत्तीसगढातील किरारी ह्या गांवी सांपडलेल्या काष्ठथूपाचाही येथे ओझरता उल्लेख केला पाहिजे.

गुप्तकालांतील शिल्प

शातवाहन काल ते गुप्त-वाकाटक काल ह्या दोहोंमधील सुमारें २५०-३०० वर्षांचें कांहींच साहित्य मध्यप्रदेशांत उपलब्ध नाही. तथापि गुप्तकालांतील बऱ्याच मोठ्या प्रमाणांतील अवशेष सागर जिल्ह्यांत एरण ह्या गांवीं तसेंच जबलपुर जवळ तिगवां ह्या ठिकाणीं सांपडतात. गुप्त कलेंतील, सौंदर्य, अवयवांचा रेखीवपणा, वक्ररेषांचे मनोहारित्व इत्यादि वैशिष्टयें वर उल्लेखिलेल्या ठिकाणच्या अवशेषांत पूर्णत्वानें प्रकट झालेलीं दिसतात. विशाल मंदिरें, विशेषतः त्यांच्या पुढील ध्वजस्तंभ, हे स्थापत्यकलेंतील प्रकार ह्या काळांत नव्यानेच पुन्हा उदित झालेले दिसतात. त्यांचें मूळ अशोककाळांतील स्तंभापासून व कदाचित् त्याच्याही पूर्वी वैदिक यूप वगैरे उभारण्याच्या पद्धतीपासून घेतले गेलें होतें. गुप्तकालांतील मंदिरांचा एक विशेष असा आहे की, त्यांचीं छतें दगडाच्या लांब लांब लाद्या टाकून ती घुमटासारखीं न बनवितां केवळ सपाट ठेवलीं जात. अशा तऱ्हेने बांधलेली कांही मंदिरें जबलपूरचे आसपास बरगांव, सकौर, रोण्ड, तिगवां, कुण्डा, तसेंच दमोह जवळ कुण्डलपुर येथें आढळांत आहेत. गुप्तकालीन मंदिरांचा हा विशेष प्रथम जनरल कनिंगहॅमनें नजरेस आणला व त्याचे ह्या बाबतींतील वर्गीकरण अजून प्रमाणीभूत मानलें जातें.

गुप्तांचे शिल्पावशेष मध्यप्रदेशाचे उत्तरी भागांतच विशेषेंकरून सांपडतात. दक्षिणेकडे त्याचवेळीं वाकाटकांचें साम्राज्य विदर्भावर होतें. त्यांची राजधानी प्रवरपूर (हल्लीचें पवनार) येथें रामा-

यणांतील कथाप्रसंगावर आधारलेले ५–६ शिलापट्ट सांपडले आहेत. त्यांची रचना उघडउघड गुप्तकालीन शिल्पपद्धतीवर आधारलेली दिसते व मर्यादित स्वरूपांत ते वाकाटककालीन आहेत असें मानावें लागतें. ह्या शिलापट्टांच्या संशोधनाचें श्रेय महामहोपाध्याय प्रो. मिराशी ह्यांचेकडे जातें.

मूर्तिकलेंत ह्या काळांत विष्णु–वराह–मूर्तींचें प्राबल्य तसेंच गंगा व यमुना ह्यांचे प्रवेशद्वारावरील अस्तित्व ह्या गोष्टी विशेष प्रामुख्यानें नजरेस येतात. रामायणांतील प्रसंगांवर आधारलेली जी थोडींच प्राचीन शिल्पें आहेत, त्यांत पवनारच्या पट्टांचा समावेश होतो.

श्रीपुर येथील वैशिष्ट्यपूर्ण मंदिरें

विदर्भाचा गुप्तोत्तरकालांतील फारसा इतिहास उपलब्ध नाही; पण ह्याच सुमारास छत्तिसगढ विभागांत श्रीपुर येथें पांडववंशातील महाशिवगुप्त ह्या राजानें सुमारें ५७ वर्षेपर्यंत राज्य केलें. ह्या राजाच्या अमदानींत संपूर्णतया विटांनी बांधलेलीं व जरूरीपुरता प्रवेशद्वार, चौथरा इत्यादीसाठीं दगडांचा उपयोग केलेलीं मोठीं मंदिरें बांधण्याची प्रथा अस्तित्वांत आली. प्राचीन विटांचें बांधकाम असलेलीं फारच थोडीं मंदिरें सध्या भारतांत अस्तित्वांत असल्यामुळे ह्या तऱ्हेच्या शिल्पांस वैशिष्ट्यपूर्ण महत्त्व प्राप्त झाल्यास नवल नाही. महानदीच्या खोऱ्यांत सिरपूर, खरोद, पुजारीपाली, जांजगीर, तसेंच कुरवाई, बोरमदेव व बिलासपूर जिल्ह्यांत धनपूर ह्या ठिकाणीं अशीं मंदिरें अद्यापि विद्यमान आहेत. सिरपूर येथील लक्ष्मणाचें मंदिर हा तर ह्या पद्धतीचा फारच चांगला नमुना असून, त्यांतील प्राकारांतील विटांचे जाळीवजा नक्षीकाम, मंदिराचे कळसावरील त्या त्या आकाराच्या विटा घडवून मग उभारलेलें चैत्या-कृति घुमट वगैरे फार प्रेक्षणीय आहेत. मंदिराचे प्रवेशद्वारावर त्रिकोणाकृति खिडकी, तसेच दगडी चौथऱ्यावरील उभारणी हे मंदिरांतील शिल्प–वैशिष्ट्य असून ह्या कलाप्रकारावर उडीसा प्रांतातील कलाकुसरीची छाप स्पष्टपणें प्रकट होते. अलीकडे सागर विद्यापीठाचे उत्खननांत असेंच विटांचें बांधकाम असलेले तीन बौद्ध मठ सांपडले असून त्यांत ही प्रांतविशिष्ट लकब पुनः प्रतीत होते.

कलाप्रणालीचें माहेरघर

शिल्पकलेंत देखील श्रीपुर हे फार पुढारलेलें केन्द्र होतें असें वर सांगितलेल्या उत्खननांत सांपडलेल्या धातु–मूर्ति, तसेंच शिल्पाकृति यावरून ज्ञात होतें. कित्येक वर्षांपूर्वी सिरपुर येथें सुमारें ५०–६० धातूमूर्ति सहजगत्या जमीन खणतांना सांपडल्या होत्या. त्यातील अवशिष्ट व ज्ञात मूर्तींपैकी सोन्याचें पाणी दिलेली बौद्धधर्मीयांच्या 'तारा' ह्या देवतेची प्रतिमा तर सिरपुर येथील कलाकुसरीच्या कामाचा अत्युत्कृष्ट नमुना म्हणून समजली जाते. नवीन उत्खननांत सांपडलेल्या मूर्ति देखील

अशाच प्रेक्षणीय आहेत. नागपुर व रायपुर येथील संग्रहालयांतील पाण्डव-कालीन बहुतेक सर्व मूर्तीचे डोळे त्या आकाराचे चांदीचे पत्रे कापून बसविलेले आहेत व हेंहि ह्या मूर्तीचें वैशिष्टच मानलें पाहिजें. अशा तऱ्हेची घडण मध्ययुगानंतर तसेंच अर्वाचीन काळांत कित्येक जैन आणि वैदिक देवतांचे बाबतींत अवलंबिलेली आढळते. पण प्रस्तुत लेखकाचे मतें चांदीचे डोळे असलेल्या मूर्तीचें हें सर्वांत प्राचीन उदाहरण होय.

सिरपुर येथील उत्खननांत ज्या धातूमूर्ति सांपडल्या, तसेंच जीं शिल्पें उजेडांत आलीं त्यावरून सिरपुर हे एका विशिष्ट घडणीचें किंवा कलाप्रणालीचें माहेरघर (School) म्हणून मानलें पाहिजे असें प्रस्तुत लेखकास वाटतें. ह्या प्रणालीवर गुप्त-शिल्पकलेची छाप स्पष्ट दिसून येते. प्रभावळीची गोलाकृति रचना, आसनावर अधोवस्त्र लोंबते टांगण्याची पद्धत, केसास काळा रंग, तसेंच ओठ ताम्रवर्ण ठेवणें, मूर्तींत किमती रत्नें किंवा खडे वापरणें इत्यादि कित्येक नवनवे प्रकार ह्या प्रणालींत आढळतात व ह्यांतीलच कांहीं विशिष्ट ढबी पुढे कलचुरि कालांत जी शिल्पें बनविण्यांत आलीं त्यांत अनुकरणानें उचलल्याचें स्पष्ट दिसतें.

गुप्तोत्तर कालांतील शिल्प

गुप्तोत्तर कालानंतर सर्वसाधारणपणें संबंध भारतांतच कलेला एक प्रकारची ओहोटी लागलेली दिसते, व मध्यप्रदेशहि त्यास अपवाद नाही. ह्या कालानंतरचें शिल्प सामान्यत: बोजड, कलाकुसरीच्या प्राबल्यामुळें सुबकतेपेक्षां बाह्यालंकारावर जास्त भर इत्यादि दोषांमुळे बेढब व नाजुकतेचा अभाव असल्याप्रमाणें दिसतें. कोणतीहि विशिष्ट कारणपरंपरा न लावता आली तरी मध्ययुगांत देवळें, मूर्ति वगैरेसाठी प्रचंड शिलांचा उपयोग हेहि एक वैशिष्टच मध्यभारतापासून ते थेट दक्षिण हिंदुस्थानच्या टोकापर्यंत आढळून येणाऱ्या वेगवेगळ्या कलाप्रकारांत आढळून येतें.

गुप्तोत्तर काळांत कलचुरि राजवंशाव्यतिरिक्त विशेष नांव घेण्याजोगें मोठें राजघराणें मध्यप्रदेशांत नांदलें नाहीं. साधारणपणें इ. स. ८४० पासून ते थेट बाराव्या शतकाचे उत्तरार्धापर्यंत ह्या राजवंशाचें वर्चस्व, जबलपूरजवळच्या नर्मदेच्या खोऱ्यांतील भाग, डाहल म्हणून उल्लेखिला गेलेला प्रदेश, व कमी अधिक प्रमाणांत गंगेच्या खोऱ्यापर्यंतचा उत्तरेकडील मुलूख ह्यावर सतत होतें.

कलचुरि राजवटींतील बहर

ह्या राजवंशाचे कारकीर्दीत स्थापत्य व शिल्पकला ह्यांना एकसारखें उत्तेजन मिळून, कलचुरि कालांतील बहुसंख्य शिल्पें व देवळांचे अवशेष आजही अभ्यासकांचे नजरेपुढें फार मोठ्या प्रमाणावर उप-

लब्ध आहेत. श्री. राखालदास बानर्जी ह्यांनी ह्या शिल्पांचा व स्थापत्यकलेचा स्वतंत्रपणें अभ्यास केला तेव्हां त्यांनी त्यांचे तीन वेगवेगळे कालखंड कल्पून, त्यांच्या घराण्याच्या अगदी प्रारंभींच्या कालचें शिल्प, कलचुरि कर्णदेव ह्या त्या घराण्यांतील अत्यंत पराक्रमी राजाचे काळांतील शिल्प, व शेवटचें तिसरें घराण्याच्या अगदी अखेर-अखेरचें शिल्प अशी कालक्रमानुसार विभागणी केली. ह्यापैकी अगदी प्रारंभीच्या काळांतील अवशेष कारीतलाई, बिल्हरी, छोटी देवरी, भेडाघाट वगैरे जबलपुर नजिकच्या प्रदेशांत अद्यापि विद्यमान आहेत तर, कलचुरि कर्णाच्या वेळचें शिल्प व देवळें मध्यप्रदेशाचे उत्तरीय भागांत जागजागीं विखुरलेलीं आहेत. फारसा अत्युक्तीचा दोष न पत्करतां असेंहि म्हणतां येईल कीं मध्यप्रदेशांतील सागर, दमोह, जबलपुर ह्या जिल्ह्यांत एकहि खेडें असें नाही कीं जेथें थोड्या फार प्रमाणांत ह्या कालांतलें कोणते ना कोणते तरी अवशेष विद्यमान नाहीत.

संशोधनाची गरज

ह्या कालातील शिल्पकलेचें प्रमुख केंद्र अर्थातच त्रिपुरी हे राजधानीचें शहर होतें व ह्या कालांतील अभ्यासास उपयुक्त अशी प्रचंड सामुग्री तेथें पूर्वी उपलब्ध होती. परंतु त्यांतील बहुतेक सर्व अज्ञानमूलक समजुतीमुळें व रेल्वेस दगड पुरविण्याच्या कंत्राटांमुळें बहुतांश नष्टप्राय झाली. तथापि तेथें जे थोडें शिल्प आज त्रिपुरीस भग्नावशेषांच्या रूपानें उपलब्ध आहे तें तत्कालीन कलेची भव्यता व विशाल स्वरूप ह्यांची कल्पना करून देण्यास पुरेसें आहे. विध्वंसकांचे तावडींत न सांपडलेलें कांहीं शिल्पसाहित्य अजूनहि त्रिपुरीस घनदाट जंगलाने आच्छादून गेल्यामुळें थोड्याफार रीतीनें संरक्षित व संशोधनांची वाट पहात अजून गडप झालेल्या स्थितींत आहे.

कलचुरि कालांतील स्थापत्यकलेचा नमुना म्हणून भेडाघाटजवळील चौसष्ट योगिनींच्या मंदिराचा उल्लेख येथें अवश्यमेव केला पाहिजे. योगिनींचें असें ह्या प्रांतातील हे एकमेव उदाहरण आहे. अन्यत्र खजुराओ येथील मंदिर, राणीपुर–झरियाल येथील मंदिर, तसेंच कोईमतुरजवळील मंदिर अशीं चौसष्ट योगिनींचीं देवळें भारतांत अन्यत्र उपलब्ध होत असलीं तरी मंडपाकार वर्तुळाकृति रचनेचें हें स्थापत्य फारच वैशिष्टयपूर्ण आहे, व त्यांत बहुतांशी सर्व योगिनींचीं नांवें त्या त्या मूर्तींवर कोरलेलीं आढळल्यामुळें ह्या देवळास विशेषच महत्त्व प्राप्त होऊन पाशुपत सांप्रदायाच्या अभ्यासकांसाठी ह्या मूर्तींच्यामुळें एक नवेंच दालन खुलें झालें आहे. भेडाघाट येथील ह्या मंदिराची अस्पष्ट कल्पना करून देईल अशा एका वर्तुळाकृति देवालयाचे भग्नावशेष प्रस्तुत लेखकानें त्रिपुरीस उत्खनन करीत असतां उजेडांत आणले होतें. पाशुपत संप्रदायाशी संलग्न असलेला सुप्रसिद्ध गोलकी–मठ तोच असावा असेंही अनुमान तेथें मिळालेल्या पुरातत्त्व-

वरून काढतां येतें. व त्रिपुरी येथील उत्खननांत सुप्रसिद्ध कर्ण राजानें बांधविलेला एक किल्लाह त्याच्या अवशेषांवरून चौगान नामक क्षेत्रांत अंशरूपानें उकरून काढण्यांत आला व त्यायोगें कलचुरि कालातील लष्करी स्थापत्यकलेचा एक नमुना नव्यानेंच नजरेंत आला.

कलचुरि कालांतील जागजागीं विखुरलेले स्थापत्यकलेचे अवशेष व शिल्पें ह्यांची एक जंत्रीच लेखकानें आपल्या "मध्यप्रदेश के पुरातत्त्व-की रूपरेखा" ह्या ग्रंथांत दिली आहे, ती जिज्ञासूंनी अवश्य पहावी.

कलचुरि कालांत बौद्ध, जैन व वैदिक अशा तीन्ही धर्मपंथांचा प्रसार मध्यप्रदेशांत झाला व ह्या सर्वांची कलचुरिकालीन शिल्पें अभ्यास-कामाठी उपलब्ध आहेत. त्रिपुरी येथील मूर्ति व गोपालपुर येथील मूर्ति ही बौद्धधर्मीयांचीं विशेष उल्लेखनीय शिल्पें आहेत. तर जैन धर्मीयांची बहुसंख्य शिल्पें जबलपूर, दमोह, कटनी ह्या जिल्ह्यांत सांपडतात. हिंदुधर्मीय शिल्पें तर शेकड्यांनी मोजतां येतील. स्वतंत्र मूर्तिरूपानें कोरलेली वराह शिल्पें तसेंच शिवपार्वतीचीं शिल्पें ही कलचुरि-शिल्पकलेचा वैशिष्ट्यें म्हणून येथें उल्लेख करण्यासारखीं आहेत.

कलचुरिकालीन शिल्पाचे विशेष

कलादृष्ट्या कलचुरि कालांतील शिल्प त्याच्या भव्यतेमुळें उठून दिसतें. अवयवांचा रेखीवपणा, दागिन्यांची रेलचेल, वस्तुनिष्ठ यथा-तथ्याचें विशेष कसोशीनें पालन केल्यामुळें सूक्ष्म व बारीक कामा-कडे विशेष लक्ष हे ह्या शिल्पाचे विशेष प्रकर्षानें दिसणारे गुण आहेत. कलचुरि कलेवर गुप्त-काळांतील शिल्पांचा छाप स्पष्टपणें दिसून येते. परंतु एकाच दगडांतून निर्माण झालेलें गुप्तकालीन शिल्प व तत्सम कलचुरि शिल्प ह्यांची तुलना केली असतां भावो-त्कर्षाचे बाबतींत कलचुरि शिल्प निस्तेज, उथळ व गुणानें कमी असतें. गुप्त काळांतील शिल्पांचे वैशिष्ट्य त्यातील अवयवांचा गोल-पणा व रेषांची वक्रता, चहूं बाजूंनी पाहिली असतां एकसारखी व दृष्टिसौन्दर्यास बाध न आणणारी आहे. तर याच्या उलट कलचुरि शिल्पकार मूर्तीच्या सुबकतेचें मोजमाप एकाच स्थलावरून करीत असल्यामुळें जी मूर्ति एका विशिष्ट ठिकाणावरून पाहिली असतां फार चांगली वाटते तीच मूर्ति दुसऱ्या ठिकाणच्या दृष्टिकोणांतून (angle) कमी प्रतीची किंवा हिणकस दिसते, असा प्रकार कित्येक कलचुरि शिल्पांत झालेला प्रस्तुत लेखकाचे नजरेस आला आहे. त्यामुळें विशेषतः चेहऱ्यावर जेथें भावोत्कर्ष ज्यास्त स्पष्ट-पणें प्रतीत व्हावयाचा त्या ठिकाणी मूर्तीचे वामांग फार उत्कृष्ट तर दुसरी बाजू तितकीच निकृष्ट अशी अवस्था, कलचुरि काळां-तील शिल्पांचे जे अनेक नमुने सागर विश्वविद्यालयाचे संग्रहांत आहेत त्यांवरून, स्पष्टपणें दिसून येते.

वस्त्रावरील घड्यांचे सूक्ष्म रेषांनी केलेलें चित्रण, तसेंच अधोवस्त्राचा व्यासपीठावरील लोंबता भाग दाखविण्याची ढब कलचुरि कलाकारांनी उघड उघड पाण्डवकालीन छत्तिसगडी शिल्पावरून उचललेली दिसते व हा कलाप्रकार बिलासपूर–रतनपूर भागातून चेदि देशांत प्रसार पावला असावा असें अनुमान करण्यास जागा आहे. परंतु कलचुरींच्या त्रिपुरी शाखेच्या वास्तुशिल्पाचें जसें पद्धतशीर अध्ययन श्री. राखालदास बानर्जी ह्यांनी केलें आहे, तसेंच त्यांच्याच समकालीन रतनपूर शाखेचें अद्यापि झालें नसल्यामुळे ह्या परस्परावलम्बित्वतेच्या प्रश्नावर सध्या मौन स्वीकारणें हेच युक्त आहे. मात्र ह्या शाखेच्या शिल्पाचा अभ्यास करण्यास छत्तिसगडांत अजूनही फार मोठ्या प्रमाणांवर वाव आहे, हें येथे नमूद करून ठेविलें पाहिजे.

डाहल किंवा चेदि हा देश बुंदेलखण्डास लागून असल्यामुळें कलचुरींच्या देवळें, वापी इत्यादि स्थापत्य शिल्पावर प्रथम समकालीन व नंतर विजेते म्हणून मिरविणाऱ्या चंदेल्ल–शिल्पाचा फार मोठ्या प्रमाणावर प्रभाव पडलेला अनेक उदाहरणांवरून अगदी स्पष्टपणें दिसतो.

दक्षिण विदर्भांतील स्थापत्यपरंपरा

कलचुरि कालानतरचें विशेषतः ह्या शिल्पकलेचा ऱ्हास प्रतीत करणारें शिल्प पुष्कळ प्रमाणांत उपलब्ध होत असलें तरी त्याविषयीचें साहित्य फारच विखुरलेलें, विस्कळीत स्वरूपाचें व त्यामुळें त्याविषयीं अंदाज बांधण्याच्या परिस्थितींत नाही. बस्तर संस्थान, छत्तिसगढ वगैरे भागांतील देवळांचे एतद्विषयक वर्णन सर्वस्वी अपुरें व भ्रमांत टाकण्याजोगं आहे. व कालनिश्चितीविषयी यथार्थं गमकेंही पण त्यांत नोट सांपडत नाहीत. चांदा जिल्ह्यांतील मार्कंड येथील विशाल देवळाचा समूह ह्याच संधिकालांत मोडतो. परंतु शिल्पवैशिष्ट्यामुळे विदर्भाच्या दक्षिणेकडील यवतमाळ, अकोला, वाशीम आदि जिल्ह्यांतून यादव राजवटीच्या प्रारंभापासून तो तहत मुसलमानी राजवटीच्या प्रारंभापर्यंत एक स्थापत्यपरंपरा नजरेस येते. सामान्यतः हा शिल्पाचा प्रकार हेमाडपंती देवळें ह्या नांवानें ओळखला जातो. ह्याचे जनकत्व यादव राजा रामचंद्र ह्याचा श्रीकरणाधिप हेमाद्रि ह्याच्याकडे लौकिक परंपरेस अनुसरून दिलेलें आढळतें. परन्तु त्याच्या पूर्वीचींहि 'हेमाडपंती' ह्या सदरांत मोडणारीं बहुसंख्य देवळें, शिलालेखादि पुराव्यावरून उपलब्ध होत असल्यामुळें ह्या माहितींत फारसें तथ्य नाहीं.

हेमाडपंती शिल्पाचे देवळें, मठ, विहिरी असे प्रकार असून त्यांचें मुख्य वैशिष्ट्य म्हणजे मोठमोठया ताशीव शिला एकमेकांवर रचून त्यांच्या बांधकामांत चुन्याचा उपयोग न करतां केवळ दगडाच्या वजनाचा योग्य समन्वय करून उभारलेलीं असतात. ह्या बांधकामांत योग्य त्या ठिकाणीं

प्रथम चौकोनी, नंतर अष्टकोनी, नंतर सोळाभुजी अशा प्रमाणांत ताशीव खांबांचा व चौफुल्या सारख्या कीचकांचा उपयोग केला जातो. मंदिरांतील छतांचा भाग देखील प्रथम चौकोनी, नंतर अष्टकोनी अशा तिरप्या मोठमोठ्या लाटा वापरुन वर निमुळता होत गेलेला असतो व क्वचित् प्रसंगी त्यांत प्रसंगानुरुप, अर्धगोलाकृति, त्रिकोणाकृति अशा अलंकृति वापरल्या जातात. भक्कमपणाबरोबरच साधपणा हें हेमाडपती शिल्पाचें महत्वपूर्ण वैशिष्टय आहे. परंतु प्रसंगविशेषीं चुन्याचे जाड-काम नसल्यामुळें, ह्या बांधकामांतील एखादा दगड निखळला तर सर्वच ढासळून किंवा कोलमडून पडतें हें ह्या शिल्पप्रकारांतील मोठें वैगुण्य आहे. विशिष्ट पद्धतीच्या शिल्पकलेची जोड असल्याशिवाय किंवा शिला-लेखादि पुरावा उपलब्ध झाल्याशिवाय, केवळ साधेपणामुळें ह्या स्थापत्य-कलेच्या कालनिश्चितीचें गमक हेमाडपती वास्तुकलेंत सापडत नाही व त्यामुळें ह्या इमारतोंचा काल बऱ्याच वेळां केवळ अनुमानानें अजमावा लागतो, ही ह्या शिल्पाविषयीची संशोधकांना नेहमी भासणारी अडचण आहे व ह्यांच कारणास्तव ह्या वास्तु–कलेचा " मध्ययुगीन " असा उल्लेख करावा लागतो.

किल्ल्यांचा अभ्यास आवश्यक

विदर्भात अकोला, बुलढाणा, वर्धा, वाशिम, नागपूर, तसेंच भंडारा जिल्ह्यांत सुमारे १०० ठिकाणीं हेमाडपंती देवळांचे अवशेष सांपडले आहेत व त्यांतील कित्येकांची चित्रें त्या त्या जिल्ह्यांचे गॅझिटियर्समधून प्रसिद्धहि झालीं आहेत. कझिन्सने आपल्या पुस्तकांत लोणार, मेहेकर, सिरपुर, बार्शी, टाकळी, सातगांव, साकेगांव, कोठाली व धोत्रा ह्या ठिकाणच्या देवळांचें स्थूल वर्णन दिलें आहे. त्यांत शिल्पशास्त्रीय चर्चा विशेषशी नसली तरी त्या त्या वास्तुशिल्पाचें यथादर्शन वर्णन त्यांत चित्रें व आलेख ह्यासहित दिलें असल्यामुळे हें पुस्तक हेमाडपंती शिल्पाचे अभ्यासकांस फारच उपयुक्त आहे.

यादव राजवटींचा अंत झाल्यावर विदर्भांत मुसलमानी राजवट सुरु झाली. व ह्या काळांत लष्करी संरक्षणाचे दृष्टानें विदर्भ तसेंच मध्यप्रदेशाचा बुंदेलखंडास लागून असलेला मुलूख ह्यांत किल्ल्यांची मोठ्या प्रमाणावर वाढ झाली. ह्या लष्करी किल्ल्यांची रचना, त्यांतील वास्तु–शिल्प हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय असला तरी त्याकडे फारसें लक्ष्य पुरविलें गेलेलें नाही व सर्व-सामान्यत: हा विषय योग्य साधनांचे अभावीं फार कमी हाताळला गेला आहे. हीच गोष्ट समकालीन गोंड, दांगी वगैरे लहानमोठे स्थानिक राज्यकर्त्यांच्या लष्करी किल्ल्यांविषयी आहे. तथापि ह्या विषयाचा विचार प्रस्तुत लेखाचे कालखंडाच्या कक्षेंत येत नसल्यामुळे येथेच थांबलेलें बरें !

मध्यप्रदेश संशोधन मंडळाचें कार्य व प्रगति
विंशतिवार्षिक समालोचन

प्रस्तुत पुस्तकांत या राज्यांतील विविध क्षेत्रांतील संशोधनकार्याची माहिती आली आहे. तेव्हा त्या अनुरोधानें मध्यप्रदेश संशोधन मंडळानेहि जी अल्प सेवा केली, तिचेहि विशेषरूपानें समालोचन केल्यास तें सुसंगत दिसेल असें वाटल्यावरून तें करावयाचें ठरविलें आहे. यापूर्वीं प्रथम दशवार्षिक व नंतर पंचदशवार्षिक समालोचनें करण्यांत आलीं होतीं. यांपैकीं दुसरें समालोचन संस्थेनें १९४९ सालीं जें 'निवडक निबंध' नांवाचें पुस्तक प्रसिद्ध केलें, त्यास परिशिष्टरूपानें जोडलें आहे. तरी तेव्हापासून आणखी संस्थेच्या आयुष्यांत ६–७ वर्षांची भर पडल्यामुळें पुनः प्रारंभापासून धावता आढावा घ्यावा असें कार्यकारी समितीनें ठरविल्यावरून हें निवेदन सादर करीत आहे. प्रस्तावनेंत या मंडळाची पूर्वपीठिका थोडक्यांत समजावून दिली आहे. तेव्हां तिची पुनरावृत्ति करीत नाहीं. तथापि कांही विशिष्ट गोष्टी तेवढ्या लिहितों.

२. १९३३ च्या डिसेंबरांत नागपुरांत महाराष्ट्र साहित्य संमेलन झालें. त्या प्रसंगी ऐतिहासिक वस्तूंचें प्रदर्शनहि भरविलें होतें. त्यांतील बरेचसे अस्पृष्ट व असंशोधनावस्थेंत असलेले ऐतिहासिक अवशेष पाहून येथील बऱ्याच लोकांना त्यांचें संशोधन होणें इष्ट आहे असें वाटल्यावरून या प्रांतांतहि संशोधन मंडळ स्थापन व्हावें, अशी नागपुरांतील प्रमुख नागरिकांना इच्छा झाली. तदनुसार श्री. नीळकंठराव भवाळकर यांचे अध्यक्षतेखालीं सभा भरून तीत 'वाङ्मयेतिहास-संशोधन मंडळ' स्थापन करण्याचें ठरलें, ही हकीकत प्रस्तावनेंत आली आहे. नंतर प्रा. पोतदारांच्या सूचनेवरून सर भवानीशंकर नियोगी यांच्या अध्यक्षतेखालीं ३० जणांचें एक नियामक मंडळ निर्माण करण्यांत आलें. त्यावर प्रा. पोतदार व श्री. य. खु. देशपांडे यांना सल्लागार म्हणून राहण्याची विनंति करण्यांत आली व ती त्यांनी मान्य केली. त्यानंतर त्यांना संस्थेचे सन्मान्य सभासद म्हणून निवडण्यांत आलें. पहिल्या सभेंत श्री. भवाळकरादि सहा सदस्यांची पोट समिति घटना तयार करण्यासाठीं नेमण्यांत आली. सभासदत्वाची वार्षिक वर्गणी रु. ३ असावी हेंहि ठरलें व तीच हल्लीं चालू आहे. अशा रीतीनें उत्साहपूर्ण वातावरणांत संस्थेचा मुहूर्तमेढ रोवण्यांत आली.

३ नंतर सुमारें दोन आठवड्यांनी संक्रांतीच्या सुमुहूर्तावर (१४–१–१९३४) प्रा. मिराशी यांची 'खामखेड येथील ताम्रपट' या विषयावरील निबंधाचे रूपानें पहिली टिपरी पडली. दरम्यान घटना समितीनें आपला मसुदा सादर केल्यावर एप्रिलच्या आरंभीं साधारण सभेंत संस्थेची घटना मंजूर करण्यांत आली. या मसुद्यांतील विशेष हा कीं, त्यांत संस्थेचें आरं-

भीच्या 'वाङ्मयेतिहास मंडळ' या नांवाऐवजीं 'मध्यप्रांत संशोधन मंडळ' असें नामकरण सुचविण्यांत आलें होतें, तें स्वीकृत झालें. तें नांव पुढें १९५१ मध्यें कां व कसें बदललें हें प्रस्तावनेंत दिलें आहे. सांप्रत 'मध्यप्रदेश संशोधन मंडळ' हें मराठी व 'मध्यप्रदेश रीसर्च सोसायटी' हें इंग्रजी अशीं दोन नांवें चालू आहेत. घटना अमलांत येतेवेळीं म्हणजे १९३५ च्या प्रारंभीं संस्थेला ३२ सभासद लाभले. त्याचप्रमाणें श्री. नागोराव पोषट्टी यांचेकडून कांही ऐतिहासिक पत्रें, नाणीं व दुर्मिळ पुस्तकें यांची देणगी मिळाली. पुण्याच्या भारत इतिहास संशोधन मंडळाचें त्रैमासिकहि विनामूल्य येऊं लागलें; व महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या स्वागत मंडळाकडून १०१ रु. ची देणगी मिळाली. अशा रीतीनें सुमारें २०० रु. च्या पुंजीवर एक वर्षाचा कारभार चालू झाला. नियामक मंडळातून ७ सभासदांचें कार्यकारी मंडळ निवडण्यांत आलें. या कार्यकारी मंडळाचे प्रा. मिराशी हे अध्यक्ष व प्रि. पांढरीपांडे हे मुख्य चिटणीस म्हणून नियुक्त झाले.

४. अशा रीतीनें हीं प्रारंभीचीं प्रसादचिन्हें दिसूं लागल्यावर अंगीकृत कार्य तडीस जाईल अशी आशा वाटूं लागली. संस्थेचें मुख्य उद्दिष्ट म्हणजे संशोधनकार्यास उत्तेजन देणें. त्या दृष्टीनें अनेक विद्वान बद्धपरिकर झाले व त्यांच्या लेखण्यांतून अनेक निबंध उतरूं लागले. त्यांपैकीं सुमारें २०० निबंध आज पावेतों संस्थेच्या मासिक सभांतून व वार्षिकोत्सवाचे वेळीं वाचण्यांत आले. त्यांची यादी परिशिष्टरूपानें दिली आहे. त्यांतील जे 'महाराष्ट्र' व 'तरुण भारत'सारख्या स्थानिक वृत्तपत्रांतून व इतरत्र प्रसिद्ध झाले, त्यांचे सारांश अभ्यासकांच्या उपयोगासाठी देतां आले असते, परंतु स्थलाभावास्तव तसें करतां येत नाही, याबद्दल खेद होतो. तरी जेथे जेथे ते प्रसिद्ध झाले त्या त्या स्थळांचा यावच्छक्य उल्लेख केला आहे.

५. निबंधांप्रमाणें वार्षिकोत्सवाचे वेळीं जीं अध्यक्षीय भाषणें झालीं तींहि नितान्त मार्गदर्शक व उद्बोधक अशीं होतीं, हें सांगावयास नको. याशिवाय देशांतील ख्यातनाम विद्वानांनीहि आपल्या आवडीच्या विषयावर मधून मधून व्याख्यनें दिलीं होतीं. त्या व्याख्यानांचीहि एक यादी परिशिष्टांत जोडली आहे.

६. अभ्यासकांचा मुख्य आधार म्हणजे संदर्भग्रंथ. त्या दृष्टीनें ज्या नागरिकांजवळ दुर्मिळ ग्रंथांचे संग्रह होते त्यांनी ते संस्थेच्या स्वाधीन केले. अशा सद्गृहस्थांत कै. नागोराव पोषट्टी, कै. दा. के. ओक, कै. कृष्णशास्त्री घुले, कै. नीळकंठराव भवाळकर, श्री. ग. त्र्यं. माडखोलकर, श्री. हरि नारायण वैद्य, श्री. वि. मा. वाईकर, श्री. काळे (वर्धा), कै. या. मा. काळे, श्री. गो. चिं. तांबे व श्री. का. कृ. गंधे यांचा उल्लेख प्रामुख्याने केला पाहिजे. कै. भवाळकरांच्या संग्रहाचें तर त्यांचे सुपुत्र श्री. गजाननराव यांनी एक प्रकारें सालंकृत कन्यादानच केलें. कारण त्यांनी पुस्तकांबरोबर एक मोठें कपाटहि संस्थेस दिलें.

७. संस्थेंत ज्या पोथ्या आहेत त्यापैकीं कांही कै. या. मा. काळे यांच्या संग्रहांतील असून, कांहीं श्री. गंगाधर रामकृष्ण देव, कै. त्र्यंबकजी देव, व श्री. वि. मा. वाईकर यांच्याकडून आल्या आहेत. थोडीं फार ऐतिहासिक कागदपत्रें व नाणींहि कै पोषट्टा, श्री. चट्टे व म. म. मिराशी यांचेकडून आलीं आहेत. एकदा प्रारंभीं नाण्यांचें वाचन झालें होतें, परंतु हल्लीं ती माहिती उपलब्ध नसल्यामुळें अडचण उत्पन्न झाली आहे. त्याचप्रमाणें पोथ्यांचेंहि मूल्यमापन व्हावयास हवें.

प्रत्यक्ष स्थळ निरीक्षण व संशोधन या करितां प्रा. मिराशी, त्रि. पांढरीपांडे प्रभृति ५ सभासद व इतर सद्गृहस्थ मन्सर खाणीचे मॅनेजर श्री. वेलस्टेड यांच्या सूचनेवरून १९३५ च्या मार्चमध्यें शिवनी रस्त्याजवळील नांदपूर गावीं गेले होते. नांदपूर येथें जाण्यांत हा हेतु होता कीं, प्रभावतीगुप्तेच्या व इतर दोन ताम्रपटांत ज्या नदिवर्धनाचा उल्लेख आहे, तें नांदा व हें, कीं रामटेक जवळील ३–४ मैलांवर असलेलें नगरधन, याचा छडा लावावा. या नंतर त्याच वर्षाच्या नोव्हेंबरांत प्रा. मिराशी, श्री. ल. रा. कुळकर्णी हे २०–२५ तिकडच्या मंडळीसहित देवटेक, जि. चांदा, येथें गेले. तेथें जाण्यापूर्वी त्यांनी पौनी येथेंहि कांही शिलालेखांचे छाप घेतले. देवटेक येथें त्यांनी वाकाटक व अशोककालीन शिलालेखांचे छाप घेतले. त्यावरून त्या लेखांचा अभ्यास करून प्रा. मिराशी यांनी मंडळापुढे आपला निबंध वाचला. (पहा, महाराष्ट्र ८–१२–३५) त्यांचप्रमाणें भांदक व मार्कंडी (जि. चांदा) येथें हि १९३७ च्या फेब्रुवारींत अशीच एक तुकडी गेली होती. तींत डॉ. य. खु. देशपांडे, प्रा. मिराशी, प्रा. चतुर्वेदी मिळून ६ जण होते. (पहा, महाराष्ट्र १४–३–३७), या शिवाय प्रा. मिराशी व श्री दे. गो. लांडगे हे सवडीनुसार सभापरिषदांच्या निमित्तानें व एरवीहि स्वतंत्रपणें या प्रांतांतील व प्रांताबाहेरील ऐतिहासिक स्थळें व संग्रहालयें पाहण्यास जात असतात. अलीकडचें एकच उदाहरण द्यावयाचें तर श्री. लांडगे हे १९५४ च्या उन्हाळ्यांत या प्रांतांतील चौरागडसारखें जंगलांत असलेलें दुर्गम स्थान पाहून आले व त्यावर त्यांनी परिचयात्मक ३ लेखांक लिहिले. (तरुण भारत, २७–५, ३–६, १७–६, १९५४.) प्रा. बनहट्टी व श्री. लांडगे असेच संस्थेच्या वतीने बाहेरगांवी हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या बैठकींस उपस्थित राहिले आहेत. या बैठकी बहुधा ऐतिहासिक स्थळींच भरत असतात. त्यामुळें त्यास सहजच तीं स्थळें पाहतां येतात.

९. संशोधनास पोषक अशी माहिती लोकांस व्हावी म्हणून मधून मधून संस्थेच्या वार्षिक उत्सवाचे वेळीं व मागणी झाल्यास बाहेर गांवींहि संस्थेतील प्रदर्शनीय वस्तु व नाणीं नेण्यांत येतात. विशेषतः विदर्भ साहित्य संमेलनाच्या वेळीं चांदा, मोझरी व खामगांव येथें संस्थेचे कागदपत्र दर्शित करण्यांत आले होते.

१९३२ सालीं त्रिवें मच्या हिस्टॉरिकल कमिशनच्या बैठकीचे वेळीं- हि नाणीं व पत्रें पाठविलीं होतीं. तसेंच १९४५ सालीं इंदूर येथें भरलेल्या हिस्टॉरिकल रेकॉर्डस् कमिशनच्या बैठकींत प्रा. बनहट्टी यानी मंडळांतील कांही नाणीं प्रदर्शित केलीं होतीं. पुन: १९५० मध्यें त्याच कमिशनच्या नागपूर येथील बैठकीच्या निमित्तानें जें प्रदर्शन भरलें होतें तेथंहि मंडळाचा पत्रसग्रह दाखविला गेला. यात काही श्री. लांडग यांचा स्वतःचाहि होता. संस्थेंत मात्र अजून स्थायी प्रदर्शनाचा सोय करतां आली नाही.

१० संस्थेच्या कार्यापैकी एक महत्त्वाचें कार्य म्हणजे ग्रंथप्रकाशन. या कामालाहि संस्थेनें स्थापन झाल्यापासून दोन वर्षांनच हात घातला; व १९३६ सालीं गुप्ते यांचा नागपूकर भोसले यांची दुर्मिळ बखर पुनर्मुद्रित करण्यांत आली. त्या ग्रथात शब्दकोश व सूची वगैरे घालून कै. या मा. काळे यांना तिचें पुन: संपादन केलें. संस्थेचे अध्यक्ष सर भवानीशंकर नियोगी यांनीं संस्थेला ५०० रु. देऊन आश्रयदाते होण्याचें कबूल केलें व तावडतोब २०० रु. दिले म्हणून हें काम हाती घेता आलें. त्या ग्रंथाचें प्रकाशन १९३७ च्या उत्सवाचे अध्यक्ष प्रा. कृ पां. कुळकर्णी यांच्या हस्तें झालें. त्याच वेळीं श्री. ह. ना. नेने यांचा 'दृष्टांतपाठ' या महानुभावीय ग्रंथाचाहि अध्यक्षांच्या हस्तें संस्थेकडून पुरस्कार करण्यांत आला. यानंतर कार्यांत बराच खड पडला. ते पुन: १९४९ पासून सुरू झालें व तेव्हापासून यथाशक्ति प्रकाशनें होत आहेत. १९४९ ला पंचदशवार्षिक प्रतिवृत्त व संस्थेंत वाचलेल्या निबंधांपैकी कांही 'निवडक निबंध या नांवाखालीं पुस्तकरूपाने प्रसिद्ध करण्यांत आले; व त्याचें प्रकाशन त्या वेळचे शिक्षणमंत्री डॉ. वा. शि. बार्लिंगे यांच्या हस्तें झालें. १९५० साली रेकॉर्डस् कमिशनची बैठक नागपुरांत झाली, तेव्हा मंडळाचे कार्यवाह श्री. लांडगे यांना नागपूरची ओळख करून देण्याची कमिशनच्या चिटणीसांनी विनंति केली; व श्री· लांडगे यांनी 'A Peep into the topography of Nagpur' म्हणून एक लेख लिहून दिला. त्याच्या २०० प्रती संस्थेच्या सभासदांसाठीं म्हणून अल्पमूल्यांत विकत घेतल्या व त्यांना वांटून दिल्या.

१९५४ सालीं एप्रिल महिन्यांत दोन नवीन पुस्तकांचें प्रकाशन या वेळचे शिक्षणमंत्री श्री. पु. का. देशमुख यांच्या हस्तें झालें. त्यांपैकीं एक पुस्तक म.म. मिराशी यांच्या बहुसंख्य लेखांपैकीं केवळ १६ लेखांचा संग्रह 'संशोधन मुक्तावलि, सर १ ला' या नांवाखाली प्रसिद्ध झाला. दुसरें पुस्तक श्री. दे. गो लांडगे यांचें 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' हें होय. त्यानंतर आता प्रस्तुतचें पुस्तक प्रसिद्ध होत आहे. खेरीज कै. या. मा. काळे यांचा 'नागपूर प्रांताचा इतिहास' या ग्रंथाच्या उर्वरित प्रतींची विक्री करण्याचें संस्थेनें पतकरलें आहे. या सर्व प्रयत्नांमुळें हल्लीं या प्रान्ताचें इतिहासाचें दालन खुलें झाल्यासारखेंच आहे. कै. काळे यांचे दुसरें पुस्तक 'विदर्भाचा इतिहास.' या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध नाहींत. त्यांत अद्ययावत् माहितीची भर घालून तें पुनर्मुद्रित करणें जरूर आहे. श्री लांडगे यानी ठिकठिकाणीं प्रसंगानुसार नागपूरच्या इतिहासावर व्याख्यानें

दिल्यामुळेहि ऐतिहासिक ज्ञानाच्या प्रसाराला अंशतः मदत झाली आहे. याखरीज प्रा. मिराशी व श्री. लांडगे यांचे लेख इंग्रजी व मराठी नियतकालिकांतून प्रसिद्ध होत असल्यामुळें जिज्ञासूंना त्यांचा फायदा होत असावा.

११. कोणत्याहि संस्थेचे मुख्य दोन आधारस्तंभ होत. एक मनुष्यबळ, दुसरें द्रव्यबळ. सभासदांच्या प्रगतीचें व त्यांचेपासून मिळालेल्या वर्गणीचें कोष्टक परिशिष्टांत दिलें आहे. आरभीं सुमारे १० वर्षें, साधारण सभासद पैकीं खरी संख्या ३० ते ५० यांचे दरम्यान राहिली असें वसुलीवरून दिसून येतें १९४७ च्या अखेरीस श्री. लांडगे हे पक्केपणीं निवृत्त झाल्यावर त्यांनी संस्थेंत लक्ष घातलें व सभासदांची संख्या आणि त्याचबरोबर वर्गणीहि वाढीस लागली. आजीव सभासदांच्या संख्येंतहि उत्तरोत्तर वाढ होतांना दिसून येते. प्रकाशित पुस्तकरूपाने मोबदला न देतां सभासदांकडून नुसतीच वर्गणी मागणें योग्य वाटत नाही, म्हणून अलीकडे कसेंहि करून नैमित्तिक निबंधव्याख्यानांव्यतिरिक्त ग्रंथप्रकाशनावर भर देण्यांत आला आहे. संस्थेला मागील वर्षापावेतों स्वतःचें स्थान नव्हतें. त्यापूर्वी नागपूर नगरपालिका इंप्रूव्हमेन्ट ट्रस्ट, राणी लक्ष्मीबाई स्मारक समिती, नझूल या सर्वांची दारें जागेसाठीं ठोठावलीं. पण कोठेंच कांही जुळलें नाही. चालू खर्चासाठींहि सरकारकडे वारंवार अर्ज केले. स्वातंत्र्योत्तरकालीन राज्य-शासनाकडेहि दोन वर्षांपासून अर्ज पडून आहे. तथापि शासनाकडून अद्यापि अनुदानाची कृपा झाली नाही. असें असताहि आम्ही आपल्या शक्ती-प्रमाणें प्रकाशनावर खर्च करीतच गेलों. उदाहरणार्थ, बखरीसाठीं
६३० रु. खर्च आला. नागपूरचे राष्ट्रीय वाचनालयाने १०० रु.
व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ, पुणे, यांने ४० रु. त्या ग्रंथांस दिले; व
१९४४ अखेर ४३३ रु. विक्रीचे आले. मिळून जमा ५७३ रु. झाले. पुनः
प्रती बांधण्यासाठीं ८५ रु. खर्च केले व किंमतींत सवलत दिल्यामुळें व
खास प्रयत्नामुळें १९४८ पासून १५६ रु. वसूल झाले. अशा रीतीनें ७१५
रु. खर्चाविरुद्ध ७२९ रु. वसूल झाले. (२) 'निवडक निबंधां'चा छपाई
खर्च ३०८ रु. आला व त्यासाठी फक्त शिक्षणमंत्र्याकडून ५० रु. दान
मिळालें. बहुतेक सभासदांस प्रती विनामूल्य देण्यांत आल्या व आतां पावेतों
१०५ रु. ५ आ. विक्रीचे आले आले आहेत. त्याच्याहि किंमतींत सवलत दिली
आहे. प्रतीहि विशेष नाहीत. (३) 'संशोधनमुक्तावली'चा मुद्रण खर्च
१०४६–८–० आला व (४) 'नागपूरचा सांस्कृतिक इतिहास' यासाठीं
६०८ रु. खर्च झाले. त्याच्याहि प्रती सभासदांस फुकट किंवा सवलतीनें देण्यांत-
आल्या. 'संशोधनमुक्तावली' च्या प्रकाशनासाठी राज्यपालांनी १५० रु.
दिले; व एका मंत्र्यांनी मंडळाच्या कार्यासाठी ५० रु. ची देणगी दिली.
पुण्याच्या ग्रंथोत्तेजक मंडळानें दोन्ही पुस्तकांस मिळून १२० रु. दिले.
ते १२० रु. दोघां ग्रंथकारांस दिले असले, तरी त्यांनी ते संस्थेंत जमा
केले. शासनाकडून मात्र कांही मिळालें नाहीं, हें खेदानें म्हणावें लागतें. वास्त-

विक पाहतां नागपूर इलेक्ट्रिक कंपनीने, एका सहकारी संस्थेनें व एका श्रीमंतानीं जर अनुक्रमें रु. ५०१, रु. १५० व रु. २५, दिले नसते, तर १९५२ व १९५३ सालीं संस्थनें प्रतिकूल परिस्थितींत जी थोडी बहुत शिल्लक टाकली होती, ती पूर्णपणे संपून गेली असती. सभासदांशिवाय भेटी व अभिप्राय या करिता ग्रंथांच्या प्रती द्याव्या लागतात. तरी या दोन्ही पुस्तकांची ५०० मुद्रितें जशींच्या तशीं आहेत. आज पावेतों मुक्तावलीचे २०९ रु. व सांस्कृतिक इतिहासाचे १६४ रु. वसूल झाले. अर्थात् यांत किंवा वरील सवविक्रीच्या आकडयांत जाहिरात खर्च व कमिशन वजा केलेलें नाहीं.

१२ तात्पर्य, १० वर्षांपूर्वीच्या ५०० रु. च्या मानानें जरी हल्ली ४–५ वर्षांपासून संस्था २ हजार रुपयावर आपला सर्व कारभार करीत असलो, तरी तिच्या गरजांच्या मानाने ही रक्कम अत्यंत अपुरी पडते, हें सांगणें नकोच. सरकारकडून वार्षिक अनुदान अद्यापि मिळालें नाहीं. आम्ही सरकारचें लक्ष अनुदानाकडेच काय, पण इतर बाबींकडेहि वेधीत राहिलों. उदाहरणार्थ जीर्ण अवशेषांचें संरक्षण करणें, पुराणवस्तु-सशोधन खात्याची शाखा या प्रांतात उघडणें, येथील रेसिडेन्सी रेकॉर्डचे कागद व्यवस्थेशीरपणें पहावयास मिळणें, उत्खनन करणे, हस्तलिखितांच्या संरक्षणविद्येच्या संपादनासाठीं शिष्यवृत्तीची खटपट करणें, जिल्हानिहाय सरकारी वर्णन–ग्रंथांच्या (Gazetteers) सुधारलेल्या आवृत्त्या काढणें वगैरे. व्यक्तिशः म. म. मिराशी व श्री. लांडगे यांस भारतीय व प्रांतीय महत्वाचीं कांही मानाचीं पदें मिळालीं, परंतु तेवढ्याने संस्थेचें कार्य प्रगत झालें, हें सिद्ध होत नाहीं. संस्थेला खरें साहाय्य झालें तें विदर्भ साहित्य संघाचें. संघान लो. टिळकांच्या नांवें दालन बांधून त्यात मंडळाला आपला संग्रह ठेवण्यास व कार्य करण्यास अनुमतीचा ठराव केला. मंडळाच्या सभासदांनी संघाच्या मंदिराकरिता जवळ जवळ दोन हजार रुपये जमवून दिले. या परस्पर सहकार्याने दोन्ही संस्थांमध्ये आत्मीयता वाढली असून संघाच्या संमतीने मंडळाचें कार्यालय आता विदर्भ साहित्य मंदिरांत आलें आहे.

१३ येथे आमच्या जुन्या व नव्या सहकाऱ्यांची थोडी ओळख करून देणें योग्य होईल. त्यांपैकीं कांही वयोमानास अनुसरून इहलोक सोडून गेले, तर कांही अकालीं वारले. प्रथम आमच्यांतून उपाध्यक्ष श्री. नी ब. भवाळकर हे १९४२ अखेर गेले. ते आद्य संस्थापकांपैकीं प्रमुख गृहस्थ होते. त्यानंतर लगेच दुसऱ्या वर्षी मार्चमध्ये श्री. या. मा. काळें हेहि निधन पावले; व संस्था त्यांच्या मार्गदर्शनास अंतरली. तथापि दोन्ही गृहस्थांच्या कुटुंबीयांनी संस्थेवर अपत्यवत् प्रेम केलें व आपले बहुमूल्य ग्रंथसंग्रह वगैरे देऊन प्रत्यक्ष साहाय्य केलें. श्री. गोपाळराव ओगले यांचें जसें इतर संस्थांवर तसेंच याहि संस्थेवर प्रेम होतें. संस्थेचे निबंध, इतिवृत्तें व भाषणें याचे सारांश 'महाराष्ट्रां'त प्रसिद्ध

करून ते भरीव मदत करीत. हल्लीचे संपादक श्रीं. बाळासाहेब ढवळे यांचेंहि तसेंच प्रेम आहे. गोपाळराव हे १९४५ सालीं इहलोक सोडून गेले तर दुसऱ्या वर्षी प्रा. गर्दे, श्री. दा. के. उर्फ दामूअण्णा ओक हे उपाध्यक्षद्वय व संस्थेचे वयोवृद्ध सहाय्यक श्री. नागोराव पोषट्टी हेहि आमच्यांतून नाहीसे झाले. कै. दामूअण्णांची तडफ कौतुकास्पद होती. त्यांचे चिरंजीव श्री. अनंतराव हेहि संस्थेचे सभासद असून सर्वांआधी व आनंदाने वर्गणी देण्याची तत्परता दाखवितात. कै. दामूअण्णांनंतर दोन वर्षांपूर्वी पंडित-सम्राट् म. म. कृष्णशास्त्री घुले यांचा मृत्यु झाला. तेहि संस्थेचे एक उपाध्यक्ष व नंतर सन्मान्य सभासद असत. या सर्व दुःखावर कळस म्हणजे आमचे प्रिय सुहृद् श्री. ह. ना. नेने यांचा आकस्मिक अकालीं मृत्यु होय. त्याचे संबंधी योग्य शब्दांत प्रस्तावनेंत श्रद्धांजलि अर्पण करण्यांत आली आहे.

१४ हें संस्थेचें रोप ज्यांनी लावलें त्यांचा प्रारंभीं व नंतरहि उल्लेख आला आहे. परतु सर्व दृष्टींनी प्रतिकूल परिस्थिति असतांहि त्याला आमचे कार्यवाह प्रि. पांडरीपांडे, श्री. शं. गो. चट्टे व नंतर प्रा. सावळापूरकर यांनी जर खतपाणी घातलें नसतें तर संस्था टिकली नसती. संस्था त्यांची अत्यंत ऋणी आहे. यानंतर आधी हिशेबतपासनीस म्हणून, नंतर सहकार्यवाह व नंतर मुख्य कार्यवाह म्हणून श्री. दे. गो. लांडगे यांनी संस्थेची जो सेवा केली आहे तीहि नमूद केली पाहिजे. सहकार्यवाह म्हणून प्रा. श्री. मा. कुळकर्णी प्रभृति मडळी पुढे आली, परंतु त्यांना इतर कामांनी घेरलें. म. म. मिराशी कार्याध्यक्ष म्हणून संस्थेची काळजी वाहतात व त्यांच्या निबंधांना तर कधी तोटाच नसतो. डॉ. चोळकर यांनी पुस्तकांकरितां कपाटें देऊन मडळाला अत्यंत उपकृत केलें आहे, हिशेब तपासनीसाच्या कामांतून श्री. लांडगे हे निवृत्त झाल्यापासून आमचे तरुण मित्र श्री. वा. ग. आंबेकर, एम्.कॉम्., चार्टर्ड अकौंटंट, हे संस्थेचे हिशेब विनामूल्य तपासून देत असतात, हें त्यांस भूषणावह आहे.

१५ वर संस्थेच्या कार्याचें व कार्यकर्त्यांचें संक्षेपाने वर्णन आलें आहे स्थलाभावास्तव कांही गोष्टी सोडून द्याव्या लागल्या, तरी कांहींचा थोड-क्यांत निर्देश करून हे समालोचन पुरें करतो. पहिली गोष्ट सांगितली पाहिजे ती ही कीं, ही संस्था १९४१ सालीं रजिस्टर्ड करण्यांत आली आहे. १९५० साली नागपूरच्या सरकारी वस्तुसंग्रहालयांत कांही अटींवर नेहमीसाठीं संस्थेनें कांही चित्रें प्रदर्शनार्थ दिलीं. नागपूर रेसिडेंसी रेकॉर्डचे राज्यशासनाने खंड काढणें सुरू केले आहे. पण त्याबरोबर खेदाची गोष्ट ही की, संस्थेला ते विनामूल्य देण्यासाठीं रीतसर अजून आज्ञापत्र काढण्याचें जुळत नाही. उलट दिल्लीवरून कितीतरी वाङ्मय अनाहूत येतें. फार काय मुंबईच्या भारतीय विद्याभवनाकडून इतिहासाचे प्रचंड व भरीव ग्रंथ विनामूल्य येत असतात. त्या सर्वांची संस्था आभारी आहे.

संस्थेच्या गरजा

विदर्भ साहित्य मंदिरांत स्थान मिळालें. पण तेथें आतां नेमानें कार्य करण्यास कोणीतरी हवें. त्याशिवाय संशोधनात्मक मासिकें व संदर्भ ग्रथांची भर घालू म्हटलें तरी तसें करणें शक्य नाही. 'सर्वारंभास्तंडुलप्रस्थमूलाः' हें काय कोणी सांगावयास हवें? संस्थेच्या जुन्या पोथ्या व ग्रंथ यांच्यासाठीं नवीन कपाटें व बैठकीचें सामान, कॅमेरा वगैरे घेणें आहे. अर्थात् संस्थेच्या कार्यवाहांनी कोठून सामान फुकट आण, कोठून नवीं जुनीं पुस्तकें आण, कोठून बक्षिसें मिळीव अशी खटपट आतापर्यंत केली आहे.

या प्रांताच्या राज्यपालांनी पुनः म म. मिराशी यांच्या वाकाटकीय उत्कीर्ण लेखांच्या ग्रंथप्रकाशनासाठीं १५० रु दिले, हें त्यांच्या विशाल हृदयास व सौजन्यास धरून आहे. इतर मंत्र्यांजवळहि आम्ही असेंच दान मागितलें. परंतु निष्पन्न कांही झालें नाहीं. संस्थेसमोर मुद्रणार्थ आणखीहि पुस्तकें आहेत. पण द्रव्याभावीं त्यांचें प्रकाशन हातीं घेता आलें नाहीं. १९५४ मध्ये संस्थेने प्रकाशिलेल्या 'संशोधनमुक्तावलि' या ग्रंथाचे लेखक म. म. मिराशी यांस नागपूरच्या राष्ट्रीय वाचनालयानें उत्कृष्ट पुस्तक म्हणून १०० रु. चें बक्षिस दिलें. हें दोघांसहि भूषणावह होय.

१६. शेवटीं, येथील नागरिकांचे, वृत्तपत्रांचे, विदर्भ साहित्यसंघाचे व सर्वांत अधिक म्हणजे सिटी कॉलेजने जी आमची २० वर्षे पावेतों अडगळ सहन केली व आमच्या नित्य व नैमित्तिक कार्यक्रमासाठीं आपलें प्रशस्त दालन दिलें, त्यासाठीं त्यांचें मनःपूर्वक आभार मानतों ज्या विद्वानांनी उत्सवांचें अध्यक्षपद स्वीकारलें, ज्यांनीं निबंध वाचले व व्याख्यानें दिलीं, व ज्यांनी द्रव्यसाहाय्य केलें, त्या सर्वांना संस्था शतशः धन्यवाद देऊं इच्छिते. संस्थेचें वृत्त वाचून एवढ्या प्रतिकूल परिस्थितींत ती टिकलीच कशी याचें-हि कांहींना आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. परंतु तींत जीव असला तरी तिच्यांत खरा जिवंतपणा येण्यास तरुण अभ्यासकांनी पुढे यावयास पाहिजे. तसेंच या प्रदेशाच्या सरकारने व जनतेनेहि आमच्या कार्याचें महत्त्व जाणून सढळ हातानें आर्थिक मदत केली पाहिजे. ही उभयविध मदत होईल अशी आशा व्यक्त करून हें विंशतिवार्षिक समालोचन पुरें करतों.

दे. गो. लांडगे
कार्यवाह

परिशिष्ट–अ

वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष

क्रमांक नांव	दिनांक	स्थळ	भाषणाचा सारांश कोठें आला
१ श्री. य. खु. देशपांडे	१४–१–३५	सिटी कॉलेज	महाराष्ट्र, २०–१–३५
२ श्री. या. मा. काळे	१४–१–३६	"	" १९–१–३६
३ प्रा. कृ. पां. कुळकर्णी	१४–१–३७	"	" १७–१–३७ २४–१–३७ ७–३–३७
४ डॉ. अ. स. अळतेकर	१६–१–३८	नागपूर विश्वविद्यालया-च्या ग्रंथालयाचें दालन	" २३–१–३८ ३०–१–३८
५ प्रा धर्मानंद कोसंबी	२२–१–३९	सिटी कॉलेज	" ३–३–४०
६ डॉ. प. ल. वैद्य	२५–२–४०	"	
७ समर्थभक्त श्री. शंकर श्रीकृष्ण देव	१२–१–४१	"	
८ श्री. ना. गो. चापेकर	१८–१–४२	"	
९ म. म. द. वा. पोतदार	२०–२–४४	"	
१० न्या.मू. वा. रा. पुराणिक उप-कुलगुरु, नागपुर विश्वविद्यालय	२८–१–४५	"	
११ प्रा. न. र. फाटक	१४–१–४६	,	
१२ प्रा. श्री. व्यं. केतकर	२६–१–४७	"	
१३ श्री. ज. स. करंदीकर	१–२–४८	"	
१४ श्री. आर. जी. ग्यानी,	३–१–४९	"	
१५ माननीय लोकनायक मा. श्री. अणे, गव्हर्नर, बिहार	६–१–५१	नागपूर विश्वविद्यालया-चें दीक्षांत सभागृह	तरुण भारत, ७–१–५१
१६ श्री. पु. का. देशमुख, शिक्षणमंत्री, म. प्र.	४–४–५४	सिटी कॉलेज	" ११–४–५४
१७ प्रा श्री. मा माटे	६–२–५५	विदर्भ साहित्य मंदिर	

टीप :– १. १९४३, १९५०, १९५२ व ११५३ चे वार्षिकोत्सव झाले नाहीत.

२. प्रा. कृ. पां. कुळकर्णी यांनी उत्सवप्रसंगीं "मराठ्यांच्या उत्कर्षापकर्षाची मीमांसा" हा आपला विस्तृत व उत्कृष्ट निबंध छापूनच आणला होता व तो तीन विभागांत 'महाराष्ट्रां'त प्रसिद्ध झाला.

परिशिष्ट—आ

मंडळाच्या सभांत वाचलेले लेख *

क्रमांक	विषय	लेखक	वाचनाचा दिनांक	प्रसिद्धि स्थळ
	वर्ष १९३४			
१	खामखेड येथील ताम्रपट	प्रा. वा. वि. मिराशी	१४–१–३४	महा., २१–१–३४
२	चौदाव्या शतकांतील एक अपूर्व गद्यग्रंथ (स्मृतिस्थळ)	कै ह. ना. नेने	२५–३–३४	
३	चन्द्रगुप्त विक्रमादित्य व चतुर्थ गोविंद	प्रा वा. वि. मिराशी	८–४–३४	इं. हिं. क्वा, पु. १०, पृ ४८
४	भोसल्यांच्या इतिहासावर नवा प्रकाश (आप्पासाहेबाचा अहवाल)	श्री. श. गो. चट्टे	१६–७–३४	महा. २२–७–३४
५	महानुभावपंथ व टीकाकार	कै. पं. बाळकृष्ण शास्त्री	२४–७–३४	महा. २९–७–३४
६	शय्यापालन प्रमेय	कै. प्रा नां. ब. भवाळकर	२०–८–३४	
७	वैदिक नदी सरस्वती	वि भू. कृष्णशास्त्री घुले	२५–११–३४	घुले–लेखसंग्रह
	वर्ष १९३५			
८	ध्रुवचरित्राचा कर्ता कोण–चिंतामण कीं उद्धव चिद्घन ?	कै. दा. के. ओक	१४–१–३५	महा. २४–२–३५
९	हिंदुस्थानी सुदामचरित्राचा कर्ता कोण ?	”	”	”
१०	गागाभट्टकृत समयनय	प्रा. द. वा. पोतदार	”	”

* सांपडलीं तीं प्रकाशनस्थलें दिलीं आहेत.

खालील संक्षेप योजिले आहेत––

इं. हि. क्वा. = इंडियन् हिस्टॉरिकल क्वार्टर्ली.

सं. मु. = संशोधनमुक्तावलि, सर पहिला.

नि. नि. = निवडक निबंध, भाग पहिला.

ए. इं. = एपिग्राफिया इंडिका.

ज. न्यु. सो. इं = जर्नल ऑफ दि न्युमिस्मॅटिक सोसायटी ऑफ इंडिया.

महा. = ‘ महाराष्ट्र ’, नागपूर.

त. भा. = ‘तरुण भारत’, नागपूर.

का. = कात्रण (संस्थेच्या दप्तरीं असलेलें).

११ भवभूतीचें जन्मस्थान	प्रा. वा. वि. मिराशी	,,	सं. मु., पृ. ७७
१२ प्राचीन महाराष्ट्राच्या चतु:सीमा	कै. ह. ना. नेने	,,	नि. नि., पृ. ८६
१३ राणी लक्ष्मीबाईच्या चरित्रांतील कांही तारखा	श्री. गो. चिं. तांबे	,,	
१४ शरीराच्या प्रमाणबद्धतेच्या कल्पनेचा विकास	कै. डॉ. कोकडेंकर	,,	महा., ७-४-३५
१५ ज्ञानेश्वर आणि वामन पंडित	डॉ. शं. दा. पेंडसे	२५-४-३५	महा., २८-७-३५
१६ भास्करभट्टाच्या शिशुपालवधाचा काळ	डॉ वि. भि. कोलते	२४-७-३५	महा., २८-७-३५
१७ देवटेक येथील अशोक व वाकाटक यांच्या काळच्या लेखांवर नवीन प्रकाश.	प्रा. वा. वि. मिराशी	१-१२-३५	महा. ८-१२-३५ (ओ कॉ. रि., सन १९३५, पृ ६१३)

वर्ष १९३६

१८ महाभारताची रचना	डॉ. के. ल. दप्तरी	१४-१-३६	
१९ अनंतव्रताचा लेखक शिरूरकर कोण ?	कै. दा. के. ओक	,,	
२० मोरोपंताच्या रचनेचे विशेष	,,	,,	
२१ पाणिनीय व्याकरणांतील वर्णमाला	प्रा. स. प्र. चतुर्वेदी	,,	
२२ माहुरझरीचा ॲम्युलेट	श्री. सबूर	,,	
२३ सागरचे सुभेदार विनायकराव चांदोरकर यांची गढामंडल्यावरील मोहीम	श्री. गो. चिं. तांबे	,,	
२४ मंडळाच्या संग्रहांतील नाण्यांचें वाचन	श्री. शं. गो. तट्टे	,,	महा., का. महा, १०-५-३५
२५ एक जुना ग्रंथ	,,		
२६ बैतुल येथील वाकाटकांचा ताम्रपट	प्रा. वा. वि. मिराशी	१२-२-३६	ए. इं., पु. २३, पृ. ८३
२७ महानुभावीय वाङ्मयाचें संशोधन	कै. पं. बाळकृष्ण शास्त्री	१६-२-३६	
२८ एक अप्रसिद्ध महानुभावीय ग्रंथ-दृष्टान्तपाठ	कै. ह. ना. नेने	९-५-३६	
२९ विवेकसिंधुकार मुकुंदराज यांचे आजे गुरु हरिनाथ यांची अद्ययावत् परंपरा	डॉ. य. खु. देशपांडे	२७-२-३६	नि. नि., पृ. ७८

वर्ष १९३७

३० इंग्रजी अमलापूर्वीचा वैदर्भीय ग्रंथकार-नी. ल. सरमोकादम	डॉ. य. खु. देशपांडे	१४-७-३७	
३१ बाजीराव पेशवे यांची महत्त्वाकांक्षा	श्री. ग. ह. खरे	,,	महा., २६-६-३७ व ४-७-३७

३२ मुकुंदराजाचा कालनिर्णय	प्रा. रा. म. भुसारी	,, सह्याद्रि, जुलै १९३७
३३ पाणिनीय शब्दभांडार	प्रा. स. प्र. चतुर्वेदी	१४-७-३७
३४ राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविंद याचा अंजनवती ताम्रपट	श्री. ल. रा. कुळकर्णी	,, ए. इं., पु. २३, पृ ८
३५ नागपूरकर भोसल्याचें एक अप्रसिद्ध आशीर्वचन	श्री. बाभ्रडकर	,,
३६ दक्षिण कोसलची प्राचीन राजधानी	प्रा. वा. वि. मिराशी	,, विहंगम, आक्टोबर १९३७
३७ वैद्य घराण्यांतील वकीलात	श्री. शं. ल. वैद्य	,,
३८ रघुनाथ पंडितांचा काळ	श्री. दा. के. ओक	,,
३९ मध्यप्रांतांतील एक नवीन ताम्रपट	प्रा. वा. वि. मिराशी	२५-७-३७ द. म. इ. सा., खं. ३, पृ ५७
४० शतकत्रयाचा कर्ता	प्रा. मा. गो. देशमुख	२४-७-३७ महा, २८-११-३७
४१ वेदांतील मित्र व अमित्र	पं कृष्णशास्त्री घुले	२८-११-३७ पं घुले लेखसंग्रह
४२ आज्ञापत्राचा कर्ता कोण ?	प्रा. श्री. ना. बनहट्टी	,,

वर्ष १९३८

४३ रामटेक येथील लक्ष्मणाचे देवळांतील लेख	श्री. ल. रा. कुळकर्णी	१६-१-३८
४४ पाणिनिकालीन समाजस्थिति	प्रा स. प्र. चतुर्वेदी	,,
४५ ऐतिहासिक व्यक्ति व त्यांचीं चरित्रें	श्री. गो. चिं. तांबे	,,
४६ पौनी येथील भारवंशी भगदत्त याचा शिलालेख	प्रा. वा. वि मिराशी	,, ए इं., पु २४., पृ. ११
४७ महाराष्ट्राचा इतिहास व कानडी साधनें	श्री. ग. ह. खरे	,,
४८ सोळाव्या शतकांतील अध्ययन व अध्यापन पद्धतीचा नमुना	कै. ह. ना. नेने	,,
४९ महाकोशलांतील गजलक्ष्मी मुद्रा (इंग्रजी)	पं. लोचनप्रसाद पांडे	,,
५० मणिराम कविकृत शृंगारमंजरी	प्रा. मा. गो. देशमुख	,,
५१ Chanakya, the Great Chancellor	डॉ. ह. च. सेठ	१९-२-३८
५२ मेघदूतांतील झाडांचीं मराठी नांवें	डॉ. द. वा. कठाळे	२७-३-३८
५३ उद्धवचिद्घन व रघुनाथ पंडित यांचा काळ	श्री. दा. के. ओक	१०-४-३८
५४ पाणिनीय अष्टाध्यायीचें मूळ स्वरूप	प्रा. सं. प्र. चतुर्वेदी	
५५ वामन पंडितांचे गुरु कोण ?	श्री. दा. के. ओक	२१-९-३८
५६ एक विनोदी महानुभावी काव्य	श्री. ह. ना. नेने	,,

वर्ष १९३९

५७ लोणार व त्याच्या सभोंवारचा भाग	श्री. ह. ना. नेने	२२-१-३९
५८ मुक्तेश्वराविषयीं कांही अप्रसिद्ध माहिती	श्री. दा. के. ओक	,,
५९ लक्ष्मीप्रसाद कविकृत गजेंद्रमोक्ष	श्री. ल. रा. कुळकर्णी	,,
६० द्वितीय प्रवरसेनाचा बेळोरा येथील ताम्रपट	प्रा. वा. वि. मिराशी	,, ए. इं, पु. २४, पृ. २६०
६१ अत्रें-आणे अणे-व्युत्पत्ति व मीमांसा	डॉ. या. श्री. अणें	,,
६२ रामदेवराव यादवाच्या काळचा एक नवीन ताम्रपट	प्रा. वा. वि. मिराशी	,,

वर्ष १९४०

६३ (अ) वामन पंडित कृत कर्मतत्त्व	श्री. दा. के. ओक	२५-२-४०	महा., २१-२-४०
६३ (ब) मंगळवेढ्याचा संत दामाजी पंत	श्री दा. के. ओक	,,	,,
६४ नागपूरकर भोसल्यांची सेनाधुरंधर पदवी	श्री. वा. ना. देशपांडे	,,	महा., २१-४-४०
६५ महाकोशलांतील एक प्राचीन राजवंश	प्रा. मिराशी	,,	भा. इ. सं. मं. त्रै., पु. २०, पृ. ९
६६ एक महानुभावीय करुण काव्य-नरविलाप स्तोत्र	ह. ना. नेने	,,	,,
६७ वर्धा जिल्ह्याचा गॅल्या शतकाचा आर्थिक इतिहास	श्री. राजाभाऊ काटे	,,	,,
६८ नागपूर प्रांताच्या इतिहासाचीं साधनें	श्री. शं. ल. वैद्य	,,	,,
६९ Totemism among Gond tribes of the Central Provinces	प्रा. बुरडकर	,,	,,
७० काला पहाड	श्री. जी. व्ही. भावे	,,	,,
७१ इत्सिगच्या प्रवासवर्णनांतील एका संस्कृत व्याकरण ग्रंथाचा निर्णय	प्रा. स. प्र. चतुर्वेदी	,,	,,
७२ 'बलाका' शब्दाचा अर्थ	डॉ. द. वा. कठाळे	,,	,,
७३ ज्ञानेश्वरींतील रेखासंज्ञेचा विचार	प्रा. मा. गो. देशमुख	,,	२५-२-४२
७४ Sociological Significance of the Statecraft of Shivaji	प्रा. श्री. ना. बनहट्टी	,,	,,
७५ महानुभावांच्या साती ग्रंथातील एक काव्य-सह्याद्रिवर्णन	श्री. ह. न. नेने	,,	,,
७६ मेघदूतांतील पाठ-आषाढस्य प्रथम-दिवसे, कीं प्रशमदिवसे ?	वि. भू. कृष्णशास्त्री घुले	१८-१२-४०	नि. नि., पृ. १५

वर्ष १९४१

७७ कालिदासाच्या मेघदूतांतील आम्रकूट व क्रौंचरंध्र हीं स्थानें	डॉ. कठाळे.	१२-१-४१	
७८ Gond Exogamy	प्रा. बुरडकर	,,	सारांश कार्यालयांत
७९ वाकाटकांचा जाब येथील ताम्रपट	प्रा. मिराशी	,,	भा. इ. सं. त्रै., पु. २३ पृ. ११
८० यज्ञश्री सातकर्णीचें एक नवीन नाणें	श्री. ल. रा. कुळकर्णी	,,	
८१ कालिदासाच्या रघुकुमाराचें पौर्वापर्य	वि भू. कृष्णशास्त्री घुले	,,	
८२ केशवस्वामी भागानगरकरांचें चरित्र व मुक्तेश्वरकृत अहिरावण–महिरावणाख्यान	श्री. दा. के. ओक	,,	
८३ प्राचीन महानुभावीय ग्रंथातील स्त्री-नामें	प्रा. श्री. ना. वनहट्टी	१२–१–४१	
८४ चांदा येथील जुन्या इमारती	श्री. शं. गो. चट्टे	,,	
८५ यादवकालीन पैठण	श्री. ह. ना. नेने	,,	
८६ मराठी संतवाङ्मयांतील साहित्यविषयक कल्पना	प्रा. मा. गो. देशमुख	२३–३–४१	
८७ Single Transferable Vote.	श्री. श. वा. रनडे	१६–१०–४१	
८८ परमारनृपति जगद्देव याचा शिलालेख	प्रा. मिराशी	२१–१०–४१	ए. इं., पु. २६, पृ. १७७
८९ Cross-cousin marriage among Gonds	प्रा. बुरडकर	६–११–४१	
९० आष्टी येथील मोगलकालीन इमारती व भोसल्याच्या गढामंडळा येथील राजवटीचें एक चित्र	श्री. आनंदराव जाशी	,,	

वर्ष १९४२

९१ Some unknown details of the situation in 1857–58 handled by Rao Raja Sir Dinkarrao Rajawade.	श्री. गो. चि. तांबे	१८–१–४२	
९२ पौर्वात्य राष्ट्रांतील पितृपूजा व तिचा सामाजिक आचारविचारांवर परिणाम	प्रा. दि. का. गर्दे	,,	
९३ कवींद्राचार्य सरस्वती	श्री. तामस्कर	,,	

९४ तीन कालिदास	विद्वद्रत्न के. ल. दप्तरी	१८–१–४२	नि. नि, पृ ५
९५ मेघदूतावरील ४५ टीकाकार	डॉ. द. व. कठाळे		,,
९६ लंडनच्या संग्रहांतील नागपूरकर भोसल्यांची माहिती	आनंदराव जोशी		,,
९७ (अ) विवेकसिंधुकार मुकुंदराज हे मराठीचे आद्य कवि नव्हत (ब) रामटेक येथील मैराल कवीविषयीं माहिती	श्री. दा. के. ओक		,,
९८ महानुभावपंथ व गुरुपरंपरा	श्री. ह. ना. नेने	१२–७–४२	
९९ नांदगाव येथील खंडेश्वराच्या देवळां तील कृष्णदेव यादवाच्या काळचा शिलालेख	प्रा. मिराशी	२६–७–४२	
१०० मध्यप्रांत सरकारचा दप्तरखाना	प्रा. श्री. ना. बनहट्टी	२७–९–४२	
१०१ आंजी (चांदोरी), जि. वर्धा, येथील रुक्मिणी व वत्सला स्वयंवरांच्या पोथ्या	श्री. आनंदराव जोशी	२८–१२–४२	
१०२ संतोषमुनिकृत आम्राख्यान– विनोदी महानुभावीय काव्य –१५ वें शतक	श्री. ह. ना. नेने	२८–१२–४२	

वर्ष १९४३

१०३ गुंजीगांवचा (सक्ती संस्थान) कुमारवरदत्त याचा प्रस्तरलेख	प्रा. मिराशी	३१-१-४३	ए. इं., पु. २७, पृ, ४३
१०४ अथर्ववेदांतील भैषज्यज्ञान	श्री. करंबेळकर		,,
१०५ कै. काळे यांचे संग्रहातील एका अप्रसिद्ध ग्रंथाचा परिचय	श्री. दा. के. ओक		,,
१०६ Identity of the Bhrigus and Angirases.	श्री. करंबेळकर		,,
१०७ एकनाथकालीन कवि महालिंगदास याचे पंचोपाख्यान (ओवीबद्ध मराठी पंचतंत्र)	श्री. ह. ना. नेने		,,

वर्ष १९४४

१०८ चाल्हण कवीचा शिष्य नृसिंह याचें रुक्मिणीस्वयंवर	श्री. ह. ना. नेने
१०९ E. I. Co.'s first envoy at Nagpur Raja's Court	प्रा. श्री. ना. बनहट्टी
११० आपदेवपुत्र अनंतदेवकृत एक अज्ञात नाटक.	प्रा. मा. गो. देशमुख

११ Handling of Situation in 1857-58 by Shivrao Bhaoo Reshimwale.	श्री. गो. चि तांबे	
१२ 'ध' चा 'मा' ही एक काल्पनिक कथाच आहे.	श्री. दा. कै. ओक	
१३ मानपूरचे राष्ट्रकूट	प्रा. मिराशी	१०-९ ४४ भा. इ. त्रै., पु. २८, पृ. १
१४ Administration in Municipal Finance	डॉ. चिं. द. दाते	

वर्ष १९४५

१५ Chief political divisions of India in 8th Cent. A. D.	Dr. H.L. Jain	२८-१-४५
१६ विदर्भातील संशोधनाचें एक पान	डॉ. य. खु. देशपांडे	,,
१७ खानदेशाचा एक प्राचीन राजवंश	म. म. मिराशी	,,
१८ वाल्मीकी रामायणांतील सुटलेले भाग; 'ख' आकाश इ समानार्थी शब्दांचा पर्वताचा शिरोभाग या अर्थी प्रयोग; शालकटंकटाचा अर्थ.	डॉ. द. वा. कठाळे	,,
१९ संशोधनाची एक नवीन दिशा	प्रा. श्री ना. बनहट्टी	,,
२० नागपुरांतील पुरातन वाडे, बागबगीचे व तळीं	दे गो लांडगे	१-४-४५ महा., १५-४-४५ २६-४-४५व २९-४-४५
२१ मराठ्यांचा एक अद्वितीय पण अप्रसिद्ध पराक्रम	श्री दा. के. ओक	,,
२२ १४ व्या शतकांतील एक महानुभावी काव्य- नवरस नारायण	श्री. ह. ना. नेने	२२-९-४५ युगवाणी, मे, १९४६
२३ वाकाटक साम्राज्याचा ऱ्हास.	प्रा. मिराशी	९-१२-४५
२४ ज्ञानेश्वरींतील त्रिशंकु पदाचा अर्थ	श्री. ह. ना. नेने	,,

वर्ष १९४६

१२५ कनिष्काचा काळ	डा. के. ल. दप्तरी	१४-१-४६
१२६ सातवाहन राजाचें एक नाणें	म. म. वा. वि. मिराशी	,, ज. न्यू. सो. इं, पु ८, पृ १५
१२७ ज्योतिषी इतिहासकार व काव्यशास्त्री यांपुढील एक समस्या	डॉ. हिरालाल जैन	,,
१२८ श्री. चक्रधराचा कालनिर्णय	प्रा वि. भि. कोलते	,,
१२९ लीळाचरित्राचे आधारें नाथपंथावर नवीन प्रकाश	श्री. ह. ना. नेने	,,
१३० गाथासप्तशतीचा काळ	म. म. मिराशी	३-३-४६ युगवाणी, एप्रिल, ४७

१३१	एक प्राचीन वैदर्भीय राजवंश	"	२०-७-४६
१३२	नागपूर म्युनिसिपालिटीच्याद्वारे नागपूरची प्रगति (इंग्रजी), (दोन वाचनांत)	दे. गो. लांडगे	२९-८-४६ १-९-४६
१३३	उपनिषदांचा बुद्धिग्राह्य अर्थ	डॉ. के. ल. दप्तरी	

वर्ष १९४७

१३४	प्राचीन वाङ्मयाधारें ज्ञानेश्वरीच्या एका ओवीचा अर्थ	श्री. ह. ना. नेने	२६-१-४७
१३५	नागपुरांतील गेल्या शतकांतील मल्लविद्या	श्री. दे. गो. लांडगे	"
१३६	सातकर्णीचें एक शिशाचें नाणें	म. म. मिराशी	" ज. न्यू. सो.इं., पु ११, पृ ५७
१३७	नागपुरांतील गेल्या शतकांतील (अ) वैदिक,शास्त्री व पंडित (पूर्वार्ध) (ब " (उत्तरार्ध)	दे. गो. लांडगे "	१६-२-४७ नि. नि. २-३-४७
१३८	भवभूतीचा कालप्रियनाथ	म. म. मिराशी	७-९-४७ युगवाणी, नोव्हें डिसें. १९४७
१३९	नागपुरांतील हिंदु मंदिरें	दे. गो. लांडगे	१९-१०-४७ हितवाद, २६-६-४८ (इंग्रजी)
१४०	समर्थांच्या राष्ट्रसेवेचे तीन विशेष	प्रा. दि. का. गर्दे	१४-१२-४७

वर्ष १९४८

१४१	व्यासांची शंकराचार्यांवर फिर्याद	डॉ. के. ल. दप्तरी	१-२-४८ नि.नि., पृ. १
१४२	आंध्र देशांतील एक ब्राम्हण राजवंश	म. म. मिराशी	"
१४३	लीळाचरित्रावरून महानुभावीय मठांचे अंतरंग	प्रा. दि. का. गर्दे	"
१४४	पोर्तुगीज वाङमयांत समर्थांचा उल्लेख	"	"
१४५	भास्करराम कोल्हटकर	श्री. दे. गो. लांडगे	"
१४६	देवनागरींतील मूळाक्षरें	श्री. श वा. रानडे	८-८-४५
१४७	दशावतार व उत्क्रान्तिवाद	श्री. स. ना. कुळकर्णी	५-१२-४८
१४८	भोंसले शाहींतील कर्तृत्ववान पुरुष : विठ्ठल बल्लाळ व गणपत विठ्ठल सुभेदार	श्री. दे. गो. लांडगे	२६-१२-४८ त. भा, जाने. ४७

वर्ष १९४९

१४९	पाणिनीय व्याकरणांतील कांही दोष	म. म. कृष्णशास्त्री घुले	१६-१-४९ नि. नि., पृ. ५६
१५०	स्वामि राजाचा नगरधन येथील ताम्रपट	म. म. मिराशी	६-३-४९ द म. इ.सा., खंड ३, पृ. १०९

१५१	संस्कृत व्याकरण संप्रदायोंमें दश लकारोंका मूलक्रम तथा प्रयोग	प्रा स. प्र. चतुर्वेदी	७-३-४९	
१५२	ज्ञानेश्वराच्या पहिल्या अध्यायांतील षड्दर्शन रूपक	डॉ. वि. ना. पंडित	,,	
१५३	लक्ष्मोबाईच्या चरित्रांतील एक विवाद्य घटना	श्री गो. चिं. तांबे	,,	
१५४	नागपूरचे गंगाधरशास्त्री मंग्रुळकर यांचे संस्कृत अप्रकाशित ग्रंथ	डॉ. करंबेळकर	,,	
१५५	गंगाधर शास्त्री मंग्रुळकर यांचें जीवन-चरित्र व ग्रंथ	श्री. दे. गो. लांडगे	,,	
१५६	नागपुरांतील काळू घराणीं	,,	६-११-४९	
१५७	,,	,,	१३-१२-४९	
१५८	शकसंवताचा दक्षिणेंतील प्रसार	म. म. वा. वि. मिराशी	२७-११-४९	इं. डि. क्वा., पु. २६, पृ. २१६
१५९	पालकाप्य ऋषीच्या हस्त्यायुर्वेदांतील चूर्ण	डॉ. द. बा. कठाळे	४-१२-४९	
१६०	मंग्रूळपीर की मंग्रुळपूर	श्री. ह. ना. नेने	११-१०-४९	

वर्ष १९५०

१६१	गुंजी येथील कुमारवरदत्त याचा प्रस्तर लेख	म. म. वा. वि. मिराशी	१०-९-५०	ए. इ., पु. २७, पृ. ४८
१६२	नाशिक गोवर्धनचा जैतपाल पाटील डाकूचा साव बनला	श्री. ह. ना. नेने	२७-९ ५०	
१६३	नागपूर प्रांतांतील भोसलेशाहींतील व नंतरच्या ख्रिस्तो मिशनऱ्यांचें कार्य	श्री. दे. गो. लांडगे	३१-१२-४९	

वर्ष १९५१

१६४	घटोत्कच लेण्यांतील वाकाटककालीन कोरीव लेख	म. म. वा. वि. मिराशी	७-१-५१	भा इं. सं. मं. त्रै., पु. ३१, पृ. १
१६५	भारतीय संतसाहित्याचीं भाषा	प्रा. भ. श्री पंडित	,,	
१६६	कंसवहो–एक अपरिचित प्राकृत काव्य	श्री. ल. रा. कुळकर्णी	,,	
१६७	Some striking characteristics & personages of Marathi States in Bundhelkhand in 19th Cent.	श्री. गो. चिं. तांबे	,,	
१६८	१८ व्या शतकांतील उत्तराखंतील महानुभावांचीं दोन पत्रें	प्राचार्य ह. ना. नेने	,,	

१६९	वैदिक त्वष्टा आणि अवैदिक त्रिशतर यांचें एकत्व आणि त्यावरून होणारा बोध	श्री. भा. र. कुळकर्णी ७-१-५१
१७०	नल-दमयंती आख्यानांतील एका श्लोकाचा अर्थ	श्री. श्री. मा. कुळकर्णी ,,
१७१	नागपुरांतील कीर्तनकार	श्री. दे. गो. लांडगे २-९-५१
१७२	गुप्तसम्राट् समुद्रगुप्त यांचें कृष्णचरित काव्य	म. म. मिराशी २१-१०-५१ त. भा. दिवाळी अंक १९५२

वर्ष १९५२

१७३	भासकृत यज्ञफल नाटकाची समस्या	म. म वा. मिराशी ६-९-५२ नवभारत, जानें. १९५२
१७४	पूर्वपाणिनीय व्याकरण	प्रा. स. प्र. चतुर्वेदी ६-११-५२

वर्ष १९५३

१७५	मध्यप्रदेशांतील गेल्या २० वर्षांतील प्राचीन इतिहासाचें संशोधन	म. म. मिराशी ५-४-५३ प्रस्तुत पुस्तक
१७६	वाकाटकांच्या राजधान्यांचीं शहरें	श्री. अ. ज. राजूरकर ११-७-५३ लेख कार्यालयांत आहे
१७७-१८१	भोसले राज्योत्तरकालीन नागपुरांतील महत्वाच्या व्यक्ति (पांच लेख)	श्री. दे. गो. लांडगे १५-७-५३; २९-७-५३; ५-८-५३; १३-८-५३; १९-८-५३
१८२	मध्यप्रदेशांतील मध्ययुगीन व अर्वाचीन इतिहासाचें संशोधन	दे. गो. लांडगे ५, १३ आणि १९ ऑगस्ट १९५३

वर्ष १९५४

१८३	माझ्या भारतीय शिल्पशास्त्राच्या अभ्यासाचीं साधनें	श्री. गो. ग. जोशी २०-१-५४ त. भा. १२-२-५४
१८४	श्लेष अलंकाराची मीमांसा	डॉ. मा. गो देशमुख ५-४-५४
१८५	सुगम्य मतदान पद्धति	श्री. श. वा. रानडे ,,
१८६	सांख्य नास्तिक आहेत काय?	डॉ. करंबेळकर ,,
१८७	सर्जेराव घाटगे	प्रा. कृष्णकुमार बुधोलिया ,,
१८८	नागपुरांतील ब्रह्मवृंद व त्यांचा प्रभुज्ञातीवरील रोष	श्री. दे. गो लांडगे ,,
१८९	झांशीच्या राज्यकर्त्यांची प्रजाहितदक्षता व त्यांच्यावर गुदरलेल्या आपत्ती	श्री. गो. चि. तांबे ,,
१९०	चक्रधराचा खून झाला काय?	प्रा. सुरेश डोळके ,,

वर्ष १९५५

१९१ चंदेल्ल नृपति वीरवर्मदेव याचें सोन्याचें नाणें	म. म, मिराशी	६–२–५५	
१९२ धर्माजी भोसल्याचा पोवाडा	श्री. दे गो. लांडगे	,,	युगवाणी सप्टे. १९५५
१९३ भाषाशस्त्रों के नियम और भारतीय भाषाओंकी विचित्रता	प्रा. स. प्र. चतुर्वेदी	,,	
१९४ राष्ट्रकूट नृपति तृतीय गोविंदाचा एक नवीन ताम्रपट	डॉ. वि भि. कोलते	६–३–५५	त. भा. १०–३–५५
१९५ मराठीतील सर्वांत प्राचीन हस्तलिखित	डॉ. मा. गो. देशमुख	३–४–५५	
१९६ अमरावतीकर भोसले घराणें	श्री दे. गो. लांडगे	९–१०५५	
१९७ प्रथम युवराजदेवाचा कारींतलाई शिलालेख	श्री. बालचद जैन	४–१२–५५	

परिशिष्ट- इ

व्याख्यानें *

क्रमांक विषय	वक्त्याचें नांव	दिनांक	प्रसिद्धिस्थल
१ नागपूरकर भोसल्यांचा इतिहास	श्री या. मा. काळे	४, ५ व ६ मार्च १९३४	महा, मार्च १९३४
२ संशोधन कसें करावे	,,		महा, २१-३-३४
३ वामन पंडितांची गीताटीका	प्रा. श्री. ना. बनहट्टी	१४–३–३४	महा, १८–३–३४
४ शिवाजी व समर्थ यांची भेट	श्री. ज. स. करंदीकर	१८–३–३४	महा. का.
५ लीलासंवादावर चर्चा	पं. बाळकृष्ण शास्त्री, प. कृष्ण-शास्त्री घुले इ.	जुलै १९३४	महा, २९–७–३४
६ श्रीचक्रधर आणि महानुभाव	प्रा. शं दा. पेंडसे	२३–९–३४	महा., ३८–९–३४
७ कालिदासाचा कालनिर्णय	श्री. पाळेकर अप्रबुद्ध	२५–२–३५	महा., १७–३–३५

* या सूचींत पुढील संक्षेप योजिले आहेत--
महा. = 'महाराष्ट्र', नागपूर; त. भा. = 'तरुण भारत', नागपूर;
का. = मंडळाच्या संग्रहीं असलेलें कात्रण.

८ प्राचीन संशोधन कसें करावें	डॉ. श्री. व्यं. केतकर	१५-९-३५	महा., २२-३-३५
९ भूषण कवीचें शिवचरित्र	श्री. काकासाहेब कालेलकर	१९३६	महा., का.
१० संशोधक कसा असावा	श्री. शं. श्री. देव	,,	महा., १८-१०-३६
११ छत्तीसगड प्रांतातील महाराष्ट्र	श्री. शेंडे	,,	
१२ भारतीय शिल्प	श्री. आ. रा. देशपांडे	,,	सदीप व्याख्यान
१३ मराठी भाषा व पाश्चात्य पंडित	डॉ. य. खु. देशपांडे	१६-७-३९	
१४ ब्राम्हणांच्या सांस्कृतिक इतिहासाचीं साधन	डॉ. या. श्री. अणे	२७-७-३९	
१५ भाषिक महाराष्ट्र	श्री. शं. रा. शेंडे	२-८-३९	
१६ विष्णुदासाची कविता	श्री. खर्शीकर शास्त्री	१९४०	
१७ भारतीय ऐतिहासिक परिषद् व प्राच्य-परिषद	प्रा. मिराशी व बनहट्टी	१७-१-४१	
१८ अखिल भारतीय शैक्षणिक पद्धति	प्रा. म. म. लिमये	५-२-४१	
१९ नागपूरच्या गेल्या शतकाचा इतिहास	श्री. दे. गो. लांडगे	२८-१-४५	त. भा., ११-२-४५
२० उपनिषदांचा बुद्धिग्राह्य अर्थ	डॉ. के. ल. दप्तरी	१९४६	
२१ गाथासप्तशतीचा काळ	म. म. कृष्णशास्त्री घुले	,,	
२२ ज्ञानेश्वरीचें तत्त्वज्ञान	पं. बाळकृष्णशास्त्री खुपेरकर	,,	
२३ परमार्थस्वरूपाची चर्चा; सोपकरण सप्रयोग	श्री. स. ना. कुळकर्णी	२२-८-४८	
२४ ज्ञानदेवोपासना	पं. बाळकृष्णशास्त्री खुपेरकर	१७-१-५१	
२५ ब्राम्हण समाजाची स्थित्यंतरें	श्री. श. गो. जोशी, धुळे	२१-३-५१	
२६ महाराष्ट्रांतील शाहिरी वाङ्मय व अध्यात्म	श्री. सहस्त्रबुद्धे, पुणे	६८-११-५१	
२७ जयपूर येथील भारतीय ऐतिहासिक परिषद	म. म. मिराशी व श्री. विं. प्र. रोडे	१२-१-५२	
२८ महाभारताचें संशोधन	डॉ. आनंद चैतन्य	७-६-५२	
२९ काशी, नालंदा व राजगृह इ. ऐतिहासिक स्थळांची माहिती	श्री. दे. गो. लांडगे	७-१२-५२	
३० दासोपंत व त्यांचें वाङ्मय	वे. शा. सं. अण्णाजी गोसावी	८-६-५३	
३१ विदर्भांतील यादवकालीन इतिहासाचीं साधनें	डॉ. य. खु. देशपांडे	२०-४-५५	

परिशिष्ट
सभासदांची

	१९३४	१९३५	१९३६	१९३७	१९३८	१९३९	१९४०	१९४१	१९४२	१९४३	१९४४
आश्रयदाते-संख्या	--	--	१	१	१	१	१	१	१	१	१
देय ५००रु. वर्गणी	--	--	२००रु.	--	--	--	--	--	--	--	--
साहाय्यक-संख्या	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
देय१०० रु. वर्गणी	--	--	--	--	--	--	--	--	--	--	--
आजीव-संख्या	--	--	१	३	४	४	४	४	५	५	६
देय ५० रु. वर्गणी १० रु. ५ हप्त्यांनी	--	--	५० रु.	६० रु.	२० रु.	३० रु.	२० रु.	४ रु.	२१ रु.	७० रु.	१० रु.
साधारण-संख्या	३२	३८	५९	७०	७१	६८	४४	४४	४१	३९	४०
वर्गणी	९६ रु.	९६ रु.	१५० रु.	१२६ रु.	८८ रु.	६४ रु.	७४ रु.	१३५ रु.	७८ रु.	७६ रु.	४५ रु.

–ई

संख्या व वर्गणी

१९४५	१९४६	१९४७	१९४८	१९४९	१९५०	१९५१	१९५२	१९५३	१९५४
१	१	१	१	१	१	१	१	१	१
—	—	—	—	१००रु.★	—	—	—	—	—
१	१	१	३	४	४	४	४	४	४
१००रु.	—	—	२००रु.	२०१रु.	—	—	—	—	—
६	६	६	७	७	११	१४	१५	१५	१६†
१० रु.	१० रु.	१० रु.	२० रु.	३० रु.	१५० रु.	१५१ रु.	२० रु.	१० रु.	७० रु.
४०	४६	२९	६२	६५	९८	१९६	१०८	९१	८९§
८६ रु.	११३ रु.	८२ रु.	१७८ रु.	१७५ रु.	२५८ रु.	२७४ रु.	२१९ रु.	२३८ रु.	२२३ रु.

★ बाकीचे फर्निचररुपाने दिले.

† आजीव सभासदांपैकी श्री. ओक हे १९४६ साली व श्री. नेने १९५४ साली वारल्यामुळे नवीन सभासद होऊनहि दोहोंच्या संख्येत घट झाली.

§ यांत कांहीनी आरंभी दिलें पण पुढें दिले नाही म्हणूनहि घट. हल्ली ८१ आहे.

दे. गो. लांडगे,

कार्यवाह, २८–४–५५

परिशिष्ट

सभासदांची

	१९३४	१९३५	१९३६	१९३७	१९३८	१९३९	१९४०	१९४१	१९४२	१९४३	१९४४
ाश्रयदाते–संख्या	—	—	१	१	१	१	१	१	१	१	१
देय ५००रु. वर्गणी	—	—	२००रु.	—	—	—	—	—	—	—	—
साहाय्यक–संख्या	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
देय१०० रु. वर्गणी	—	—	—	—	—	—	—	—	—	—	—
आजीव–संख्या	—	—	१	३	४	४	४	४	५	५	६
देय ५० रु. वर्गणी १० रु. ५ हप्त्यांनी	—	—	५० रु.	६० रु.	२० रु.	३० रु.	२० रु.	४ रु.	२१ रु.	७० रु.	१० रु.
साधारण–संख्या	३२	३८	५९	७०	७१	६८	४४	४४	४१	३९	४०
वर्गणी	९६ रु.	९६ रु.	१५० रु.	१२६ रु.	८८ रु.	६४ रु.	७४ रु.	१३५ रु.	७८ रु.	७६ रु.	४५ रु.

-ई

संख्या व वर्गणी

१९४५	१९४६	१९४७	१९४८	१९४९	१९५०	१९५१	१९५२	१९५३	१९५४
१	१	१	१	१	१	१	१	१	१
—	—	—	—	१००रु.★	—	—	—	—	—
१	१	१	३	४	४	४	४	४	४
१००रु.	—	—	२००रु.	२०१रु.	—	—	—	—	—
६	६	६	७	७	११	१४	१५	१५	१६†
१० रु.	१० रु.	१० रु.	२० रु.	३० रु.	१५० रु.	१५१ रु.	२० रु.	१० रु.	७० रु.
४०	४६	२९	६२	६५	९८	१९६	१०८	९१	८९§
८६ रु.	११३ रु.	८२ रु	१७८ रु.	१७५ रु.	२५८ रु.	२७४ रु.	२१९ द्र.	२३८ रु.	२२३ रु.

★ बाकीचे फर्निचर-रुपाने दिले.

† आजीव सभासदां-पैकी श्री. ओक हे १९४६ साली व श्री. नेने १९५४ साली वारल्यामुळे नवीन सभासद होऊनहि दोहोंच्या संख्येंत घट झाली.

§ यांत कांहींनी आरंभीं दिलें पण पुढें दिलें नाही म्हणूनहि घट. हल्ली ८१ आहे.

दे. गो. लांडगे,

कार्यवाह, २८–४–५५

परिशिष्ट–उ

उत्पन्न व खर्च

	१९३४	१९३५	१९३६	१९३७	१९३८	१९३९	१९४०	१९४१	१९४२	१९४३	१९४४	शेरा
उत्पन्न	९७	९६	५०३	११३	२२१	९९	१७८	२६०	१७६	१४८	११७	
खर्च	७६	४४	१४२	७०१	१८६	६०	८५	१५१	८५	४६	१५४	

	१९४५	१९४६	१९४७	१९४८	१९४९	१९५०	१९५१	१९५२	१९५३	१९५४	
उत्पन्न	२०३	१७६	८२	४५०	४४०	८१९	५०८	३०६	५१८	१३५९	खाणे व मोडून दिले.
खर्च	८१	१६४	९२	३८७	२९३	३५१	१३५	४६	३३३	१८५६	

दे. गो. लांडगे,

कार्यवाह

परिशिष्ट–ऊ

सभासदांची यादी

आश्रयदाते (५०० रु. देणारे)

१. डॉ. सर भवानीशंकर नियोगी,
एम्. ए., एल् एल्. एम्., एल् एल्. डी.
सेवानिवृत्त हायकोर्ट जज्ज, नागपूर, (मंडळाचे अध्यक्ष)

सहाय्यक सभासद (१०० रु. देणारे)

१. ना. मंगलदास पक्वासा, गव्हर्नर, मध्यप्रदेश, नागपूर.
२ प्रा. न. र. फाटक, मुंबई
३. डॉ. एन्. एम्. सहस्त्रबुद्धे एल्. एम्. एस्. नागपूर.
४. डॉ. शिंगणापूरकर, सेवानिवृत्त असि. सर्जन ,,

आजीव सभासद (५० रु. देणारे)

१. म. म. वा. वि. मिराशी, एम्. ए. ,,
२. श्री. दा. तु. मंगळमूर्ति, एल् एल्. एम्. ,,
३. प्राचार्य श्री. ल. पांढरीपांडे, एम्. ए. ,,
४. श्रीमन्त माधव नारायण घटाटे, सावकार, नागपूर, ,,
५. श्री. हरी गणेश आंबेकर, (हल्ली परिव्राजक, हृषीकेश) ,,
६. सर कृष्णाजी कुकडे, ,,
७. रा. ब. के. व. विडवाई, माजी दिवाण, देवास
८. श्री. गो. चि. तांबे नागपूर
९. सरदार व्यंकटराव गुजर, ,,
१०. प्रा. स. प्र. चतुर्वेदी एम्. ए. ,,
११. 'क्ष' ,,
१२. डॉ. मो. रा. चोळकर ,,
१३. श्री. रा. पु. सगदेव ,,
१४. श्री. ग. त्र्य. माडखोलकर ,,
१५. श्री. पां. ना. बनहट्टी ,,
१६. प्रा. माणिक के. बैतुले ,,

सन्मान्य सभासद

१. म. म. प्रा. दत्तो वामन पोतदार, पुणें
२. डॉ. य. खु. देशपांडे, एम्. ए., डी. लिट, यवतमाळ

साधारण सभासद

१.	डॉ. के. ल. दप्तरी, डी. लिट्., उपाध्यक्ष	नागपूर
२.	श्रीमंत मा. गं. चिटणवीस, बी. ए.	,,
३.	श्री. ल. रा. कुळकर्णी, एम्. ए., एल्. टी.	,,
४.	प्रा. पां. कृ. सावळापूरकर	,,
५.	रा. ब. के. वी. पळसुले, सेवानिवृत्त डि. अँड. से. जज्ज	,,
६.	श्री. दे. गो. लांडगे, बी. ए., एल्. टी., एल्.एल्. बी., (सर्टी.) ए. आय. आय. बी ,	नागपूर.
७.	श्री. शं. अ. साठे, एम्. ए., एलएल्. बी , ॲडव्होकेट	नागपूर
८.	डॉ. द. वा. कठाळे. एल्.एल्. एम्., एल्. एल्. डी.	,,
९.	श्री. म. ना. अमरावतकर, निवृत्त डि. अँड से. जज	,,
१०.	श्री. खं. ना. वाडेगांवकर	,,
११.	श्री. आ. रा. देशपांडे, एम्. ए. एल्. एल्. बी.	,,
१२.	प्रा. डॉ. मा. गो. देशमुख, एम्. ए., पी एच्. डी.	,,
१३.	प्रा. शु. प्र. तिवारी, एम्. ए., एल्.एल्. बी.	,,
१४.	डॉ वि. भि. कोलते, एम्. ए., पी एच्. डी.	,,
१५.	श्री. ना. दा. पेंडसे,	,,
१६.	श्री. शं. वा. रानडे, बी. ए.	,,
१७.	मीमांसाभूषण पु. वा. साठे, एल्.एल्. एम.	अकोला
१८.	श्री. गं. रा. देव	नागपूर
१९.	प्रा. दि. वि. वऱ्हाडपांडे, एम्. ए.	,,
२०.	डॉ. वा. गं. पांडे, एल्. एम्. पी.	,,
२१.	श्री. वि. प्र. रोडे, एम्. ए.	,,
२२.	श्री. हरि लक्ष्मण ढवळे	,,
२३.	श्री. वि. मा. वाईकर	,,
२४.	श्री. स. ना. कुळकर्णी, बी. ए., एल्. टी.	,,
२५.	रा. ब. भा. रा. चांदोरकर, सेवानिवृत्त, सिव्हिलसर्जन, एल्. एम्. अँड एस्., डी. टी. एम्.	,,
२६.	रा. र. दडिगे, बी. ए., एल्.एल्. बी., ॲडव्होकेट	,,
२७.	श्री. गो. ह. पुराणिक	,,
२८.	श्री. त्र्यं. ना. जोशी	,,
२९.	श्री. रा. भा. मिटकरी बी. ए.	,,
३०.	श्री. बापूसाहेब मुन्शी	,,

३१	रा. ब. दा. कृ. मोहनी, एम्. ए., एल्. टी.	नागपूर
३२	श्री. रा. गो. उबाळे, बी. ए.	,,
३३	,, पुरुषोत्तम दिवाकर ढवळे, संपादक, महाराष्ट्र	,,
३४	,, कृ. आ. पोटे, बी. ए. एल्. एल्. बी., ॲडव्होकेट	,,
३५	प्रा. श्री. मा. कुलकर्णी, एम्. ए.	,,
३६	रा. सा. के. डी. बॅनर्जी, बी. ए.	,,
३७	श्री. गो. के. वाळके	सावनेर
३८	,, का. कृ. गंधे, बी. ए. एल् एल्. बी., ॲडव्होकेट	नागपूर
३९	,, ग. ब. बक्षी	,,
४०	,, बाबासाहेब माटेगांवकर	,,
४१	,, प्रभातकुमार बॅनर्जी	,,
४२	,, बी. जी. भूत	,,
४३	,, ग. ना. मोहगांवकर	,,
४४	,, गो. आ. भोंसुले, बी. कॉम्.	,,
४५	,, व्ही. बी. नाईक बी. एस्. सी.	,,
४६	,, रा. गो. सालपेकर	,,
४७	,, अ. दा. ओक	,,
४८	प्रा. स. गो. सोमलवार, एम्. ए.	,,
४९	डॉ. या. ब. मंग्रूळकर, सेवा निवृत्त सि. सर्जन	,,
५०	प्रा. भ. श्री. पंडित, एम्. ए.	,,
५१	डॉ. हीरालाल जैन, एम्. ए डी लिट्,	,,
५२	प्रा. भा. ह. मुंजे, एम्. ए.	,,
५३	श्री. बा. ना. बक्षी	,,
५४	,, ग. नी. भवाळकर, बी. ए.	,,
५५	,, परमानंद भिशीकर, बी. ए.	,,
५६	,, आ. जी. उधोजी	,,
५७	श्री. बा. कृ. देव, बी. ए.	,,
५८	,, राजाभाऊ डांगरे	,,
५९	,, शं. दि. फाटक, सेवानिवृत्त डि. ॲंड से. जज	,,
६०	डॉ. शं. दा. पेंडसे, एम्. ए., पीएच्. डी.	,,
६१	श्री. पी. आर. साठे, सेवानिवृत्त डि. जज,	नागपूर
६२	,, भास्करराव करंदीकर,	,,
६३	,, रा. ब. भाऊसाहेब खळतकर	,,
६४	,, डॉ. ल. गो. जोशी, एम्. ए. पी. एच्. डी.	,,

कार्य केलें आहे, त्या कार्याने त्यांना आंतरराष्ट्रीय महत्त्व मिळवून दिलें आहे. आपल्या प्रदेशांतील विद्यापीठांनी त्यांच्या कार्याचा गौरव करावयास पाहिजे. दुसऱ्या शाखांतील लेखकहि आपल्या क्षेत्रांत चांगले प्रथितयश आहेत.

प्रस्तुत ग्रंथाच्या प्रकाशनाने मध्यप्रदेशांतील संशोधन कार्याची प्रगति अजमाविण्यास उत्तम सोय झाली आहे, आणि त्या त्या क्षेत्रांत पदार्पण करणाऱ्यास तें एक उत्तम साधन झालें आहे.

विशेष समाधानाची गोष्ट ही कीं मध्यप्रदेश सरकार, आणि सागर व नागपूर विद्यापीठें यांचेंहि लक्ष या संशोधन क्षेत्रांकडे वळलें आहे. दोन्ही विद्यापीठांनी पुरागवस्तुसंशोधनाकरितां कार्यारंभ केला आहे. विदर्भ आणि महाकोसल यांचा इतिहास फार प्राचीन आहे. हे देश प्राचीन अवशेषांनी समृद्ध आहेत. आमचे तरुण या योजनांचा आणि साधनांचा फायदा घेऊन या क्षेत्रांत अहमहमिकेनें भाग घेतील आणि या क्षेत्रांत ज्यांनी यापूर्वी कार्य केलें त्यांची परंपरा पुढें चालवितील अशी आशा आहे. अशा उत्साही तरुणांना प्रस्तुत ग्रंथ निःसंशय स्फूर्तिदायक होईल असा मला विश्वास आहे.

शारदाश्रम, यवतमाळ,
ता. १५-१२-५५

यशवंत खुशाल देशपांडे

मध्यप्रदेश संशोधन मंडळ
स्वीय व पुरस्कृत ग्रंथ

१ नागपूरकर भोसल्यांची बखर
विदर्भातील नामवंत इतिहासकार **कै. यादव माधव काळे** यांनी संपादलेली द्वितीयावृत्ति, किंमत अडीच रुपये.

२ दृष्टान्तपाठ (यादवकालीन मराठी गद्य प्रबंध)
लेखक--**कै. नी. ब. भवाळकर व कै. ह. ना. नेने**
(शिल्लक नाही.)

३ निवडक निबंध, खंड १
कै. म. म. कृष्णशास्त्री घुले, कै. नी. ब. भवाळकर, डॉ. दफ्तरी, म. म. मिराशी, कै. ह. ना. नेने, डॉ. य. खु. देशपांडे, व श्री. दे. गो. लांडगे यांच्या विविध विषयांवरील संशोधनपर लेखांचा संग्रह.
किंमत दीड रुपया.

४ नागपूरचा सांस्कृतिक इतिहास
भोसल्यांच्या राज्यस्थापनपासून सुमारें दीडशें वर्षांचा नागपूरच्या सांस्कृतिक इतिहासाचा सर्वांगीण परामर्श.
लेखक--**श्री. दे. गो. लांडगे** किंमत दोन रुपये.

५ संशोधन मुक्तावली, सर पहिला
या ग्रंथांत कालिदास, भवभूति, सर्वसेन, प्रवरसेन इत्यादि संस्कृत व प्राकृत कवींविषयीं आणि सातवाहन, गुप्त, वाकाटक, कलचुरि इत्यादि प्राचीन राजवटींविषयीं नवीन माहिती आहे.
लेखक--**म. म. प्राचार्य वा. वि. मिराशी** किंमत चार रुपये.

प्राप्तिस्थान-- **१ चिटणीस, मध्यप्रदेश संशोधन मंडळ,**
विदर्भ साहित्य मंदिर, नागपूर-१.
२ डेनेट आणि कंपनी, सीताबर्डी, नागपूर-१.